# टॅली हो द फॉक्स!



## जगाचा दृष्टान्त पाहणारे, जगावर प्रभाव पाडणारे निवनिर्माणक्षम शिष्य तयार करणे

हर्ब हॉजेस

# प्रस्तावना

अमेरिकेतील सर्वसाधारण ख्रिस्ती मंडळीमधील सभासदांचे फार मोठा उपेक्षित असा ''कामगार सेवक वर्ग'' आहे. ख्रिस्ताने घालून दिलेल्या सेवा-सेवक यांचा दंडक लक्षात घेता सर्वसाधारण ख्रिस्ती व्यक्ती बहुधा बेकार म्हणजे तिच्या क्षमतेपेक्षा कितीतरी कमी काम करणारी असते. असा ख्रिस्ती माणूस सतत कहीतरी करत असतो, कधी रिकामा नसतो. पण त्याच्या कामाची फलप्राप्ती जवळजवळ शून्यच असते. लोकांशी संपर्क साधणे, त्यांना सेवेसाठी सज्ज करणे अशी कामे होतच नाहीत. सर्वसामान्य ख्रिस्ती मंडळी दर रविवारी ''प्रेक्षागृहात'' एकत्र जमते. मंडळीचे सभासद व्यक्तिशः प्रेक्षक व श्रोते असतात, ते ऐकणाऱ्या प्रेक्षक-श्रोत्यांच्या समुदायाचा एक भाग असतात. थोडक्यात काय तर सर्वसामान्य ख्रिस्ती मंडळीत आसनांवर बसून राहणाऱ्या सभासदांची एकच गर्दी असते. उपासनामंदिरात यायचे, उपदेश ऐकायचा आणि निघून जायचे एवढाच त्यांचा उद्देश असतो. असा क्रम ठेवला म्हणजे त्यांचा जीवात्मा खाजगीपणे स्वर्गात नेला जाईल आणि ती वेळ येईपर्यंत आरामशीर जीवन जगता येईल असे त्यांना वाटते. या प्रकारची जीवनशैली आणि नव्या करारामध्ये दाखवलेले ख्रिस्ती जीवन यांमध्ये काही साम्य आढळलेच तर तो निव्वळ योगायोग समजावा.

मला एक गोष्ट स्पष्टपणे समजली आहे. आम्ही ख्रिस्ती लोकांनी नव्या कराराचा पुन्हा अभ्यास केला पाहिजे हा अभ्यास आपण अगदी काटेकोरपणे, आळस सोडून सर्वस्वी वस्तुनिष्ठ प्रकारे केला पाहिजे. कारण नवा करार हाच आमचा मार्गदर्शक आहे. आपण परंपरांचा, रिवाजांचा नाद सोडून नव्या करारामध्ये आम्ही स्वतःसाठी आणि देवाने आम्हांला सोपवून दिलेले कार्य शोधून समजून घेतले पाहिजे.

चार्ल्स स्विंडॉल लिहितात : ''ख्रिस्ताच्या शिष्यांतील अगदी अंतरंगातील

शिष्यांनी पहिल्या शतकात सुवार्ताप्रसाराचे जे प्रभावी कार्य केले तसे अद्याप कोणत्याच गटाकडून झालेले नाही!'' त्यांचे हे म्हणणे शंभर टक्के खरे आहे. पण त्यांच्या यशाचे कारण काय? येशूने त्यांना दिलेले प्रशिक्षण या कामी बहुमोलाचे होते. त्यांच्या यशाला ते प्रशिक्षण बऱ्याच अंशी कारण आहे. ''शिष्य'' या महत्त्वपूर्ण शब्दाभोवती हे प्रशिक्षण केंद्रित झाले आहे. नव्या कराराच्या पहिल्या पाच पुस्तकांमध्ये शिष्य हा शब्द ठायी ठायी आढळतो. मत्तयकृत शुभवर्तमान ते प्रेषितांची कृत्ये या पाच पुस्तकांमध्ये ''शिष्य'' हा शब्द सुमारे २६९ वेळा आला आहे. तेथे शिष्य (नाम) व शिष्य करणे (क्रियापद) अशा दोन्ही प्रकारे हा शब्द वापरला आहे. महान कामगिरी सोपवून देताना ख्रिस्ताने आपल्या अनुयायांना याच शब्दाने आज्ञा दिली आहे, ''... लोकांस शिष्य करा.'' आजच्या ख्रिस्ती मंडळ्यांमध्ये पाहावे तर तिकडे अविकसित शिष्यांचा फार मोठा भरणा आहे. (मंडळी एकत्र जमते तेव्हा याच्यापैकी बहुतेकजण मंडळीत आलेले असतात). अशा स्थितीत ''शिष्य'' या शब्दाचा अर्थ आम्ही अगदी योग्य प्रकारे समजून घेतला आहे असे म्हणता येईल का? तसेच लोकांना शिष्य करा या आज्ञेचा संपूर्ण अर्थ आम्हांला समजत आहे असे म्हणता येईल? शिष्य करण्याची प्रक्रिया आम्हांला कितपत कळाली आहे? या प्रश्नांची उत्तरे प्रामाणिकपणे शोधली पाहिजेत. आज या पृथ्वीवर कोट्यवधी लोकांना अद्याप सुवार्ता माहीत नाही हे लक्षात घेता, सर्वसाधारणपणे समाजावर ख्रिस्ती मंडळीचा विशेषसा प्रभाव पडलेला नाही असे दिसते. मग आम्ही महान कामगिरी पूर्ण करण्यास झटतो आहोत असे खरेच म्हणता येईल? मला वाटते याचे उत्तर 'नाही' असेच आहे!

ख्रिस्तावर विश्वास ठेवणारे म्हणून आमची ओळख आणि त्याचे अनुयायी म्हणून आमच्यावर त्याने सोपवलेली कामगिरी यांचे पुनर्परीक्षण आणि विवेचन करण्याचा अगदीच अल्पस्वल्प प्रयत्न या पुस्तकात केला आहे. या पुस्तकाच्या वाचनातून देव आमच्या अंतःकरणाला हालवून जागे करील आणि नवी दृष्टी, नवा सहभाग आणि नवी उत्पादकता यासाठी हिरिरीने कार्य करण्यास प्रेरणा देईल आणि त्यामुळे आमच्या प्रभूने सोपवलेली महान कामगिरी पूर्ण करण्यास साहाय्य होईल.

हे पुस्तक लिहिण्याचे कामी मला अनेक मित्रांचे सहाय्य मिळाले तसेच





''लौकिक'' व ''अलौकिक'' अशा दोन्ही प्रकारच्या ग्रंथकारांच्या ग्रंथांतून नवनवे विचार, कल्पना मिळाल्या. मी त्या सर्वांचा अत्यंत आभारी आहे. अनेकांनी माझे विचार ऐकून हे छापून प्रसिद्ध करा असे उत्तेजन दिले. काहींनी लेखनातही साहाय्य केले आहे. त्यांचे मार्गदर्शन व प्रभाव मी ख्रिस्ताच्या न्यायासनाकडे सोपवतो. तेथे त्यांच्या कार्याचे यथार्थ मूल्यामापन होऊन माझ्याकडून मिळू शकेल त्याहून अधिक चांगले प्रतिफळ मिळेल असा माझा भरवसा आहे.

हर्ब हॉजेस

## *प्रकाशकाचे दोन शब्द*

कोणत्याही उद्दिष्टाच्या पूर्णतेसाठी अनेक व्यक्तींचे सहकार्य आवश्यक असते आणि हे पुस्तक ह्याला अपवाद नाही.

टॅली हो द फॉक्स या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद करावा म्हणजे मराठी भाषिक सेवकवर्ग आणि पुढारीवर्ग यांना वैयक्तिकरित्या व त्यांच्या सेवाकार्यात त्याचा निश्चित लाभ होईल अशा प्रेरणेने पुढे येऊन, उत्स्फुर्तपणे या पुस्तकाचे मराठी भाषेमध्ये प्रकाशन करण्याकामी, ख्रिस्त सेवेतील बंधू प्रकाश मुदलियार यांनी खूप परिश्रम घेतले. मी त्यांच्या सहकार्याबद्दल आभारी आहे.

तसेच ज्या ज्ञात-अज्ञात व्यक्तींनी या पुस्तकाला हातभार लावला त्या सर्वांबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

शेवटी, या पुस्तकाचे मूळ लेखक हर्ब हॉजेस, टेनेसी, यु.एस.ए. यांनी या पुस्तकाचे मराठी भाषेमध्ये प्रकाशन करण्यास दिलेल्या परवानगीसाठी मी त्यांचा ऋणी आहे.

मान, महिमा, गौरव प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावास असो.

**अमोल परागे**
संचालक, गॉस्पल इंडिया मिनिस्ट्रीज्
चंद्रपूर - ४४२४०२
महाराष्ट्र.



## *आभार*

प्रत्येक मनुष्य जन्मतःच कर्जाचे मोठे ओझे घेऊनच या जगात येतो, निष्कर्जी अवस्थेत जगणे केवळ अशक्य! प्रत्येक माणसाला जन्मतःच नऊ महिन्यांचे खोलीभाडे व भोजनखर्च एवढे देणे असते.

कर्जाच्या ओझ्याखाली वाकलेल्या सर्व लोकांमध्ये माझ्या डोक्यावर कर्जाचा भार सर्वात अधिक आहे. अर्थात मी कोणाचा एक पैसाही लागत नाही. माझ्या जीवनाला अनेक मृत आणि जिवंत लोकांनी हातभार लावला आहे, मोठे लाभ करून दिले आहेत. त्या सर्वांचा उच्चार येथे करणे शक्य नाही. त्यांनी माझ्यामध्ये गुंतवलेल्या भांडवलावरच्या व्याजाचीही फेड मी आजवर करू शकलो नाही.

या छोटेखानी पुस्तकाविषयी सांगायचे तर मी असंख्य लेखकांचा अतिशय ऋणी आहे. त्यांनी आपले विचार लिहून प्रसिद्ध केले म्हणूनच ते मला पाहता आले. उपदेशक, पाळक, शिक्षक आणि सहकारी या सर्वांनी माझ्या ख्रिस्ती जीवनात माझ्या मनावर सत्याचे महान संस्कार केले आहेत, सत्य शिकवले आहे. त्या सर्वांच्या ऋणाचे प्रचंड ओझे माझ्यावर आहे. मागील काही वर्षात त्यांची संख्या झपाट्याने माझ्या कल्पनेपेक्षाही अधिक वाढली आहे, वाढते आहे. डॉम फॉस्को यांच्यासारख्या व्यक्तींचा मी अधिकच ऋणी आहे. त्यांनी मोठ्या काळजीपूर्वक हे पुस्तक वाचले आणि अनेकवार उत्तम सूचना केल्या. क्लिंट डेविस यांचेही माझ्यावर पुष्कळ उपकार आहेत. त्यांनी टिपणे व ध्वनिफित यांवरून लूक शुभवर्तमानाची प्रस्तावना हे प्रकरण तयार केले. माझी पृथ्वीमोलाची पत्नी ज्युडी हिचेही माझ्यावर डोंगराएवढे उपकार आहेत. ती माझी सहकारी, सहचरी व चिटणीस आहे. ती नेहमी मोठ्या आस्थेने, सौम्यपणे मला प्रेरणा व आधार देते आणि माझ्या अल्पशा

ज्ञानात शहाणपणात तिच्या स्वतःच्या विशाल ज्ञानाची व शहाणपणाची भर घालते.

या सर्वांना आणि इतर अनेकांना मी मनःपूर्वक धन्यवाद देतो. त्या सर्वांनी मला फार फार आशीर्वादित आणि धन्य धन्य केले आहे. मी पुनश्च सांगतो या सर्वांचे माझ्यावर अपार उपकार आहेत. त्यांचे हे ऋण माझ्याकडून कधीच फिटणार नाही. मित्रहो, आभारी आहे.

हर्ब हॉजेस



# अनुक्रमणिका


प्रस्तावना ........ ३

आभार ........ ७

प्रकरण १ : दृष्टान्त कितपत महत्त्वाचा आहे? ........ ११

प्रकरण २ : आमचे कार्यकर्तव्य निश्चित करणारी कामगिरी ........ ३९

प्रकरण ३ : आमची कार्यपद्धती निश्चित करणारी संकल्पना ........ ७९

प्रकरण ४ : मंडळीच्या व इतिहासाच्या आघाडीस असणारी दाराची किल्ली ........ ९७

प्रकरण ५ : शिष्य करण्यासाठी अतिआवश्यक बाबी ........ १२१

प्रकरण ६ : देवाचे गुणाकार कोष्टक ........ १४१

प्रकरण ७ : येशूच्या योजनातंत्रामागील बुद्धिवैभव ........ १६१

प्रकरण ८ : मंडळीमध्ये या तंत्रानुसार कार्य कसे करावे? ........ १७९

प्रकरण ९ : त्याचे अखेरचे शब्द - त्याची अखेरची इच्छा ........ २०१

प्रकरण १० : टॅली हो द फॉक्स - या शीर्षकाविषयी ........ २१९

समारोप : रानकुत्र्याचे मनोगत ........ २३१

परिशिष्टे

अ. प्रकरणांची रूपरेषा ........ २४१

ब. अधिक अभ्यासासाठी ग्रंथांची सूची ........ २४७

क. या पुस्तकाचा अभ्यास करण्यासाठी सूचना व प्रश्न ........ २५७

*प्रकरण १*

# दृष्टान्त कितपत महत्त्वाचा आहे?

*''ईश्वरी दृष्टान्त न झाल्यास लोक अनावर होतात''* नीती.२९:१८.

आध्यात्मिक परिभाषेमध्ये ''दिव्य विचारदृष्टी'' ''सुज्ञान'', ''मर्मदृष्टी'', ''सूक्ष्मदृष्टी'', ''प्रकाश'' आणि ''दूरदृष्टी'', ''साक्षात्कार'', ''दृष्टान्त'' हे समानार्थी शब्द, संज्ञा आहेत. अशा दृष्टान्तांचे महत्त्व विशद करणारे अनेक शास्त्रपाठ देवाच्या वचनामध्ये आहेत. स्तोत्र.११९:१८ मध्ये असे आहे : ''तू माझे नेत्र उघड, म्हणजे तुझ्या नियमशास्त्रातील अद्भुत गोष्टी माझ्या दृष्टीस पडतील.'' स्तोत्र.११९:१३० पाहा : ''तुझ्या वचनाच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो; त्याने भोळ्यांना ज्ञान प्राप्त होते.'' याकोब.१:५ हे वचन सांगते, ''जर तुम्हांपैकी कोणी ज्ञानाने उणा असेल तर त्याने ते देवाजवळ मागावे, म्हणजे ते त्याला मिळेल; कारण तो कोणास दोष न लावता सर्वांस उदारपणे देणग्या देतो. इफिस.१:१५-१९ या वचन संदर्भात पौलाने आपली एक महान प्रार्थना नमूद केली आहे. एखाद्या मनुष्याने दुसऱ्यासाठी करावी अशी ही अत्यंत महत्त्वाची प्रार्थना आहे असे मला व्यक्तिशः वाटते. ''अंतःचक्षु प्रकाशित'' व्हावे यासाठी ही प्रार्थना आहे. नवा जन्म झाल्यानंतर देवाच्या गोष्टी समजून घेण्यासाठी अंतरंगात असा प्रकाश मिळणे

अतिआवश्यक असते. ''नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही... पाहता येत नाही'' (योहान.३:३). नवा जन्म आणि प्रकाश या दोन गोष्टी आध्यात्मिक ज्ञान मिळण्यासाठी अटळपणे आवश्यक आहेत.

या प्रकरणाच्या प्रारंभी दिलेल्या वचनातून ''दृष्टान्त'' किती महत्त्वाचा आहे ते नकारात्मक रीतीने दाखवले आहे. व्यक्ती ज्या चष्म्यातून जे पाहते तेच त्याला दिसते आणि ज्या 'चाळणीतून' तो ऐकतो तेच त्याच्या समजुतीत येते. आपल्या प्रभूने आम्हांला - त्याच्या लोकांना - दिलेल्या या महान आज्ञेचा अभ्यास करताना दृष्टान्ताचे महत्त्व व मूल्य समजून घेणे आवश्यक आहे. नीती.२९:१८ मध्ये असे आहे : ''ईश्वरी दृष्टान्त न झाल्यास लोक अनावर होतात.'' हे वचन सर्वव्यापी म्हणजे जगातील सर्वांना सर्वस्वी लागू पडणारे आहे.

## आध्यात्मिक संकल्पना

सर्वप्रथम येथे मांडलेली ''आध्यात्मिक संकल्पना'' लक्षात घ्या. ही दृष्टान्ताची संकल्पना आहे. संदर्भ लक्षात घेऊन विचार केला तर येथे उल्लेख केलेला दृष्टान्त विशेष प्रकारचा आहे हे स्पष्टच दिसते. हा संदर्भ आध्यात्मिक दृष्टान्ताविषयी आहे. कोणाही व्यक्तीला मिळावी अशी ही सर्वांत महत्त्वाची दूरदृष्टी आहे.

प्रत्येक गोष्टीचा आरंभ दृष्टान्ताने होतो. तुम्हांला जे दिसते, तुम्ही जे पाहता तसे तुम्ही होता. पण जे दिसत नाही ते तुम्ही होऊ शकत नाही. म्हणजेच तुम्ही जे काही उत्कटतेने, प्रेमाने, मनापासून पाहता तसे त्यासारखे तुम्ही व्हाल. तुम्ही ज्याकडे पाहता तसेच तुम्ही व्हाल.

आज इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या जगात हे दिसते, प्रत्ययास येते. तुम्ही एखादी प्रतिमा कॉम्प्युटरच्या पडद्यावर दीर्घकाळ ठेवलीत तर ती कॉम्प्युटरच्या चित्रनलिकेत (पिक्चरट्युब) पक्की सामावेल, ठसून राहील आणि त्यानंतर तुम्ही जो कार्यक्रम पाहाल त्यामध्ये ही प्रतिमा अचूकपणे येईलच. हे तत्त्व तुम्हांलाही लागू पडते. तुम्ही जे काही एकाग्रपणे रोखून, टक लावून पाहाल तेच तुमच्या जीवनाची दिशा निश्चित करील.

*लुइसिआना (अमेरिका) येथील एका शेतकऱ्याने आपले खेचर विकण्यासाठी*





*बाजारात आणले. एकाने त्याला विचारले, ''काय रे बाबा, हे खरेच नीट काम करते ना?'' का त्रास देते?'' तो शेतकरी म्हणाला, ''त्रासबीस काही देत नाही. फक्त ते काही चांगले दिसत नाही.'' (त्याला चांगलं दिसत नाही हे त्याला म्हणायचं होतं). त्यावर तो ग्राहक बोलला, ''ठीक, मला त्याचं काही वाटत नाही. ते भरपूर काम करते का?'' ''होय, खूप काम करते ते, पण ते दिसायला चांगले नाही.'' मग त्या माणसाने ते खेचर विकत घेतले. शेतकऱ्याने ते त्या माणसाच्या ट्रकवर चढवले. तो माणूस खेचर घेऊन आपल्या शेतावर आला. ट्रकची मागची फळी उघडून खेचराला खाली उतरून घेतले. ते खेचर लगेच एका झाडावर आपटले. तिथून जरा पुढे गेले ते कोठाराच्या भिंतीला अडखळले. तो माणूस म्हणाला, ''मी फसलो, मला फसवलं. हे खेचर तर ठार आंधळं आहे!'' मग पुन्हा ते खेचर ट्रकमध्ये घालून मूळच्या मालकाकडे नेले. तेथे तो मोठ्याने ओरडून म्हणाला, ''तू मला खरी गोष्ट सांगितली नाहीस. हे खरेच आंधळं आहे. तू माझ्याशी खोटं बोललास!'' तो शेतकरी म्हणाला, ''नाही, नाही. मी खोटं बोललो नाही. मी त्याला चांगलं दिसत नाही नाही म्हणजेच ते दिसायला चांगलं नाही, हे मी तुम्हांला चार चार वेळा सांगितलं. तुम्हीच नीट पाहिलं नाही!'' मित्रांनो, आम्ही कसं पाहतो, किती पाहतो, बारकाईने पाहतो का नाही तेच महत्त्वाचे आहे.*

**''माय अटमोस्ट फॉर हिज हायेस्ट''** या व इतर थोर भक्तिपर पुस्तकांचे प्रसिद्ध लेखक ओस्वाल्ड चेंबर्स ह्यांनी मोठ्या मार्मिकपणे लिहिले आहे : *''दृष्टान्त नसताना देवाची सेवा करणे सोपे आहे, पाचारण नसताना देवासाठी काम करणे अधिक सोपे आहे. कारण या स्थितीत देवाला काय हवे, काय आवश्यक आहे त्याची चिंता तुम्हांला सतावत नाही. तुमचा विचारच तुमचा वाटाड्या असतो आणि त्यावर ख्रिस्ती भावभावनांचा मुलामा दिलेला असतो. परंतु, एकदा तरी तुम्ही येशू ख्रिस्ताने सोपवलेली महान कामगिरी, महान आज्ञा पूर्ण ऐकलीत तर तेथून पुढे, त्या क्षणापासून देवाला जे हवे तेच तुमचेही ध्येय, उद्दिष्ट राहील आणि मग तुम्ही तुमच्या विचारांना वाट विचारीत विचारीत देवासाठी कार्य करणार नाही. देवाची इच्छा जाणूनच त्याच्यासाठी कार्य करालच.''* हा अभ्यास असाच पुढे चालू

ठेवण्यापूर्वी वरील उतारा पाच पंचवीस वेळा तरी नीट वाटा. (तिरपा टाइप माझा आहे. मूळ लेखकाचा नाही.)

शारीरिक दृष्टी ही वस्तुनिष्ठ प्रेरक (आसपासच्या जगातील काही वास्तविक वस्तू-पदार्थ) आणि आत्मनिष्ठ अनुभव (व्यक्तीला त्या वस्तुनिष्ठ प्रेरकाची जाणीव ज्या प्रकारे होते तो प्रकार/ती रीत). वस्तुनिष्ठ प्रेरक कधी बदलणारही नाही, पण एकदा ते प्रेरक व्यक्तीच्या दृष्टीवर नोंदले गेले की ते विपरीत होणे, नाकारणे अथवा स्वीकारणे यातील काहीही होऊ शकते. म्हणजेच त्या प्रेरकाची कृती-प्रभाव ज्याच्यावर पडतो त्या व्यक्तीने ठरवलेल्या अर्थानुसार ती ती क्रिया (नाकारणे-स्वीकारणे, विपरीत होणे) घडते.

माणसाला पाच स्वाभाविक ज्ञानेंद्रिये आहेत. त्यातील दृष्टीचे इंद्रिय गमावून कोणाचेच चालणार नाही. राल्फ सॉकमन ह्यांनी यथार्थपणे म्हटले आहे : ''मी तर माझ्या नेत्रांचा सर्वतोपरी बंदिवान आहे.'' आणि प्रत्येक माणसाच्या बाबतीत हे अक्षरशः खरे आहे. दृष्टी-जाणीव यातूनच *प्रक्रिया* (कार्यव्यवस्था) होते आणि *प्रक्रियेतून फलनिष्पत्ती* होते. येशू ख्रिस्ताच्या मंडळीमध्ये फलप्राप्ती होण्याविषयीच मोठा पेच आहे आणि त्याची झळ आम्हा सर्वांनाच लागते. ज्या ख्रिस्ती लोकांनी प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक रचिले त्यांच्यासारखे ख्रिस्ती लोक सर्वसाधारणपणे आम्ही मिळवत नाही, तयार करीत नाही. म्हणजे आमची फळे निकोप नाहीत, त्यात उणेपण आहे तर आमच्या दृष्टीतही उणीव आहे हाच त्याचा अर्थ आहे.

आध्यात्मिक दृष्टान्त म्हणजे काय? कलस्सै १:९ या वचनाचा अर्थविस्तार जे. बी. फिलिप्स यांनी केला आहे. तो असा : पौलाने लिहिले, ''तुम्ही सर्व काही देवाच्या दृष्टीविचाराने पाहावे हीच माझी विनंती आहे.'' *आध्यात्मिक दृष्टान्त म्हणजेच देवाच्या दृष्टीविचाराने सर्व काही पाहणे.* पण देवाची विचारदृष्टी व आमची विचारदृष्टी अगदी एकसारखी असणारच नाही हे पवित्र शास्त्र स्पष्टपणे सांगते (यशया ५५:१०). आमची विचारदृष्टी देवाच्या विचारदृष्टीशी मिळतीजुळती होण्यासाठी मूलगामी आध्यात्मिक फेरफार करणे अगत्याचे आहे.

महान आध्यात्मिक दृष्टी लाभलेले डॉसन ट्रॉटमन सांगतात : ''देवाच्या अंतःकरणामध्ये जे आहे ते आपल्या अंतःकरणामध्ये घेणे हाच दृष्टान्त. पण





देवाच्या अंतःकरणामध्ये काय आहे? आमच्या प्रतीक वचनातून त्याचे उत्तर ''लोक'' या एकाच शब्दाने दिले आहे. देवाच्या अंतःकरणावर लोकांचे ओझे आहे. पण किती लोक? सर्वच लोक! या पृथ्वीवर प्रत्येक व्यक्तीबद्दल देवाला कळवळा, आस्था आहे आणि हीच कळवळ आपल्या सर्व मुलांना वाटावी ही त्याची इच्छा आहे.

आपल्या मुलांनी संपूर्ण जगावर प्रभाव पाडावा हीच देवाची इच्छा अपेक्षा आहे. *जागतिक सुवार्ताप्रसारासाठी जागतिक दृष्टान्त* पाहिजे. म्हणजे बहुसंख्य ख्रिस्ती लोकांनी अगोदर नकाशांच्या सहाय्याने संपूर्ण जगाचा विस्तार वगैरे समजून घेतले पाहिजे, मगच त्यांना संपूर्ण जगावर ख्रिस्ताचा प्रभाव पाडण्यासाठी कार्य करता येईल.

हाच प्रश्न पुन्हा पाहा, नीट विचार करा : ''देवाच्या अंतःकरणामध्ये काय आहे?'' विश्वासणाऱ्याची स्वप्ने, दृष्टान्त यांच्या अंतरंगात काय असले पाहिजे? पुन्हा तेच उत्तर ''लोक.'' दृष्टान्त नसला की लोक अनावर होतात, नष्ट होतात. जगातील ४/५ लोक अद्याप सुवार्तेपासून वंचित आहेत. त्यांना सुवार्ता, तिचा अर्थ, उद्देश वगैरे काही माहीत नाही आणि एकंदर लोकसंख्येच्या अर्ध्याअधिक लोकांनी येशूचे तारणदायी नाव अद्याप ऐकलेले नाही याचे कारण काय? प्रेषितांची कृत्येमध्ये ज्या ख्रिस्ती विश्वासाचे वर्णन आहे त्या विश्वासाला ही अवस्था चालली असती का? मुळीच नाही. मग 'प्रेषितांची कृत्ये'मधील ख्रिस्ती विश्वास आणि आजच्या सुवार्तावादी मंडळ्यांमध्ये (विशेषतः अमेरिकेतील मंडळ्या) प्रामुख्याने आढळतो तो ख्रिस्ती विश्वास या दोहोंमध्ये काय फरक आहे? आजच्या मंडळीतील येशू त्यांच्या येशूपेक्षा वेगळा आहे का? नाही. मग काय पवित्र आत्मा वेगळा आहे? मुळीच नाही. तर मग पवित्र शास्त्र वेगळे आहे का? होय वेगळे आहे, पण त्याचा विशेष फायदा आरंभीच्या ख्रिस्तीजनांना नाही तर आम्हांलाच होत आहे. त्या लोकांच्याकडे संपूर्ण नवा करार नव्हता. परंतु आमचे पारडे एवढे जड असून जगावर प्रभाव पाडण्याचे बाबतीत आम्ही त्यांच्या पासंगालाही पुरत नाही!

प्रेषितांची कृत्ये या पुस्तकाच्या रचनेस कारण झालेला ख्रिस्ती विश्वास आणि आजचा आमचा ख्रिस्ती विश्वास या दोहोंमध्ये काय फारक आहे? हा फरक अगदी

बाळबोध रीतीने सांगायचा तर माझे स्पष्ट मत आहे की, ''त्यांचा ख्रिस्ती विश्वास'' आणि ''आमचा ख्रिस्ती विश्वास'' यात मूलभूत फरक आहे तो केवळ ''योजनातंत्राचा'', नियोजनाचा. त्यांच्या योजनातंत्रामध्ये संस्था-संघटना बांधणे, स्थापन करणे याकडे पूर्ण दुर्लक्ष केले होते.

व्यक्तिव्यक्तींना बांधणे, तयार करणे यावरच त्यांचा सर्वथा भर होता. त्यांची योजना बाह्य वाढीवर भर देणारी होती. आंतरिक वाढ त्यांना दुय्यम होती. येशूने बारा जणांना शिकवून तयार केले. त्यांना त्याने प्रेषित हे नाव दिले (लूक.६:१३). त्याने त्यांना हे वेगळे नाव का दिले? त्याची प्रशिक्षणप्रक्रिया मुख्यतः बारा जणांवर केंद्रित झाली होती. तसेच नेहमीच्या 'शिष्य' या शब्दाऐवजी त्याने त्यांना 'प्रेषित' हे नाव दिले. याचे कारण काय? यामागे कोणती सूक्ष्म दृष्टी होती. याचे उत्तर आपणाला त्या शब्दाच्या अर्थातूनच मिळणार. ॲपॉस्टल हा शब्द दोन ग्रीक शब्द मिळून एक सामासिक शब्द तयार झाला आहे. 'स्तोलोस' व 'ॲपो' हे ते दोन शब्द आहेत. 'स्तोलोस' म्हणजे पाठवणे व 'ॲपो' म्हणजे '०च्या पासून दूर'. येशूने या लोकांना विशेषेकरून स्वतःजवळ असावे म्हणून निवडले होते (मार्क.३:१४). आपले जीवन, आपली दूरदृष्टी व आपले योजनातंत्र हे सर्व त्यांना सांगावे, शिकवावे, त्यांच्या अंगवळणी पडावे आणि एवढे झाल्यावर त्यांना मूळ ठिकाणाहून दूर पाठवायचे. तात्पुरते *आत* येथे पण कामासाठी *बाहेर* हीच त्याची योजना होती. त्याने आपल्या मंडळीला ज्या देणग्या - कृपादाने (कृपादान लाभलेल्या व्यक्ती) दिली त्यात प्रेषित पहिल्या क्रमांकावर आहेत (इफिस.४:११). यावरून हे स्पष्टच दिसते की, मंडळीची सेवा व मंडळीचे सभासद ह्यांना बाह्य दिशेला वळवण्यासाठीच मंडळीला प्रेषित दिले होते.

तारण पावलेल्या प्रत्येक व्यक्तीला दूरदृष्टी असावी, आणि ती दृष्टी त्याला नेहमी बाहेरचे पाहण्यास, पुढे पुढे अगदी दिगंतापर्यंत जाण्यास प्रवृत्त करणारी असावी हीच येशू ख्रिस्ताची अपेक्षा आहे असे मला अगदी ठामपणे वाटते. त्याने आम्हांला 'जागतिक कार्यकर्तव्य' नेमून दिले हे स्पष्टच आहे. आणि मी पुन्हा सांगतो, जागतिक कार्यकर्त्यासाठी 'जागतिक दृष्टान्त' अति आवश्यक आहे आणि तो दृष्टान्त व ते कार्यकर्तव्य हे दोन्ही वैयक्तिक असावे, प्रामुख्याने संस्थासंघटनात्मक





नसावे असे मला पक्केपणे वाटते. आजच्या मंडळीतील निष्क्रिय ख्रिस्ती माणूस जगावर छाप उठवण्याच्या कामात गुंतलेला नाहीच. देवाच्या योजनेमध्ये अशा व्यक्तीला स्थान नाही. तेथे अशा व्यक्तीची कल्पनाही केली जात नाही. तारण पावलेल्या प्रत्येक व्यक्तीला दूरदृष्टी आणि योजनातंत्र असावे ही येशूची अपेक्षा आहे अशी माझी पक्की खात्री आहे. ते योजनातंत्र कोणते ते प्रथम स्वतः येशूनेच तयार केले आहे. दूरदृष्टी आणि योजना यांच्या सहाय्याने युगाच्या समाप्तीपर्यंत पृथ्वीच्या टोकापर्यंत सुवार्तेचा प्रचार व प्रसार व्हावा, तिची छाप पडावी हीच येशूची अपेक्षा आहे.

देवाच्या अंतःकरणावर सर्वच लोकांचे ओझे आहे हे विसरू नका. आणि आमच्याकडून त्याची हीच अपेक्षा आहे. थोर ख्रिस्ती शिक्षिका हेन्रीएटा मायर्स ह्यांनी म्हटले आहे, ''माझ्या सेवाकार्याचा विचार करताना संपूर्ण जग माझ्यासमोर असते. त्याहून कमीचा विचार करणे ख्रिस्ताच्या आणि माझ्या जीवनाविषयीच्या त्याच्या इच्छेच्या योग्यतेचे होणार नाही.'' असा दृष्टान्त नसलेला ख्रिस्ती मनुष्य आणि आपल्या अंतराळप्रवासाची योजना स्पष्ट करणारा आराखडा हरवलेला अंतराळवीर - दोघेही सारखेच! अंतराळयानाला पहिली गती मिळाली की ते कोठेतरी जाणार हे निश्चित. पण ठरवलेल्या योजनेनुसार प्रवासाची दिशा धरली गेली नाही तर ठरवलेले मूळचे ध्येय साध्य होणारच नाही. ख्रिस्ती या नात्याने 'संपूर्ण जगावर प्रभाव' हीच आमच्या कार्याची रूपरेषा ठरलेली आहे आणि त्यासाठी आवश्यक ते योजनातंत्र आमच्या प्रभूने सोपवलेल्या महान कामगिरीत आहे. याहून जे काही उणे असेल तर ते माणसाचे आहे. ते देवाला संतोष - समाधान देण्याएवढे मोठे नाही.

पेंन्टेकॉस्टच्या दिवशी पवित्र आत्म्याचे आगमन झाले, तारणदायी सामर्थ्याचा पूर्ण वर्षाव झाला तेव्हा त्याच्या आगमनाचा पहिला परिणाम सांगितला तो असा आहे : ''तुमच्या तरुणांस दृष्टान्त होतील व तुमच्या वृद्धांस स्वप्ने पडतील'' (प्रे.कृ.२:१७). हे मर्म नीट लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. परंतु या वास्तवाला रहस्याचा, गूढतेचा मुलामा देऊन हे अगदी गुप्त, रहस्यमय असल्याचा आभास निर्माण करून ते फक्त द्रष्ट्यांसाठीच आहे अशी समजूत करून दिली आहे. तथापि

अध्यात्मिक ख्रिस्ती व्यक्तींचा हा सर्वसामान्य अनुभव आहे हे सत्य नीट लक्षात घ्यावे. येथील संदर्भ नीट लक्षात घ्या. हे दृष्टान्त व स्वप्ने झोपेत येणारे अनुभव नसून पवित्र आत्म्याने परिपूर्ण झालेल्या अंतःकरणाचा हा नित्याचा अनुभवच आहे. थोडक्यात ही स्वप्ने, हे दृष्टान्त म्हणजे योजनातंत्राची दूरदृष्टी आहे, आणि त्या योगे आमच्या प्रभूने सोपवलेली कामगिरी अधिक पूर्पपणे पार पाडता येईल. कार्ययोजनेविषयी अशी स्वप्ने व दृष्टान्त सर्वसाधारण नव्या करारानुसार चालणाऱ्या ख्रिस्ती लोकांच्या नित्यक्रमाचा एक भागच असला पाहिजे. काही ठरावीक लोकांसाठीच हे गूढ अनुभव नाहीत हे नीट लक्षात घ्यावे.

काही वर्षांपूर्वी पश्चिमेकडील एका राज्यामध्ये पुढाऱ्यांसाठीच्या एका शिबिरात शिक्षण देत असता एका सामान्य सभासदाने मला पुढील गोष्ट सांगितली. तेथे जवळच असलेल्या एका चौदा मजली इमारतीकडे निर्देश करून तेथे काम करणाऱ्या कंपनीप्रमुखाविषयी त्याने सांगितले :

''त्या इमारतीमध्ये एक मोठा धनाढ्य कंपनीगट आहे. काही वर्षांपूर्वी त्या कंपनीसमूहाचे काही वरिष्ठ नेते अध्यक्षांकडे गेले व त्यांना म्हणाले, 'अहो, त्या पहिल्या क्रमांकाच्या उपाध्यक्षांना तुम्ही अजून कंपनीत का ठेवलंय? तुमचं काही गुपित त्यांना माहीत आहे का? तुम्ही त्यांना एवढे घाबरता का? ते काहीच काम करीत नाहीत. मग तुम्ही त्यांना एवढा मोठा पगार का देताहात?' अध्यक्षांनी या लोकांना त्यांच्या म्हणण्याचा अर्थ काय हे विचारले तेव्हा ते अध्यक्षांना घेऊन त्या उपाध्यक्षांच्या कचेरीजवळ गेले. तेथील एक लहान खिडकी उघडून ते म्हणाले, 'येथून आत डोकावून पाहा!' त्यांनी आत पाहिले तेव्हा ते उपाध्यक्ष आपल्या मेजाकडे पाठ करून खुर्चीत बसले होते. त्यांनी आपले पाय खिडकीच्या मागच्या चौकटीच्या खालच्या भागावर टेकले होते. हात डोक्याच्या मागे ठेवून ते आरामात बसले होते. ते झोपलेत का खिडकीबाहेर पाहात आहे ते सांगणे कठीण होते. ते लोक अध्यक्षांना म्हणाले, 'आता तुम्हीच पाहा. ते इथं आरामात बसण्याशिवाय दुसरं काहीच करीत नाहीत, तरी ते भरघोस वेतन घेतात! याचं कारण काय?' अध्यक्ष शांतपणे बोलले, 'मी सांगतो ते नीट ऐका. तिथे बसलेल्या त्या माणसाने गेल्या वर्षी आपल्या कंपनीला एक कल्पना सुचवली. त्यामुळे आपल्या या समुहाला





८५ दशलक्ष डॉलरपेक्षा अधिक लाभ झाला. या वर्षी त्यांना तसलीच कामगिरी सांगितली आहे.''

माझ्या प्रिय विश्वासातील बंधुभगिनींनो, देवाच्या मंडळीमध्ये अशी ८५ दशलक्ष डॉलरची कल्पना मांडणारा, मनात वागवणारा माणूस कुठे आहे? देवाचा ८५ दशलक्ष डॉलरचा दृष्टान्त पाहणारी, अगर देवाची ८५ दशलक्ष डॉलरची योजना मनोमन पाहणारी व्यक्ती कुठे आहे? पवित्र शास्त्रातील निर्माणकर्त्या देवाला सर्जनशील अशा प्रचंड कल्पनांचा तुटवडा कधीच पडत नाही. पण त्याचा दृष्टीकोन त्याच्या दृष्टीने, तंत्रशुद्ध प्रकारे पाहणारे त्याचे सर्वसामान्य पवित्रजन कोठे आहेत? देवाच्या अंतःकरणामध्ये जे आहे ते पूर्ण योजनेने स्वतःच्या अंतःकरणावर घेणाऱ्या व्यक्ती कुठे आहेत?

दृष्टान्ताविषयी आणखी दुसरे एक सूत्र मी तुम्हांला सांगतो :

दृष्टान्त नसणे = संपूर्ण अपयश
मर्यादित दृष्टान्त = अल्प यश
दृष्टान्त – योजना – कृती = केवळ स्वप्न
दृष्टान्त + योजना – कृती = सतत पिच्छा पुरवणारे स्वप्न (अपराधीपण) पण
दृष्टान्त + योजना + कृती = आध्यात्मिक दृष्टीने उत्पादक सेवाकार्य

दृष्टान्तामुळे जी कार्याची प्रेरणा मिळते व त्यानुसार जी कृती होते तीच एखाद्या व्यक्तीच्या दृष्टान्ताची कसोटी असते. कृती नसेल तर तुम्ही व तुमचे कृपादान, क्षमता सर्व काही 'सुप्तशक्ती' याच प्रकारात राहील. सुप्त शक्ती, माणसाचे अंगी असते पण ती दृष्टान्ताच्या माध्यमातून कधीच प्रत्यक्ष कृतीत उतरत नाही!

माइल्स मन्रो नावाच्या ख्रिस्ती पुढाऱ्याने आपल्या **अंडरस्टँडिग युअर पोटन्शल** या पुस्तकात विश्वासणाऱ्याच्या सुप्त शक्तीविषयी म्हटले आहे, ''या पृथ्वी ग्रहावरचे सर्वांत धनसंपन्न ठिकाण कुवेत, इराक, अगर सौदी अरबिया येथील तेलाच्या विहिरी नाहीत, दक्षिण आफ्रिकेतील सोन्याच्या व हिऱ्याच्या खाणीही नाही. सोविएट रशियातील युरेनियमच्या खाणी अगर आफ्रिकेतील चांदीच्या खाणी यातील

कोणतेच ठिकाण सर्वात धनसंपन्न नाही. मी सांगतो ते ऐकून तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. आपल्या या ग्रहावरची सर्वात बहुमोल संपत्ती आपल्या गावातच, तुमच्या घरापासून काही अंतरावर आहे. ही संपत्ती तुमच्या स्थानिक कबरस्तानात विसावली आहे. तेथे कधीच प्रत्यक्षात न आलेली स्वप्ने, कधीच स्वर न दिलेली गीते, कधीच न लिहिली गेलेली पुस्तके, कॅनव्हासचा स्पर्शही न झालेल्या चित्रकल्पना, अव्यक्त विचारकल्पना, कधी वास्तवात न आलेले दृष्टान्त, कल्पनेतच राहिलेले शोध आणि तंत्रे, मनातच उभारलेल्या व राहिलेल्या महायोजना, हेतू, उद्दिष्टे वगैरे सर्व जमिनीखाली पुरलेली आहेत. आमची कबरस्ताने अशीच सुप्त शक्तीच्या सुप्तच राहिलेल्या मोठ्या साठ्यांनी भरलेली आहेत.''

सुप्त शक्तीक्षमतेचे गमक हेच आहे की, तुम्ही जे साध्य केले तेवढ्याने तुमचे समाधान होत नाही. यश, विजय हाच तुमच्या सूक्ष्म शक्तीक्षमतेचा मोठा शत्रू आहे. लहानसहान विजयांनी मोठमोठ्या विजयांवर पाणी पडते! तुमच्या सुप्त क्षमतेचा पुरेपूर उपयोग करून घ्यायचा तर तुमच्या हातून झालेल्या कार्यात तुम्ही कधीच समाधानी असता कामा नये. त्याचप्रमाणे तुम्हांला जे करता येते त्यात जे करता येत नाही त्याची अडचण होऊ देऊ नका. मरण ही जीवनातील सर्वात मोठी शोकांतिका नसून सुप्त क्षमतेचा संपूर्ण उपयोग कधीच करू न शकलेले जीवन हीच मोठी शोकांतिका आहे.

ही संकल्पना नीट लक्षात घेण्यासाठी निसर्गातील एक शक्तीशाली सूत्र पाहा. समजा माझ्या हातात मी एक बियाणं घेतलं आणि विचारलं, ''माझ्या हातात काय आहे?'' तर तुम्ही काय सांगाल? अगदी सरळ स्पष्ट दिसणारं तेच म्हणजे - बी आहे असे तुम्ही म्हणाल. परंतु तुम्हांला बी, बियांचे स्वरूप, स्वभाव माहीत असेल तर तुमचे उत्तर *वस्तुस्थितीला धरून असले* तरी ते *सत्य* नाहीच. माझ्या हातामध्ये एक मोठे जंगल आहे हेच सत्य आहे. पाहा, प्रत्येक बीजामध्ये एक वृक्ष असतो. प्रत्येक वृक्षाला फुले, फळे येतात. त्यात बिया असतात - त्या प्रत्येक बीजामध्ये एक वृक्ष आहे, वृक्षाला फळे, बिया आहेत. अशी ही साखळी अखंडपणे चालू असते. तुम्हांला जे दिसते त्यातून हे एवढे सर्व दिसत नाही. तेव्हा बियानाचा एक दाणा आणि संपूर्ण जगाला पुरेल एवढा गव्हाचा साठा या दोहोंमधील जो फरक





आहे त्याला सुप्त सामर्थ्य म्हणतात.

समजा शेक्सपीअर बालपणीच मेला असता तर नाटके, कविता लिहिण्याची त्याची क्षमता - मॅकबेथची सुप्त शक्ती सर्व पुरले गेले असते. समजा सिस्टिन चॅपेलमधील चित्रे रंगवण्यापूर्वीच मायकल अँजेलो मेला असता, मोना लिसा हे चित्र काढण्यापूर्वी लिओनार्द द व्हिंचीचा अंत झाला असता, तर त्या चित्राचे सौंदर्य कधीच लोकांच्या दृष्टीस पडले नसते. सर्वच्या सर्व संगीत सुरावटी मनातच असताना मोझार्टचे देहावसान झाले असतं तर...

समजा ते जळते झुडूप पाहण्यापूर्वीच मोशेचा देहान्त झाला असता - दिमिष्काच्या वाटेवर येशूचे दर्शन होण्यापूर्वीच पौलाचा अंत झाला असता - इसहाकाच्या जन्मापूर्वीच अब्राहाम मेला असता... तर मग इतिहास आणि शास्त्रलेख ह्यांना कोणती वेगळी वळणे मिळाली असती? समजा तो लेख लिहिण्यापूर्वीच मार्टिन लुथरचे आयुष्य संपले असते - ती प्रसिद्ध थोर भक्तीगीते लिहिण्यापूर्वीच चार्लस वेल्स्लीला मरण आले असते. पवित्र शास्त्राचे इंग्रजी भाषांतर करण्यापूर्वीच जॉन विक्लिफ मेला असता - तर मग मंडळीचा एकंदर इतिहास किती वेगळा झाला असता!

''*तुमची* गर्भधारणा होण्यापूर्वीच तुमचे *वडील* अथवा *आई* मरण पावले असते तर *काय झाले* असते? तुमचा *जन्मच झाला नसता* तर जगाचे किती *नुकसान* झाले असते? आणि तुम्ही आपल्या *सुप्त* क्षमतेचा, शक्तीचा पूर्ण उपयोग न केल्याने जगाचा *काय* तोटा झाला? आपल्या *कबरीत* जाताना *तुम्ही गीते, पुस्तके, ग्रंथ, नवनवे शोध औषधे वगैरेंपैकी काय घेऊन जाणार?''* (तिरपा टाईप माझा).

न वापरलेली सुप्त शक्ती हेच ख्रिस्ती लोकांचे महापाप आहे का? आमच्या प्रभूने सोपवलेली महान कामगिरी पूर्ण करण्याचे कामी केलेली हेळसांड यातच आज वाया जात असलेले, कारणी न लावलेले सुप्त सामर्थ्य आहे. संपूर्ण जगावर छाप पाडण्याचे कामात त्याने तुम्हांला एक निश्चित भूमिका, कामगिरी नेमून दिली आहे आणि ही भूमिका फार मोठी आहे. एवढे मोठे कार्य तुम्ही अद्याप केलेले नाही. पण शक्यतेचा दृष्टान्त असल्याशिवाय ही भूमिका करणे शक्य नाही. ***म्हणूनच देवाला मान्य असा दृष्टान्त असणे हीच तुमच्या जीवनातील सर्वात मोठी महत्त्वाची गोष्ट***

***आहे.*** तुमच्याकडे दिलेली कामगिरी जागतिक स्वरूपाची आहे म्हणून तुमचा दृष्टान्तही जागतिक स्वरूपाचा असला पाहिजे. तुम्हांला असा दृष्टान्त आहे का?

तुमच्यामाझ्यासारख्या कोत्या मनाच्या, स्वार्थी, प्रादेशिक वृत्तीच्या आपल्यापुरतेच पाहणाऱ्या लोकांना देवाचा दृष्टान्त कसा मिळावा? त्यासाठी हे उपयुक्त सूत्र लक्षात घ्या. योग्य माहिती अधिक आध्यात्मिक प्रकाश यातून दृष्टान्त मिळतो, त्यातूनच पुढे प्रेरणा मिळते व या प्रेरणेमधून पुढे आध्यात्मिक उत्पादक कृती होते. योग्य माहिती मिळाल्याने दृष्टान्ताचा आरंभ होतो हे लक्षात घ्या. शारीरिक दृष्टी, दृष्टान्त बाह्य प्रेरकांच्या द्वारे मिळतो, त्याचप्रमाणे शास्त्रलेखातील देवाचे सत्य व जे शास्त्रलेखाशी संबंधीत त्यातूनच आध्यात्मिक दृष्टान्ताचा आरंभ होतो. या दृष्टान्ताच्या उभारणीसाठी शास्त्रलेखांचे चांगले ज्ञान, वचन ऐकून त्याप्रमाणे करण्याची वृत्ती असलेले अंतःकरण, जगाचा भूगोल, जगातील राष्ट्रीय आणि वांशिक संस्कृती - समाज, सध्या घडत असणाऱ्या घटनांचे अध्यात्मिक मूल्यमापन, प्रार्थना, माहितीपट, वाचन, प्रत्यक्ष अनुभव (जसे शास्त्रलेखातील या आणि पाहा). जगातील सुवार्ताक्षेत्रांची माहिती, शक्य तेवढा अनुभव, दूरदृष्टी असणाऱ्या विश्‍वासणाऱ्यांबरोबर सहभागिता, सुवार्ताप्रसार, प्रेषणकार्य यासाठी भरपूर अर्थसाहाय्य देणे, भरपूर फळ देणाऱ्या सुवार्तासेवकांबरोबर चर्चा, जगावर छाप उठवणाऱ्या ख्रिस्ती लोकांना भेटणे, योग्य ती जीवनशैली निवडणे वगैरे अनेक गोष्टींनी या दृष्टान्ताची जडणघडण करायची असते. तुमच्या जीवनात आध्यात्मिक दृष्टान्त पाहण्यासाठी आजपासूनच देवाबरोबर सहकार्य करा. परंतु तुम्ही ज्यांना नेहमी भेटता, ज्यांच्याशी बोलता, सहभागिता ठेवता त्यातील बहुतेक ख्रिस्ती बांधवांना असा दृष्टान्त मुळातच नसतो ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

## शोचनीय परिस्थिती

येथे स्पष्टपणे दाखवलेली दुरवस्था लक्षात घ्या. ''जेथे लोकांना दृष्टान्त नाही.'' जेथे म्हणजे सर्वत्र. हे विधान सर्व ठिकाणी लागू आहे. पवित्र शास्त्राच्या परिभाषेत दृष्टान्त नाही म्हणजे काय? देव व देवाची परिपूर्ण योजना यांची जाणीव नसणे म्हणजेच दृष्टान्त नसणे. या जगाचे दैवत सैतान याने लोकांची मने, अंतःकरणे





अंध, बधिर केली आहेत. त्यामुळे त्यांना महत्त्वाच्या, खरोखरी उपयुक्त गोष्टी दिसत नाहीत व समजत नाहीत. ज्ञान व प्रकाश मिळून नवा जन्म झाल्याशिवाय या गोष्टी कोणालाच दिसत नाहीत वा समजत नाहीत (पाहा १ करिंथ.२:९-१४). त्यामुळे स्वर्ग व मानवी अंतःकरणे यांच्यात नित्याचे दळणवळण उरलेले नाही. जे सार्वकालिक, सत्य अदृश्य आणि आध्यात्मिक त्याच्याबरोबर कसलाच व्यवहार होत नाही. देवाचे ऐकणे, ऐकून घेणे नाही आणि त्याच्याकडून मार्गदर्शन घेणेही नाही! थोडक्यात, दृष्टान्त नाही म्हणजे जो परात्पर व पवित्र, सर्वकालामध्ये वसती करतो त्याला लोक पाहात नाहीत. आम्ही आमच्या पावलापुरत्या प्रकाशात, आमच्या टीचभर क्षितिजांकडे रोखून पाहतो आणि आमच्या स्वार्थी पापी योजनांचा विचार करतो. अशा मर्यादांनी वेढलेली व्यक्ती अशा मर्यादित किरकोळ योजना पुऱ्या करू पाहताना आपल्या अंतरंगातच विलीन होईल. लक्षात घ्या प्रत्येक गोष्टीचा आरंभ खऱ्या दृष्टान्तानेच आहे. येथे 'खरा', 'सत्य' हा शब्द लक्षात घ्या. दृष्टान्त नसणे, खोटा दृष्टान्त आणि मर्यादित दृष्टान्त यातील भेद स्पष्ट करण्यासाठी ते दोन शब्द मी वापरले आहेत.

हरवलेले, देवाला दुरावलेले लोक आणि तारण पावलेले बहुसंख्य लोक दोघेही आत्ममग्न, आत्मकेंद्रीत, स्वार्थी आणि टिकून राहण्यासाठी धडपडणारे असतात ही खेदाची गोष्ट आहे. थोडक्यात तारण पावलेले बहुतेक लोक हरवलेल्या लोकांएवढेच 'पापी' असतात. त्यांचा स्वार्थीपणा हेच त्यांचे पाप आहे.

याचे कारण पुन्हा आपले प्रतीकवचनच सांगते, ''दृष्टान्त नाही.'' आम्ही देवाच्या दृष्टीकोनाने क्वचितच पाहतो. देवाच्या अंतःकरणामध्ये आहे -''म्हणजे हरवलेल्या व्यक्तींनी भरलेले जग आहे'' ते आमच्या अंतःकरणात बहुधा कधीच नसते.

व्यावसायिक, उद्योजक आणि तत्सम मंडळी ह्यांनी वापरलेल्या एका संकल्पनेतून पवित्र शास्त्रातील दृष्टान्त ही संकल्पना प्रतीत होते. 'नमुनेदार साचा' हीच ती संज्ञा होय. एखादी व्यक्ती ज्या चष्म्यातून पाहते त्याच प्रकारे तिला जग दिसते. ऐकण्याचेही तसेच आहे. जे ऐकावेसे वाटते ते बरोबर मेंदूपर्यंत पोहोंचते आणि जे अप्रिय ते ऐकले तरी 'ऐकले' जात नाही! हा चष्मा व ऐकणे न ऐकणे याची चाळणी

हाच त्या व्यक्तीचा नमुनेदार साचा आहे. या साचाचे एक उदाहरण मी तुमच्यापुढे ठेवतो.

*लहान मुलांना 'स्पिनॅच' ही राजगिऱ्यासारखी पालेभाजी मुळीच आवडत नाही, पण पॉपआय (वडील माणूस - कार्टून मालिकेतील एक पात्र) याच्या मते पालेभाजी पोषणासाठी अगदी आवश्यकच आहे. ही भाजी खाणे मुलांना मोठी शिक्षाच वाटते.*

वरील उदाहरणामध्ये दोन नमुनेदार साचे आहेत. लहान मुलांचा 'साचा' आणि 'पॉपायचा साचा'. त्या पालेभाजीकडे कोणत्या दृष्टीने पाहावे हे प्रत्येक व्यक्तीच्या 'साच्यावरून' ठरणार. मुलाला 'स्पिनॅच' म्हणजे ''ई ऽऽ घाण!'' ''सगळी जीवनसत्त्वे या भाजीतच का भरलीत - चॉकलेटमध्ये का भरली नाहीत?'' असे एका मुलाने विचारले. पण पॉपायची योजना वेगळीच आहे (प्लुटोला हरवायचे आणि त्या सुंदरीला 'जिंकायचे' आहे!). शक्तीसाठी स्पिनॅच आवश्यक आहे. त्याची चव कशी का असेना - ते खात राहिल्यानेच अखेर विजय मिळणार. विजय महत्त्वाचा, 'चव बेचव' असली तरी चालेल! नमुनेदार साच्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

आणखी एक उदाहरण पाहा.

१८७७ मध्ये पर्सिव्हल लोवेल नामक अमेरिकन खगोलशास्त्रज्ञाने तिकडील विज्ञान जगात मोठी खळबळ उडवून दिली. आपण मिळवलेल्या प्रमाणपुराव्यानुसार मंगळ ग्रहावर बुद्धी असलेले जीवन आहेत असा सिद्धान्त त्याने मांडला. विज्ञान जगात सर्वत्र त्याचीच चर्चा होऊ लागली. मंगळ ग्रहाच्या पृष्ठभागावर 'कालवे' आहेत असे वाटणाऱ्या रेषा दिसल्या आणि त्याच आधाराने तो सिद्धान्त तयार केला होता. पण मंगळावर कालवे वगैरे काहीही नाही हे माहीत असणारे काही लोक होते. लॉवेलला काही दृष्टीदोष होता आणि त्याचीच ही चिन्हे होती. काही डॉक्टरांनी त्याला तपासले व दोष काय ते शोधून काढले. त्याला झालेली व्याधी तेव्हा कोणालाच माहीत नव्हती म्हणून त्यांनी या रोगाला ''लॉवेल्स सिंड्रोम'' हेच नाव दिले. या रोगाचे एक लक्षण असे होते : तो जेव्हा केव्हा एखादी वस्तू अगर दृश्य काही विशिष्ट वेळ पाहात असे तेव्हा त्याच्या डोळ्यांमधील रक्तवाहिन्यांची





प्रतिमा त्या वस्तूच्या पृष्ठभागावर प्रक्षेपित केली जाई. म्हणून त्याच्या दुर्बिणीतून मंगळावरचे 'कालवे' दिसण्याऐवजी त्याच्याच रक्तवाहिन्या दिसत होत्या - त्यांनाच तो 'कालवे' समजला. त्याला बाहेर दिसते असे वाटत होते तेच त्याच्या डोक्यात बसले आणि तेच त्याने सिद्धान्त म्हणून जाहीर केले. हेही 'साच्याचे' एक नमुनेदार उदाहरण आहे.

आता आणखी एक उदाहरण पाहा.

'ख्रिश्चिॲनिटी टुडे' या मासिकाचे सन्माननीय संपादक डॉ. हॅरॉल्ड लिंडसेल, कित्येक वर्षांपूर्वी एका नेत्रविषयक व्याख्यानाला गेले होते. त्या व्याख्यानात वक्त्याने अचानक एक तक्ता लोकांच्या समोर धरला व विचारले, ''यावर आठ हा आकडा कितीजणांना दिसतो?'' तेथील श्रोत्यांमधून फक्त लिंडसेल यांनीच हात वर केला. नंतर ते म्हणाले, ''बाकी सर्व श्रोत्यांनी माझी थट्टा करण्यासाठीच हे केले, माझ्याशिवाय कोणीच हात वर केला नाही.'' तेव्हा त्या वक्त्याने विचारले, ''या तक्त्यावर चौदा हा आकडा कुणाकुणाला दिसतोय?'' तेव्हा तेथील बाकी सर्व श्रोत्यांनी हात वर केला. मग तो वक्ता लिंडसेल ह्यांना म्हणाला, ''महाशय, तुम्ही रंगांधळे आहात हे तुम्हांला अजून कोणीच सांगितले नाही का?'' तेथे थट्टा करण्याचा संबंध नव्हताच. तेथील प्रत्येकजण त्याला दिसले तेच सत्य सांगत होता. बाकी सर्वांना चौदा हा आकडा दिसला आणि फक्त एकालाच आठ हा आकडा दिसला. हेही 'नमुनेदार साच्या'चे उत्तम उदाहरण आहे.

या प्रकारचा नमुनेदार साचा मनात पक्का बसला की जे पाहायचे असते तेवढेच दिसते. जी स्वीकारले, सामावून घेतलेले असते तेवढेच काय ते दिसते आणि इतर सर्वच पुसले जाते. म्हणूनच आपले नमुने - साचे एवढे महत्त्वाचे आहेत.

डॉ. जी. कॅंबेल मॉर्गन या थोर पवित्र शास्त्र शिक्षकाकडे एक स्त्री आली. तिने विचारले, ''डॉ. मॉर्गन, देवाला आमच्या जीवनातील अगदी बारीकसारीक गोष्टींचीही काळजी आहे असे खरेच तुम्हांला वाटते का?'' डॉ. मार्गन शांतपणे उत्तरले, ''बाईसाहेब तुमच्या जीवनात देवाच्या दृष्टीने काहीतरी प्रचंड मोठे आहे असे खरेच तुम्हांला वाटते का?'' येथेही पुन्हा नमुनेदार साचाच आहे.

मी एका महाविद्यालयाच्या वसाहतीत राहतो. तिकडे मी अलीकडेच एक विनोद

ऐकला. तिकडचा अगदी 'हुशार' विद्यार्थी एकाएकी अभ्यासात मागे पडू लागला. शोधाअंती असे समजले की तो आपल्या निबंधावर अधोरेखन वगैरे करण्यासाठी 'हायलाइट पेना'ऐवजी काळ्या जादूचे पेन वापरीत होता!

नमुनेदार साचा असला की हेच होते. त्यात काही माहिती निरुपयोगी म्हणून टाकली जाते, तर दुसरी काही माहिती सत्य समजून स्वीकारली जाते. पण एखादा साचा सर्वस्वी आत्मनिष्ठ (स्वतःच निश्चित केलेला) असतो, त्याला वस्तुनिष्ठ वास्तवाचा कोणताच आधार नसतो. म्हणजे त्या साचामध्ये वास्तविक सत्यतेला अजिबात थारा नसतो.

अशा नमुनेदार साचाचे पवित्र शास्त्रातील एक उदाहरण पाहा. गणना या पुस्तकाच्या तेराव्या अध्यायात इस्राएल राष्ट्राचा वृत्तांत दिला आहे. देवाने त्यांना अभिवचनाने देऊ केलेल्या भूमीच्या दक्षिणेस कादेश-बर्ण्या येथे ते येऊन पोहोचले आहेत. वास्तविक आता त्या देशात जाणे व प्रवेश करणे एवढेच काम उरले होते. पण अनोळखी प्रदेशात बेधडकपणे जाण्यास ते धजले नाहीत. त्यांना तसा धीर झाला नाही, कारण त्यांना विश्वास नव्हता. त्या देशाची मर्मस्थळे हेरण्यासाठी त्यांनी बारा हेरांचा एक गट पाठवला. त्यांनी परत येऊन वेगवेगळे अहवाल दिले. त्या देशातील लोक सहजासहजी देश सोडणार नाहीत याबद्दल त्यांचे एकमत होते. त्यांच्यातील दहा हेरांनी - बहुमत त्यांचेच होते - म्हटले आपण त्या देशाच्या वाटेला मुळीच जाऊ नये, कारण तेथील सध्याचे रहिवासी मोठे धिप्पाड आहेत आणि त्यांच्या तुलनेने आम्ही इस्राएल लोक त्यांच्यापुढे टोळासारखे आहोत. दोघा हेरांनी अनुकूल मत दिले. पण ते 'अल्पमतात' होते. त्यांनी वस्तुस्थिती मान्य करूनही ठामपणे म्हटले, ''आपण त्या देशावर आताच्या आता हिंमत धरून चढाई करून जाऊ आणि तो घेऊ; कारण तो जिंकण्यास आपण पूर्णपणे समर्थ आहो'' (गणना १३:३०). या अल्पसंख्य गटाने आपल्यामध्ये देवाला जमेस धरले होते, तर बहुमताच्या गटाने देवाला वजा केले होते! दोन नमुने - दोन साचे आणि दोन शिफारशी! एकाने आपल्या सांगण्यात देवाचा समावेश केला तर दुसऱ्याने तसे केले नाही. ते धिप्पाड बलदंड लोक सर्वांनी पाहिले पण बहुतेकांनी आपण टोळासारखे आहोत हेच पाहिले. फक्त दोघांनीच खरोखरी देवाला पाहिले. बहुसंख्य लोकांनी





त्या धिप्पाड लोकांच्याद्वारे देवाकडे पाहिले म्हणून त्यांना ते धिप्पाड लोक देवाहून मोठे भासले. अल्पसंख्य होते त्यांनी देवाच्या द्वारे ते धिप्पाड लोक पाहिले. त्यांना देव त्या धिप्पाड लोकांहून प्रचंड मोठा होता. त्यांची दृष्टी, त्यांनी जे पाहिले, त्यांना जे जाणवले त्याच्या आधारेच त्यांनी कार्य करण्याचा प्रस्ताव मांडला. 'दृष्टान्त असणे' व 'दृष्टान्त नसणे' यातील फरक हाच आहे.

तुमची मानवी बुद्धीच नेहमी तुम्हांला स्वतःची विचारदृष्टी देईल आणि प्रकाश मिळण्याच्या चमत्कारानेच तुम्हांला देवाचा दृष्टीकोन समजेल. 'दृष्टान्त नसल्याने' लोक नाश पावतात. आणि 'दृष्टान्त असल्याने' त्या योगे लोक समृद्ध होतात यातील फरक हा असाच आहे.

कल्पना करा, तुम्ही उपासनेसाठी जेथे जाता त्या मंडळीत पुलपीटवरून आध्यात्मिक दृष्टान्त मिळत नाही. तुम्ही बऱ्याच मंडळ्यांत जाऊन पाहा. या बाबतीत अजिबात कल्पना करावी लागणार नाही. १ शमुवेल ३:१ मध्ये लिहिले आहे : ''त्या काळी परमेश्वराचे वचन दुर्लभ झाले होते. त्याचे दृष्टान्त प्रायः होत नसत.'' दृष्टांतांच्या या अभावामुळे पुढे ज्या दुःखद घटना येथून पुढे घडल्या त्यांचा वृत्तान्त त्या राष्ट्राच्या इतिहासात दिलाच आहे.

तुमच्या मंडळीमध्ये पुलपिटवरून सुवार्ता सांगितलीच जात नसेल तर? ख्रिस्ताशिवाय माणसाची कशी शोचनीय स्थिती होते त्याची जाणीव झालीच नाही तर? पवित्र आत्म्याच्या परिवर्तन करण्याच्या सामर्थ्यावर भरवसा नसणार. मग पुढे काय? देवाचे सखोल, सघन सनातन मनोदय कसे उकलले जाणार? देवाच्या वचनाच्या खाणीत दडलेली संपत्ती नजरेस पडली नाही तर? श्रोत्यांना एकाच वेळी स्वर्गात व पृथ्वीवर राहण्यासाठी मग सज्ज करताच येणार नाही. आत्म्याने परिपूर्ण, वचनाला अनुसरून प्रार्थनाशिल शिष्य करणाऱ्या अशा ख्रिस्ती जीवनाचे शिक्षण मग कोठून मिळणार? जेथे दृष्टान्त नाही अशा एका पुलपीटची कल्पना करून पाहा!

पाळकहो, सध्या तुम्ही जे काही करीत आहात त्याचा परिणाम होईल का नाही तो किती होईल याविषयी तुम्हांला कितपत शंका आहे? यथार्थ, हितकर शंकासंशय एखाद्या हातोड्यासारखा आहे, त्यानी मानवी कल्पनांच्या जाळ्याजळमटांनी

काळवंडलेल्या खिडक्यांच्या काचा फोडता येतात. सार्थ, हितकर शंका असणे सुचिन्ह आहे. मनात आलेली अशी शंका प्रामाणिकपणे मान्य करून त्यावर दिव्य पर्याय काय आहे त्याचा प्रार्थनापूर्वक शोध करावा. तसे न केल्यास तुम्ही जेथे उभे राहता ते पुलपीट दृष्टान्तहीनच राहणार यात शंकाच नाही.

काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. सदर्न बॅप्टिस्ट मंडळीचे एक थोर पाळक एके दिवशी सकाळी आपल्या अभ्यासिकेत जमिनीवर पालथे पडून प्रार्थना करीत होते. आपल्या सेवाकार्यावर पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याचा वर्षाव व्हावा म्हणून देवाला विनंती करीत होते. पुन्हा पुन्हा ते मोठ्या उत्कटतेने देवाला विनवून मागत होते, ''हे प्रभू, मला तुझे सामर्थ्य, तुझी शक्ती दे, तुझे सामर्थ्य नसेल तर उपदेश आणि सेवा माझ्या हातून कशी होईल?'' प्रत्येक प्रामाणिक, नम्र वृत्तीने पाळक अगदी मनापासून मोठ्या अजिजीने अशीच प्रार्थना करतात. त्यांनी आपला अनुभव सांगताना म्हटले, ''माझ्यावरचे छप्पर अचानक उघडले गेल्याचे भासले. वरून एका हाताने खाली येऊन माझ्या खांद्याला स्पर्श केला.'' देव आपल्याशी बोलत आहे असे त्यांनी ऐकले. देव बोलला, ''माझ्या मुला, प्रार्थना थांबव.'' पाळक शांत स्वस्थ राहिले तेव्हा ती वाणी त्यांनी स्पष्टपणे ऐकली. ''माझ्या मुला, तुझ्या योजनांचा आवाका पाहिला तर तुला माझ्या शक्तिसामर्थ्याची मुळीच गरज नाही!''

ख्रिस्ती बांधवहो, तुमचा दृष्टान्त देवाच्या गौरवासाठी त्याला शोभण्यासारखाच आहे का? देवाच्या चमत्कारक्षम साधनसामग्रीवर भार पडेल, संपूर्ण जगावर प्रभाव पाडू शकणाऱ्या, योजना, स्वप्ने, दृष्टान्त, योजनातंत्रे वगैरे कोठे आहेत? योजनेचा प्रभाव सतत राहण्यासाठी चमत्कार होण्याची गरज असणारा दृष्टान्त, नियोजन कोठे आहे? कोणत्याही प्रकारे मानवी साधनसामग्रीच्या मर्यादेपलीकडचे असा तेवढ्याच तोलामोलाचा दृष्टान्त एकच आहे. प्रभू येशू ख्रिस्ताने आमच्यावर सोपवलेली महान कामगिरी हाच तो दृष्टान्त. ''तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा,'' या आदेशाची घोषणा वारंवार तुमच्या पुलपीटवरून होत नसेल. तुमच्या मंडळीला याचा ध्यास लागलेला नसेल तर ते सर्व देवाला कसे मान्य होईल? हा महान गौरवी ध्यास नसेल तर तुमच्या पुलपिटवर 'दृष्टान्तशून्य' हाच छाप असेल.





पुलपिटवरून सभासदांच्या आसनापर्यंतचे अंतर विशेषसे नाहीच. सभासदांनाही या गोष्टींची आध्यात्मिक दृष्टी, दृष्टान्त नसेल तर मग काय? मंडळीच्या आंतरिक जीवनाचा हा नियमच आहे : ''जसे पाळक तसे लोक!'' मंडळीतील सभासद हळूहळू त्यांच्या पाळकांची आध्यात्मिकता धारण करतील. समजा या परंपरेत आसनांवर बसलेल्या लोकांना सुवार्तेच्या अलौकिक गौरवाचा दृष्टान्त मुळातच लाभला नसेल, अगर असलेला दृष्टान्त हरवला असेल तर काय? येशू ख्रिस्ताचे परम वैभव नजरेआड झाले असेल तर? आमच्यावर सोपवलेल्या जगव्यापी कार्याचे मोठेपण, भव्यता आणि गौरव हरवले असेल तर? आणि आरंभीच्या ख्रिस्ती लोकांप्रमाणे येशू ख्रिस्त व त्याची सुवार्ता यांचा संपूर्ण जगावर प्रभाव पाडण्याच्या शक्यतेविषयी काय सांगावे? कोणीतरी अगदी यथार्थपणे म्हटले आहे, धाडस करणारा, काळजी घेणारा आणि शेवटची व्यवस्था करणारा यांच्या दरम्यान काही विशेष अंतर नाहीच.

मंडळीचे सभासद लहान मोठ्या गोष्टीसंबंधाने जेवढा उत्साह दाखवतात, तेवढा ते देव, आध्यात्मिक गोष्टी, स्वर्ग, नरक व सर्वकाल या बाबतीत का दाखवीत नाहीत? याचे उत्तर एकच - दृष्टान्त नाही, दूरदृष्टी नाही! परिणामी प्रेरणा नाही, कारण दृष्टांतातूनच प्रेरणा उसळून येत असते.

शुभवर्तमाने, आणि प्रेषितांची कृत्ये या पुस्तकांचा बारकाईने अभ्यास केला तर सर्वसाधारण ख्रिस्ती मंडळीची जडणघडण आणि कार्य प्रकाशाच्या आधारे नव्हे तर परंपरेच्या आधारानेच चाललेले असते. कोणीतरी कुत्सितपणे म्हटले आहे, ''मंडळ्यांनी प्रत्येक गोष्ट अगदी प्रथमपासूनच योग्य प्रकारे केली पाहिजे, सांगितली पाहिजे कारण मग पुढे सर्वत्र तसेच केले जाणार आहे.''

पुलपिट आणि बैठका येथे दृष्टान्त उरलाच नाही, तर मग सार्वजनिक जीवनात आध्यात्मिक दृष्टान्त असणारच नाही यात शंकाच नाही. समजा मीठ व प्रकाश या आपल्या भूमिकेचा मूळ दृष्टान्तच ख्रिस्ती लोकांनी गमावला तर? (मत्तय ५:१४-१६). मग या अंधाऱ्या, सडणाऱ्या जगाचे काय होईल? आम्ही येशू ख्रिस्ताचे ''बदली'' अगर ''प्रतिनिधी'' हा आमचा दृष्टान्त आम्ही गमावला (२ करिंथ ५:२०) तर मग काय? या कुटील व विपरीत पिढीत जीवनाचे वचन पुढे करून

दाखवताना ज्योतीसारखे जगात दिसत राहण्याचे काय? (फिलिप्पै.२:१४-१६). ''ख्रिस्ताचे राजदूत'' हा आमचा उच्च दर्जा आहे. या परकी, पापी व अंधाऱ्या जगामध्ये आमच्या राजाच्या वतीने मध्यस्थी करण्याचा दृष्टान्त आम्ही गमावला तर पुढे काय? पण हे प्रश्न विचारून त्यांची काल्पनिक उत्तरे मिळवण्याची काहीच गरज नाही. दृष्टान्ताचा अभाव आहे, दृष्टान्त इतिहासजमा झाला आहे. हे सर्व पुलपिट, सभासदांची आसने आणि सार्वजनिक जीवन यामध्ये प्रस्तुत प्रतीक वचनात सांगितलेले परिणाम झालेत का नाही त्यावरूनच लगेच समजेल.

## गंभीर परिणाम

''दृष्टान्ताचा अभाव'' या दुःखदायी स्थितीतून होणाऱ्या गंभीर परिणामांचा विचार करा : ''ईश्वरी दृष्टान्त न झाल्यास लोक अनावर होतात.'' दूरदृष्टी नसते तेथे लोक नाश पावतात. 'नाश पावणे, नष्ट होणे, अनावर होणे' या अर्थाचा मूळ हिब्रू शब्द अर्धघन म्हणजे अनेक अर्थ असलेला शब्द आहे. त्याचे अनेक अर्थ आहेत. ''घरबंद सोडणे, मर्यादा सोडणे, अनावर होणे, मोडणे, तुकडेतुकडे होणे, नागवे नाचणे, नासणे, नष्ट होणे'' वगैरे मूळ शब्दाचे अर्थ आहेत. तेव्हा दृष्टान्त हरवला, गमावला तर ख्रिस्ती लोकांमध्ये त्याचे किती व कसे शोककरी परिणाम होतात ते पाहा.

पहिले असे की, दृष्टान्त नसला की मग समाजातले लोक, शेजारपाजारचे लोक, मंडळीतील, घरातील लोक असे सर्वच घरबंद सोडून अनावर होतात. दृष्टांत गमावल्याचा हा नैतिक परिणाम आहे. दृष्टान्त नसला की नैतिक अनागोंदी येते, अनाचार बोकाळतो आणि मग जो तो ज्याला त्याला बरे दिसते तेच करतो (शास्ते २१:२५). जाता जाता हे लक्षात घ्या की, अंतिम वास्तवाची, सत्यतेची जाणीव उरलेली नसते, तेव्हा लोक त्यांना स्वतःच्या नजरेला बरे दिसते तेच करतात. सरळ सरळ चुकीचे दिसणारे, वाटणारे करीत नाहीत.'' योग्य'', ''बरोबर'', ''अयोग्य'', ''चूक'' हे शब्द सर्वसाधारणपणे स्वाभाविक देहस्वभावी मनाच्या माणसाला सापेक्ष आहेत. ''बरोबर-योग्य, चूक-अयोग्य हे शब्द खरोखरी आध्यात्मिक मानसिकतेच्या व्यक्तीला मूलभूत स्वरूपाचे आहेत.'' ''मनुष्याला एक





सरळ मार्ग दिसतो पण त्याच्या शेवटास मृत्यूपथ फुटतात'' (नीती.१४:१२). लक्षात घ्या, आपलाच मार्ग बरोबर, योग्य आहे याची त्या माणसाला पक्की खात्री असते. आपण जातो आहो तो मार्ग सैतानी विनाशकारी आहे असे त्याला स्वप्नातही वाटत नाही. पुन्हा येथे फरक आहे तो व्यक्तीला झालेल्या आविष्कारात, दृष्टीत आणि विचारदृष्टीत आध्यात्मिक वस्तुस्थितीविषयी सर्वस्वी अंध, अजाण असलेले लोकच आपल्या स्वतःच्या समजुतीवर, ज्ञानावर सर्वस्वी विसंबून राहतात ते विश्वसनीय मानतात याचे खरोखरी मोठे आश्चर्य वाटते.

आज लोकांनी घरबंद सोडला आहे हे तर प्रत्येकालाच मान्य आहे. स्वयंनिर्णय, अराजक, बेबंदशाही आणि स्वयंनिश्चय यांचा सर्वच सुळसुळाट झाला आहे. देवाचा पुत्र आणि पापी यांच्यातील भेद या बाबतीत अगदी स्पष्टच दिसतो. येशूने म्हटले, ''ज्याने मला पाठविले तो (माझा पिता) माझ्याबरोबर आहे; त्याने मला एकटे सोडिले नाही कारण जे त्याला आवडते ते मी सर्वदा करितो'' (योहान ८:२९). पण पापी लोकांचे ब्रीदवाक्य पाहा (खरे म्हणजे पापाचा अर्कच) ते म्हणतात, ''मला बऱ्या वाटणाऱ्या गोष्टीच मी नेहमी करतो.'' भविष्यकाळातील कोणी शिल्पकार विसाव्या शतकातील मनुष्याचा पुतळा आपल्याच हातांनी स्वतःला प्रेमाने मिठी मारलेला तथापि या परिस्थितीतील शोचनीय प्रतिमेचा मुका घेणारा असा घडवील. तथापि या परिस्थितीतील शोचनीय परिणामांकडे कोणी विनोद म्हणूनच पाहणार असेल तर महाकवी जॉन मिल्टन ह्याने **पॅराडाइज लॉस्ट** या काव्यात सैतानाच्या तोंडी घातलेल्या शब्दांनी आपण ताळ्यावर, भानावर येऊ. घरबंद न ठेवता स्वैरपणे आपला स्वार्थ साधणाऱ्या पापी लोकांना जे शब्द अटळपणे उच्चारावे लागतात तेच सैतानाने स्वतःविषयी उच्चारले आहेत. तो म्हणतो, ''मी स्वतःच नरक आहे.''

काही वर्षांपूर्वी वर्तमानपत्रामध्ये एका वीस वर्षांच्या तरुणाची हकीगत आली होती. हा तरुण न्यू यॉर्क येथील आयडलवाइल्ड विमानतळावर तंत्रज्ञांचा साहाय्यक म्हणून कामाला होता. त्याने हवाईदलामधील आपल्या एका मित्राला पत्र पाठवले. त्या पत्रात त्याने आपण आपल्या मैत्रिणीशी संबंध तोडल्याचे कळवले. तसेच पॅन अमेरिकन कंपनीचे एक विमान घेण्याचा आपला बेतही या मित्राला कळवला. एक

दिवस त्याने डिसी-३ हे दोन इंजिने असलेले विमान चोरले आणि त्यात बसून ते उडवण्यासाठी धावपट्टीवरून सोडले. विमान आकाशात उडालेच नाही. ते कोठेतरी आदळले, तोडफोड झाली त्यात हा तरुण मरण पावला. या बातमीत शेवटी त्याच्याच पत्रातील हे शब्द दिले होते : ''विमानाचे नियंत्रण मी स्वतः करणार आहे. आजवर जीवनात सर्व एकट्यानेच केले आणि पुढेही करणार!'' हीच हकीगत वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या प्रकारे पुन्हा पुन्हा ऐकायला वाचायला मिळते. प्रत्येक वेळी असाच शोकमय शेवट होतो. सर्व काम स्वतः करणे, स्वयंशासित व्यक्ती नेहमीच चिरडली जाते. तिचा दारुण अंत होतो. प्रत्येकजण स्वतःच्या नियमांनीच चालतो, कोणाला जुमानीत नाही तेव्हा कोणाचेच कोणाला पटत नाही. मग स्थानिकच नव्हे, तर जागतिक पातळीवर ताणतणाव वाढतात. मनुष्यांना वारंवार दृष्टान्त होत नाही, जिवंत देवाकडून स्पष्ट संदेशवचन मिळत नाही. ख्रिस्ती विश्वासाला मरगळ येते तेव्हा लोक सारे नियम झुगारून देतात, अनावर होतात.

दुसरे असे की, या हिब्रू शब्दाचा *'विघटन-विभाजन'* होणे असाही अर्थ आहे. ईश्वरी दृष्टान्त होत नाही तेव्हा लोकांचे विघटन होते, लोकांमध्ये दुही माजते. दृष्टान्त नसला म्हणजे हाच सामाजिक परिणाम होतो. आध्यात्मिक दृष्टान्त नसलेल्या समाजात पापाचे प्रमाण वाढते आणि या पापाला मध्योत्सारी बळ असते म्हणजेच केंद्रापासून बाहेर फेकण्याची शक्ती असते. या बलामुळे लोक जीवनाच्या खऱ्या केंद्रापासून म्हणजे खुद्द देवापासून बाजूस फेकले जातात आणि एकमेकांपासूनही दूर दूर फेकले जातात. मग आपल्याला जगात केवळ तुकडे तुकडे होऊन दाही दिशांना फेकला गेलेला समाजच दिसणार! असा समाज मग ढिला पडतो, विरघळतो, तुटतो-फुटतो. दुही, फूट हे शब्द आपल्या जगातील अनेक घटनांचे वर्णन करताना वापरतात. अणूंचे विभाजन होते, कुटुंबात फूट पडते, राष्ट्राराष्ट्रातून दुही माजते, जग दुभंगते, माणसाचे व्यक्तित्वही दुभंगते. एक मानसोपचार तज्ज्ञ एक दिवस पेट्रोल घेण्यासाठी पंपावर गेला. त्याच्या मोठ्या मोटारीत मागील बाजूस तीन खुर्च्या ठेवल्या होत्या. त्याला त्याचे कारण विचारल्यावर तो म्हणाला, ''मी आता एका दुंभगलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या माणसाकडे जाणार आहे!'' कितीतरी व्यक्तींची मने आज भंग पावताहेत, त्यांचे विभाजन होत





आहे. लोक अनेकदा म्हणतात, ''माझ्या मेंदूचा भुगाभुगा झालाय, मनाचे तुकडे होत आहेत!'' एक कॉलेजकन्या आपल्या मैत्रिणीला म्हणाली, ''माझ्या अंतरंगात यादवी युद्ध चालले आहे असे वाटते.'' त्यावर तिची मैत्रीण म्हणाली, ''त्यात विशेष ते काय? माझ्या मनात तर महायुद्ध चाललंय!'' कोणाही व्यक्तीला कोणत्याही प्रश्नाला नीट तोंड देता येते. पण त्यासाठी तो अंतरंगात एकसंध, एकात्म असला पाहिजे! पण त्याचे स्वतःशीच भांडण असेल, पटत नसेल तर मग अगदी क्षुल्लक बाबीनेही त्याचा मर्मभेद होणार यात संशयच नाही.

नव्या करारामधील यहूदाच्या वृत्तांतामध्ये शेवटी हे शब्द आहेत. ''त्याने आपल्या दुष्टाईच्या मजुरीने शेत विकत घेतले; तो पालथा पडल्याने त्याचे पोट मध्येच फुटले, व त्याची सर्व आतडी बाहेर पडली'' (प्रे.कृ.१ः१८). यहूदाने गळफास लावून घेतला हे आपल्याला माहीत आहे. आणि पोट फूटून बाहेर आल्याचा प्रकार एकतर गळफास लावून घेताना उंचावरून खाली पालथे पडल्याने असेल अगर त्याचे मृत शरीर काही काळ तसेच दोरीला लटकत राहिल्याने त्याचे पोट फुटले असेल. पवित्र शास्त्राच्या विस्तारीत भाषांतरात त्याच्या शरीराचा मध्यभाग फुटला असे आहे. हे अतिशय भेसूर, हिडीस वाटले तरी त्यातून वस्तुस्थिती दिसून येते. यहूदाचे 'विघटन' झाले. त्याचे तुकडे तुकडे झाले असे एका अनुवादात आहे. त्याचे अक्षरशः विभाजन झाले, तुकडे तुकडे झाले, पण हे केवळ शेवटचे शारीरिक लक्षण होते. हा शेवट होण्याचा आरंभ तसा तीन वर्षांपूर्वीच झाला होता. विघटन होण्याची प्रक्रिया हळूहळू सुरूच होती. संपूर्ण व्यक्तित्त्व एकसंध, एकात्म ठेवणारे दिव्य सिमेंट केंद्रस्थानी ठेवलेले नव्हते. त्याने तिकडे कधी लक्षच दिले नाही. सतत 'स्वार्थाकडेच' लक्ष दिल्याने अगदी निकट असलेले 'दिव्यत्व' त्याला दिसलेच नाही. खरेच तो मधोमध दुभंगला-त्याचे तुकडे तुकडे झाले. यहूदा या जगाचे मार्गदर्शक दैवत सहज होऊ शकेल. पवित्र शास्त्र सांगते फक्त येशू ख्रिस्तामध्ये सर्वकाही अस्तित्वात आहे (कलस्सै.१ः१७). परंतु लोकांनी येशू ख्रिस्ताचा दिव्य दृष्टान्त नजरेआड केला, गमावला की मग समाजामध्ये सर्वांना एकसंध ठेवील असा कोणताच प्रभाव, एकीकरणाचे बळ, एकात्मता साधू शकणारे केंद्र उरतच नाही.

मार्क कॉनलीच्या **ग्रीन पाश्चर्स** (हिरवी कुरणे) या नाटकामध्ये आद्य देवदूत गब्रीएल स्वर्गाच्या तटावर फिरतो आहे. पृथ्वीवरील एकंदर स्थिती, तेथील गोंधळ, गडबड व अशांतता पाहून तो फारच अस्वस्थ झाला आहे. अखेर न राहवून तो देवाकडे वळून म्हणतो, ''प्रभुजी, प्रभुजी, ठीकठाक, घट्ट बसवले होते ते सगळे निखळून पडते आहे, सर्व ढिले पडते आहे!'' ख्रिस्ताच्या हाती सूत्रे, नियंत्रण नसले की व्यक्ती आणि संस्था संघटना फुटतात, दुभंगतात, त्यांच्यात फुटी पडतात. आध्यात्मिक दृष्टान्त गमावला की त्याचा समाजावर असाच विपरीत परिणाम होतो.

तिसरे असे की, या हिब्रू शब्दाचा 'विवस्त्र होणे, असणे - नग्न फिरणे' असाही अर्थ आहे. या शब्दांच्या इतर सर्व अर्थांचे स्वरूप आध्यात्मिक आहे तेव्हा हा अर्थही आध्यात्मिकच असला पाहिजे. हा अर्थ मानवप्राण्यांच्या अवस्थेला लावला तर पवित्र शास्त्राच्या आपल्या अभ्यासाला एक नवीन परिमाण मिळेल. मूळ वचनाचा अर्थ अधिक सघन होईल. ''जेथे दृष्टान्त नाही तेथील लोक विवस्त्र-वस्त्रहीन-नग्न आहेत'' असा अनुवाद केल्याने दृष्टान्त नसल्याचे वैयक्तिक परिणाम दिसतात. पवित्र शास्त्रामध्ये सर्वत्र, पापी जनांचे तारण, त्यांचे नीतिमान ठरणे वगैरे सर्व वस्त्र परिधान करणे या अर्थाच्या शब्दांनी सूचित केले आहे. हे संरक्षक गुणयुक्त वस्त्र ख्रिस्ताच्या नीतिमत्त्वाचे आहे. तसेच पापी जनांचा न्यायनिवाडा, शिक्षा होणे हे त्यांचे विवस्त्र होणे, न्यायासमोर उघडे पडणे या संदर्भात दाखवले आहे. खरे पाहता, पवित्र शास्त्रात सर्वच वस्त्र-प्रावरण हे पाप व नीतिमत्त्व या दोहोंचेही प्रतीक आहे. मलिन घाणेरडी वस्त्रे पाप व स्वतःला चांगले समजणारी ढोंगी व्यक्ती यांचे प्रतीक आहे. तसेच पांढरी शुभ्र स्वच्छ वस्त्रे ख्रिस्ताच्या गुणवान नीतिमत्त्वाचे प्रतीक आहेत. पवित्र शास्त्रातून या विचाराचा आणखी मागोवा घ्यायचा असेल तर पुढील शास्त्रभाग वाचा : उत्पत्ती ३:७,२१; जखऱ्या ३:१-५; मत्तय.२२:११-१३; लूक.१५:२२; रोम.१३:११-१४; इफिस.४:२२-२४; कलस्सै.३:५-१४ आणि प्रकटी.१९:७-८.

ख्रिस्ती असण्यामध्ये एक अतिआनंदाची गोष्ट आहे - देवाने स्वतःच्या खर्चाने मला स्वर्गातील अतिशय उत्तम वस्त्र दिले आहे. पोषाख घातला आहे, हीच मोठी आनंदाची बाब आहे. जॉन बन्यन यांच्या **यात्रेकरूचा प्रवास** या सुप्रसिद्ध





रुपककथेमध्ये ही गोष्ट स्पष्टपणे दाखवली आहे. पापाविषयी खातरजमा झालेला तो प्रवासी यात्रेकरू येशूच्या वधस्तंभाजवळ येऊन येशूवर विश्वास ठेवतो तेव्हा त्याच्या पाठीवरचे पापांचे भलेथोरले गाठोडे खाली पडते आणि तो सरळ उभा राहून क्षमा व सार्वकालिक जीवन लाभल्याबद्दल आनंद करतो. मग पुढे जाताना त्याला रस्त्यामध्ये तीन तेजस्वी व्यक्ती भेटतात. या व्यक्ती देव पिता, देव पुत्र व देव पवित्र आत्मा असतात. परिवर्तन झालेल्या या प्रवासी यात्रेकरूला देव पिता सांगतो, ''तुला शांती असो. तुझ्या पापांची क्षमा झाली आहे.'' देवपुत्र यात्रेकरूच्या अंगावरील मलिन वस्त्रे काढून त्याला शुभ्र, तेजोमय स्वच्छ पोषाख घालतो. देव पवित्र आत्मा त्याच्या कपाळावर खूण करतो (पवित्र आत्म्याची मोहर) आणि एक गुंडाळी - पुस्तक त्याच्या हातात देतो (हे पवित्र शास्त्र आहे).

दृष्टान्त नसला की लोक वस्त्रहीन, विवस्त्र होतात या वचनाच्या संदर्भात वरीलपैकी दुसरे कार्य, पापी माणसाचे जुने कपडे काढून नवे कपडे घालणे हे अभिप्रेत आहे. योहान.३:३६ मध्ये असे आहे : ''जो पुत्रावर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे, परंतु जो पुत्राचे ऐकत नाही त्याच्या दृष्टीस जीवन पडणार नाही; पण देवाचा क्रोध त्याच्यावर राहतो.'' ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तीने ख्रिस्ताचे नीतिमत्त्व परिधान केलेले असते. पापाविषयी देवाला असलेल्या क्रोधापासून त्याची सुटका झालेली असते, पण विश्वास न ठेवणारी पापी व्यक्ती वस्त्रहीन असते आणि सर्व विनाशक शक्तींच्या हल्ल्याला ती सहज बळी पडते.

जेथे ईश्वरी दृष्टान्त नसतो तेथे जास्तीत जास्त लोक ''वस्त्रहीन'' अगर असुक्षित - सर्वकाळासाठी असंरक्षित असतात. दृष्टान्त नसण्याचा हा व्यक्तीगत परिणाम आहे.

पवित्र शास्त्राच्या **किंग जेम्स** या इंग्रजी भाषांतरात या हिब्रू शब्दाचे अचूक भाषांतर आहे. ''ईश्वरी दृष्टान्त नसतो तेथे लोक नाश पावतात.'' येथे आपल्याला लोकांची दया आली पाहिजे. कारण येथे लोक संकटात आहेत. मरणाचे भय लोकांना आहे. हाच प्रसंग प्राणी आणि पशू आणि वनस्पतींवर आला असता तर

आपले अंतःकरण तेवढेसे हेलावले नसते. पण येथे तुमच्या-माझ्यासारखे लोक आहेत. ते नाश पावणार आहेत! योहान.३:१६ मध्ये ''नाश होणे'' व ''सार्वकालीक जीवन प्राप्त होणे'' हे दोन शब्द परस्परविरोधी रीतीने आले आहेत. नाश पावणे, नाश होणे म्हणजे सातत्याने जीवंतपणी मरण, आणि मरताना जीवन हा अनुभव नरक नावाच्या ठिकाणी घेत राहणे, तसेच जे लोक ख्रिस्तापासून अलग आहेत ते सध्याच नाश होण्याच्या अवस्थेत आहेत असे १ करिंथ.१:१८ मध्ये आहे. ख्रिस्ती लोकांनी दृष्टान्त गमावला आहे, हरवला आहे या कारणाने लोकांचा नाश होत आहे. दृष्टान्त नसल्याचा हा आध्यात्मिक आणि सार्वकालिक परिणाम आहे. प्रत्येक क्षणाला ख्रिस्तविरहित असे तीन लोक नाश पावत आहेत. कारण मंडळीमध्ये व्यापक दृष्टान्त नाही. नरकामध्ये गर्दी होते आहे आणि स्वर्गामध्ये भरण्याजोग्या पुष्कळ जागा आहेत! या सर्वांचे कारण एकच - मंडळीचा दृष्टान्त लघू झाला आहे, तेजोमय दृष्टान्ताचे तेज झाकोळले आहे, मावळले आहे!

कित्येक वर्षांपूर्वी एक सधन उद्योगपती बंगाली वाघांची शिकार करण्यासाठी भारतात आला. तो सहा आठवडे भारतात राहिला. घरी परत गेल्यावर तो आठवड्याच्या मध्यास होणाऱ्या उपासनेसाठी तो नेहमी जात असे त्या मंडळीमध्ये गेला. तिथे मंडळीच्या वार्षिक अंदाजपत्रकावर विचारचर्चा सुरू होती. या उद्योगपतीने त्यांना सुचवले की परदेशात सुवार्ताप्रसार कार्यासाठी दिले जाणारे पैसे यापुढे देऊ नयेत. आपल्या अंदाजपत्रकातून ते कलम कायमचे काढून टाकावे. त्याची सूचना ऐकून सर्वजण अगदी चकीत झाले. एका वयस्कर गृहस्थाने त्यांना या विचित्र सूचनेचे कारण काय ते विचारले. त्यावर उत्तर मिळाले ते असे : ''मी आताच भारतात जाऊन आलो आहे. तिकडे मी सहा आठवडे होतो. त्या काळात मला तिकडे एकही मिशनरी - सुवार्तासेवक दिसला नाही.'' त्या वयस्कर गृहस्थाने आणखी विचारले, ''तुमची ही भारतयात्रा कशासाठी होती?'' त्यावर तो उद्योगपती बोलला, ''मी तिकडे बंगाली वाघांची शिकार करायला गेलो होतो!'' ''हो का! मग किती बंगाली वाघ बघितलेत?'' ''सहा दिसले!'' तो वयोवृद्ध गृहस्थ पुढे बोलला, ''मला तर हे चमत्कारिक वाटते! मी भारतात मिशनरी म्हणून तीस वर्षे सेवा केली. त्या काळात मी शेकड्यांच्या शेकडो मिशनरी आणि





सुवार्ताप्रसारक पाहिलेत, पण बंगाली वाघ म्हणाल तर मला अजून एकही वाघ दिसलेला नाही.'' तेव्हा लक्षात घ्या, आमची विचारदृष्टी, दृष्टीकोन आणि दृष्टान्त यांवर खूप काही अवलंबून असते.

नीती.२९:१८ हे वचन शलमोन राजाने लिहून ठेवले आहे. या माणसाच्या कारकिर्दीत, राजवटीत ईश्वरी दृष्टान्त मावळत होता. लोकांच्या अनास्थेमुळे दृष्टान्ताचे तेज लयास जात होते. शलमोन राजाच्या कारकिर्दीत जो व जसा अधःपात झाला तसा इस्राएल राज्यात त्यापूर्वी व त्यानंतरही झाला नाही. लोकांचे विभाजन झाले. लोकांची मने छिन्नविछिन्न झाली. राष्ट्र कोसळले, राज्य दुभंगले आणि त्याचे दोन भाग झाले!

आमच्यासमोर पर्याय अगदी सुस्पष्ट आहे. दूरदृष्टी, दृष्टान्त अगर लघुदृष्टी - विभाजन-विघटन, आणि हे विश्वात सर्वत्र, राष्ट्रात, देशात, स्थानिक पातळीवर खरे आहे, पण येशू ख्रिस्ताच्या मंडळीत आणि वैयक्तिक ख्रिस्ती जीवनात ते विशेषकरून खरे, लागू पडणारे आहे.

आपण शांत, निवांतपणे प्रार्थनापूर्वक देवाला विनविले पाहिजे. आपली निकडीची गरज सांगण्यास आणि शिकून घेण्यास तयार असले पाहिजे. देवाने आपला दृष्टान्त आम्हांला पुन्हा द्यावा, त्याच्या अतिभव्य वैयक्तिक गौरवाचा दृष्टान्त द्यावा आणि आमच्यासाठी आणि जगासाठी असलेली त्याची प्रबल, समर्थ योजना आम्हांला समजावून सांगावी म्हणून त्याला विनंती करूया. तो दृष्टान्त पुन्हा प्राप्त झाला की आपणाला पुन्हा समजेल, दिसेल की त्याची संपूर्ण योजना आमच्या प्रभूने दिलेल्या महान आज्ञेमधूनच प्रकट झाली आहे आणि ''लोकांना शिष्य करा'' हाच आदेश आपल्याला दिला आहे.

''देवाच्या अंतःकरणावर जगाचे ओझे आहे, त्याला जगाची काळजी आहे. त्याची ती चिंता, तो भार आपल्या अंतःकरणावर घेणे हीच आध्यात्मिक दूरदृष्टी, दृष्टान्त आहे,'' असे डॉसन ट्रॉटमन ह्यांनी यथार्थपणे म्हटले आहे. कलस्सै येथील ख्रिस्ती लोकांनी सर्व काही देवाच्या दृष्टीने, देवाच्या दृष्टीकोनातून पाहावे अशी पौलाने प्रार्थना केली आहे (कलस्सै.१:९ जे. बी. फिलिप्स अनुवाद). आपण

*टॅली हो द फॉक्स!*

सर्वांनीच असे केले तर खरोखर कल्पनातीत क्रांती होईल. या जगाचा चेहरामोहराच बदलून जाईल!

''जागा असलेला एकजण
दुसऱ्याला जागे करू शकतो;
मग तो दुसरा सहज उठवतो
आपल्या शेजारच्या भावाला
जागे झालेले हे तिघेजण मग
साऱ्या गावाला उठवतील
सगळे गाव उलथेपालथे होईल
सर्वजण जागे होतील
पुष्कळजण जागे झाले की,
मग एकच गडबड उडेल
त्यामुळे अखेर आम्ही
सगळेच जागे होऊ
पहाटेचा प्रकाश डोळ्यात घेऊन
एक माणूस जागा झाला
की बहुतजन जागे होतात.''



*प्रकरण २*

# आमचे कार्यकर्तव्य निश्चित करणारी कामगिरी

*''तेव्हा येशू जवळ येऊन त्यांच्याशी बोलताना म्हणाला स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे. तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकांस शिष्य करा; त्यांस पित्याच्या पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या; जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांस पाळावयास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे''* (मत्तय.२८:१८-२०).

आम्ही घर सोडून बाहेर जातो तेव्हा जाण्यापूर्वी आम्ही आमच्या महत्त्वाच्या सूचना व इतर आवश्यक गोष्टींची माहिती घरातील मंडळींना देतो. दुसऱ्यांनी विसरू नयेत अशा गोष्टींची आठवण देतो. माझी पत्नी अशा सूचना सैपाकघरातील मेजावर - सैपाकाच्या कट्ट्यावर किंवा फ्रीजवर चिकटवून ठेवते. याचा अर्थ काय? अर्थ हाच की हे अगदी महत्त्वाचे आहे.

जॉर्ज पीटर्स ह्यांनी आपल्या ***'अ बिब्लिकल थिऑलॉजी ऑफ मिशन्स'*** या पुस्तकात लिहिले आहे की, मानवी धुके आणि धूसर कल्पनांचे जंजाळ यात महान कामगिरी आमचा मार्गदर्शक प्रकाश - दीप आहे. आपण आता महान कामगिरीचा नव्याने सखोल अर्थभेदक अभ्यास केला पाहिजे. त्याचीच आज नितांत गरज आहे.

फारच थोडे शिक्षक आणि भाष्यकार महान कामगिरीविषयी सविस्तर विचार करतात. शिष्य करण्याची कामगिरी सोपवली आहे तिचा मंडळीने गंभीरपणे विचार करण्याचा समय आला आहे. जॉन मॅकजी ह्यांनी जीवनभर नायजेरियामध्ये मिशनरी सेवा केली. ते म्हणतात, महान कामगिरीमध्ये फार मोठा विचार आहे. तो पूर्ण करणे, त्यावर मनन चिंतन करणे, व त्याची स्वप्ने पाहणे हे दहा जन्म मिळाले तरी कोणा एका व्यक्तीचे काम नाही!

मत्तय.२८:१६-२० या वचनांमध्ये महान कामगिरीचा उल्लेख आहे. या भागात आरंभी असे आहे : ''इकडे अकरा शिष्य गालीलात जो डोंगर येशूने सांगून ठेविला होता त्यावर गेले'' (व.१६). पुनरुत्थानानंतर पूर्वीच सांगून ठेविल्याप्रमाणे येशूने दर्शन दिल्याचा हा एकमेव प्रसंग आहे. इतर वेळा येशूने शिष्यांना साधारण उत्स्फूर्तपणे दर्शन दिले आहे. या प्रसंगी येशूला काही विशेष महत्त्वाचे सांगायचे, करायचे होते यात शंकाच नाही. आणि खरोखरी तसेच आहे! येथे त्याने आपल्या अंतिम सूचना 'जाहीर' केल्या. सर्व उपाय थकले की 'सूचना नीट वाचा' हे शब्द आजच्या यंत्रयुगात महत्त्वाचे आहेत. आता या प्रकरणामध्ये आपण या सूचनांचे दोन शीर्षकांखाली दोन भाग करणार आहोत. १) या कामगिरीमागचे आश्वासन - निर्वाळा आणि २) या कामगिरीच्या आदेशात नेमून दिलेले काम - महान कामगिरी नीट समजून घेऊन ती पूर्ण करावयाची तर आपणाला दोन्ही गोष्टी नीट शोधून पाहणे अगत्याचे आहे.

## या कामगिरी मागचे आश्वासन (व.१८, २०अ)

महान कामगिरी सोपवून देताना आरंभीच कधी ऐकिवात नसलेली थक्क करणारी घोषणा आहे. येशूने म्हटले, ''स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे.'' त्याची सत्यता, विश्वासार्हता आणि आम्हांला दिलेली कामगिरी याच वाक्यावर अवलंबून आहे. याचा अर्थ काय? आणि हे किती महत्त्वाचे आहे?

येथील 'अधिकार' हा *'दिव्य* अधिकार' आहे. सर्वच शास्त्रलेखांमध्ये देवापासून नाही असा अधिकार नाही (रोम.१३:१) - 'सर्व अधिकार देवापासून आहे' हे महान तत्त्व आहे. येथेही तेच तत्त्व दिसते. 'अधिकार' या अर्थी 'एक्सोसिया' हा





ग्रीक शब्द आहे. त्याचा शब्दशः अर्थ आहे जिवापासून. आता यावर नीट विचार करा. प्रत्यक्ष देवाच्या जीवित्वापासून आवश्यक तो सर्व अधिकार ख्रिस्ताबरोबरच्या आमच्या सख्याच्या द्वारे आम्हांला ती महान कामगिरी पूर्ण करण्यासाठी दिला आहे.

हा अधिकार *सुपूर्द केलेला, सोपविलेला* अधिकार आहे येशू ख्रिस्ताला त्याच्या व्यक्तित्वामध्ये, अंगभूत अधिकार आहे. तो जो आहे त्या कारणाने त्याला हा अधिकार आहे. या पृथ्वीवरील त्याच्या जीवनात त्याला जो अधिकार होता तो अगदी स्पष्ट रीतीने प्रकट झाला.

मुखाने उच्चारलेला एक शब्द व आपल्या हाताची हालचाल एवढ्यानेच त्याने निसर्गावरील आपल्या अधिकाराचे प्रात्यक्षिक दाखवले. मोठे वादळ उठले, जन्मजात मासेमारी करणारे अनुभवी कोळीही घाबरले एवढे ते तुफान जबरदस्त होते तेव्हा त्याने क्षणार्धात ते वादळ शमविले. उंबराच्या झाडाला उद्देशून तो एक शब्द बोलला आणि आश्चर्याने टकमक पाहणाऱ्या शिष्यांच्या समोर ते झाड वाळून पडले.

मानवी सदसद्विवेकभावाच्या क्षेत्रातही त्याचा अधिकार होता. त्या शोमरोनी स्त्रीबरोबर सरळ चार दोन शब्द बोलून त्याने तिचा विवेकभाव जागविला, तिच्या पापाची जाणीव दिली आणि तिच्या अंतःकरणात आशेचे झंकार उमटले. आणि यासाठी ममतेने केलेले भाषण याहून दुसरे मोठे साधन अथवा हत्यार त्याने वापरलेच नाही. दुसऱ्या एका प्रसंगी चहूबाजूंनी चौकस, प्रत्येक गोष्टीत नाक खुपसणाऱ्या लोकांची गर्दी असूनही एका माणसाला नावाने हाक मारली आणि झाडावरून खाली उतरण्यास सांगितले, आणि एवढ्यानेच यरीहोमधील त्या देवहीन निंद्य यहूदी जकयाचा विवेकभाव जागवला.

या भौतिक जगापासून केवळ एका अगदी पातळ पडद्याने वेगळे केलेल्या अदृश्य आध्यात्मिक जगावर आपला सर्वोच्च अधिकार आहे याचे प्रमाण त्याने या पृथ्वीवरील आपल्या जीवनामध्ये दिले आहे. मनुष्याच्या जीवनावर कबजा करून राहिलेल्या दुष्टतेच्या शक्तिशाली अधिकाऱ्यांना तो केवळ एका शब्दाने पळवून लावीत असे.

मानवी अशक्तपणा आजार व रोग या क्षेत्रावरही त्याचा अद्‌भुत अधिकार होताच. नेत्रदीपक असे काही करून लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी नव्हे तर दुखणाईत, वेदनांनी हैराण झालेल्या लोकांचे जीवन सुकर व्हावे म्हणूनच त्याने आपल्या आरोग्यदायी शक्तीचा उपयोग केला. त्याने बहिऱ्यांना ऐकणारे कान दिले, अंधांना दृष्टी दिली, मुक्यांना वाचा दिली, लंगड्यापांगळ्यांना धडधाकट - हिंडते फिरते केले, सतरा जागी वाळलेली शरीरे सरळ केली आणि मेलेल्यांना पुन्हा जीवन दिले.

त्याचे शिक्षणही अधिकारयुक्त होते. सभास्थानामध्ये अगदी प्रथम शिक्षण दिल्यावर त्याच्या शिकवणीवरून लोक थक्क झाले, कारण तो त्यांना शास्त्री लोकांसारखे नव्हे तर अधिकार असल्यासारखा शिकवीत होता (मार्क.१:२२). आपला संपूर्ण अधिकार घेण्यास, वापरण्यास येशूने कधीच कुचराई केली नाही. पापक्षमा करण्याचा आपला अधिकार त्याने ठामपणे व्यक्त केला (मार्क.२:१७). मोशेच्या नियमशास्त्रात फेरफार सुचविणारी विधाने त्याने केली. मोशेचे नियमशास्त्र देवाकडून आहे असे सर्वजणच मानीत होते (मत्तय.५:२१,२७,३३). प्रत्येक माणसाचा अंतिम न्यायनिवाडा करणारा न्यायाधीश आपणच आहो असेही तो म्हणाला (योहान.५:२७).

परंतु येशूच्या या म्हणण्यामध्ये असलेला अधिकार आणि मत्तय.२८:१८ मध्ये उल्लेख केलेला अधिकार - एकच नसून ते वेगवेगळे आहेत. हा विशिष्ट अधिकार येशूला दिल्याचे तो स्वतःच सांगतो. मरणावर विजय मिळवून पुनरुत्थान झाल्याने तो हा अधिकार मिळण्यास पात्र झाला आहे. या गौरवी पुनरुत्थानातून त्याला आता जो अधिकार आहे तो पूर्वी त्याच्या जीवनकालातील अधिकारापेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे. आता प्रत्येक प्रकारचा अधिकार त्याचाच आहे, स्वर्गातील त्याच्या पित्याच्या दिव्य आदेशाने त्याला हा अधिकार दिला होता. आपल्या प्रभूचा पृथ्वीवरील आणि स्वर्गातील अधिकार परिपूर्ण आहे, हे त्याच्या सेवकांना - शिष्यांना चांगले माहीत होते. रोम.१:४ मध्ये म्हटले आहे : ''...पवित्रतेच्या आत्म्याच्या दृष्टीने तो मृतांच्या पुनरुत्थानाच्या द्वारे देवाचा पुत्र असा निश्चित ठरला.'' त्याने आपल्या शिष्यांवर सोपविलेल्या कामगिरीचा मूळ आधार हाच





अधिकार आहे.

अधिकाराचा हा दावा अत्यंत विस्मयकारक आहे. ए. व्ही. रॉबर्टसन म्हणतात, ''पुनरुत्थित ख्रिस्ताजवळ पैसा, सैन्य अगर देश - राज्य काहीही नसताना या पाचशे स्त्रीपुरुषांच्या समुदायावर जग जिंकण्याचे काम सोपवून देतो आणि हे करणे सहज शक्य आहे असा विश्वास त्यांच्या मनात उत्पन्न करतो आणि त्यांना मोठ्या उत्कटतेने व उत्साहाने ही जबाबदारी स्वीकारण्यास लावतो हे चित्र खरोखर चित्तथरारक आहे.''

हा अधिकार *पात्रतेमुळे मिळालेला अधिकार आहे.* येशूने म्हटले, सर्व अधिकार मला दिला आहे. लक्षात घ्या, अधिकार आम्हांला नव्हे तर त्याला दिला आहे. परंतु त्यामुळे आपण नाराज होण्याचे काहीच कारण नाही, कारण जे काही त्याचे आहे ते तारण झालेल्या प्रत्येक व्यक्तीचे आहे. नव्याने जन्मलेली प्रत्येक व्यक्ती देवाची वारसदार आहे कारण ती ख्रिस्ताबरोबर सहवारीस आहे (रोम.८:१७). पित्याच्या मालमत्तेतील जे जे म्हणून वारसा हक्काने ख्रिस्ताचे आहे ते माझेही आहे कारण मी विश्वासाने त्याच्याशी समरूप झालो आहे. जे जे त्याचे ते ते सर्व माझेही आहे. माझी तशी लायकी आहे म्हणून नव्हे तर मी त्याच्यामध्ये आहे म्हणून ते माझे आहे. हेही लक्षात घ्या, की तो देवाचा पुत्र आहे म्हणून हा अधिकार त्याला दिलेला नाही. तो देव आहे, त्याच्यामध्ये कसलीही भर घालता येत नाही आणि त्याच्यातून काही काढूनही घेता येत नाही. येशूने येथे ज्या अधिकाराचा दावा केला आहे तो अधिकार त्याने मनुष्याचा पुत्र म्हणून संपादन केला आहे. हक्काने, पात्रता आहे म्हणून तो त्याने घेतला आहे. दिला आहे या क्रियापदावरून हे कृत्य भूतकाळी घडल्याचे समजते, मेलेल्यांतून तो पुन्हा उठला त्याच वेळी, त्याच दिवशी त्याला हा अधिकार मोठ्या प्रतिष्ठापूर्वक प्रदान करण्यात आला. फिलिप्पै.२:५-११ मधील अतिलीन होणे व अति उन्मत्त केले जाणे या शास्त्रभागाशी हे मिळतेजुळते आहे. ख्रिस्ताची दारुण मानखंडना दाखवल्यावर पौलाने त्यातूनच पुढे त्याचे झालेले गौरव उघड केले आहे. ''ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले; ह्यात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर आणि पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा'' (फिलिप्पै.२:९-११). त्याला 'अत्युच्च

करणे’ व त्याला ‘अधिकार देणे’ हे दोन्ही त्याचे मरण व पुनरुत्थान यांच्या गुणामुळे मिळाले आहे.

ही महान कामगिरी सोपविण्यापूर्वी त्याने आपल्या अधिकाराविषयी सांगितले. त्याचा अधिकार निश्चित स्वरुपाचा होता. स्वर्गात व पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे येथे दोन क्षेत्रांचा उल्लेख आहे आणि आपण फक्त याच क्षेत्रात काम करतो. आणि आमच्या समजुतीप्रमाणे येशू ख्रिस्त देखील याच दोन क्षेत्रात कार्य करतो - ‘स्वर्गात आणि पृथ्वीवर’ सर्व अलौकिक अधिकार, स्वर्गीय अधिकार त्याचा आहे आणि ‘पार्थिव, ऐहिक अधिकारही त्याचाच आहे.’ तो आपल्या शिष्यांना जाहीरपणे सांगतो, ‘‘स्वर्गात सर्व अधिकार मला दिला आहे!’’ तेथे स्वर्गात त्याला, ‘‘सर्व नावापेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले आहे’’ आणि त्याला आपल्या उजव्या हाताशी अधिपती व तारणारा असे उच्च पद दिले आहे, तेथे त्याला गौरव थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहे. ‘‘पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे’’ असेही त्याने जाहीर केले. तो दोन्हीही जगांचा प्रभू आहे, त्यांवर सर्वस्वी त्याचाच अधिकार आहे.

शेक्सपिअरच्या **‘किंग लिअर’** ह्या नाटकामध्ये अर्ल ऑफ केंट वेषांतर करून राजाच्या भेटीला आल्याचे चित्रण आहे. लिअर राजा त्याला विचारतो, ‘‘तुम्हांला काय पाहिजे?’’ अर्ल ऑफ केंटने उत्तर दिले, ‘‘मला तुमची सेवा करायची आहे.’’ लिअर राजाने विचारले, ‘‘का?’’ त्यावर अर्ल ऑफ केंट याने ते सुप्रसिद्ध उत्तर दिले, ‘‘तुम्हांला स्वेच्छेने, आनंदाने, स्वामी, मालक, धनी मानावे असे काही तुमच्या चेहऱ्यावर आहे.’’ राजाने विचारले, ‘‘ते काय आहे?’’ ‘‘अधिकार’’ अर्ल ऑफ केंट उत्तरला.

येशूने सर्व अधिकार आपलाच असल्याचा दावा यथार्थपणे केला आहे. सुवार्ताप्रसाराचे महान कार्य आणि शिष्य करण्याविषयीची आज्ञा हे दोन्ही याच अधिकाराने पूर्ण करायचे आहे. त्याचा अधिकार कमी झालेला नाही, शतकांच्या काळात तो ओसरला नाही. जसा आरंभी होता तसा आजही आहे. त्या अधिकाराच्या आधाराने त्या महान आज्ञेच्याद्वारे नेमून दिलेली कामगिरी पूर्ण करायची आहे.





## महान कामगिरीमधील नेमून दिलेले काम (व.१९,२०)

येशूने आपल्या मंडळीला दिलेला कार्य करण्याचा आदेश महान कामगिरीमध्येच आढळतो. महान कामगिरी म्हणजे आत्मे जिंकणे आणि सुवार्ताप्रसार सेवाकार्यासाठीची आज्ञा आहे - पण एवढेच नाही त्यात अजूनही पुष्कळ आहे. आमच्या प्रभूने सोपविलेल्या महान कामगिरीचा दृष्टांत नव्या करारामध्ये पाच प्रकारे दिला आहे. या कामगिरीची आज्ञा वेगवेगळ्या रीतीने दिली आहे. मत्तय.२८:१८-२० (सर्वस्वी निश्चित, सुस्पष्ट विधान), मार्क.१६:१५; (अगदी थोडक्यात); लूक.२४:४७; योहान.२०:२१ आणि प्रे.कृ.१:८ (येथे सर्वांत विस्तृत विवरण आहे).

मत्तयने लिहिलेल्या वृत्तांतामध्ये येशू ख्रिस्ताच्या मंडळीला आपल्या कार्यकर्तव्याचा आधार मिळतो. आपल्या अनुयायांनी काय करायचे ते येशूने तेथे अगदी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. यात भावभावनांचा संबंध नाही. हे आमच्या सोयीसवडीने करावे असे हे काम नाही, येशूने नेमकेपणे सूचना दिल्या आहेत. या सचूना कालातीत आणि न बदलणाऱ्या आहेत, तात्कालिक स्वरुपाच्या नाहीत. खरे तर ही कामगिरी आताच्या आता करायची आहे. आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रत्येक ख्रिस्ती व्यक्ती आता या क्षणी बांधलेली आहे. या महान कामगिरीच्या विधानातील क्रियापदे, शब्द कृतिशील आहेत. हे शब्द कृती सूचित करतात - जाऊन शिष्य करणे, बाप्तिस्मा द्या, शिकवा - शिक्षण द्या अगदी सरळ सांगायचे तर मंडळीला आज्ञा दिल्या आहेत. त्या आज्ञांचे नेमके स्वरूप पाहिले तर बहुतेक सर्वच विश्वासणारे आश्चर्यचकित होतील.

## या कामगिरीचे भागशः विभाजन

मी या एकंदर कामगिरीचे - या उद्देशाचे सात भाग करणार आहे. त्याची रुपरेषा अशी आहे. सर्वप्रथम आपण जवळ असलेले सर्व उपलब्ध मनुष्यबळ कामास लावले पाहिजे (व.१९ मधील ‘तुम्ही’ अनेकवचनी आहे). येशूने आपल्या अनुयायांना कोणती कामगिरी दिली आहे त्याचा उद्देश काय ते मत्तयने स्पष्टपणे नमूद केले

आहे. मग आपण 'गेले' पाहिजे म्हणजे दुसऱ्या क्षेत्रात प्रत्यक्ष प्रवेश केला पाहिजे (जा - जाऊन). तिसरे असे की, आपण सातत्याने आपली दृष्टी व्यापक केली पाहिजे (सर्व राष्ट्रे) ('सर्व राष्ट्रातील'). चौथे आपण त्यांना सुवार्ता सांगायची आहे (शिष्य करा). पाचवे म्हणजे, सुवार्ता ज्यांना सांगितली आहे त्यांना दाखल करून घ्यायचे आहे (त्यांस, पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या). सहावे असे की, दाखल करून घेतलेल्या या लोकांना शिक्षण देऊन त्यांचे प्रबोधन केले पाहिजे (मी तुम्हांस आज्ञापिले ते सर्व त्यांस पाळावयास शिकवा) आणि अखेरीस त्याने कार्य करावे अशी अपेक्षा आपण ठेवावी (आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे). म्हणजेच प्रभूने दिलेल्या महान कामगिरीमध्ये आपण जाणून घेतले त्याहून खूप काही असणार यात संशय नाही.

आपण अगदी गंभीरपणे व काळजीपूर्वक शोध घेतला तर आपल्याला या महान कामगिरीबद्दल एक खास गोष्ट समजेल. एक नवाच मुद्दा लक्षात येईल. साधारणपणे दोनशे वर्षे या आज्ञेप्रमाणे काम चांगले चालले होते आणि त्यावेळी ज्ञात असलेल्या जगावर सुवार्तेचा उत्तम प्रभाव पडत होता. परंतु नंतर काही चमत्कारिक घडले. काहीतरी भयानक चूक झाली. नेमके काय झाले ते समजण्यासाठी आपण वर दिलेल्या सात मुद्द्यांपैकी प्रत्येकाचा स्वतंत्रपणे विचार करू. प्रत्येक मुद्द्याखाली तुम्ही दोन उपमुद्द्यांचा किंवा उपशीर्षकांचा विचार करावा - एक शीर्षक आहे : 'तारकाची योजना,' दुसरे शीर्षक आहे 'सैतानाचा पर्याय'. या महान कामगिरीमध्ये आपण सात मुद्दे शोधले. त्या प्रत्येक मुद्द्याचे परीक्षण आपण याच प्रकारे करू.

## १. मनुष्यबळ कामास लावा

सर्व माणसे कामावर पाठवा, मनुष्यबळ कामास लावा हाच या कामगिरीतील पहिला मुद्दा आहे. व. १९ मधील 'तुम्ही' हा शब्द अनेकवचनी आहे. तुम्ही सर्वांनी - तुम्ही सर्वजण असा त्याचा अर्थ आहे.





### तारकाची योजना

ही महान कामगिरी पूर्ण करण्यासाठी येशूने जे योजिले होते ते कोणी एकाने या शब्दांनी सांगितले आहे : ''सर्व विश्वासणाऱ्यांनी या कामात सहभागी व्हावे, आणि त्यांनी नित्य, नेहमी त्या कामात गढलेले असावे.''

महान कामगिरी पूर्ण होण्यास आरंभी दिव्य शक्ती हे एक कारण होते. तथापि त्याहून महत्त्वाचे म्हणजे कामाच्या सेवेच्या ठिकाणी त्यांनी आपले सर्व मनुष्यबळ कामास लावले. प्रत्येक शिष्य आत्मे जिंकणारा, आणि नवनवे पहिल्यासारखे आणखी शिष्य तयार करणारा व्हावा हेच त्यांचे उद्दिष्ट होते. ते सर्वच प्रचारक - प्रसारक व सुवार्तिक होते! प्रसारसेवा कार्यामध्ये सहभागी होण्यात त्यांचा उत्साह एवढा दांडगा होता की, गोंधळ टाळण्यासाठी, सर्वकाही सुव्यवस्थित होण्यासाठी नियम करणे भाग पडले (पहा १ करिंथ.१४:२६-३३). त्यांच्यामध्ये केवळ बघे, प्रेक्षक असे कोणी नव्हते! ख्रिस्ती मंडळीचे एक थोर इतिहासकार अ‍ॅडॉल्फ हार्नक ह्यांनी म्हटले आहे, ''रोमन साम्राज्याच्या आरंभ काळात ख्रिस्ती मंडळीने मोठमोठे विजय मिळवले, ते तज्ज्ञ शिक्षक, उपदेशक अगर प्रेषित यांच्या कार्यामुळे नव्हे तर हौशी, उत्साही, मिशनरींच्या कार्यामुळे मिळविले.'' प्रत्येक विश्वासणाऱ्याने स्वतः होऊन हे सेवाकार्य केले पाहिजे, यात प्रत्येकाचा सहभाग हवा हेच या महान कामगिरीमध्ये अपेक्षित आहे. हे कार्य प्रत्येक सदस्याने केले पाहिजे ते ख्रिस्ताच्या मंडळीतील सर्व सभासदांना करता येणार. एरवी ते शक्य नाही. न्यूयॉर्क शहराच्या मॅनहेटन या आधुनिक भागात एका मंडळीच्या उपासनामंदिरावर नामफलक होता : ''पाळक : सहपाळक : मंडळीचा प्रत्येक सभासद.'' मनुष्यबळ कामी लावण्यासाठी आमच्या तारकाची योजना अशीच आहे.

### सैतानाचा पर्याय

आता सैतानाचा पर्याय काय कसा आहे ते पहा. महान कामगिरीमधील आदेशानुसार काम नेटाने चालू होते ही वस्तुस्थिती आहे. हे कार्य एवढे उत्तम प्रकारे होत होते की, ते पाहून सैतान दिङ्मूढ झाला. त्याला मोठा धक्का बसला. त्यातून सावरून पुन्हा आपले बगलबच्चे वगैरे भुतावळ एकत्र करण्यास त्याला २०० वर्षे

लागली. मग त्याने या महान कार्याला शह देण्यासाठी स्वतःचा पर्यायी कार्यक्रम सुरू केला. महान कामगिरीच्या मूळच्या आदेशात त्याने फेरफार मोडतोड केले हे उघडच दिसते, त्यात त्याने सुधारणा केली, बदल केला आणि कित्येक शतकांच्या काळात अनेक मंडळ्या सैतानाच्या कारवायांना बळी पडल्या - त्यांनी त्याचा पर्यायी कार्यक्रम स्वीकारला. सर्व मनुष्यबळ, सर्व सेवक कामाला लावा याच तत्त्वावर सैतानाने पहिला घाव घातला, महान कामगिरीची अर्धीअधिक शक्ती येथेच संपुष्टात आली.

मंडळीच्या इतिहासात आरंभीच सैतानाने फूट पाडली, मंडळीचे दोन भाग पाडले. आणि या विभाजनावर वारंवार भर देऊन त्यामागील तत्त्व सर्वांच्या गळी उतरवले. या विभाजनाला अवाजवी महत्त्व दिले, यातील बहुसंख्यांच्या भागाला त्याने 'अदीक्षित, सामान्य' सभासद असे म्हटले आणि उरलेल्या मूठभर लोकांच्या समूहाला त्याने 'पाळक - पुरोहित वर्ग' हे नाव दिले. अदीक्षित लोक मंडळीचे सामान्य सभासद असतात. त्यांना सेवा करण्याची कुवत नाही तसेच त्यांना विशेष कृपादानही नसते. आणि मंडळीच्या मुख्य कार्यामध्ये त्यांना आस्था नाही, उत्साह नाही असेही तो सांगू लागला. आणि मग त्याने स्वतः पुढाकार घेऊन व्यावसायिक धर्मकार्य करणाऱ्या माणासांचा अधिकार क्रम ठरवला व प्रसारात आणला. या व्यावसायिक लोकांनी १) सर्व आध्यात्मिक कार्य करायचे होते आणि २) आध्यात्मिक लढेही लढायचे होते. मग सामान्य सभासदांनी अदीक्षित वर्गाने काय करायचे? याचे उत्तर सोपे होते. त्यांनी उद्योग व्यवसाय करून या व्यावसायिक पाळक वर्गाला अर्थसहाय्य पुराव्याचे, त्यांनी आखलेल्या कार्यक्रमासाठी येणारा सर्व खर्च करायचा. एवढेच त्यांचे काम! (नव्या करारामध्ये लोक हाच कार्यक्रम आहे!)

मग मंडळीमध्ये 'समर्पणाची शिडी' तयार केली गेली. सर्वात वरच्या पायरीवर 'मिशनरी' सेवकाचे स्थान होते, मग त्या खाली क्रमशः पाळक व इतर व्यावसायिक धर्मसेवक यांच्या जागा होत्या. आणि सर्वांचे ओझे शिरावर वाहणारा सर्वांचा आर्थिक पुरवठादार 'सामान्य अदीक्षित' सभासद सर्वात खाली, तळाच्या पायरीवर होता. आजचे आपले युग 'प्रेक्षकांचे - बघ्यांचे' युग आहे असे कोणीसे म्हटले आहे. फुटबॉलच्या खेळात बावीस खेळाडू असतात पण लक्षावधी लोक तो खेळ





पाहात असतात. बेसबॉलच्या खेळात एका वेळी १८ खेळाडू असतात, बास्केट बॉल खेळण्यास दहा, बॉक्सिंगसाठी दोन आणि ऑलिंपिक खेळात तर कोठे कोठे एकटा खेळाडू स्पर्धक असतो! पण या सर्व खेळांचे कोट्यवधी शौकीन प्रेक्षक असतात. विनोदवीर फ्रेड ॲलन म्हणतो, ''समाजाची वाटचाल अशी याच दिशेने होत राहिली तर लवकरच आपल्या जगात मोठे मोठे वाटीएवढे डोळे असलेले लोक असतील, त्यांचे डोळे मोठे पण मेंदू मात्र वाटाण्याएवढा असेल!''

## मंडळीच्या समस्या - काही लोकांना काम नसणे व कामासाठी लोक कमी पडणे

मंडळीमध्ये काम करणे - काम नसणे. बेकारी याविषयी दोन समस्या आहेत. या दोन्ही समस्या परस्परपूरक असल्याने परिस्थिती अधिकच बिकट होते. स्थानिक मंडळीतील सभासदांना मंडळीत काही काम नसणे ही एक समस्या आहे. सर्वसाधारण मंडळीतील सर्वसाधारण सभासद देवाने त्यांच्याकडे सोपवलेले कार्य पूर्ण करीत नाही म्हणून त्याला फक्त 'उदरनिर्वाह' एवढेच वेतन मिळते. त्याच्यावरची जबाबदारी पूर्ण होत नाही, त्याचे पारितोषिक तो गमावतो. जग आहे तसेच अंधारात राहते आणि सैतानाचे मात्र संपूर्ण समाधान होते!

आचार्य पाळक ह्यांना त्यांच्या लायकीचे काम नसणे ही दुसरी समस्या पहिलीशी संबंधित अशीच आहे. आजच्या कोणत्याही मंडळीत सर्वसाधारण पाळक कामाच्या ओझ्याखाली दबलेला असतो, पण त्याला साजेसे काम त्याला पुरेसे नसते! हेन्री एम. स्टॅन्ली हे गृहस्थ डेविड लिव्हिंगूस्टन यांचा शोध घेण्यास आफ्रिकेत गेले होते. लिव्हिंगूस्टन यांची भेट घेऊन स्टॅन्ली माघारी आले तेव्हा एका वार्ताहराने त्यांना कुत्सितपणे विचारले, ''आफ्रिकेमध्ये तुम्हाला जास्त त्रास कशाचा झाला? सिंहाचा का सापांचा?'' स्टॅन्ली ह्यांनीही त्याला तशाच सुरात उत्तर दिले, ''त्रास सिंहाचा नव्हता आणि सापांचाही नव्हता- खरा त्रास दिला डासांनी आणि मच्छरांनी!'' आमच्या पाळकांच्या वाघ सिंह क्वचितच नजरेस पडतात. कारण त्यांना सदोदित मच्छर आणि डास यांचा त्रास चुकवावा लागतो! आध्यात्मिक क्षेत्रामध्ये अणुयुद्ध सुरू आहे आणि आमचे पाळक पॉपकॉर्नचा (मक्याचा लाह्या) मारा चुकवण्याची

धडपड करीत आहेत! त्यांच्या वाटेत नाना प्रकारचे अडथळे ठेवण्यासाठी धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल केली जाते त्यातच त्यांची दमछाक होते. तसेच त्यांचे पाचारण त्यांची जबाबदारी वगैरे संबंधात भडक चित्र प्रतिमा उभ्या केल्या जातात. परिणामी देवाने त्यांच्यासाठी नेमून दिलेले कार्य त्यांना पूर्ण करता येत नाही.

याच आठवड्यात मला प्रांतिक परिषदेच्या कचेरीतून एक अहवाल मिळवला. त्यात असे आहे : अमेरिकेतील सदर्न बॅप्टिस्ट मंडळीच्या पुलपिटवरून दरमहा ३०० सदर्न बॅप्टिस्ट पाळकांना सक्तीने हाकलण्यात येते अगर त्यांची सेवा समाप्त केली जाते. ही संख्या बरोबर आहे का नाही ते मला माहीत नाही, पण ही समस्या मोठी गंभीर आहे एवढे मी जाणतो. सदर्न बॅप्टिस्ट मंडळ्यातील १००० पेक्षा अधिक सदर्न बॅप्टिस्ट पाळक दरवर्षी सेवा सोडून जातात असे मी काही वर्षांपूर्वी ऐकले. आता ही संख्या बरोबर आहे का ते मी नक्की सांगू शकत नाही. परंतु हा प्रश्न फारच गंभीर आहे एवढे मी जाणतो. पण पाचारण असलेल्या नेतृत्वाची अशी वाताहत होण्याचे मुख्य कारण या नेत्यांना त्यांच्या लायकीचे काम पुरेसे नसते - आणि भलत्याच कामांचा भार त्यांच्यावर असणे हेच मुख्य कारण आहे,

### मंडळीमधील प्रेक्षक - बघे ख्रिस्ती लोक!

मंडळीमध्ये पाहावे तर सर्वत्र प्रेक्षक - बघे ख्रिस्ती दिसतात. चार दोन लोक बोलतात आणि बाकी सर्व - पुष्कळ लोक ऐकतात - केवळ 'श्रवण भक्ती' करतात! मंडळीमध्ये चाहत्या - शौकीन बंधुभगिनींचा भरणा असतो. हे विश्वासाचे चाहते आहेत! कल्पना करा एक मोठे घाऊक माल विक्रीचे दुकान आहे. तेथे एक विक्री व्यवस्थापक आहे. माल विकणे, मालाचे गुण गाणे व विक्रीयंत्रणा कशी असावी यावर व्याख्याने देणे हेच त्याचे काम आहे. त्याच दुकानात अनेक विक्रेतेदेखील आहेत. विक्री व्यवस्थापकाचे व्याख्यान ऐकण्यासाठी श्रोते गोळा करणे व त्यांना संपूर्ण व्याख्यान ऐकण्यास प्रोत्साहन देणे हेच या विक्रेत्यांचे मुख्य काम आहे. या दुकानाचे काम असेच चालत राहिले तर काय होईल! हा सर्वच प्रकार मूर्खपणाचा आहे आणि तो असाच राहिला तर लवकरच ते दुकान मोडीत निघेल! एडिंबरो, स्कॉटलंड येथील जेम्स एस. स्टुअर्ट म्हणतात, ''नास्तिक मत अगर संशयवाद ही ख्रिस्ती विश्वासाची खरी समस्या नाही. साक्ष न देणारा, अनुत्पादक आणि आपला





स्वतःचा आत्मा गुपचूप कोणाला नकळत एकट्याने स्वर्गात नेऊ पाहणारा ख्रिस्ती माणूस हीच खरी समस्या आहे.'' ही योजना सैतानाची आहे. त्याने आतापर्यंत तुम्ही - हा शब्द एकवचनी आहे का अनेकवचनी यावरच घोळ घातला आहे आणि आता सर्वच पाळक इ. साक्षी ख्रिस्ताची साक्ष देणारे नाहीत अशी स्थिती झाली आहे!

ख्रिस्ती समाज पाहा. सर्वसाधारण मंडळी आज कोणत्या बाजूला झुकली आहे? तारणाऱ्याच्या योजनेच्या बाजूला का सैतानाने सुचवलेल्या पर्यायाकडे? याचे उत्तर अगदी सरळ, स्पष्ट आहे. आम्हांला दिलेला कूच करण्याचा आदेश आम्ही पुन्हा एकदा नीट समजून घेतला पाहिजे.

## २. सेवाक्षेत्रावर जा - प्रवेश करा!

महान कामगिरीच्या आपल्या रुपरेषेत संपूर्ण सेवाक्षेत्रावर जाणे - प्रवेश करणे हा दुसरा मुद्दा आहे. ''जा - जाऊन...'' हा क्रियाशील, आक्रमक शब्द आहे. या शब्दाने हालचाल, गती अपेक्षित आहे.

### तारकाची योजना

तारकाची योजना सरळ, साधी व सुस्पष्ट आहे. त्याने म्हटले, ''शेत हे जग आहे'' (मत्तय.१३:३८). हे मंडळीसाठीचे जग नाही. *ते तुमच्या स्थानिक मंडळीसाठी जग - सेवाक्षेत्र आहे! संपूर्ण जग हेच तुमचे सेवाक्षेत्र आहे असे समजून कार्य करावे हीच येशू ख्रिस्ताची अपेक्षा आहे.* ख्रिस्ती लोक आणि सुवार्ता यांच्यासाठी येशूने योजिलेली सूचक प्रतीकचिन्हे एकाच समान धाग्याने एकत्र गोवली आहेत. त्या सर्वांच्या मध्ये 'भेदणे - आत शिरणे, शिरकाव करणे, प्रवेश करणे' हाच अर्थभाव आहे. येशूने प्रकाश, मीठ, किल्ल्या, भाकरी व पाणी अशी प्रतीकचिन्हे योजिली आहेत. प्रकाशाने अंधाराचा भेद करून उजेड दिला तरच त्याचा उपयोग. तसे न झाले तर प्रकाशाचे मोल शून्यच! मीठ अन्नपदार्थात टाकले तरच त्याचा उपयोग. बरणीत अगर भांड्यात ठेवलेल्या मीठाचा काही उपयोग नाही. मीठ पदार्थामध्ये भिनले पाहिजे, प्रवेशले पाहिजे तरच पदार्थ रुचकर होऊन

मीठ कारणी लागते. एक लहान मुलगा म्हणाला, मीठ हा पदार्थ वापरला नाही तर बटाट्याची भाजी बिघडते! कुलुपात न जाणाऱ्या किल्ल्यांचा काय उपयोग? भाकरी खाणाऱ्याच्या पोटात गेली, पाणी तोंडातून आत गेलं तरच त्यामुळे भुकेल्याची भूक व तहानेल्याची तहान भागणार.

कोणी एकाने म्हटले आहे : इंग्रजीमध्ये देव हा शब्द लिहिताना प्रथम 'जा' म्हणजे "Go" ही अक्षरे लिहावीच लागतात! इंग्रजीमध्ये आरंभी "Go" म्हणजे 'जा' ही असलेली बरेच शब्द आहेत उदा. चांगले (Good) सुवार्ता (Gospel). सुवार्तेची आज्ञा मानून देवाचा चांगला सेवक व्हायचे तर आपण देवाच्या सांगण्याप्रमाणे गेले पाहिजे. ख्रिस्ती विश्वास मुख्यतः मध्योत्सारी म्हणजे केंद्रापासून चहू दिशांना पसरणारा आहे. सर्वांपर्यंत जावे, पोहचावे हेच त्याचे ध्येयधोरण आहे. हा विश्वास चहुबाजूंनी केंद्राकडे माघारा येणारा असा नाही! प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने भेद करण्याच्या, शिरकाव करण्याच्या आघाडीवर ख्रिस्ती सुवार्तिक म्हणूनच राहिले पाहिजे. मग ही आघाडी वैज्ञानिक प्रयोगशाळा, ग्रंथालय, कारखाना, फळबाग, फूलबाग, शेतमळा, मालपुरवठा करताना कचेरीत काम करणे, अंतराळयान, विमान, दवाखाना, मानसोपचाराचे उपचार केंद्र, पाळकांची अभ्यासिका यांपैकी कोठेतरी अगर आणखी वेगळ्या ठिकाणी असेल. जेथे कोठे लोक आहेत तेच आमचे 'जग' तेच आमचे 'शेत, कार्यक्षेत्र' आहे. पवित्र शास्त्रामध्ये लूक.१०:१-३ या वचनांमध्ये असे आहे : ''ह्यानंतर प्रभूने आणखी बहात्तर (सत्तर) जणांना नेमून ज्या ज्या नगरात व ज्या ज्या ठिकाणी तो स्वतः जाणार होता तेथे दोघे दोघे असे त्यांना आपणांपुढे पाठविले. तेव्हा त्याने त्यांना म्हटले, *पीक फार आहे परंतु कामकरी थोडे आहेत; म्हणून पीकाच्या धन्याने आपल्या पिकासाठी कामकरी पाठवावे म्हणून त्याची प्रार्थना करा. जा लांडग्यांमध्ये कोकरे तसे तुम्हांस मी पाठवीत आहे.''* वर तिरप्या टाईपातील वाक्यांशांकडे विशेष लक्ष द्या. या वचनांमध्ये किती विशाल व विविधतापूर्ण जग आहे! ख्रिस्त जेथे जेथे येणार तेथे तेथे ख्रिस्ती व्यक्तीने अग्रगामी, अग्रेसर होऊन गेले पाहिजे, वाट, प्रशस्त व उजळ केली पाहिजे. लांडग्यांच्या कळपात कोकरांचे रक्षण केवळ चमत्कारानेच होणार हे सांगणे नकोच! एरवी त्यांचा टिकाव लागणे कठीण!





जाता जाता लक्षात घ्या की, महान कामगिरी सोपवताना ''जाऊन... करा'' असे सांगितले आहे ही काही आज्ञा नाही. ती आज्ञा आहे असे मानले तर ख्रिस्ती समर्पणाची संकल्पना पुढे आणून ख्रिस्ती समर्पणाचीही एक व्यवस्थाक्रमवारी ठेवल्यासारखे होईल.

ही आज्ञा असेल तर सुवार्ता सांगण्यासाठी अगर ख्रिस्ताची साक्ष देण्यासाठी कोणी दूरदेशी, दूरच्या ठिकाणी गेला तर सर्व खास विशेष व्यक्ती आहे असे समजतील. पण या क्रियापदाचा अर्थ आहे, ''तुम्ही जात असताना'' किंवा ''तुम्ही जात आहात म्हणून.'' आम्ही जे करीत आहोत तेच पुन्हा करण्याचा आदेश अगर आज्ञा येशू कधीच देणार नाही. मंगळवारी दुपारी तीन वाजता तुमची मंडळी कुठे असते? उपासना मंदिरात असते का? नाही ती *जाते* आहे. मंडळी बाहेर जगामध्ये का जात नाही? हा प्रश्नमुद्दा नक्कीच नाहीच, प्रवेश करीत असताना मंडळी आपली नेमून दिलेली कामगिरी करते आहे का नाही?

काही वर्षांपूर्वी मी परदेशात एक मोठ्या सुंदर शहरामध्ये गेलो होतो. तेथे रविवारी सकाळी मी इंग्रजी भाषिक मंडळीपुढे संदेश दिला. मी त्या उपासनामंदिरात खूपच लवकर गेलो. उपासना सुरू होण्यापूर्वी लोकांना भेटावे, त्यांच्याशी बोलावे हाच माझा उद्देश होता. लोकांना भेटून मला आश्चर्याचा मोठाच धक्का बसला. तिकडे असलेले बहुतेक अमेरिकन लोक एका आंतरराष्ट्रीय कंपनीत एका मोठ्या पगारावर नोकरी करीत होते. इकडे तुमचा वेळ मजेत जातो का असे विचारले तेव्हा त्यांनी कुरकूर केली, इकडे तेच ते कंटाळवाणे आहे. इथले जीवन एकसुरी आहे. बरेचजण तिकडे दोन वर्षांच्या कराराने आले होते. संदेश देत असताना मी त्यांना म्हटले तुम्ही तिथली भाषा का शिकला नाही? तिकडील भाषेत ख्रिस्ती सुवार्ता हस्तपत्रिका तयार करून त्या लोकांना देऊन त्यांच्याशी संपर्क का ठेवला नाही? तिकडे असताना सुवार्ताप्रसार, शोधकांना ख्रिस्ताकडे आणणे हे काम सहज करता आले असते! पण त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता माझी सूचना फेटाळली. पाहा, कोणीतरी आम्हांला काहीतरी देवाची भूलथाप देऊन येशू व त्याने सोपवलेली महान कामगिरी यांकडे दुर्लक्ष करण्यास फितवले आहे. परिणामी पुन्हा विश्वासघात

करण्यास आम्ही मागेपुढे पाहात नाही. ते 'गेले' होते (तेलकंपनीच्या पैशांनी त्यांची उपजीविका चालू होती) पण 'जात असताना' आपली काही जबाबदारी, काही कर्तव्य आहे याची त्यांना अजिबात जाणीव नव्हती.

## सैतानाचा पर्याय

सैतानाने मंडळीच्या मनोभूमिकेत, विचारभूमीत अगदी सूक्ष्मपणे, नकळत काही मर्मभेदक पर्याय रुजवला आहे. 'या' आणि 'जा' हे दोन अतिमहान सुवार्ताविषयक शब्द आहेत. आम्ही ख्रिस्ताकडे आलो (उदा. मत्तय.११:२८-३०) की मग आम्हांला ख्रिस्तामध्ये जे लाभले, मिळाले ते 'जाऊन' सर्व लोकांना सांगायचे आहे. सैतान शब्दांची उलटापालट, अर्थाचा अनर्थ करण्यात पटाईत आहे. त्याने मंडळीमध्ये ''जा आणि सांगा'' या मूळ सूचनांचा ''आत या आणि ऐका'' असा विपर्यास केला आहे. एका समाजवादी गृहस्थाने मंडळीविषयी हे मार्मिक उद्‌गार काढले आहेत! ''इकडे या देवाचा संदेश घ्या, ऐका आणि स्वर्गात जा; नाही तर घरी बसा आणि नरकात जा! हेच या ख्रिस्ती लोकांचे ब्रीद वाक्य आहे असे दिसते - हेच त्यांचे ध्येय व उद्दिष्ट आहे असे वाटते.'' पॉल लिटल ह्यांनी म्हटले आहे, ''सुवार्तेचे सामर्थ्य हरवले आहे ही समस्या मुळीच नाही, मंडळीमध्ये तिचे श्रोते उरलेले नाहीत हीच समस्या आहे.'' दुसरा एकजण म्हणतो, ''पवित्र आत्मा पवित्र जन व बैठका आसने यांचे तारण करू शकत नाही. पण मंडळीमध्ये या दोन्ही गोष्टी भरपूर आहेत!''

आता वैद्यकीय क्षेत्रातील एक उदाहरण पाहा. समजा हिवतापाची साथ येणार आहे असे आरोग्य खात्याला वाटले तर या रोगाचा प्रसार होऊ नये म्हणून ते काय उपाययोजना करील? या रोगाने आजारी असलेल्यांना एकीकडे वेगळे ठेवतील. प्रतिबंधक उपाय करतील, संसर्ग झालेल्या लोकांना वेगळे ठेवल्याने रोग अधिक पसरणार नाही आणि तापाची साथ लवकरच आटोक्यात येईल. कल्पना करा : 'नव्या करारानुसार' असलेल्या ख्रिस्ती विश्वासाची साथ आटोक्यात आणण्यासाठी नरकाचे खाते काय करील? जेवढे म्हणून 'सुवार्तावाहक' प्रसारक आढळतील तेवढ्यांना हे खाते अगदी एकीकडे एकान्तात ठेवील. शक्य त्या सर्व उपायांनी ते





हा प्रसार रोखून धरील, थांबवील. आज मंडळीत मोठ्या व्यापक प्रमाणावर सर्वत्र हेच घडते आहे, घडले आहे. आपण मंडळीमध्ये सर्वांनी मिळून 'पवित्रपणे डोके गुडघ्यात' खुपसून बसण्याची रीत पाडली आहे! जेथे गोंधळ गडबड - झोंबाझोंबी चालली आहे, तेथे भर गर्दीत दोन हात करण्यासाठी उतरण्यास आम्ही घाबरतो. पण विजय मिळवायचा तर गर्दीत घुसलेच पाहिजे मंडळीत स्वस्थ बसून पाहण्यामध्ये सुरक्षितपणा आहे, त्यात डोक्याला ताप नसतो हे कित्येकांना फार आवडते. फूटबॉलचा सामना सुरू होताना आरंभी सर्व खेळाडू काही वेळ एकत्र गोळा होतात तेव्हा त्यात कोणाला दुखापत झाल्याचे कधी ऐकले नाही? हे सर्व लक्षात घेऊन आम्ही आमची योजना आखतो, शत्रूचे डावपेच ओळखून त्यांचे विश्लेषण करतो, तीच ती ठराविक भाषणे बोलतो, साचेबंद गोष्टी सांगतो, आणि आमच्याच समूहातील लोकांवर जोरदार टीका करतो. सभासदसंख्या, कार्यक्रम, इमारती, घरे, पैसा, आर्थिक व्यवहार वगैरे अनेक चिंतांचे काहूर आमच्या मनात माजते. दर आठवड्याला आम्ही 'उत्तम पोषाख' घालून जगापुढे स्वतःचे प्रदर्शन करतो. तुम्ही जसे असाल तसे हे फक्त मुखाने उच्चारायचे असते! रुपकांचा मारा जरा सहन करा आणि मुख्य अर्थ समजून घ्या. आम्ही सातत्याने आमचे धार्मिक कार्यक्रम वाढवीत असतो. आमच्या संघटनात्मक कार्यक्रमांना घासूनपुसून नवी झळाळी आणतो, आमच्या संप्रदायाच्या संस्थांची वाढ व विकास करतो, आमच्या मंडळीची, संप्रदायाची संरचना अगदी सुस्थिर, भक्कम करण्याकडे आमचे चित्त लागलेले असते. आणि जगात कितीतरी मंडळ्यांमध्ये *आम्ही स्वतःचाच सांभाळ करतो, स्वतःची करमणूक - मनोरंजन करून घेतो. अशा स्थितीत सैतानाला भरपूर सुख समाधान झाले असणार यात शंकाच नाही.* आजच्या सर्वसाधारण मंडळीचे कार्य तारणाच्या योजनेने नव्हे तर सैतानाच्या पर्यायी व्यवस्थेने चाललेले आहे.

संपूर्ण जगावर प्रभाव पाडणे, माहिती देणे, हे विशाल जग आपल्याकडे घेणे हाच येशूचा हेतू असल्याचे शुभवर्तमानातून दिसते. मी गालील प्रांताचा प्रकाश आहे असे म्हणणे त्याला सहज शक्य होते. परंतु ''मी जगाचा प्रकाश आहे'' असेच त्याने म्हटले (योहान.८:१२). ''मी बॅप्टिस्टांचा, प्रेसबिटेरियनांचा, अगर मेथडिस्टांचा प्रकाश आहे,'' असे तो म्हणाला नाही. ''मी सुशिक्षित लोकांचा,

विद्वान लोकांचा अगर खाऊनपिऊन सुखी लोकांचा प्रकाश आहे,'' असे तो म्हणाला नाही. ''देवाने यहूदी लोकांवर एवढी प्रीती केली की...'' असे त्याला सहज म्हणता आले असते. पण तो तसे न म्हणता त्याने ''देवाने जगावर एवढी प्रीती केली'' असे म्हटले (योहान.३:१६). आपल्या अंतःकरणामध्ये कोणताही लहान सहान भूप्रदेश नाही, एखादे गाव, शहर, प्रांत, राज्य नाही तर संपूर्ण जग व जगातील सर्व लोक हेच आहेत हे त्याने पुन्हा पुन्हा ठामपणे सांगितले आहे. या पृथ्वीतलावरील प्रत्येक देश, प्रत्येक व्यक्ती यांच्यासाठी तो एकमेव आध्यात्मिक प्रकाश आहे.

असे सांगितात की, नेपोलियनच्या सैन्यातील प्रत्येक सैनिकाकडे त्याच्या सामानात जगाचा नकाशा असे. हा नकाशा फ्रान्सच्या तिरंगी ध्वजाच्या पार्श्वभूमीवर काढलेला होता. संपूर्ण जग फ्रान्ससाठी जिंकायचे या विचाराने ते 'पछाडलेले' होते. ते जणू या विचारकल्पनेचे गुलाम होते! याहून अन्य विषय त्यांच्या ध्यानीमनी कधीच नव्हता. माझ्या ख्रिस्ती भावांनो आणि बहिणींनो, आमच्या सार्वभौम, सामर्थ्यशाली प्रभूने संपूर्ण जगाचा ज्वलंत दृष्टांत आमच्या समोर - त्याच्या लोकांसमोर ठेवला आहे. आणि प्रत्येक व्यक्तीने हा दृष्टांत आपआपल्या अंतःकरणावर कोरावा हीच त्याची इच्छा आहे. आपल्या जीवात जीव आहे तोपर्यंत आमच्या मनात, विचारात, उच्चारात, कृतीत, योजनांत स्वप्नांत सर्वत्र हाच दृष्टांत सातत्याने असला पाहिजे. एकदा का हा दृष्टांत आमच्या अंतःकरणात ठसला, रोमारोमात भिनला की, आपल्याला समजेल की येशूने आमच्यासाठी एक योजना केली आहे, ती व्यक्ती म्हणून तुम्ही आणि मी पूर्ण करायची आहे. या दृष्टांतानुसार शिष्य तयार करायचे एवढेच आपले काम. हे अवघड वाटते का? तर हे मुळीच अवघड नाही.

आपल्या मनामध्ये या प्रश्नावर नीट विचार करा. पवित्र शास्त्र आणि ख्रिस्ती विश्वास यांचा उगम कोठे झाला? अमेरिकेत पन्नासांपैकी एका संस्थानात - राज्यात हा उगम झाला का? नाही. ख्रिस्ती धर्मविश्वास युनायटेड स्टेट्समध्ये 'आयात' केला आहे. येशूचा जन्म माझ्या शेजारी अगर गावात झाला नाही. पवित्र शास्त्र मुळात इंग्रजीत लिहिले नाही. *ख्रिस्ती सुवार्तासेवकांनी - मिशनरींनी इकडे येऊन*





*सुवार्ता सांगितली.* आम्ही ती स्वीकारली म्हणून आज आम्ही येथे अमेरिकेत ख्रिस्ती आहोत. त्या मिशनरी सेवकांनी आमच्यासाठी जे केले ते जगाच्या इतर भागामध्ये करण्यास आम्ही तयार आहोत का? समजा, तुम्ही आशिया, आफ्रिका, अगर लॅटिन अमेरिका किंवा अशाच एखाद्या देशात राहता का? तुम्ही देवाला दुरावलेले आहात का? हरवलेले आहात का? जीवनाचा आणि प्रकाशाचा संदेश कोणीतरी तुम्हांला सांगावा असे तुम्हांला वाटते का? खरेतर आम्ही आत्मकेंद्रित, स्वार्थी ख्रिस्ती आहोत. आमच्या मंडळ्यादेखील स्वतःपुरते पाहणाऱ्या, संघटनात्मक, 'तग धरून राहणाऱ्या' आहेत. आम्ही सर्वांनीच खरोखरी पश्चात्ताप करून आमच्या प्रभूची करुणा भाकून त्याची क्षमा मागितली पाहिजे. आपण ख्रिस्ताला सर्वस्वी समर्पित होऊन त्याला सादर झाले पाहिजे पण तसे न करता यहूदी लोकांप्रमाणे त्यालाच स्वतःच्या अधीन करण्याचा प्रयत्न केला. आमचा पश्चात्ताप खरा असला पाहिजे आणि परिणामी आमच्या या तथाकथित मानवतावादी ख्रिस्ती धर्मात सुधारणा होणे अगत्याचे आहे ('मानवतावादी ख्रिस्ती धर्म' हे माझेच शब्द आहेत).

जॉन ऑक्झनहॅम ह्यांच्या ***'बीज इन अँबर'*** या पुस्तकात लिहिले आहे :

*एक स्पष्ट स्वरातील हाक ऐकू येत आहे.*
*रात्रीच्या अंधारात कोणीतरी साद घालीत आहे.*
*अहो, जीवनाच्या प्रकाशातील रहिवाशांनो,*
*आमच्याकडे प्रकाश आणा, आम्हांला प्रकाश द्या!*
*आमच्या डोळ्यांना काहीच दिसत नाही.*
*तुम्ही तर कधीच अंध अगर बद्ध नव्हता -*
*आणा आमच्याकडे प्रकाश आणा!*
*तुम्ही विसरू नका आम्हाला - ते शक्यच नाही.*
*इकडे अगदी काळ्याकुट्ट रात्री*
*आम्ही बुडतो आहोत. मरणोन्मुख झालो आहोत!*
*आणा - प्रकाश आमच्याकडे आणा!*

आता ख्रिस्ती बांधवहो, ईश्वरपरिज्ञानाचे सिद्धांत आणि प्रमाणवचने माझ्या तोंडावर फेकू नका. ‘देवविरहित माणसे मेलेली आहेत. आणि त्यांना अशा प्रकारे बोलता येत नाही’, असल्या शब्दांच्या पट्ट्या लावून माझे तोंड बंद करू नका. तुमचे सगळे म्हणणे मला चांगले माहीत आहे. ते सगळे मी चांगले जाणतो! देवहीन माणसे असे बोलत नाहीत, अशी राहत नाहीत आणि असा विचारही करीत नाहीत, पण प्रत्येक विश्वासणाऱ्याने या प्रकारे विचार केला पाहिजे. मेलेल्या लोकांना मरण कसे असते ते कसे सांगणार! तसेच असे लोक जीवंत व्यक्तीसारखे वागतील, बोलतील, करतील अशी अपेक्षा ठेवणे शक्य नाही. *तसेच मेलेल्यांना उठविण्यास समर्थ वाणी ऐकल्याशिवाय त्यांनी मेलेल्यांतून उठावे अशी अपेक्षा आम्ही ठेवू शकत नाही.* रोमकरांस पत्राच्या दहाव्या अध्यायात हा मुद्दा स्पष्ट केला आहे : हरवलेल्या लोकांकडे कोणाला तरी पाठवले, त्यांनी घोषणा केली तरच ते संदेश ऐकणार. अशी घोषणा केल्याशिवाय ते ऐकणार कसे? ऐकल्याशिवाय ते विश्वास कसा ठेवतील आणि विश्वासाशिवाय तारण कसे होईल (रोम.१७:१२-१७)! पण प्रत्यक्ष वास्तवात हे केव्हा कोठे, कसे सुरू होते? पाठविल्याने व घोषणा केल्याने याचा आरंभ होतो. तुमची मंडळी सुवार्तासेवक पाठवण्याचे कार्य करते का? संदेशाची घोषणा व्हावी, ती घोषणा करणाऱ्यांना पाठवता यावे यासाठी ती पैसा खर्च करते का? राजांच्या राजाची आणि प्रभूंच्या प्रभूची अवज्ञा करणे त्याची सुस्पष्ट आज्ञा न जुमानणे हाच अन्य पर्याय आहे. आम्ही आमची शक्ती, वेळ आणि पैसा इमारती बांधणे, अंदाजपत्रके करणे, समित्या, पत्रके, पुस्तके वगैरेवर खर्च केला असेल तर ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर उभे राहिल्यावर आमची काय अवस्था होईल? आमच्या मनात कोणती भावना कोणते विचार असतील? आताच पुढचा विचार करा!

१९ व्या शतकाच्या मध्यास चार्लस किंग्स्ले हा लेखक दक्षिण पॅसिफिक महासागरातील न्यू हेब्राइड्स या बेटावर गेला होता. तेथील पाशवी जंगलीपणा आणि नरमांस खाण्याची रीत पाहून त्याला मोठा धक्का बसला. ब्रिटनमध्ये परत आल्यावर त्याने एक मर्मभेदक लेख लिहून सुचविले की, ब्रिटिश सरकारने त्या बेटावर एक युद्धनौका पाठवून तेथील सर्व रहिवाशांना त्रासदायक मुंग्यांमाशांप्रमाणे





चिरडून मारून टाकावे. कारण ते सर्व लोक अमानुष असून त्यांना माणसात आणणे सर्वस्वी अशक्य आहे.

पण दुसरे काही लोक होते. त्यांना किंग्स्लेची सूचना अजिबात पटली नाही. या लोकांपैकी स्कॉटीश डमफ्राईज येथील जॉन पॅटन हा एक निष्ठावंत ख्रिस्ती होता. येशू ख्रिस्ताची सुवार्ता तारणासाठी देवाचे सामर्थ्य आहे (रोम.१:१६) आणि पापामध्ये मृत झालेल्यांना पुन्हा जीवन देण्यास सुवार्ता समर्थ आहे (इफिस.२:१) यावर पॅटनचा पक्का विश्वास होता. खूप लांबचा प्रवास करून पॅटन न्यू हेब्राइड्स मधील ‘ताना’ बेटावर गेला. जिवाला सतत धोका असूनही तेथे त्याने या अंधकाराच्या गर्तेत खितपत पडलेल्या लोकांना ख्रिस्ताचा संदेश सांगितला, सुवार्तेची घोषणा केली. त्याच्या कार्याविषयी कोणाला शंका असेल तर त्याने जरुर माझ्या म्हणण्याची सत्यता पारखावी, संशोधन करावे. पॅटन मरण पावला तेव्हा तेथील स्थानिक लोकांनी स्वतः त्याच्या कबरेवर शिळा उभारून तीवर हा लेख कोरला : ‘‘तो आला तेव्हा इकडे प्रकाश नव्हता. तो प्रभूकडे गेला तेव्हा इकडे अंधार उरला नाही.’’ माझ्या प्रिय मित्रांनो, आज परवडणाऱ्या खर्चात सहजपणे पृथ्वीच्या कोणत्याही भागात जाता येते. आमच्याकडे ‘प्रचंड’ साधनसामग्री नुसती पडून आहे. संपूर्ण जगभराच्या विशाल जनसमुदायाला सुवार्ता संदेश देऊन त्यांना शिष्य करण्यासाठी हीच साधनसामग्री वापरता येईल. दूरच्या आणि जवळच्या अनेक देशांमधील हजारो ख्रिस्ती लोक, मंडळ्या आणि हरवलेले लोक आमचे स्वागत करतील, आमच्या प्रीतीला प्रतिसाद देतील - ते आमची उत्कंठेने वाट पाहत आहेत आणि आम्ही इकडे अमेरिकेत, आपआपल्या घरी स्वतःच स्वतःचा भ्रमनिरास करून घेत मेलेल्या व मरमोन्मुख मंडळ्यांमध्ये नुसते बसलो आहोत. ‘‘जेथे दृष्टांत, दूरदृष्टी नसते तेथे लोक नाश पावतात!’’

जपानी बॉंबफेक्या विमानांनी पर्ल हर्बरवर हल्ला केला त्याच दिवशी पौर्वात्य देशातून परत आलेला एक मिशनरी सेवक आणि प्रत्येक गोष्टीत ज्याला दोष दिसत असे असा त्याच्या परिचयाचा एक माणूस यांची गाठ पडली. त्या माणसाने कुत्सितपणे हसून उपहासाने मिशनरीला विचारले, ‘‘काय हो, आता तुमच्या जपानी लोकांबद्दल तुम्हांला काय वाटतं?’’ यावर त्या मिशनऱ्याने मोठ्या ठामपणे

आणि शांतपणे उत्तर दिले. त्याचे उत्तर धारदार तरवारीने वार करावा तसे मर्मभेदी होते. ''हे पाहा, माझे जपानी अगदी ठीक, चांगले आहेत. ते देवाच्या कृपेने सुखरूप आहेत, धन्यवाद! पण आता आजच ज्यांनी अमेरिकन नौदलावर हल्ला केला त्यांच्याविषयी विचारत असाल, तर ते माझे नव्हे तुमचे जपानी आहेत. त्यांची जबाबदारी तुमच्यावर होती पण त्यांच्यासाठी तुम्ही काहीही केले नाही! आता तेच गडबड गोंधळ करीत आहेत! पण माझे जपानी अगदी ठीक आहेत. धन्यवाद, प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवून ते चांगले काम करीत आहेत.'' मित्रहो आता मला सांगा ब्राझील, चिली, होंडुरास, ग्वाटेमाला, फिलिपाईन्स, इंडोनेशिया, मंगोलिया, चीन, न्यू गिनी, युगोस्लोवाकिया, इराक या देशातील तुमच्या आमच्या लोकांचे काय? फ्रँक लॉबॅख यांनी म्हटले आहे : ''अमेरिकन लोकांनी, एक युद्धनौका बांधण्यासाठी जेवढा पैसा खर्च केला तेवढा पैसा दुसरे महायुद्ध होण्यापूर्वी जपानमध्ये सुवार्ताकार्यासाठी खर्च केला असता तर बहुधा आपणाला ते युद्ध करावेच लागले नसते आणि आमची ती नौका पर्ल हार्बरवरील हल्ल्यात बुडालीही नसती!'' जगाला प्रभावित करण्याच्या कामात तुम्ही खरोखरी या ना त्या प्रकारे गुंतला आहात का? 'पाठविलेला' म्हणून तुम्ही जाऊन इतरांना ख्रिस्ताची ओळख करून देत आहात का? जात नसाल तर का जात नाही?

हार्वर्ड विद्यापीठातील एक मानसशास्त्रज्ञ लहानपणी न्यू हँप शायर, चोकोरुआ येथे राहात. त्यांच्या घराचे वर्णन त्यांनी केले आहे ते असे : ''आमचे घर मोठे टुमदार, छान होते, तसे दुसरे शोधूनही सापडणार नाही. या घराला चौदा दरवाजे होते. गंमत म्हणजे ते सर्व बाहेरच्या बाजूला उघडत होते.'' इमारत बांधण्याच्या नियमानुसार सुरक्षिततेसाठी प्रार्थनामंदिराचे दरवाजे बाहेरच्या बाजूस उघडणारे असले पाहिजेत. हा नियम शहाणपणाचा आहे. सर्व दरवाजे बाहेरच्या बाजूला उघडणारे असून त्यानुसार कार्य करणारी ख्रिस्ती व्यक्ती, मंडळी, उत्कट आवेशी दृष्टांत, दूरदृष्टी असणारी ही मोठी आनंददायी गोष्ट आहे! पण उलटपक्षी अंतर्मुख - 'स्व'केंद्रित ख्रिस्ती व्यक्ती, 'स्व'केंद्रित मंडळी आपल्याच निराशेचा, विफलतेचा बळी ठरते, तिचा भ्रमनिरास होऊन पदरी पराभवच येतो!

फुगवलेल्या फुग्यातील हवा बाहेर जाऊ लागली की तो आकसतो. तसे जग





आज आकसत आहे. आज प्रचंड वेगाने जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत अल्पकाळात जाता येते. सूर्य उगवत असतानाच विमानाने लंडनहून न्यूयार्कपर्यंत जाणे सहज शक्य आहे! जेव्हा जेव्हा मी परदेशी जातो तेव्हा दरवेळी जगप्रवाशी लोक भेटतातच! वक्ता व्याख्यान देत असता त्याच्या तोंडचे शब्द सर्व श्रोत्यांपर्यंत पोचण्यापूर्वी रेडिओवरून जगाच्या दुसऱ्या टोकाला ऐकू येतात. टेलिव्हिजनवर तर कोणताही खेळ चालू असताना जगात कोठेही दिसू शकते. संपूर्ण जग एक घर आहे असे मानले तर आम्ही पुढच्या बाजूला राहात आहोत. सगळे जग आता आपल्या शेजारी, आसपासच आहे! आमच्या शेजाऱ्यांविषयी आम्ही काय करीत आहोत?

मागील काळात मी दहा वर्षे पाळकीय सेवा करीत होतो. त्यावेळी जगाविषयीचा हा दृष्टांत पाहण्यास, जगावर छाप उमटवण्यासाठी मंडळीच्या सभासदांना प्रेरणा देण्यासाठी केलेल्या उपायांचे स्मरण करून ते सांगतो.

१) आपल्या सुट्या नाण्यांची बचत करा ही योजना आम्ही केली होती. आम्ही सभासदांना विनंती केली, रोज संध्याकाळी प्रत्येकाने आपआपले खिसे रिकामे करावे आणि सर्व सुटी नाणी प्रत्येक प्रकारचे एक एक नाणे वगळून - मिशन सेवाकार्यासाठी बाजूला ठेवावी. डिसेंबर महिन्यात आम्ही वर्षभरात जमलेली सर्व नाणी प्रभूने पृथ्वीच्या दिगंतापर्यंत सेवेसाठी आशीर्वादित करावीत यासाठी त्याच्यासमोर अर्पण करीत होतो.

२) दर आठवड्यात 'सुवार्ता सेवा - मिशन कार्यासाठी एक डॉलर द्यावा' ही योजनाही आम्ही सुरू केली. प्रत्येक सभासदाने दर आठवड्याला एक डॉलर अधिक द्यावा ही आमची विनंती सर्वांनीच मान्य केली. जमलेले पैसे जागतिक सुवार्ता मिशनसाठी वापरले.

३) आम्ही ''कार्यकारी मिशन समिती'' ही योजना सुरू केली. सुवार्ताप्रसाराचा जागतिक दृष्टान्त व उत्कट आस्था असणाऱ्या निवडक लोकांना आम्ही या समितीवर नेमले आणि त्यांना सांगितले, जगाचे मित्र सतत तुमच्या आमच्या डोळ्यांसमोर ठेवा, दर तिमाहीला आम्ही सुवार्तासेवांवर भार देणारे कार्यक्रम मंडळीत उपासनेच्या वेळी घेतले. मिशन क्षेत्रावरील सेवक, कार्यकर्ते,

त्यांची बायका मुले यांना त्यांचे अनुभव सांगण्यासाठी बोलावले. त्यांनी सेवाक्षेत्रातून पाठविलेल्या पत्रांचे वाचन, आपल्या मिशनरींसाठी विशेष प्रार्थना करणे वगैरे कार्यक्रमांचे आयोजन केले.

४) ''मिशनरींची निवास व्यवस्था'' हीदेखील आमची योजना होती. आमच्या मालकीची दोन घरे होती. रजेवर असलेल्या मिशनरींची आम्ही येथे निवासाची सोय करीत होतो. त्यांनी आमच्या मंडळीशी संपर्क ठेववा आणि आपले अनुभव सांगावेत, आमच्या सभासदांना सुवार्तासेवेसाठी उत्तेजन द्यावे, प्रेरक मार्गदर्शन द्यावे हीच आमची अपेक्षा होती.

५) ''आपल्या जगाचा मागोवा घ्या - शोध करा'' ही आमची एक योजना आहे. जगातील अनेक राष्ट्रे, देश यांच्याविषयीची भौगोलिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक वगैरे विषयी माहिती मागवून लोकांना कळवली. यातील विशेष परिपक्व भागांवर म्हणजे सुवार्तेला सहज प्रतिसाद देणाऱ्या भागांचा आम्ही विशेष अभ्यास केला.

आम्ही वस्तुपाठ म्हणून पुढील प्रकारची उदाहरणे देत असू. समजा तुमच्या मालकीची एक मोठी फळबाग आहे आणि त्यात तीन भाग आहेत. पहिल्या भागातील कामकरी एका तासाला पाच टोपल्या फळे काढतो. दुसऱ्या भागात एक टोपलीभर फळे गोळा करायला पाच तास लागतात. आणि तिसऱ्या भागातील फळे अजून पिकलेली नाहीत, कची आहेत. समजा आज तुमच्याकडे तीस कामकरी आहेत. तर तुम्ही त्यांना कोठे पाठवाल? मी बागेच्या पहिल्या भागात एकूणतीस कामगार पाठवीन. त्यामुळे तिकडची सर्व फळे गोळा करता येतील, काही नुकसान होणार नाही. उरलेला दुसरा कामकरी मी बागेच्या दुसऱ्या भागात पाठवीन. तेथे जमेल तेवढी फळे गोळा करताना तो बागेच्या तिसऱ्या भागाकडेही लक्ष ठेवील. तिकडची फळे पिकली असे त्याने मला सांगितले की मग मी कामकऱ्यांना पुन्हा वेगवेगळ्या ठिकाणी पाठवीन. येशू स्वतः पिकाचा धनी आहे (मत्तय.९:३८). त्याने आपल्या कारभाराची अव्यवस्था केली आहे का? मुळीच नाही, पण त्याचे कामकरीच त्याचे नीट ऐकत नाहीत. पिकाच्या धन्याने आपल्या शेतामध्ये कामकरी पाठवावेत यासाठी तुम्ही त्याची प्रार्थना विनंती करीत आहात काय? लक्षात ठेवा





शेत म्हणजे जग (मत्तय.१३:३८).

६) ''एक एक सुवार्ता सेवक, मिशनरी पाठवणे'' हीही आमची योजना होती. मी पाळक म्हणून सेवा करतो तेथून - त्या मंडळीतून अगर माझा प्रभाव आहे तेथून देवाने तरुण व्यक्तींना सुवार्तासेवेसाठी पाचारण केलेच नाही तर त्यात मला कधी समाधान वाटेल का? माझ्या सेवेत, लोकांसमोर दृष्टांत ठेवण्यात मी उणा पडलो असाच त्याचा अर्थ होणार नाही का? मी माझ्या सेवेत कोठेतरी उणेपण आहे असेच समजेन. गेल्याच आठवड्यात आमच्या घरी एक पाहुणे आले होते. पूर्वेकडील एका ''बंद'' देशात सुवार्ताप्रसाराचे कार्य कारणारे हे सेवक आणखी सहाय्य मिळवणे व आणखी प्रशिक्षण घेणे यासाठी अमेरिकेत आले होते. सुवार्ता सांगण्याची त्यांना मोठी हौस आहे (रोम.१५:२१). ईश्वरी दृष्टांताने त्यांच्या मनाची पकड घेतली आहे. त्या 'अंधाऱ्या, काळोख्या देशात सुवार्तेचा दीप लावावा ही त्यांची उत्कट इच्छा आहे. एका वर्षापूर्वी त्यांनी एका तरुणाला ख्रिस्ताकडे आणले, त्याला शिष्यपणाचे शिक्षण दिले आणि आता त्याने आणखी दहा जणांना ख्रिस्ताकडे आणले आहे. हे सर्व ''बंद'' देशात झाले! या सुवार्तासेवकाने (मिशनरी) इलेक्ट्रिक इंजिनिअरिंगची पदवी घेतली होती. मग पूर्वेकडील देशामध्ये विद्यापीठात चांगली शिक्षकाची नोकरी मिळावी यासाठी चार वर्षांनंतर पुन्हा कॉलेजमध्ये येऊन त्यांनी कॉंप्युटर सायन्सची पदवी घेतली. हा मजकूर लिहित असतानाच ते पुन्हा इकडे अमेरिकेत आले आहेत. कॉम्प्युटरचे आणखी प्रगत शिक्षण घेऊन चांगला कॉलेज शिक्षक होण्यासाठी ते इकडे आले आहेत. याचे कारण काय? कारण त्यांना दृष्टांत लाभला आहे. जगावर परिणाम करणारे शिष्य तयार करणे हेच त्यांचे उद्दिष्ट आहे. त्यांनी मला सांगितले की, जेथे शिष्य करणारे पाळक होते त्याच मंडळीतून त्यांना शिष्य करण्याची प्रक्रिया अनुभवता आली आणि जगाकडे पाहण्याची विशेष दृष्टी लाभली. म्हणून त्यांनी धन्यवाद दिले.

७) ''तात्पुरते - अल्पकाळासाठी - मिशनरी, सुवार्तासेवक पाठवणे'' ही आमची आणखी एक योजना. अमेरिकेतील मंडळ्यांमधून लोकांच्या लहान गटांना परदेशात काही काळ सुवार्ताप्रसारासाठी जाता येते. त्या दृष्टीने जग आता खुले आहे! सुवार्ताप्रसार करण्यासाठी, जगाला ख्रिस्ताची ओळख देण्यासाठी कोणालाही

काही काळ परदेशात जाऊन सेवा करण्यासाठी अनेक मंडळ्या सहाय्य मार्गदर्शन करतात. सदर्न बॅप्टिस्ट इंटरनॅशनल मिशन बोर्ड ही अशीच प्रेषितकार्य करणारी एक संस्था आहे. जगामध्ये जाण्याचे दार किलकिले झाले आहे. आणि या दारातून सतत जगावर प्रभाव पाडू शकणाऱ्या, सुखी, आनंदी सुवार्तेची प्रेरणा असणाऱ्या ख्रिस्ती लोकांची ओळच्या ओळ रांगेने नीट जगाच्या शेवटापर्यंत जात राहिली पाहिजे. काही 'मोठ्या मंडळ्यांनी' 'जगाला कवेत घेणाऱ्या सुवार्ताप्रसार कार्यासाठी' दरवर्षी १००० तरी उत्साही, आवेशी लोक पाठवणे जरुरीचे आहे. माझ्या सेवेच्या ठिकाणच्या जबाबदाऱ्या सांभाळून मी स्वतः अशा शंभराहून अधिक 'सुवार्ताप्रसार फेऱ्यांवर' गेलो आहे. मंडळीचा एक सभासद परवाच मला म्हणाला, ''अमेरिकेच्या बाहेर दुसऱ्या देशात जायची मला भीती वाटते!'' भीती? भय? कोणाही ख्रिस्ती माणसाच्या मनात भय भीती हा विचारही कधी येऊ नये (२ करिंथ ११:२३-३३ वाचा आणि प्रेषित पौलाच्या त्या वृत्तांतामध्ये भय, भीती यांना कितपत स्थान आहे ते पहा). माझ्या मित्राच्या मंडळीने आपल्या सभासदांना ख्रिस्ताच्या महान आज्ञेचा दृष्टांत दिला नाही त्यांच्या मनात सुवार्ताप्रसार करण्याचे ध्येय जागवले नाही हेच तो मला सांगत होता.

८) ''जगातील धर्मांचा अभ्यास करा'' हाही कार्यक्रम आम्ही घेतला. याविषयी अधिक काही सांगायची गरज नाही. जगातील इतर धर्मांमधून ख्रिस्ताकडे आलेल्या व्यक्तींच्या साक्षी - निवेदने यांचाही गरजेनुसार योग्य तेथे आधार घेतला जातो.

९) आमच्याकडे ''मिशन - सुवार्तासेवा सर्वत्र'' हीही योजना आहे. ख्रिस्ताने दिलेली महान आज्ञा, सोपवलेली महान कामगिरी खरोखर सुवार्ता संदेशाला गती देणारी आहे. हे पाळकांच्या मनावर एकदा ठसले की मग ते त्या आज्ञेचा संबंध सदोदित, प्रत्येक गोष्टीकडे लावतील. प्रत्येक प्रमुख सिद्धान्ताचा संबंध या कामगिरीशी जोडतील. प्रत्येक वेळी उपासना, उपदेश, सुवार्ता संदेश यामधून ते ती महान कामगिरी पूर्ण करण्याविषयी आपली इच्छा, आस्था व तळमळ उत्कटतेने व्यक्त करतील, दूरदृष्टीने दृष्टांत पाहणाऱ्या विश्वासणाऱ्यांची समर्पित वृत्ती, सुवार्ताप्रसाराची आस्था व तळमळ हे सर्व ते आपल्या सभासदांना स्पष्टपणे सांगतील, दाखवतील ते स्वतः लोकांना घेऊन अनेक मिशन क्षेत्रांमध्ये जातील,





शक्यतो जास्तीत जास्त लोकांना या सेवाकार्यात गुंतविण्यास झटतील.

ख्रिस्ती बांधवहो, जगावर छाप पडावी, सुवार्तेचा प्रभाव वाढावा अशी स्वप्ने आणि दृष्टांत तुम्ही पाहात आहात का? सर्व वंशांचे, सर्व राष्ट्रातील सर्व लोक - शेजारचे, देशातले आणि जगातले - यांनी सुवार्ता ऐकली पाहिजे असे तुम्हांला वाटते का? देवाने तुम्हांला 'नकाशे पाहण्याची' दृष्टी दिली आहे का? तुम्ही त्याच्यासाठी जगाचे ओझे स्वतःवर घेतले आहे का? तुम्ही आपल्या तारकाच्या योजनेमध्ये सेवा करता की सैतानाचा पर्याय घेऊन स्वस्थ बसता?

ख्रिस्ताचे व्यक्तीत्त्व आणि उद्धारकार्य या विषयावर डिसेंबर १९४६ मध्ये शिकागो येथे 'समिट III'परिषद भरली होती. डॉ. राल्फ विंटर, जनरल डायरेक्टर, यु. एस. सेंटर फॉर वर्ल्ड मिशन हे या परिषदेसाठी आले होते. परिषदेच्या शेवटी एकंदर विषय व सादरीकरण या विषयी आपली मते सांगण्यासाठी ज्यांना सांगितले त्यांच्यापैकी डॉ. विंटर हे एक होते. आपले मत मांडताना डॉ. विंटर ह्यांनी म्हटले की, ''या परिषदेमध्ये ख्रिस्त आणि ख्रिस्ताचे कार्य यांविषयी जगाला सांगण्यात, साक्ष देण्यात ख्रिस्ती लोक व ख्रिस्ती मंडळी याचा साधा उल्लेखही केलेला नाही. थोडक्यात जगाला ख्रिस्ताची साक्ष देण्याची जबाबदारी ख्रिस्ती लोकांची आहे या मुद्द्यांचा साधा उल्लेखही झाला नाही!''

डॉ. विंटर ह्यांनी आपले विचार सांगितले तेव्हा त्या सत्राचे अध्यक्ष, जे प्रसिद्ध ख्रिस्ती विद्वान होते - ते डॉ. विंटर ह्यांच्याकडे रोखून पाहून कुत्सितपणे म्हणाले, ''तुम्ही एकदा तरी तुमच्या त्या आवडत्या धंद्याविषयी सांगणारच - मिळालेली संधी सोडणार नाही हे अगोदरच आमच्या लक्षात यायला हवं होतं!'' जगावर ख्रिस्तासाठी प्रभाव पाडणे हा काही मूठभर अतिउत्साही लोकांचा छंद आहे का ते प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीचे जीवितकार्य असावे? येशू ख्रिस्ताचे प्रभुत्व इकडे मान्य करायचे आणि त्याच वेळी त्याने आमच्यावर सोपवलेल्या एकमेव कामगिरीकडे, दुर्लक्ष करायचे? त्या महान आज्ञेची उपेक्षा करायची? हे शक्य आहे का? ख्रिस्ताने जगावर आपले लक्ष केंद्रित केले होते त्याचा कसलाही उल्लेख न करता कोणत्याही ख्रिस्ती लोकगटाला ख्रिस्ताचे व्यक्तित्त्व आणि कार्य यांचे संगोपन, अचूक चर्चा विचार करता येईल का? या प्रश्नांचा नीट यथार्थपणे विचार करून त्यातून

समाधानकारक निष्कर्ष काढणे आमच्यावर बंधनकारक आहे. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्ती जागतिक जगदृष्टी असणारी हवी हेच योग्य आहे. दुसऱ्यांना कार्यप्रवण करणे, मिशनरी सेवकांसाठी मध्यस्थी करणे, मिशन सेवाक्षेत्रे, इतर ख्रिस्ती लोक यांच्यासाठी प्रार्थना विनंती करणे, जगाला सुवार्तासंदेश देणे, माहितीची देवाणघेवाण करणे आणि या कामी देवाने जास्तीत जास्त सहाय्य पुरवावे अशी आग्रहपूर्वक विनंती करणे - या कार्यासाठी प्रत्येकाने स्वतःला वाहून घेतले पाहिजे.

मित्रहो, आपले हे जग पेटले आहे, 'परिवर्तनाच्या ज्वाला उफाळत आहेत' गडबड, गोंधळ, दुःख, क्लेश, क्रांती, बंड, दहशत हिंसाचार लढाया यांचे थैमान माजले आहे. हे संपूर्ण वातावरण सुवार्ताप्रसारासाठी अत्यंत उपयुक्त आहे. इकडे मिनिटामिनिटाला क्रांती होत आहे. येणाऱ्या जाणाऱ्यांनो, हे पाहून ''तुम्हांस काहीच वाटत नाही काय?''

वॉशिग्टंन आयर्विंग या लेखकाच्या **स्केच बुक** नावाच्या पुस्तकात रिप व्हॅन विंकल नामक विक्षिप्त, लहरी व्यक्तीची सुपरिचित कथा आहे. आपली कजाग, भांडकुदळ बायको, कंटाळा, आपला निरुपयोगीपणा या सर्वांना वैतागून, रिप सरळ वीस वर्षे झोपला. तो झोपी गेला तेव्हा त्याचे न्यू यॉर्क गाव इंग्रज लोकांची एक वसाहत होते. लोक इंग्रजांची अनिर्बंध सत्ता, दडपशाही आणि जुलूम यांच्या विरोधात झगडत होते. परंतु रिपला त्या 'जबर दडपशाहीचे' काही वाटत नव्हते. तो घराच्या कटकटींना वैतागला होता. घरचा जुलूम त्याला सोसवत नव्हता. दीर्घकाळ झोपल्याने या दोन्ही जुलुमातून रिपची सुटका झाली. ख्रिस्ती बांधवहो, ऐकताय ना? रिपची ही कथा लाक्षणिक प्रतीकात्मक आहे. पाळकांनाही लहान सहान - किरकोळ स्वरुपाच्या स्थानिक जुलूम सोसावे लागतात. ते गुंग असतात (म्हणतात दृष्टांत नाही, गतीशीलता नाही, जागतिक प्रभाव नाही) पण त्यांना विश्वव्यापी जुलूम दडपशाहीची अजिबात कल्पना नाही. संपूर्ण जगावर सैतानाची घट्ट पकड आहे त्याची त्यांना जणू जाणीवच नाही (१ योहान.५:१७). आता त्या कथेत काय झाले ते पाहा. रिप गाढ झोपी गेला आणि तो वीस वर्षे तसाच झोपून राहिला. दरम्यानच्या काळात क्रांतीयुद्ध झाले! रिप झोपी गेला तेव्हा त्याच्या गावावर इंग्लंडचा तिसरा जॉर्ज याची सत्ता होती, तो जागा झाला तेव्हा तेथे





लोकशाही राजवट होती. लवकरच दुसरा एक जॉर्ज - जनरल जॉर्ज वॉशिंग्टन नेतृत्त्वाची सूत्रे स्वतःकडे घेणार होता. रिप व्हॅन विंकल डोळे झाकून झोपी गेला - मोठी क्रांती झाली, देशात उलथापालथ झाली तरी त्याला काही कळले नाही! ख्रिस्ती बांधवहो, लक्ष आहे ना? नीट ऐका. आपण झोपलो की बाहेर - घरात देखील - काय चालले आहे ते अजिबात समजत नाही! तुम्ही अंतर्मुख व्हावे, - तुमच्या तुमच्यातच गढून राहावे हीच सैतानाची इच्छा आहे. तुमच्या स्वतःच्या प्रार्थना, तुमचेच पवित्र शास्त्रवाचन, तुमची स्वतःची सेवाव्यवस्था, तुमची मंडळी, तुमचीच पापे, तुमचा विश्वास, तुमची साक्ष, तुमचाच विश्वासूपणा, तुमचे भय - सर्व काही आपले - तुमचे - कसेही करून मानवतावादाचा बुरखा पांघरून ख्रिस्तीपणाचे बिरुद मिरवीत राहायचे. ख्रिस्ती लोकहो, उठा जागे व्हा. झोप सोडा आणि नव्या दृष्टीने आपला तारणारा, आपले पवित्र शास्त्र, आपले जग, आपणाला मिळणाऱ्या संधी यांच्याकडे पहा - विचार करा!

## सैतानाचा पर्याय

आता पुन्हा मत्तय.२८:१८-२० हा शास्त्रभाग पाहा. या महान कामगिरीच्या आदेशामधील तिसरा मुद्दा पाहा : ''तुमचा दृष्टांत व्यापक करा'' या शीर्षकाखाली आपण तारकाच्या योजनेचा सविस्तर अभ्यास करीत आहोत. आता येथे क्षणभर थांबून सैतानाच्या पर्यायाकडे जरा पाहू या. सैतान सतत आमचे लक्ष आमच्याकडेच केंद्रित करण्यास लावतो. आमची धडपड, आमचा संघर्ष, आमचे जगणे, तग धरून राहणे, आम्ही काम करतो ती संस्था - त्या संस्थेचे यश, भरभराट वगैरे गोष्टींवर तो आमचे लक्ष खिळवून ठेवतो. आमचा दृष्टान्त संकुचित व्हावा, रुढी, परंपरा, व्यक्ती, संस्था या मर्यादांच्या मध्येच आम्ही घुटमळत राहावे हाच त्याचा प्रयत्न असतो. आणि मग जगातील लोकांचे थवेच्या थवे, समुदायाचे समुदाय तसेच तहानेले भुकेले राहतात. ख्रिस्ताची जीवनदायी - तारणाची सुवार्ता हे शब्दही त्यांनी कधी ऐकलेले नसतात. संपूर्ण जगावर प्रभाव, छाप पडेल अशी योजना ख्रिस्ताने आम्हांला दिली आहे. पण आपण विफलतेकडे नेणाऱ्या भ्रामक, निरुपयोगी पर्यायाला उराशी कवटाळून बसतो. तुम्ही कोणती योजना घेतली आहे?

जगावर प्रत्यक्षात प्रभाव पाडू शकणारी अशी तारणाची योजना घेतली आहे का सैतानाचा पर्याय घेतला आहे? सैतानाच्या वाटेने गेल्याने ख्रिस्ती समाजाचा सतत संकोच होणार आणि कोट्यवधी लोक ख्रिस्ताची सुवार्ता न ऐकताच नाश पावणार याची हमीच मिळते!

## ४. त्यांना सुवार्ता सांगा

ख्रिस्ताची सुवार्ता ऐकून घेतील अशा लोकांना सुवार्ता सांगा. महान कामगिरीच्या तर्जुम्यामध्ये सात क्रियापदरूपी शब्द आहेत, परंतु 'सर्व लोकांस शिष्य करा' हे एकमेव आज्ञार्थी क्रियापद आहे. मत्तय.२८:१६-२० या संपूर्ण परिच्छेदामध्ये 'लोकांना शिष्य करा' हे एकमेव आज्ञार्थी - आदेश देणारे क्रियापद आहे. हा एक विशिष्ट प्रकारचा सुवार्ताप्रसार आहे. यात लोकांकडून 'ख्रिस्ताचा स्वीकार करण्याविषयीची वचने - निर्णय मिळवायचे नाहीत तर जगात क्रांती करणारे शिष्य तयार करायचे आहेत.'

### तारणाऱ्याची योजना

याचा नीट बारकाईने विचार करा. ही येशूने दिलेली आज्ञा आहे. त्याने आपल्या मंडळीला दिलेला कूच करण्याचा हा एकमेव आदेश आहे. ख्रिस्ताच्या आज्ञेप्रमाणे, त्याच्या योजनेला अनुसरुन आपण शिष्य करीत असलो तरच आम्ही त्याचे खरे शिष्य आहो.

'शिष्य करा' ही आज्ञा येशूच्या योजनेत मागाहून जोडलेली नाही तर ती मुळातच आज्ञा दिली आहे. ही आज्ञा योजनेचा एक अविभाज्य भागच आहे. येथे 'पालट झालेले' नव्हे तर 'शिष्य झालेले, होणारे' हाच मुद्दा आहे. या ठिकाणी तारकाची योजना केवळ आत्मे जिंकणे ही नसून 'शिष्य करणे' हीच आहे. येशूने आपल्या निकटच्या शिष्यांच्या बाबतीत जे केले तेच त्यांनी इतरांच्या बाबतीतही करावे हीच त्याची आज्ञा आहे. येशूने त्यांच्यासाठी जी योजना, जे तंत्र व जी प्रक्रिया वापरून जे केले ते तसेच त्यांनीही इतरांच्या बाबतीत करायचे होते. मित्रहो, हा परिच्छेद हा मजकूर नीट पुन्हा पुन्हा वाचा, आत्मसात करा आणि मगच पुढचा





भाग पाहा. 'शिष्य' या शब्दाचा अधिक सविस्तर विचार नंतरच्या एका प्रकरणात करणार आहे.

### सैतानाचा पर्याय

'शिष्य करणे' या आज्ञेला सैतानाने कोणता पर्याय दिला आहे? हरवलेल्या लोकांना तसेच त्याच स्थितीत, तारणाला वंचित ठेवणे हा त्याच्या योजनेचा एक भाग आहे. आणि विश्वासणाऱ्यांनी जगदृष्टीने विशाल दृष्टान्त पाहू नये, जगावर प्रभाव, छाप उठवणारे शिष्य होऊ नयेत, त्यांची अडवणूक करावी हा त्याच्या योजनेचा दुसरा भाग आहे. आणि समजा त्यातूनही कोणी शिष्य झालेच तर त्यांनी आपल्या मनाशी गोड कल्पना, काही ठराविक पद्धत ठेवावी, असे तो करतो. या ना त्या प्रकारे त्यांना खरे, ख्रिस्तासारखे, नव्या करारातल्याप्रमाणे शिष्य होऊ द्यायचे नाही हाच त्याचा मानस आहे.

## ५. ज्यांना सुवार्ता सांगितली त्यांना दाखल करून घ्या

ज्यांना सुवार्ता सांगितली त्यांना दाखल करून घ्या हा या महान आज्ञेतील पाचवा मुद्दा आहे : त्यांस पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या.

### तारकाची योजना

तारणाऱ्याने प्रत्येक विश्वासणाऱ्यासाठी योजना आखलेली आहेच. प्रत्येक विश्वासणाऱ्याने येशू ख्रिस्ताबरोबर समरूप व्हायचे आहे. म्हणजेच पूर्वी विश्वासणारा ज्या ज्या साठी जगत होता त्या सर्व गोष्टींना तो आता मेला आहे आणि त्याच्या पुनरुत्थानात तो आता फक्त ख्रिस्तासाठी जगतो आहे. बाप्तिस्मा घेतल्याने ख्रिस्तावरील विश्वासणारा आपण स्वतःच्या भूतकाळाला, गत काळातील सर्व गोष्टींना, पापांना मेला आहे हे कबूल करतो. आपली गत काळातील पापे, गतकाळातील स्वार्थ, जुनी विचारधारा, पूर्वीची मानसिकता, पूर्वीचे हेतू, ध्येये, उद्दिष्टे, थोडक्यात संपूर्ण भूतकाळ या सर्वांना आपण आता मेलो आहोत आणि आता एकच गौरवी जीवितहेतू आहे तो म्हणजे येशू ख्रिस्ताचे वैभवी व्यक्तित्व आणि

त्याचे दिव्य उद्दिष्ट, हेच आता त्याचे जीवनकेंद्र आहे. बाप्तिस्मा म्हणजे जणू पापरूपी कबरेत पुरले जाणे, हे ख्रिस्ताच्या मरणाशी समरूप होणे आहे आणि पापरूपी कबरेतून पुन्हा वर येणे हे ख्रिस्ताच्या पुनरुत्थानामध्ये सहभागी होण्याचे द्योतक आहे. विश्वासणारा ख्रिस्ताच्या शिष्यांमध्ये पूर्णपणे दाखल झाला आहे. त्याच्या कार्याला सादर समर्पित झाला आहे हेच बाप्तिस्म्याने प्रतीकरुपाने स्पष्ट होते. 'पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावाने' बाप्तिस्मा करायचा म्हणजेच विश्वासणाऱ्याने देव, देवाचे व्यक्तित्त्व व देवाची योजना यांत सर्वस्वी समरूप होणे, स्वतःला गुंतविणे. आपल्या जीवनातील काहीही स्वतःसाठी राखून ठेवायचे नाही. आता मृत्यूने ती शक्यता पुसली गेली आहे. पुनरुत्थानामुळे विश्वासणाऱ्याच्या जीवनाला एक नवी दिशा मिळाली आहे. आता त्याच्या व्यक्तीत्वाचा कण न् कण प्रभू येशू ख्रिस्त ह्यालाच अर्पिलेला आहे.

## सैतानाचा पर्याय

महान कामगिरीच्या या टप्प्यावर सैतानाने कोणता पर्याय दिला आहे? माणसांची मने दोन टोकांच्या भूमिकांमध्ये हेलकावे घेत डळमळीत ठेवावीत हेच त्याचे धोरण आहे. तो एकीकडे म्हणतो, 'बाप्तिस्मा केवळ यांत्रिक, आचारविधी, संस्कार आहे तो ऐहिक आहे - म्हणूनच त्यांचे काहीच महत्त्व नाही!' याच कारणाने क्वेकर पंथाचे लोक बाप्तिस्मा करीतच नाहीत! दुसरीकडे हाच सैतान म्हणतो, 'असं कसं! बाप्तिस्मा अत्यंत महत्त्वाचा आहे, बाप्तिस्मा घेतल्याशिवाय पापी लोकांना सार्वकालिक जीवन मिळणारच नाही.' म्हणूनच कँबेल संप्रदायी लोक बाप्तिस्मा तारणाची कोनशिला आहे असे मानतात. या दोन अगदी टोकांच्या मतांमध्ये बाप्तिस्मा केवळ प्रतीक चिन्ह  आहे या सरळ साध्या मताच्या सदर्न बॅप्टिस्ट ह्या व इतर मंडळ्या आहेत.

एक दिवस एक मनुष्य कामावर आला. त्याच्या दोन्ही डोळ्यांचा भाग काळानिळा झाला होता, चेहरा सुजला होता. बरोबरच्या दुसऱ्या कामगाराने विचारले, काय रे बाबा काय झाले? माझ्या बायकोनं मला मारलं! त्याने खाली मान घालून उत्तर दिले. काय म्हणतोस? एका साध्या बाईने तुझी ही अवस्था केली? त्यावर तो माणूस उत्तरला, अरे, माझी बायको साधीसुधी नाही!





मित्रहो, येशूने सोपविलेली, कोणतीही कामगिरी, कोणतीही आज्ञा केवळ चिन्ह - प्रतीक आहे असे म्हणणे म्हणजे सैतानाच्या पक्षाने चालणे नाही का? येशूने सांगितलेली कोणतीही गोष्ट कधीच 'किरकोळ, साधी' नाही. येशू ख्रिस्ताने तुम्हांला स्वीकारणे व तुम्ही त्याच्या कार्यात सहभागी होणे हे खरोखरी किती महान - थोर आहे ते तुम्ही लक्षात घेतले आहे का?

# ६. दाखल करून घेतलेल्यांना शिक्षण द्या, त्यांचे प्रबोधन करा

दाखल करून घेतलेल्या सर्वांना शिक्षण द्या, त्यांना बोध करा हा महान कामगिरीमधील सहावा मुद्दा आहे. जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांस पाळावयास शिकवा. शिकवा - शिकवत राहा. शिकवणे, बोध करणे हे सतत चालू असणारे कार्य आहे, त्यात खंड पडता कामा नये. एकेकाने लोकांना सतत शिकवणे हा क्रम तसाच चालू ठेवणे अगत्याचे आहे.

## तारकाची योजना

माझ्या ख्रिस्ती जीवनात मी सतत शिक्षण देत, प्रबोधन करीत असावे - या कामात क्षणाचाही खंड नसावा. सहेतुक दिलेली उदाहरणे, दाखले, अर्थपूर्ण विधाने, विशिष्ट नियोजित अभ्यासक्रम, मूळ प्रभाव, औपचारिक - अनौपचारिक प्रसंग अशा सर्व वेळी मी जो माझे जीवन सर्वस्व त्याचे गुण न थकता प्रकट केले पाहिजेत. प्रत्येक विश्वासणाऱ्याने शिक्षक असावे, मग त्याला शिस्त देण्याची देणगी असो वा नसो. आज संपर्क साधनांची एवढी रेलचेल आहे ती साधने एवढी उपयुक्त आहेत की 'मला शिकवणे जमत नाही,' वगैरे कोणालाही सांगता येणार नाहीत. आज कोणत्याही ख्रिस्ती विषयाचे शिक्षण देणाऱ्या ध्वनिफिती सात्विक, तज्ज्ञ ख्रिस्ती शिक्षकांनी तयार केलेल्या आहेत. ख्रिस्ती विश्वासाचे, पवित्र शास्त्राचे शिक्षण देणारी शेकड्यांनी पुस्तके ग्रंथालयात आणि दुकानात तसेच इंटरनेटवर उपलब्ध आहेत. विविध प्रकारे शिक्षण देणारी मासिके, नियतकालिके प्रसिद्ध होत आहेत. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीच्या घरी या शिक्षण साधनांचा साठा असावा व त्यातून दुसऱ्यांचे प्रबोधन होत राहावे. प्रत्येक ख्रिस्ती मंडळीने सुवार्तेच्या सत्याची सातत्याने घोषणा करावी. प्रत्येक सभासदाच्या सहकार्याने हरएक प्रकारच्या

साधनाने लोकांची घरे, अंतःकरणे, समाज समूह, सामाजिक संस्था वगैरे सर्वांचे प्रबोधन झाले पाहिजे. सुवार्तेचे संपूर्ण सत्य लोकांपर्यंत पोचवले पाहिजे.'

शिष्य करणे, शिष्यत्त्वाचे प्रशिक्षण देणे ही साखळी अखंडितपणे चालू राहावी यासाठी प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने सहकार्य केलेच पाहिजे. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्ती आणि प्रत्येक ख्रिस्ती मंडळी यांच्या समोर जगदृष्टी, जागतिक सेवाकार्य यांचा गतिमान दृष्टांत सतत ठेवला पाहिजे. यातून साधायचे आहे ते हेच की देवाचा संपूर्ण मनोदय सर्वांना कळवण्यासाठी देवाच्या अंतःकरणावर जे आहे तेच ओझे प्रत्येकावर असावे. जगावर प्रभाव पाडणारे, दूरदृष्टीने जगाकडे पाहणारे ख्रिस्ती लोक तयार व्हावेत या उद्देशाच्या परिपूर्तीसाठी सर्वकाही करायचे आहे.

## सैतानाचा पर्याय

या ठिकाणी सैतानाने कोणता पर्याय पुढे ठेवला आहे? पवित्र शास्त्रातील महान सत्यांचे आशीर्वादित शिक्षण कोठेच दिले जाऊ नये यासाठी तो हरप्रकारे प्रयत्न करतो. बहुतेक सर्व ख्रिस्ती लोक उपदेशांची चव चाखणारे, पारख करणारे व्हावेत असेही तो करतो. यामुळे त्यांना खऱ्या ख्रिस्ती विश्वासाचे शिक्षण मिळणार नाही. उपदेश संदेशांची केवळ चव चाखून ख्रिस्ती लोकांमध्ये सत्याच्या सखोल अनुभवांचा केवळ आभास निर्माण केला जातो. आभासी सत्यात गढून राहिल्याने अस्सल सत्य त्यांना सोसत नाही. तसेच तो विश्वासणाऱ्यांना सत्याचे विश्लेषण करण्यास लावतो. मग त्यांना वाटते की, सत्य काय ते आपल्यालाच समजते. पवित्र शास्त्राला वगळून आपण सत्य समजू शकतो, सांगू शकतो, असा भ्रम त्यांना होतो. म्हणजे ते स्वतःला सत्य आणि सत्याचा शिक्षक यांच्यापेक्षा श्रेष्ठ समजू लागतात. नव्या करारामध्ये आज्ञापालन - आज्ञाधारकपणा या अर्थी 'हुपोकोनान' हा ग्रीक शब्द आहे त्याचा अर्थ '०च्या हाताखाली शिकणे - ऐकून घेणे' असा आहे. नेहमी अतिशय नम्रपणे देवाचे सत्य ऐकून घेणारा/घेणारी हे या शब्दामागील चित्र आहे. जेम्स एम. बॅरी ह्याने म्हटले आहे : ''जीवन म्हणजे एक विनम्रतेचा दीर्घ धडाच आहे.'' ख्रिस्ती जीवनाला हे बरोबर लागू पडते. परंतु नम्रपणे सत्य शिकून घेण्याची ही शक्यता नष्ट करणे हीच सैतानाची योजना आहे. आणि यामुळे विश्वासणारा





पुन्हा स्वार्थीपणे स्वतःच्या मनाप्रमाणे वागू लागतो.

विश्वासणाऱ्यांसाठी सैतानाने केलेली ही विपरीत योजना कोणत्याही संवेदनशील विचारी ख्रिस्ती माणसाच्या चटकन लक्षात येते. विश्वासणाऱ्या व्यक्तीने दर रविवारी न चुकता उपासनेला जावे, सत्याचा संदेश या कानाने ऐकावा, त्या कानाने सोडून द्यावा यातच सैतानाला मोठा आनंद होतो. विश्वासणारा प्रथम सत्य ऐकतो तेव्हा तो त्याचा अर्धवट स्वीकार करतो आणि ते लगेचच विसरतो. अशा प्रकारे रविवार मागून रविवार, आठवडेच्या आठवडे, महिनेच्या महिने, वर्षानुवर्षे हाच क्रम चालू राहतो. त्या विश्वासणाऱ्याला वाटते, प्रार्थना उपासनेला नियमितपणे जाणे, उपदेश ऐकणे हेच ख्रिस्ती जीवन आहे. असा हा क्रम बरीच वर्षे चालतो. त्या व्यक्तीला मग नम्रपणे सत्य ऐकून घेणे, आज्ञापालन करणे अशक्य होते. त्याच्या मनावर सत्याचा काहीच प्रभाव पडत नाही एवढा तो बधिर झालेला असतो. मग तो निर्जीव, अशक्त हट्टी असून अंधळा होतो, स्थानिक मंडळीत प्रत्येक उपासनेच्या वेळी 'एक जागा' अडवणारा एवढेच त्याचे काम ठरते. बहुधा त्याच्याकडून पाळकाचे किंवा मंडळीचे काहीच नुकसान होत नाही, तो मौन धारण करून असतो. नित्यनियमाप्रमाणे उपासनेला जाणारे, सतत सत्य पाहणारे, सत्याचे विश्लेषण करणारे लोकच कधी न क्षमा होणाऱ्या पापाचे दोषी असतात. शास्त्री व परूशी अशा प्रकारचे लोक होते. त्या काळी ते सर्वात धार्मिक समजले जात (पाहा मत्तय १२). गप्पागोष्टी करणारे ख्रिस्ती व्हावे हीच सैतानाची इच्छा आहे. सतत सत्याची पारख करावी, आमच्या आवडत्या सत्यावर व्याख्यान द्यावे, आमच्या आवडत्या उपदेशकांकडून आवडते उपदेश ऐकावे आणि याप्रमाणे सुखासमाधानाने (?) कालक्रमणा करावी, सैतानाच्या या पर्यायी योजनेमुळे महान कामगिरीमधील सहावा मुद्दा निकामी निष्प्रभ होतो.

ख्रिस्ती बांधवहो, तुम्ही कोठे कोणत्या बाजूला आहात? तुम्ही अतिशय नम्रपणे तारणाऱ्याच्या योजनेप्रमाणे कार्य करीत आहात का? किंवा एक नियमित श्रोता म्हणून देवाच्या अंगणात वेळ घालवण्यासाठी जगाला दाखवण्यासाठी येऊन बसता आणि महान कामगिरीच्या परिपूर्तीसाठी काहीच करायचे नाही असे म्हणणाऱ्या जमावात सामील झाला आहात!

## ७. तो कार्य करील अशी अपेक्षा ठेवा

''येशू ख्रिस्त कार्य करील अशी अपेक्षा ठेवा'' हाच महान कामगिरीमधील सातवा मुद्दा आहे, ''आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत सर्व दिवस मी तुमच्या बरोबर आहे.'' 'पाहा' हा शब्द 'जा - जाऊन...' नंतर आला आहे हे नीट लक्षात घ्या. आपल्या समक्षतेचे हे विशेष अभिवचन ख्रिस्ताने महान कामगिरीमधील प्रत्येक बाब पूर्ण करण्यासाठी आपली जीवने समर्पित केली आहेत त्यांच्यासाठीच आहे. थोडक्यात या योजनेप्रमाणे तुम्ही कार्य करीत असाल तरच या अभिवचनाप्रमाणे मागणी करण्याचा हक्क तुम्हांला आहे. नव्या करारामधील नमुन्याप्रमाणे, आराखड्याप्रमाणे काम केले तरच आम्हांला नव्या करारातील सामर्थ्य मिळणार. एरवी ते शक्य नाही. म्हणूनच पवित्र आत्मा व त्याचे सामर्थ्य मिळावे यासाठी केलेल्या सर्व प्रार्थना व्यर्थ आहेत! आम्हांला त्याची परिपूर्णता कशासाठी हवी आहे? देवाने आमच्या योजनांना पसंती द्यावी म्हणून? आमची प्रतिष्ठा वाढावी म्हणून? आम्ही त्याच्यासाठी चालवलेल्या प्रयत्नांवर त्याच्याकडून विजयाचे यशाचे शिक्कामोर्तब व्हावे म्हणून? त्या थोर उपदेशकाच्या प्रार्थनेला देवाने दिलेले उत्तर लक्षात आहे ना? माझ्या मुला, तुझ्या योजनांचा एकंदर आकार आणि आवाका पाहता तुला माझ्या शक्तीसामर्थ्याची काहीच गरज नाही!

### तारकाची योजना

तारणाची योजना काय आहे? शिष्य करणाऱ्या प्रत्येकाच्या कामावर लक्ष ठेवणे आणि त्यांचे जीवन व कार्य ह्यांच्यावर पवित्र आत्म्याचा महान सामर्थ्याचा अभिषेक करणे - हीच त्याची कार्ययोजना आहे. येशूने म्हटले, आणि युगाच्या समाप्तीपर्यंत मी (स्वतः हा शब्द विशेष जोरदार आहे) सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे. हे अभिवचन वगळले, बाजूला ठेवले, तर प्रत्येक ख्रिस्ती व्यक्ती येशू ख्रिस्ताची अपुरी, अक्षम्य, अपूर्ण, शक्तीहीन प्रतिनिधी आहे. (खरेतर ही वस्तुस्थिती आहे, केवळ अभिवचन नाही). आपल्याबरोबर आपला शिक्षक मार्गदर्शक, जाणकार आहे हे समजल्याने नवशिक्या माणसाला फार मोठे प्रोत्साहन, धैर्य व धीर मिळतो हे जो तो जाणतोच! मी स्वतः तुमच्याबरोबर आहे या येशूच्या म्हणण्याचा अर्थ काय?





येशूची प्रत्यक्ष समक्षता शिष्य करणाऱ्याबरोबर आहे हाच त्याचा अर्थ. पवित्र आत्मा येशू ख्रिस्ताचा 'जिवलग' आहे असे म्हटले तरी चालेल. शिष्य करणाऱ्याबरोबर येशूची समक्षता सतत असते. शिष्य करणारी व्यक्ती महान कामगिरी करण्यास झटत असते, तेव्हा प्रत्येक प्रसंगी, प्रत्येक परिस्थितीत, क्षणोक्षणी देवाच्या पुनरुत्थित, समर्थ पुत्राची समक्षता तिच्याबरोबर असतेच असते. मूकपणे सर्व पाहणारा, स्वस्थ राहणारा, काहीच न करणारा अशा प्रकारे येशू आमच्याबरोबर नसतो. मार्ककृत शुभवर्तमानाच्या अखेरच्या वचनात स्पष्ट सांगितले आहे : ''त्यांनी (शिष्यांनी) तेथून जाऊन सर्वत्र घोषणा केली. प्रभू त्यांच्याबरोबर कार्य करीत होता व घडणाऱ्या चिन्हांच्याद्वारे वचनाचे समर्थन करीत होता'' (मार्क.१६:२०). ही 'चिन्हे' वेगवेगळी, शंकास्पद कधी अशी कधी तशी असली तरी येशूची समक्षता सततची, न बदलणारी, अखंडित आहे.

जॉन वेस्ली व्हाइट म्हणतात, ''जाऊन.... करा' म्हणजेच पवित्र आत्म्याने परिपूर्ण होणे. लोक अनेकदा संदर्भ सोडून या अभिवचनाचा आधार घेतात. संकट आले, परिस्थिती बिकट झाली की प्रभू आमच्याबरोबर नेहमी आहे असा दावा करण्यासाठी ते याच अभिवचनाचा आधार घेतात. पण त्या अडचणीमध्ये उपयुक्त अशी धीर देणारी दुसरी अनेक वचने शास्त्रलेखांमध्ये आहेत, त्यांचा आधार घ्यावा. पण महान कामगिरी पूर्ण करताना बिकट प्रसंग ओढवला तर या वचनाचा आधार घेणे उचित होईल. हे वचन शिष्य तयार करणाऱ्यांसाठीच आहे. हेच वेगळ्या प्रकारे सांगायचे तर पहा - आज येशू कोठे असेल? तो कोठे काम करीत असेल हे समजून घ्यायचे तर शिष्य तयार केले जात आहेत तेथे जा व पाहा. जेथे उत्तमोत्तम उपदेश - प्रवचने ऐकवली जातात त्या उपासनामंदिरात तो जात नाही. जेथे प्रार्थना म्हटल्या जातात, कळकळीने, आस्थापूर्वक प्रार्थना होतात तिकडे त्याचे लक्ष असेलच असे नाही. लोक बहुसंख्येने जमतात, लोकांची मोठी गर्दी होते. लोकांचे थवेच्या थवे येतात तेथे तो असेलच असे नाही. त्याने नव्या करारामध्ये दाखवल्याप्रमाणे, त्या योजनेप्रमाणे जो शिष्य करीत आहे त्याला अभिषेक करण्यासाठी तो तिकडे जातो.

पुढच्या रविवारी येशू उपासनेसाठी कोणत्या मंडळीत जाणार? तुम्हांला माहीत

आहे का? संपूर्ण जग दृष्टांतरूपाने डोळ्यांसमोर ठेवून दूर दृष्टीने, जगावर प्रभाव टाकतील असे जागतिक दूरदृष्टीने जगामध्ये प्रभावी कार्य करतील असे शिष्य तयार होत आहेत तेथे - त्या मंडळीत जा, येशू खात्रीने तेथेच असणार. तेथे केवळ 'चांगले ख्रिस्ती' तयार होणार नाहीत कारण 'चांगले' या शब्दाला मानवतावादी ख्रिस्तीपणाचा वासवारा लागला आहे. येशू सर्वच मंडळ्यांमध्ये जात नाही, सर्वच ठिकाणी अभिषेक करीत नाही, सर्वच विश्वासणाऱ्यांची जीवने आशीर्वादित करीत नाही. कारण देवाच्या अंतःकरणावर असणारे ओझे त्यांच्यावर नसते, 'सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करण्याकडे' त्यांचे लक्ष नसते. उलट पक्षी, सर्वस्वी देवावर विसंबून, महान कामगिरी पूर्ण करण्यासाठी त्याच्या योजनेनुसार शिष्य करणारी मंडळी आढळली की देव त्या कार्यात पूर्णपणे सहभागी होतो. मोठ्या उत्साहाने व आस्थेने तो ताबडतोब त्या मंडळीत सामील होतो. आणि जोपर्यंत तेथे त्याच्या इच्छेप्रमाणे कार्य होत आहे तोपर्यंत तो तेथेच असणार.

ही कामगिरी किती महान आहे त्याचा पुरावा हवा आहे का? या आज्ञेच्या आरंभी व अखेर असलेली येशूची विधाने नीट पहा. हाच भक्कम पुरावा आहे. ''स्वर्गात व पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे... व ... आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्या बरोबर आहे!'' बरे दिवस - वाईट दिवस, सुखाचे दिवस - दुःखाचे दिवस, यशाचे दिवस - अपयशाचे दिवस, स्वतंत्रतेचे दिवस - दास्यत्त्वाचे दिवस, शांतता - युद्ध यांचे दिवस, पेरणीचे दिवस कापणीचे दिवस - अभ्यासाचे दिवस, कृती करण्याचे दिवस अशा सर्व दिवशी तो आपल्याबरोबर आहे - यात कधीच खंड पडणार नाही.

फ्रेरिऑफ नान्सेन हे नॉर्वे येथील थोर संशोधक १८९६ मध्ये उत्तर ध्रुवावरील बर्फाचे संशोधन करून बर्फाच्या प्रवाहांचा अभ्यास करण्यासाठी बोटीतून तिकडे गेले तेव्हा हे फार मोठे साहस असल्याचे सर्वच जाणून होते. त्यांनी आपल्याबरोबर बरीच संदेशवाहक कबुतरे घेतली होती. या धोक्याच्या खडतर प्रवासात प्रत्येक टप्प्यावर ते एक एक कबुतर आकाशात पाठवत होते. प्रत्येकाच्या पायाला एक पत्र बांधलेले असे. घरी त्यांची पत्नी श्रीमती नान्सेन आपल्या दैनंदिनीत लिहून ठेवत असे : ''माझ्या खिडकीत हे कबुतर येऊन बसले की मला फार आनंद होत असे.





हे कबुतर दिसले की माझा नवरा अद्याप जिवंत आहे, माझाच विचार करीत आहे याची खूण पाहून मनाला मोठे समाधान वाटत असे!'' दोन हजार वर्षांपूर्वी गौरविलेल्या प्रभू येशू ख्रिस्ताने स्वर्गीय कबुतर, पवित्र आत्मा - त्याचे दुसरे 'स्व'त्व पेंटेकॉस्टच्या दिवशी या जगामध्ये पाठविले - दिव्य योजनेच्या परिपूर्तीसाठी पूर्णपणे दिव्य शक्तीसामर्थ्य पाठविले. त्याच्या आज्ञा पाळाव्या, त्याच्या समर्थ, बलशाली आत्म्याचे कार्य पाहिले की सर्व काही ठीक आहे, तो आमचाच विचार करीत आमच्याबरोबर कार्य करीत आहे याची खात्री पटते. या प्रकारे सदासर्वदा कार्य करावे, करीत राहावे हीच त्याची इच्छा आहे, हेच त्याला बरे वाटते. हीच त्याची योजना आहे.

## सैतानाचा पर्याय

सैतानाचा सूक्ष्म भेदक पर्याय काय आहे? तो आमचे चित्त भलत्या गोष्टींकडे लावतो, संस्था संघटना स्थापन करणे, बांधणे आणि अशाच बिनमहत्त्वाच्या हलक्यासलक्या गोष्टींमध्ये आम्हांला गुंतवून ठेवतो. तसेच आम्ही एकाकी आहोत, प्रार्थना विनंत्या करतो तेव्हा आमचे कोणीच ऐकत नाही अशा भूलथापा देऊन तो आमच्या मनात संशयाचे बीज पेरतो. मग पवित्र आत्म्याचे सहाय्य आम्हांला मिळू शकत नाही. तो आम्हांला पवित्र आत्म्याच्या बाबतीत अज्ञानीच ठेवतो किंवा पवित्र आत्म्याचे व्यक्तित्व, समक्षता व सामर्थ्य यांच्याकडे दुर्लक्ष करण्यास लावतो, किंवा पवित्र आत्म्याचा म्हणून कोणत्या तरी खोट्या नकली अनुभवात आम्हांला गुंग करून ठेवतो.

ख्रिस्ती बांधवहो या टप्प्यावर तुम्ही कोणत्या पक्षाचे आहात? महान कामगिरीच्या पक्षाचे आहात का महान उपेक्षेच्या पक्षाचे आहात?

आमची जबाबदारी आदेश निश्चित करणारी कामगिरी कोणती ते आपण पाहिले आहे. लक्षात ठेवा पुढे जाण्याची ही एवढीच आज्ञा येशूने मंडळीला दिली आहे. परंतु आपल्याच योजनेचे घोडे पुढे दामटून सैतान या दिव्य योजनेच्या पूर्ततेमध्ये नेहमी अडथळे आणतो. जेथ जेथे मंडळी आपल्या नेमलेल्या कार्यापासून ढळते, बाजूस जाते, संस्था संघटना उभारून या ना त्या प्रकारे स्वतःचे अस्तित्व

टिकवण्यास धडपडते, आटापिटा करते किंवा फक्त ''चांगले ख्रिस्ती'' करण्यावर भर देते तेव्हा तेव्हा त्यात सैतानाचा हात दिसून येतो, अशा स्थितीत महान कामगिरी 'महान उपेक्षा' झालेली असते.

काही वर्षांपूर्वी मी 'महान कामगिरी - महान आज्ञा' हा विषय काही तरुण नवविवाहित जोडप्यांना शिकवला. या अभ्यासाच्या अखेरीस एका तरुण गृहिणीने केलेली प्रार्थना मी ध्वनिमुद्रित केली होती, तीच येथे देत आहे.

*हे स्वर्गीय पित्या, आता या क्षणी स्वर्गामध्ये आमच्यासाठी एक मनुष्य आहे याचा मला मोठा अभिमान वाटतो. आणि तो खरोखर मानवी आहे व मानवीच राहतो तर त्याला आजही मानवी भावभावना आहेत. त्याला आनंद, प्रशंसा यांचा अनुभव येतो तसे त्याला दुःख होते, वेदनाही होतात. या पृथ्वीवर आपल्या योजनेप्रमाणे कार्य व्यवस्था करताना त्याच्या अंतःकरणाला असंख्य वेदना होत असतील कारण त्याचे पार्थिव शरीर म्हणजे मंडळी आपल्याच योजनेचे घोडे पुढे दामटते आणि त्याने आपल्या शिष्यांना दिलेल्या योजनेला सर्व प्रकारे प्रतिकूल - विरोधी अशी योजना चालवण्यासाठी झटते!*

महान कामगिरी का महान उपेक्षा? येशूने ''आणि पाहा'' या शब्दाने सांगितल्याप्रमाणे आम्ही महान कामगिरी नीट पाहून विचारपूर्वक केव्हा पूर्ण करणार? वेळ आहे तोवरच ही संधी साधली पाहिजे.



## *प्रकरण ३*

# आमची कार्यपद्धती निश्चित करणारी संकल्पना

*''लोकांना शिष्य करा...''* - मत्तय २८:१९

आम्ही सर्वस्वी येशू ख्रिस्ताचे आज्ञापालन करून त्याने सोपविलेली महान कामगिरी पूर्ण करायची तर पहिल्याने ती कामगिरी नेमकी काय कशी आहे ते नीट समजून घेणे जरुरीचे आहे. आपण प्रत्येक शब्दाचा अचूक अर्थ तंत्रशुद्ध रीतीने जाणून घेतला पाहिजे. त्यात चूक होता कामा नये. आम्हांला माहीत नाही, समजले नाही अशा सबबींना येथे जागा नाही, आपण - 'परमेश्वराच्या मुखातून प्रत्येक शब्दाने जगतो' आणि महान कामगिरीच्या संबंधात आम्ही याचे अगदी काटेकोरपणे पालन केले पाहिजे. या महान कामगिरीमध्ये 'लोकांना शिष्य करा' ही एकच आज्ञा आहे. तेव्हा ती कशी पाळायची, त्यासाठी काय करायचे ते सर्व नीट समजून घेणे, पूर्णपणे लक्षात घेणे आवश्यक आहे. लोकांना शिष्य करा ही एकच आज्ञा महान कामगिरीमध्ये आहे हे एकदा समजले की मग आपण अनेक महत्त्वाचे प्रश्न विचारून त्यांची उत्तरे मिळवली पाहिजेत. शिष्य म्हणजे काय? हा पहिला प्रश्न. लोकांना शिष्य करायचे म्हणजे नेमके काय करायचे? हा दुसरा प्रश्न आणि हे आपण कसं करायचं? ही तिसरा प्रश्न आजच्या मंडळीला याहून दुसरे

महत्त्वाचे प्रश्न नाहीतच असे मला वाटते. या प्रश्नांची उत्तरे मिळवलीच पाहिजेत. नाहीतर तारणाची योजना एकीकडे राहील आणि आपण अज्ञानाने, डोळे झाकून 'सैतानाच्या कपटी पर्यायाप्रमाणे चालत राहू.'

आध्यात्मिक कार्यासाठी दृष्टान्त किती आवश्यक आहे ते आपण पाहिलेच आहे. तसेच आमचा आदेश - आज्ञा निश्चित करणारी महान कामगिरी नेमकी काय कशी आहे ते आपण पाहिले. आता या कामासाठी पद्धत कोणती ते निश्चित करणारी संकल्पना पाहू या. शिष्य तयार करणे - शिष्य करणे हीच संकल्पना आहे. ही संकल्पना नीट समजण्यासाठी आपण शिष्य, शिष्यत्व - शिष्यपणा या व अशाच आणखी काही शब्दांचा विचार पवित्र शास्त्राच्या आधाराने करू या.

## शिष्य करणे

'लोकांना शिष्य करा' ही येशूची आज्ञा आहे. 'शिष्यत्व - शिष्यपणा' या संकल्पनेच्या आधारे आपली कार्यपद्धती निश्चित होणार आहे. यासाठी आपण काही महत्त्वाच्या शब्दांकडे लक्ष दिले पाहिजे.

## शिष्य

'शिष्य हा एक महत्त्वाचा शब्द आहे.' शिष्य म्हणजे प्रभूला संतोष देणारे आणि जगाशी संपर्क साधणारे लोक. शिष्य कोण आहे त्याची अगदी स्पष्टपणे ओळख करून घेणे अगत्याचे आहे. शिष्य कोण कसा आहे आणि शिष्य काय करतो ते मंडळीने अग्रक्रमाने - सर्वप्रथम समजून घेतले पाहिजे. मंडळीमध्ये 'शिष्य' या शब्दाचा मुक्तहस्ते उपयोग केला जातो. पण शिष्याची व्याख्या - पण शिष्याची व्याख्या - अर्थ कोणालाच माहीत नसतो ही मोठी खेदाची गोष्ट आहे. बूट बनवत राहण्यासारखे हे आहे. अशा कारखान्यातून अखेर काय तयार होते ते पाहणे मनोवेधक ठरेल! (***बिल हल् : द डिसायपल मेकिंग पास्टर*** ५४).

'शिष्य' हा शब्द आधुनिक मंडळीत अधिकच संकुचित केला आहे. त्यात 'पालट झालेला' 'विश्वास व्यक्त करणारा' हे अर्थ जोडले आहेत. शिष्य करणे म्हणजे लोकांना ख्रिस्ताकडे आणणे असे सामान्यपणे समजले जाते. आत्मे





जिंकणे, हा शिष्य करण्याचा महत्त्वाचा, प्रारंभिक आणि आवश्यक भाग आहे. पण हा तर केवळ आरंभच आहे. ही प्रक्रिया हे कार्य 'आत्मा जिंकणे' याच टप्प्यावर थांबले तर त्या पापी व्यक्तीला जिंकले : ख्रिस्ताकडे आणले असे होतच नाही.

नव्या करारामध्ये हा शब्द अनेक प्रकारे - आरंभी सर्वसाधारणपणे व नंतर पुढे अगदी संकुचित - नेमकेपणे वापरला आहे. आरंभी हा शब्द 'सहज ऐकणारा - श्रोता' या अर्थी योजिला आहे. येशूच्या सेवाकार्याच्या आरंभी त्याच्याकडे आलेल्या सर्वांनाच शिष्य म्हटले आहे. नंतर 'खात्री पटलेला श्रोता' या अर्थी योजिला आहे. असा श्रोता आपण ऐकतो ते सत्यच आहे हे मान्य करतो पण ते स्वीकारीत नाही, परिणामी त्याचे जीवन , जीवनशैली, विचार - यात काही बदल होत नाही. योहान अ. ६ नीट काळजीपूर्वक वाचा. ६३-६६ या वचनांकडे विशेष लक्ष द्या. येथे सहज जाता जाता ऐकणारे, तसेच खात्री पटलेले असे दोन्ही प्रकारचे शिष्य - श्रोते होते. ते अनुयायी असले तरी अद्याप त्यांनी येशूचा स्वीकार केला नव्हता. हेच लोक येशूला सोडून गेले, आणि ते पुन्हा कधी त्याच्याकडे आले नाहीत. मित्रहो, आज मंडळीमध्ये या दोन्ही प्रकारचे लोक भरपूर भरले आहेत. ते दर रविवारी 'बैठकांची - आसनांची शोभा वाढवतात, व रविवार मागून रविवार मंडळीत गर्दी करतात, पण जग बदलून टाकणारे दिव्य सामर्थ्य त्यांना नाही.' देवाकडून त्यांना शक्ती मिळत नाही. कारण ते स्वतः खरोखरी बदललेले नसतात. त्यांच्यामध्ये सखोल पालट झालेला नसतो.

'शिष्य' या शब्दाचा नव्या करारातील तिसरा उपयोग पाहा. यात 'शिष्य म्हणजे - समर्पित - बांधील, आमरण शिकत राहणारा अनुयायी' असा अर्थभाव आहे. महान कामगिरीमध्ये येशूने याच अर्थाने हा शब्द योजिला आहे. आणि याचसाठी आम्ही कूच करून पुढे जायचे आहे. आम्ही सर्वत्र जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करायचे आहे. म्हणजेच येशू ख्रिस्तासाठी समर्पित - बांधील, आमरण शिकत राहणारे अनुयायी तयार करायचे आहेत. शिष्य या शब्दातच हा सर्वव्यापक 'अर्थभाव' अंतर्भूत आहे. शिष्य म्हणजे येशू ख्रिस्ताला बिलगून, चिकटून राहणारा, निष्ठावंत अनुयायी अगर ख्रिस्ताचा शिकाऊ उमेदवार. प्रत्येक शब्दाचा अर्थ समजून घ्या. शब्द नीट तोलून मापून पाहा. शिष्य म्हणजे प्रशिक्षण घेत असलेली व्यक्ती.

खरे तर ती प्रशिक्षण घेत असलेली पुढारीच आहे.

*आरंभीच्या मंडळीतील एक पुढारी तिर्तुलिअन ह्याने ख्रिस्ती लोक देवाच्या पाठशाळेतील विद्यार्थी आहेत असे म्हटले आहे. शिष्य प्रथम जन्मतो, मग त्याला तयार केले जाते. योग्य त्या अधिकृत साधनांनी देवाच्या आत्म्याने त्याचा जन्म होतो. मग त्याची रचना करण्यासाठी त्याला शिकवायचे, प्रशिक्षण द्यायचे आणि येशू ख्रिस्तासमोर सादर समर्पित होण्यासाठी त्याला मार्गदर्शन करायचे.*

*वॉल्ड्रन स्कॉट हे शिष्य तयार करणारे थोर सेवक म्हणतात, नवीन वृत्ती प्रवृत्ती विकसित करणे, नवी कौशल्ये शिकून घेणे, नवनवे नातेसंबंध जोडणे, शोध करणे, धाडस करणे, संशोधन करणे, सुधारणे, नवीकरण - या सर्व गोष्टींमुळे येशूने सांगितले तसे जीवन एक साहसच होते. शिष्य होणे करणे हे एवढे सरळ, व शुद्ध आहे.*

परंतु एवढे सांगितले तरी स्कॉट यांच्या वरील विधानाला एक पुष्टी जोडलीच पाहिजे, शिष्यत्व शिकविण्याचे व आचरणाचे केंद्र येशू ख्रिस्त हेच असणे अगत्याचे आहे आणि यातून प्रत्यक्षात येशू ख्रिस्ताप्रमाणे वागणूक ठेवायची हाच परिणाम साधायचा आहे. *नव्या करारानुसार शिष्य असणाऱ्या व्यक्तीचे सर्व लक्ष येशू ख्रिस्ताकडेच लागलेले असते. यामुळे इतर कोणत्याच बाबींकडे लक्ष जात नाही, चित्त विचलित होत नाही - आणि तो प्रत्यक्षात व्यावहारिक रीतीने अधिकाधिक प्रमाणात ख्रिस्तासारखा होतो.* तो सतत शिकवीत असतो, सतत सेवा करतो, लोकांच्या जीवनांना उठाव देतो, जरूर तेथे सतत सुधारणा करतो, चुका दुरुस्त करतो आणि सातत्याने संपूर्ण विशाल जगाकडे लक्ष ठेवतो.

प्रत्यक्षात ख्रिस्तासारखे असायचे म्हणजे अगदी जपून खाली मान घालून राहायचे, भित्रेपणाने, लीनपणे, अगदी जिवावर आल्यासारखे वावरणे अशा वृत्तीने वागायचे नाही. आज ख्रिस्ती मंडळ्यांमध्ये आपण अविचाराने असलीच हानिकारक वृत्ती पसरू दिली आहे. ''आज येशू ख्रिस्ताला अगदी सामान्य पातळीवर आणून ठेवण्याचे महापाप आजच्या मंडळीने केले आहे'' असे युजिनिया प्राइस ह्यांनी अगदी सार्थपणे म्हटले ते खरेच आहे. 'संघटनात्मक मंडळ्यांमध्ये सॅम शूमेकर यांना त्यांच्या पिढीतील इतर कोणाहीपेक्षा अधिक महत्त्व होते,' असे बिली ग्रॅहॅम यांनी





ज्यांच्याविषयी म्हटले त्या सॅम शूमेकर यांनी एकदा म्हटले, ''भरपूर काम करणे, सभासदांची नोंदवही भरून ठेवणे, सभासदांमध्ये भर घालणे, अगर भरपूर पैसा उभा करणे हे मंडळीचे मुख्य कार्य नाही, तर येशू ख्रिस्तासारखे वागणारे, चालणारे लोक तयार करणे हेच मंडळीचे मुख्य कार्य आहे, आणि हे कार्य साधारण काम नाही. तसेच अशा प्रकारे घडवलेले लोक केवळ अभिनय करीत नाहीत, सोंग करीत नाहीत. ख्रिस्तासारखे लोक घडवणे हे काही सोपे काम नाही. सामान्य लोकांमधून विपुल प्रमाणात असे लोक तयार करता येत नाहीत.''

आजच्या मंडळ्या पाहा, त्यांची योजना, कार्यपद्धती पाहा - त्यांची पद्धत मोठी गमतीदार आहे. स्फोटके लावून ग्रॅनाइट दगडाचा एक डोंगर उडवून द्यायचा आणि त्यातून उत्तम चमकदार पुतळे मिळवायचे! शुमेकर पुढे म्हणतात, ''आमच्या मंडळ्यांमधील मोठमोठ्या संस्था संघटना लहान आकाराच्या केल्या पाहिजेत. त्यामुळे पाळक व सामान्य अदीक्षित सभासद यांना दुसऱ्यांना जिंकणे व प्रशिक्षण देणे ही थोर आध्यात्मिक कला शिकून घेता येईल. या प्रकारच्या कार्याला आपल्या जीवनामध्ये अग्रक्रम दिला नाही तर लवकरच जीवनात अशा कार्याचा मागमूसही उरणार नाही हा अनुभव साधारणपणे सर्वत्र येतो. आमची मने, अंतःकरणे, आमच्या भाव भावना, आमच्या दिवसाचे सर्व तास सर्व काळ एका विशिष्ट व्यक्ती समूहासाठी नेमलेला असणे जरुर आहे. ज्यांना ख्रिस्ताकडे आणायचे आहे अशा व्यक्ती, आम्ही ज्यांना जबाबदारी स्वीकारण्यासाठी प्रशिक्षण देऊन तयार करतो अशा व्यक्ती, आध्यात्मिक सहभागिता आणि सहाय्य यासाठी आम्ही ज्यांच्याकडे पाहतो अशा व्यक्ती यांचाच विचार आमच्या मनात असावा.'' या प्रकारच्या जीवनशैलीचे नमुनेदार आदर्श प्रथम येशूने घालून दिले आणि आम्ही सर्वांनीच ते आत्मसात करणे अगत्याचे आहे.

नॉफेल स्टॅटन ह्यांनी अगदी परखडपणे लिहिले आहे, ''येशूचा शिष्य कोण आहे? आम्ही शिष्य कसा करावा? या प्रश्नांचे, आमच्या उद्दिष्टांचे स्पष्ट चित्र डोळ्यांपुढे नसेल तर आम्ही जागच्या जागीच हात पाय हालवीत राहू, वायफळ श्रम करण्यात आमचा वेळ व शक्ती खर्ची घालू. आणि एवढा खटाटोप करूनही आमच्याकडून एकही शिष्य तयार केला जाणार नाही!'' शुभवर्तमाने, प्रेषितांची

कृत्ये या पुस्तकांमध्ये ''शिष्य'' हा शब्द २७० वेळा आला आहे. नव्या करारामधील उर्वरित २२ पुस्तकांमध्ये हा शब्द आढळत नाही. असे का झाले असावे? हा शब्द का आणि कसा अदृश्य झाला? पवित्र आत्मा काय सांगतो? लूक ६:४० या वचनात येशूने म्हटले आहे, ''शिष्य गुरूपेक्षा श्रेष्ठ नाही; पूर्ण झालेला प्रत्येक शिष्य आपल्या गुरूसारखा होईल.'' म्हणजेच प्रगत समरुपता वेगळ्या संज्ञांनी व्यक्त होणार असे आपण लक्षात घेतले पाहिजे. खरे तर येथून पुढे ख्रिस्ती हा शब्द प्रचलित झाला. 'पवित्र जन' हाही शब्द पुढे आला आहे. ख्रिस्ताच्या नियंत्रणासाठी सर्वथा वेगळा केलेला हा 'पवित्र जनाचा' अर्थ आहे. येशू ख्रिस्तावर सातत्याने विश्वास ठेवणारा, त्याला धरून चिकटून राहणारा, आपल्या दैनंदिन जीवनात त्याची - ख्रिस्ताची उद्दिष्टे पूर्ण करण्यास झटणारा या अर्थी 'विश्वासणारा' हा शब्द प्रचारात आला आहे.

## शिष्य करणारा

शिष्य करणारा ही आणखी एक महत्त्वाची संज्ञा आहे. 'शिष्य तयार करणारी' व्यक्ती लोकांना शिष्यपणाचे शिक्षण देते आणि या प्रकारे शिष्य घडवते. शिष्य करणारा स्वतः प्रौढ परिपक्व होणारा शिष्यच असतो. येशूने आपल्या मंडळीला कूच करण्याचा दिलेला एकमेव आदेश डावलून, त्याकडे दुर्लक्ष करून येशूचा शिष्य कोणालाच होता येणार नाही. थोडक्यात, शिष्य तयार करणारा झाल्याशिवाय कोणाला शिष्य होता येत नाही असे दिसते. शिष्य करणारा सहविद्यार्थी असतो. एकत्र शिकत असताना तो इतरांना आपल्यात सामील करून घेतो. इतरांना नेतृत्व देतो.

## शिष्यपणाचे शिक्षण देणे

'शिष्यपणाचे शिक्षण देणे' ही तिसरी महत्त्वाची संज्ञा आहे. शिष्य करा या येशूच्या आज्ञेमध्ये येशूचे आदर्श उदाहरण आणि शिक्षण यातून ध्वनित होणारे अर्थभाव जोडलेले आहेत. शिष्य करणे म्हणजे लोकांना शिष्यत्वाचे शिक्षण देऊन तयार करणे. 'पर्सनल डिसायपल मेकिंग' या पुस्तकाचे लेखक क्रिस्टोफर ॲडसिट





यांनी याची व्याख्या अशी केली आहे : शिष्य करणे म्हणजे महान कामगिरी पूर्ण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, लोकांनी आध्यात्मिक दृष्टीने परिपक्व व्हावे यासाठी त्यांना सहाय्य करणे, त्यासाठी पवित्र आत्म्याकडून सामर्थ्य व मार्गदर्शन मिळवणे त्यासाठी स्थानिक मंडळीची साधनसामग्रीचा उपयोग करणे आणि वर्षानुवर्षे संपादन केलेली कौशल्ये, बुद्धिगुण व ईश्वरी कृपादान हे सर्व पूर्णपणे कारणी लावणे.

शिष्य करण्याचे हे कार्य एखाद्या व्यक्तीकडून होते, एखाद्या गोष्टीकडून होत नाही. हे कार्य संघटना यांच्याकडून नाही तर व्यक्तीच्या कडून होते. तांत्रिक दृष्टीने पाहायचे तर शिष्यत्वाचे शिक्षण देणे, शिष्य तयार करणे म्हणजे एका व्यक्तीने आपले सर्व जीवन दुसऱ्यासाठी वेचणे; उदाहरण, आदर्श, कित्ता, नेतृत्व, नातेसंबंध यांच्याद्वारे दुसऱ्याला सेवेसाठी सज्ज करणे असे आहे. यात नेहमीच एकाकडून दुसऱ्याला हस्तांतर करणे हा भाग असतो.

पापी जनांना शुद्ध करणे आणि पवित्र जनांना शिष्यत्वाचे शिक्षण देऊन शिष्य करणे या दोहोंमध्ये पुष्कळ फरक आहे. मंडळीत साधारणपणे जे कार्य होते - पाळकीय सेवाकार्य, उपासना, प्रार्थना, शैक्षणिक कार्यक्रम, वाढविस्तारासाठी केलेले प्रयत्न या सर्वांच्याद्वारे अधूनमधून पापी जन शुद्ध होतात. परंतु पवित्र जनांना खऱ्या अर्थाने शिष्य केले जाण्याचे प्रमाण अगदीच नगण्य आहे. याचे प्रमाण पाहायचे आहे? अगदी स्पष्टच सांगायचे तर बहुतेक मंडळ्यांमधील बहुसंख्य ख्रिस्ती लोकांच्याकडे त्यांचे तारण झालेल्या दिवशी होते तेवढेही ''आध्यात्मिक वजन'' आज ख्रिस्तासाठी उरलेले नसते!

पापी जनांना शुद्ध केल्याने त्यांचे तारण होते. पण त्यानंतर त्यांना आध्यात्मिक पेटीमध्ये सुरक्षित ठेवले जाते त्यातून ते काही काळाने माणसाळलेला, नमविलेला, सुस्वभावी मानवप्राणी असे पुढे येतात. परंतु पवित्र जनांना शिष्यत्वाचे शिक्षण देणे यात तारण झालेल्या व्यक्तीची गुणप्रधान रचना केली जाते. मग परिणामी ती व्यक्ती हीच प्रक्रिया पुढे चालू ठेवून जगामध्ये बदल घडवील, हा बदल सतत वाढता विस्तारणारा असेल.

यातील फरक पुढील उदाहरणातून स्पष्ट होईल. त्यासाठी आपणाला उपदेश

करणे व शिष्य करणे यात तुलना करावी लागेल, समजा जमिनीवर एक रेषा काढली आहे. त्या रेषेच्या मागे एक माणूस हातात पाण्याने भरलेली बादली घेऊन उभा आहे. त्या रेषेच्या पुढे वीस फूट अंतरावर दुधाच्या लहान तोंडाच्या वीस रिकाम्या बाटल्या ओळीने लावून ठेवल्या आहेत. उपदेश करणे हे रेषेच्या मागे उभे राहून बादलीतले पाहणी फेकून त्या बाटल्या भरण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. थोडे तरी पाणी त्या बाटल्यांमध्ये जाईल अशा आशेने पाणी फेकले जाते. परंतु कितीही कौशल्याने पाणी फेकले तरी त्याचे काय होणार ते सांगण्यास डोक्याला शीण देण्याचे काहीच कारण नाही. त्या बाटल्यांमध्ये पाण्याचे काही तुरळक थेंब पडतील. एरवी त्या रिकाम्या त्या रिकाम्याच राहणार! आणि समजा काही पाणी बाटल्यांमध्ये गेले तरी प्रत्यक्षात त्या पाण्याचा काही उपयोग केला नाही तर ते सुकून त्याची वाफ होऊन जाईल. उलटपक्षी तुलनेने शिष्य करणे हे पाण्याने भरलेली बादली त्या बाटल्यांजवळ नेऊन प्रत्येक बाटली पाण्याने नीट पूर्ण भरणे असे आहे. यातील कोणता प्रकार अधिक उपयुक्त, कार्यक्षम आहे ते स्पष्ट करण्याची गरजच नाही.

आणखी पाहा उपदेश करणे हे डोळ्यात घालायच्या औषधाची कुपी हाती घेऊन तिसऱ्या मजल्यावरच्या खिडकीत उभे राहण्यासारखे आहे. तेथे उभे राहून त्या औषधाचे थेंब खाली रस्त्यात उभे असलेल्या लोकांच्या डोळ्यांत टाकण्याचा प्रयत्न करायचा. आणि ते थेंब कोणाच्या तरी डोळ्यात पडतील, त्याला बरे वाटेल अशी आशा करायची! उलट पक्षी शिष्य करण्यामध्ये वैयक्तिकतेला फार महत्त्व आहे. त्यात अगदी निकट राहून शिकवणे, त्या औषधाच्या कुपीतून औषधाचे थेंब थेट गरजू डोळ्यात टाकणे हा भाग आहे.

शिष्य तयार करण्याचे कार्य सातत्याने पारखण्यासाठी कोणताच मापदंड नसल्याने आम्ही विपुल प्रमाणात एकदम अनेकांना सत्याचा संदेश सांगतो आणि मग किती लोक इकडे आले ते मोजून पाहतो - पण प्रत्यक्षात आपल्याकडून प्रत्यक्षात उपयुक्त असे मूठभर लोकही तयार होत नाहीत. येशूने शिक्षण दिले, शिष्य केले त्या प्रकारे आपणही शिष्यत्वाचे धडे दिले तर ही उणीव दूर होईल, ही समस्या सुटेल. ''तुम्ही जाऊन... शिष्य करा'' हे येशूचे सांगणे शिष्यांनी ऐकले तेव्हा





त्यांनी ही आज्ञा अशी समजून घेतली... येशूने ज्या प्रकारे त्यांना शिक्षण देऊन शिष्य केले तसेच त्यांनीही इतरांना शिष्यत्वाचे शिक्षण देऊन त्यांना शिष्य म्हणून तयार करायचे होते. शिष्यत्वाचे शिक्षण देण्यामध्ये शिष्य तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया अंतर्भूत आहे. पालट होण्यापासून ते दुसऱ्यांना शिष्यत्वाचे शिक्षण देऊन शिष्य करण्यास सज्ज प्रशिक्षित होण्यापर्यंतचे सर्व टप्पे येतात. आपल्या मंडळीकडून ख्रिस्ताची नेमकी हीच अपेक्षा आहे.

## शिस्त लावणे

'शिस्त' (नियम - निर्बंध) हा आणखी एक अखेरचा महत्त्वपूर्ण शब्द. शिष्य होण्यासाठी मोजावी लागणारी किंमत शिस्तीच्या नियमांमधून व्यक्त होते. चायना इग्लंड मिशनचे संस्थापक आणि एक दूरदृष्टीचे महान मुत्सद्दी सुवार्तासेवक हडसन टेलर ह्यांनी लिहिले आहे : ''एखादा मनुष्य सर्वस्वी समर्पित असेल, निष्ठावान आणि अगदी प्रामाणिक, विश्वासू असेल पण त्याला शिस्तच नसेल, तो बेशिस्त असेल तर त्याची किंमत शून्यच आहे.''

ख्रिस्ताने दिलेली आज्ञा, सोपवलेली कामगिरी कितपत महत्त्वाची आहे? आणि आज्ञापालन न केल्याने या कामगिरीमधील एकमेव आज्ञा मोडल्याने मंडळीच्या पदरी किती व्यापक आणि गंभीर दोष आला आहे? मंडळीला आलेल्या या अपयशाचा काही प्रत्यक्ष पुरावा मिळतो का? मला वाटते असा पुरावा भरपूर, आणि विपुल प्रमाणावर दिसून देतो.

काही वर्षांपूर्वी मी एका सभेसाठी गेलो होतो. तेथे मला एक वयोवृद्ध अनुभवी खंदे सुवार्तिक भेटले. आता ते प्रभूकडे गेले आहेत. मी त्यांच्या कचेरीत काही वेळ बसलो असताना त्यांनी मला विचारले, ''तुमचं कसं काय चाललंय? तुमच्या मंडळीत चांगलं काम होत आहे का?'' त्यावर मी म्हटले, ''मंडळीच्या सभासदांनी जगदृष्टी ठेवावी, आपल्यासारखीच दूरदृष्टी असणारे शिष्य तयार करावेत यासाठी मला जमेल त्याप्रमाणे मी त्यांना सूचना देतो, मार्गदर्शन करतो आहे.'' त्यावर ते म्हणाले, ''हॉजेस भाऊ मी पाळक होतो तेथे मीही अगदी हेच करण्याचे ठरवले होते. पण त्यात मला काही यश आले नाही. शिष्यांनी शिष्य तयार करावे हे माझे

स्वप्न काही खरे झाले नाही.'' मी विचारले, ''मग तुम्ही काय केलंत?'' त्यांनी मोठ्या खेदाने उत्तर दिले, ''मग मीच पुढाकार घेतला आणि मला जमले तेवढे सगळे काम मीच केले!'' आयुष्याच्या सायंकाळी असे आत्मपरीक्षण स्पष्टपणे करणे खरेच दुःखाची गोष्ट आहे!

एक दिवस आम्ही जेवणासाठी एका उपहारगृहात गेलो. माझ्याबरोबर आणखी तिघे पाळक होते. आम्ही शिष्य तयार करणे या विषयावर बोलत होतो. आमच्यापैकी एका सेवाभावी पाळकांनी आपल्या पाळकीय सेवेचे अगदी प्रांजलपणे मूल्यमापन केले (ते आघाडीचे सुवार्तावादी पाळक होते). ते म्हणाले, ''हर्ब, मी दोन मंडळ्यांवर पाळक होतो. दोन्हीकडे बराच काळ सेवा केली आणि प्रत्येक मंडळीत तुम्ही म्हणता त्या प्रकारचे शिष्य तयार करणारे फक्त दोघेजणच आढळले.'' हे त्यांनी मोठ्या खेदाने सांगितले. यात त्यांच्या बोलण्यात राग नव्हता, निषेध नव्हता, फक्त दुःखाचा सूर होता. खरोखर खेदाची गोष्ट आहे. पण पाहावे तिकडे असेच दिसते, आम्ही फक्त चांगले ख्रिस्ती तयार करू शकतो. चांगले ख्रिस्ती म्हणजे बहुधा सर्वस्वी आत्मकेंद्रीत, सदा अंतर्मुख असणारे लोक! त्यांच्या हातून जगावर कसला प्रभाव पडणार? आणि जे स्वतःच शिष्य नाहीत ते शिष्य कसे करू शकणार?

'शिष्य तयार करणारे,' शिष्यत्वाचे धडे देणारे शिष्य तयार करणे हेच येशूचे सुस्पष्ट ध्येय होते. आणि त्यांनी आयुष्यभर शिष्यत्वाचे धडे द्यावे आणि ते उद्दिष्ट पूर्ण करण्यास आवश्यक ती शिस्त स्वतःला लावून घ्यायची हीच येशूची त्याच्या शिष्यांविषयी इच्छा होती.

## बहुगुणित व्हावे अशा प्रकारे शिष्य तयार करणे

आमच्याकडे सोपविलेल्या कार्याला नव्या करारामध्ये आणखी एक महत्त्वाचे परिमाण जोडलेले आहे. शिष्यत्वाचे शिक्षण देऊन शिष्य तयार करण्याच्या कार्यातून आणखी शिष्य केले जावेत यावर विशेष लक्ष दिले पाहिजे. म्हणजेच पुढे नित्य शिष्यांकडून शिष्य तयार व्हावे या प्रकारे आम्ही ही सेवा करायची आहे. प्रत्येक शिष्याने असे बहुगुणनाचे सेवाकार्य करावे हीच येशूची इच्छा होती. बहुगुणन म्हणजे





काय? शिष्य जेव्हा दूरदृष्टी असलेले, जगाला प्रभावित करणारे, शिष्य करणारे शिष्य तयार करतात व ही प्रक्रिया अशीच पुढे चालू राहते तेव्हा गुणाकार - बहुगुणन होते. बहुगुणित होऊन जगामध्ये सर्वच लोकवस्ती झाली त्याचप्रमाणे सर्व जगाशी संपर्क साधावा ही देवाची योजना आहे. देवाने सांगितले, ''...फलद्रूप व्हा, बहुगुणित व्हा आणि पृथ्वी व्यापून टाका'' (उत्पत्ती ९:१). कोणीतरी म्हटले आहे, मानवाला दिलेली ही पहिलीच आज्ञा आहे आणि हीच एक आज्ञा मानवाने पाळली आहे. देवाने लोकसंख्या वाढवण्याबद्दल दिलेल्या आज्ञेप्रमाणेच येशूने सुवार्ताप्रसार वाढवण्याबद्दल आज्ञा दिली आहे.

लोकांना संतती न होण्याची कारणे कोणती आहेत?

१. *काही लोक कधीच लग्न करीत नाहीत. लैंगिक संबंध येत नाहीत परिणामी लोकसंख्या वाढत नाही - बहुगुण होत नाही.*
२. *काहींच्या अंगी जन्मतः शारीरिक दोष असतात. पुनरुत्पादनाच्या इंद्रियांत दोष असतो - अशांना संतती होत नाही.*
३. *जे अल्पवयी, अपरिपक्व असतात ते संतती निर्माण करू शकत नाही. लहान लहान ५-६ वर्षांची मुले मुली माता पिता झाल्याचे कोणी कधी पाहिले, ऐकले आहे काय? लहान मुलांमध्ये पुनरुत्पत्तीची इंद्रिये असतात. पण पुनरुत्पत्ती होऊ शकेल असा त्यांचा विकास - वाढ झालेली नसते. बाळांना बाळे होत नाहीत!*

आध्यात्मिक बहुगुणन न होण्यासही याच उणीवा कारणीभूत आहेत. ख्रिस्ती माणूस आणि येशू ख्रिस्त यांच्यात नित्य ऐक्य नसेल तर आध्यात्मिक बहुगुणन होण्याची आशाच नाही. विश्वासणाऱ्याच्या जीवनातील पापही बहुगुणनाच्या या प्रक्रियेत अडथळा आणते. त्याचप्रमाणे एखादी ख्रिस्ती व्यक्ती वयाने वाढूनही आध्यात्मिकदृष्ट्या बाळच राहिली तर त्यामुळेही बहुगुणन होत नाही. पौलाने म्हटले आहे, ''बंधुजनहो, जसे आध्यात्मिक माणसांबरोबर बोलावे तसे तुमच्याबरोबर मला बोलता आले नाही, जसे दैहिकांबरोबर, जसे ख्रिस्तांतील बाळकाबरोबर तसे मला बोलावे लागले'' (१ करिंथ.३:१).

आणि करिंथ येथील बालक ख्रिस्ती लोकांना आध्यात्मिक बहुगुणन करता आले

नाही. जगावर प्रभाव पाडण्याच्या कसोटीवर ते उतरले नाहीत. उणे पडले.

सध्याच्या जगाशी आणि पुढील भावी पिढ्यांबरोबर संपर्क साधण्यासाठी देवाने आध्यात्मिक बहुगुणन हाच दृष्टांत नेमलेला आहे. पण ही प्रक्रिया अशीच चालू राहावी यासाठी आम्ही लोकांना ख्रिस्ताकडे आणून त्यांना शिकवून तयार करणे अगत्याचे आहे. येशूच्या सेवाकार्यातील नियोजन, अगदी स्पष्टच होते. त्याने मनुष्याच्याद्वारे लोकसमुदायांकडे पाहिले; मग लोकसमुदायांवर प्रभाव पाडण्यासाठी त्याने मनुष्याची तयारी केली. त्याच्या समोर असलेल्या प्रत्येकांना त्याने सहाय्य केले - पण त्याने आपल्या राज्यासाठीच माणसे दाखल करून घेतली. आणि आम्ही हे आदर्श मानदंड एकीकडे टाकून माणसांची उभारणी करण्याऐवजी संस्थांची उभारणी करण्यात वेळ, श्रम व पैसा व्यर्थ खर्च करीत आहोत. प्रत्येक व्यक्तीवर येशूचे प्रेम होते व आहे यात शंकाच नाही पण त्याची नजर नेहमी लोकांकडे असे, त्याचे शिष्य पुढे जाऊन ज्यांना शिकवून तयार करणार त्या माणसांवर त्याचे लक्ष होते (पाहा योहान.१७:२०).

प्रे.कृ.२:४१,४७ आणि प्रे.कृ.५:१४ या वचनांमध्ये 'भर पडली, मिळत गेले' हे शब्द आहेत त्यावरून मंडळीच्या काळात देवाची गणिती योजना कशी होती ते दिसते. प्रे.कृ.६:१ मध्ये असे आहे : ''त्या दिवसांत शिष्यांची संख्या वाढत चालली...'' ६:७ मध्ये आहे : ''मग देवाच्या वचनाचा प्रसार होत गेला, यरुशलेमेत शिष्यांची संख्या फार वाढत गेली; याजकवर्गातीलही पुष्कळ लोकांनी ह्या विश्वासाला मान्यता दिली.'' पुढे प्रे.कृ.९:३१ मध्ये ''...मंडळीस स्वस्थता मिळाली आणि तिची उन्नती होऊन ती... वाढत गेली.'' मंडळीने केवळ भर घालण्यावर समाधान मानले नाही. तेव्हा मंडळी आज्ञापालन करण्यात अग्रेसर होती व शिष्य करणे, शिष्यांनी शिष्य करणे... ही बहुगुणन सेवा चालूच होती.

माझ्या वयाची एखादी व्यक्ती आपल्या पूर्वीच्या मित्राला बऱ्याच वर्षांनी भेटते तेव्हा साधारण हे प्रश्न विचारले जातात : लग्न झालंय ना? मुलं किती आहेत? नातवंडं किती? हे मित्र वृद्ध असतील तर पणतू वगैरे आहेत का? हाही प्रश्न विचारला जातो.

आणि आम्ही येशू ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर उभे राहू तेव्हा आम्हांला हेच





प्रश्न विचारले जातील. तुम्हांला मुलं आहेत का? (नसली तर का नाहीत?) किती मुलं आहेत? आणि त्यानंतर येशूच्या योजनेमध्ये आमच्या सहभागाची पारख हेते. तुम्हांला नातवंडं आहेत का? तुमच्या स्वतःच्या आध्यात्मिक मुलांना तुम्ही नीट वळण लावलंत त्याचा परिणाम म्हणून किती लोक ख्रिस्ताकडे आले? तसेच तुम्हांला आध्यात्मिक पणतू-पणती आहेत का? आम्ही अनेकांना संदेश दिले, उपदेश केले आणि त्यातून फक्त चार दोनच उत्पादक झाले ही काही अभिमानाने सांगण्याची गोष्ट नाही. येशूने आपल्या शिष्यांना जसे पुनरुत्पादकक्षम शिष्य केले तसे आमच्या शिष्यांमधून करण्यात आम्ही जीवन खर्ची घातले असते तर ती मोठी समाधानाची बाब झाली असती.

आपण खरा वास्तविक मापदंड पाहून समजून घ्यावा आणि त्यानुसार करण्यास आम्ही चुकलो तर काय होईल याचे गांभीर्य आमच्या लक्षात यावे यासाठी मी या प्रकरणाचा शेवट अगदी गंभीरपणे नकारात्मक प्रकारे करीत आहे. **'द ब्रिज ओव्हर द रिव्हर काय'** नावाचे एक प्रसिद्ध पुस्तक आहे. त्याच्या आधारे त्याच नावाचा एक परिणामकारी चित्रपट तयार केला गेला. चित्रपटाचे शीर्षक **'मिरॅकल ऑन द रिव्हर क्वॉय'** या अर्नेस्ट गॉर्डन ह्यांच्या प्रभावी पुस्तकावरून घेतले आहे. पण वरील पुस्तक व चित्रपट हे दोन्ही मूळ पुस्तकातील कथेला कल्पनेचा रंग देऊन तयार केले आहेत.

**'द ब्रिज ऑव्हर द रिव्हर क्वॉय'** ही एक ब्रिटिश सेनापतीची कथा आहे. दुसऱ्या महायुद्धात जपानी सैन्याने या सेनापतीला कैद केले. त्याला इतर अनेक कैद्यांबरोबर ब्रम्हदेशातील एका जंगलामधील 'कैद्यांच्या छावणीत' ठेवले होते. तेथे शेकडो कैदी निराश होऊन मरणाची वाट पहात खितपत पडले होते. त्या सर्वांचे नैतिक धैर्य वाढवावे, त्यांच्या जिण्याला काही सकारात्मक उद्देश द्यावा यासाठी सदर इंग्रज अधिकाऱ्याने एक नवी योजना आखली. त्या तळाजवळ शत्रू (जपान) एक रेल्वे पूल बांधत होता. या कैद्यांनी ते काम स्वतःकडे घेऊन अगदी पूर्ण क्षमतेने उत्तम प्रकारे संपवायचे होते. इंग्रज लोकांचे कार्यकौशल्य, अपूर्व कल्पनाशक्ती कशी आहे ते जपानी लोकांना प्रत्यक्षात दाखवायचे होते. तो अधिकारी व त्याचे सैनिक मोठ्या हिरिरीने ते काम करू लागले. लवकरच सैनिकांचे - कैद्यांचे खचलेले नीतीधैर्य

पुन्हा जणू नव्याने जागृत झाले. तो पूल बांधून हेच त्यांचे व त्यांचा नेता अशा सर्वांचे दिमाखदार उद्दिष्ट झाले. त्यांना सतत याच कामाचा ध्यास लागला. अखेर पुलाचे काम पूर्ण झाले, पूल तयार झाला. जपानी सैन्याला मालाचा पुरवठा करणारी पहिली मालगाडी त्या पुलावरून पलीकडे जाण्याच्या तयारीत होती. तेव्हा हा इंग्रज अधिकारी मोठ्या अभिमानाने पुलावर पहारा देत होता. त्याने खाली नदीच्या पात्रात पाहिले तो दोस्त राष्ट्रांचे कमांडो सैनिक तो पूल स्फोटक्यांच्या सहाय्याने उडवून देण्याची खटपट करीत आहेत असे त्याला दिसले. हा पूल त्याचा ध्यास, जीवितहेतू झाला होता म्हणून त्याने मोठी आरोळी मारून जपानी सेनापतीला इषारा दिला आणि त्या घातपाती लोकांना रोखण्यासाठी तो स्वतः धावतपळत खाली गेला.

यातील साम्यसाधर्म्य स्पष्टच आहे ना? अनेक मंडळ्या मरणाच्या दारी खितपत पडल्या आहेत. त्यांचे नैतिक धैर्य उंचवावे, सभासदांच्या समोर काही निश्चित ध्येय ठेवावे म्हणून मंडळीचे पुढारी नवनव्या योजना पुढे आणतात, कार्यक्रमामागून कार्यक्रम घेतात. थोडक्यात टिकून तग धरून राहण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय करतात. हेच ते संघटना उभारण्याचे, बांधण्याचे अभिजात उदाहरण आहे. पण वरील गोष्टीत दाखवल्याप्रमाणे शत्रूचा स्वतःचा कार्यक्रम आहे, योजना आहे आणि ती योजना पूर्ण व्हावी यासाठी तो आम्हांला जवळ करतो, त्याच्या कार्यक्रमात आम्हाला सहभागी करून घेतो. आणि आपणही त्याची योजना अगदी आपली स्वतःची म्हणून हिरिरीने अंगावर घेतो - पूल बांधण्याचे कार्यध्येय हाच आमचा ध्यास - श्वास आणि जीवित हेतू होतो. आणि कोणी आम्हांला सांगितले की तुम्ही करीत आहा ती तारकाची योजना कार्यक्रम नसून तो सैतानाचा पर्यायच वाटतो तर आम्ही तोच आमचा शत्रू आहे असे मानून त्याच्यावरच उलटतो. संस्था - संघटना उभारणे बांधणे याच विचाराने आम्ही एवढे पछाडलो गेलो आहेत की त्या पुलापेक्षा मोठे युद्ध चालू आहे हेच आम्ही विसरलो आहो. लुटुपुटीचे खेळ खेळणाऱ्या लहान मुलांप्रमाणे आम्ही जीवनात धापा टाकीत उगाचच धावपळ करतो. परिणामी येशूने सोपविलेल्या मूळ कामगिरीकडे आमचे साफ दुर्लक्ष होते, त्याचा विचारही कधी मनाला शिवत नाही.





१९९१ च्या वसंत ऋतूमध्ये मी टेक्सास येथील एका मंडळीत एक आठवडा व्याख्याने दिली. रोज रात्री शिष्य करण्याची प्रक्रिया स्पष्ट करून सांगणारे संदेश दिले आणि रोज दुपारी उपासनेमध्ये शिष्य कसे करावे ते शिकवले. मी पूर्वी पाळक होतो त्या मंडळीतूनच सदर मंडळीचे पाळक आले होते. माझ्या तेथील कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी एक तरुण पतिपत्नी माझ्याकडे आले. काही क्षणातच उपासना सुरू होणार होती. आम्ही बोलत असताना त्या गृहस्थाच्या पत्नीने एक घडी केलेले पत्र माझ्या हातात ठेवले. त्या पत्रातील काही भाग असा होता : ''तुम्हांला माहीत आहे का नाही ते आम्हांला माहीत नाही, पण मी तुमची एक आध्यात्मिक नात आहे. आमचे पाळक मला व माझ्या पतीला गेली चार वर्षे शिष्यत्वाचे शिक्षण देत आहेत.'' त्यानंतर काही वैयक्तिक माहिती दिली होती, त्यानंतर प्रत्येक दिवशी संध्याकाळी मी दिलेल्या संदेशाचा थोडक्यात सारांश देऊन तो प्रत्यक्षात कसा आणला ते लिहिले होते. शेवटी तिने लिहिले होते :

*आपला बहुमोल वेळ खर्चून आम्हांला शिष्यत्वाविषयी शिक्षण दिल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद. दुपारच्या एका उपासनेत एका ख्रिस्ती भावाने रडतरडत कबुली दिली की इतकी वर्षे ख्रिस्ती असूनही त्याने आजवर कोणा एकालाही शिष्यत्वाचे शिक्षण देण्याचा विचार केला नाही. मला वाटतं माझी अवस्था अशीच आहे. आमच्या पाळकांच्या बरोबर राहून, त्यांच्यापासून शिकल्यानंतर मी अनेकांना साक्ष दिली आहे, आता पहिला शिष्य करण्याची संधी मिळावी म्हणून मी आतुरतेने वाट पाहात आहे. हा आठवडा माझ्या जीवनाला एक नवीन वळण देणारा ठरला आहे. देवाने तुमच्याद्वारे मला शिकवले, आवाहन केले याबद्दल मी फार आभारी आहे. येशूच्या साहाय्याने, सहकार्याने तुमच्यासाठी आध्यात्मिक पणतू - पणती द्यावी असा माझा विचार आहे. इकडे येऊन आम्हांला शिक्षण दिल्याबद्दल पुन्हा आभार. - ख्रिस्तामध्ये तुमची बहीण व नात (सही).''*

या पत्रातील भावभावनांमधून नव्या करारातील वस्तुस्थिती डोळ्यांसमोर येते आणि येशू ख्रिस्ताने आपल्या मंडळीला हाच कूच करण्याचा आदेश दिल्याचे जाणवते. आता यात आध्यात्मिक पुनरुत्पत्ती, जगदृष्टी, आणि शिष्य तयार करण्याची प्रत्यक्ष प्रक्रिया यांची जोड द्या म्हणजे त्याची आज्ञा पूर्ण करण्याच्या

दिशेने झपाट्याने प्रगती करीत आहात असे अनुभवण्यास येईल.

१९८३ च्या मे महिन्यात एका सदर्न बॅप्टिस्ट सेमिनरी मासिकात एक अगदी शोकपूर्ण दुःखद वृत्तांत आला होता. त्या वृत्तांतामध्ये संबंधित व्यक्तींची नावे दिली असली तरी ती मी येथे उघड करणार नाही. इथिओपिया देशातून हाकलून देण्यात आले तेव्हा त्या मिशनरी सेवकांनी त्या घटनेविषयी एक पुस्तक लिहिले. आपण निघून जाताना मागे काय ठेवले - या अवघड प्रश्नाचे उत्तर देणे त्यांना भागच पडले. या प्रश्नाचे उत्तर पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली! आपण फक्त बिया टाकल्या - लावल्या नाहीत. बी पेरले, पण बीजारोपण केले नाही. आणि ख्रिस्ती लोक सर्वत्र हीच चूक करीत आहेत हे जाणून ते अधिकच खिन्न झाले - हजारोंना शेकडोंना बाप्तिस्मा द्यायचा पण एकालाही शिष्य करायचे नाही! या मिशनरी सेवकांनी एका प्रार्थना सभेत सांगितले, ''आम्ही शिष्य तयार केले नाहीत, आम्ही फक्त त्यांच्याकडून विश्वासाची कबुली घेतली. ते म्हणाले, 'आमचा विश्वास आहे.' आम्ही म्हटले, 'ठीक, आनंद आहे, देवाची स्तुती असो!' आम्ही तेथेच थांबलो.'' असे विश्वासाची कबुली देणारे अमेरिकेत आणि सर्व जगभर उपासनामंदिरात बसलेले आढळतात. लोकांना बाप्तिस्मा देणे खूपच सोपे आहे पण शिष्य करणे अगदी वेगळेच आहे. मंडळी आणि देव यांच्या दोन वेगवेगळ्या योजना आहेत असे आम्हांला वाटते. मंडळीमध्ये वक्ते आहेत, श्रोते आहेत पण या दोहोंपैकी एकही येशूने सांगितलेली कामगिरी करणारा नाही. ख्रिस्ताने ज्यासाठी ख्रिस्ती लोकांना पाचारण केले आहे ते कोणीच करीत नाही. आपण मंडळीच्या नव्हे तर देवाच्या योजनेत सहभागी झाले पाहिजे.

कदाचित ह्या वृत्तांतामधून ही समस्या अगदी सर्वसाधारणपणे मांडली आहे. जणू काही सर्वच ख्रिस्ती लोक दोषपात्र आहेत. असे दाखवून त्यावरचा उपाय अगदीच सरळ साधा करून सांगितला आहे. आणि हे दोन्ही दोष या पुस्तकातही आहेतच. परंतु येथे मंडळीतील सर्वत्र आढळणारी एक उणीव, एक अपयश, एक महत्त्वाचा दोष विचारासाठी मांडला आहे आणि त्यातून येशूने आम्हांला दिलेल्या एका रास्त योजनेचे पुन्हा स्मरण दिल आहे.

आम्हांला जे सांगितले आहे - आज्ञापिले आहे, ते करण्यास योग्य ते करण्याची





सुरुवात करणे केव्हाही चांगले. झालेल्या विलंबाची खंत करीत बसू नये. पुन्हा कोणालाही अगदी आरंभापासून बहुगुणन सुरू करता येईल. तथापि आपणांपैकी बहुतेक सर्वांनी लगेचच येशू ख्रिस्ताचे जीवन व सेवाकार्य यांचा सखोल अभ्यास सुरू केला पाहिजे. त्याने आपल्या शिष्यांना घेऊन कसे कार्य केले? शिष्यांना कसे तयार केले, ते मूळापासून नीट समजावून घेतले पाहिजे. आरंभी ***'मास्टर प्लॅन ऑफ इव्हँजिलिझम'*** - रॉबर्ट कोलमन; आणि ***द लॉस्ट आर्ट ऑफ डिसायपल मेकिंग*** - लिरॉय एम्स ही पुस्तके वाचावी. पुन्हा पुन्हा वाचून विषय समजावून घ्यावा. एवढे झाल्यावर आज या विषयावरील उपलब्ध असणारी तज्ज्ञांनी लिहिलेली पुस्तके वाचण्यास सुरूवात करावी. शिष्य तयार करण्याचे काम कधीच संपत नाही म्हणून हा अभ्यासही न संपणारा आहे.

संपूर्ण जगाचा दृष्टांत समोर ठेवून दूरदृष्टीने जगावर प्रभाव पाडणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे, ते सर्व बहुगुणन करणारे शिष्य तयार करीत आहेत आणि तुम्ही जाऊन लोकांना शिष्य करा या येशूच्या आज्ञेचे ते समर्पित वृत्तीने पालन करीत आहेत असे चित्र मी पाहतो आहे. देवाने माझ्या व तुमच्या डोळ्यादेखत अशा लोकांची फौज आघाडीवर पाठवावी हीच प्रार्थना.

*प्रकरण ४*

# मंडळीच्या इतिहासाच्या आघाडीस असलेली दाराची किल्ली

*''थियफिल महाराज, येशूने जे प्रेषित निवडले होते त्यांना पवित्र आत्म्याच्या द्वारे आज्ञा केल्यानंतर तो वर घेतला गेला. त्या दिवसापर्यंत त्याने जे जे करावयास व शिकवावयास आरंभिले होते त्या सर्वांविषयी मी पहिला ग्रंथ केला. मरण सोसल्यानंतरही त्याने त्यांना पुष्कळ प्रमाणांनी आपण जिवंत आहो हे दाखविले. चाळीस दिवसपर्यंत तो त्यांना दर्शन देत असे व देवाच्या राज्याच्या गोष्टी सांगत असे. तो व ते एकत्र जमले असताना त्याने त्यांना आज्ञा केली की, यरुशलेम सोडून जाऊ नका, तर पित्याने देऊ केलेल्या ज्या देणगीविषयी तुम्ही माझ्याकडून ऐकले आहे तिची वाट पाहा; कारण योहानाने पाण्याने बाप्तिस्मा केला खरा; पण तुमचा बाप्तिस्मा थोड्या दिवसांनी पवित्र आत्म्याने होईल.''* प्रे.कृ.१:१-५

आपण या अभ्यासाचा आरंभ ''प्रेषितांची कृत्ये'' या पुस्तकाच्या ''पुढल्या दारा''पासून सुरू करणार आहोत. नव्या करारातील पुस्तकांची नावे ''ईश्वरप्रेरित'' नाहीत हे तुम्हांला माहीतच असेल. ''नवा करार'' लिहून पूर्ण झाल्यानंतर कित्येक वर्षांनी ही नावे देण्यात आली. काही लोकांना वाटते की, या विशिष्ट पुस्तकाला ''काही प्रेषितांची कृत्ये'' हे नाव द्यावे. कारण या पुस्तकामध्ये

फक्त पेत्र, याकोब, योहान आणि पौल ह्यांच्याच सेवाकार्याचा उल्लेख आहे; दुसऱ्या काहींना वाटते की, या पुस्तकाला ''पवित्र आत्म्याची कृत्ये'' हे नाव द्यावे, मग मुख्य कार्य करणारा स्पष्टपणे सर्वांच्या लक्षात येईल आणि दुय्यम कार्य करणारे साहाय्यक मागे राहतील. पण पुस्तकाच्या नावामध्ये ''कृत्ये''हा शब्द सर्वांनीच कायम ठेवला आहे. प्रेषितांच्या योजना उद्देश, हेतू, आशा, आकांक्षा, मनन, चिंतन, उपदेश, प्रवचने वगैरे काहीही या पुस्तकात नाही. किंबहुना यातील एकही या पुस्तकाचा विषय होऊ शकत नाही. हा प्रेषितांच्या *कृत्यांचा* वृत्तांत आहे. प्रेषितांनी वर उल्लेख केलेला एखादा विषय घेतला व त्यावर लिहिले असते तर आता आहे ते हे पुस्तक कधीही लिहून झाले नसते. आपण या पुस्तकाचा पुढील दरवाजा उघडताना आम्हीही या कृत्यांमध्ये गुंगून जावे, सहभागी व्हावे हीच माझी सर्वांसाठी प्रार्थना आहे.

आपण या पुस्तकातील पहिल्याच वचनाकडे, प्रथम सविस्तरपणे पाहू : ''थियफिल महाराज,... येशूने जे जे करावयास व शिकवावयास आरंभिले होते त्या सर्वांविषयी मी पहिला ग्रंथ केला.'' या वचनाची मी प्रथम रूपरेषा देतो. एक म्हणजे येथे *''पहिला ग्रंथ''* असा उल्लेख आहे. मग एका शिष्याचा नावाने उल्लेख आहे (थियफिल महाराज). शेवटी येथे स्पष्टपणे हेतू, उद्देश सांगितला आहे. त्यातून पहिला ग्रंथ लिहिण्याचा उद्देश सांगून नंतर हे सध्याचे पुस्तक लिहिण्याचा उद्देश सांगितला आहे.

## पहिल्या ग्रंथाचा उल्लेख

येथे उल्लेख केलेल्या पहिल्या ग्रंथाचा आपण विचार करू. जे. बी. फिलिप्स यांच्या अनुवादात ''माझे पहिले पुस्तक'' असे आहे. पवित्र शास्त्राच्या विस्तारित अनुवादामध्ये ''मी तयार केलेला, लिहिलेला पूर्वीचा वृत्तांत'' असे आहे. हा पहिला ग्रंथ म्हणजे लूककृत शुभवर्तमान आहे हे सांगणे नकोच. नव्या करारामध्ये एकूण चार शुभवर्तमाने आहेत. लूककृत शुभवर्तमान त्यातील एक आहे. ते आपल्या पवित्र शास्त्रात असून त्याचे एकूण २४ अध्याय आहेत. येशू ख्रिस्त या व्यक्तीच्या संबंधातील दहा ऐतिहासिक घटनांभोवती साधारणपणे या शुभवर्तमानाची रचना





केली आहे. या घटना अशा : कुमारीच्या उदरी येशूचा जन्म, त्याचे पापरहित, निष्कलंक जीवन, आचरण, त्याचा बाप्तिस्मा, त्याची मोहपरीक्षा, त्याचे रूपांतर, गेथसेमेनी बागेमध्ये त्याचे मानसिक द्वंद्व, त्याचे वधस्तंभावरचे मरण, त्याचे उत्तरकार्य - पुरले जाणे, त्याचे पुनरुत्थान आणि त्याचे स्वर्गारोहण.

हे सर्व किती महत्त्वाचे, किती लक्षणीय आहे ते समजण्यासाठी येशूविषयीच्या या ऐतिहासिक गोष्टींपैकी कुमारीच्या उदरी त्याचा जन्म या पहिल्या गोष्टीकडे लक्ष द्या. परत एकदा लक्षात घ्या. लूक वैद्य - औषधोपचार करणारा होता. डॉक्टर, वैद्य सहसा कुमारीच्या उदरी जन्म यावर विश्वास ठेवीत नाहीत. पण संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये डॉ. लूक ह्यानेच येशूचा कुमारीच्या उदरी जन्म अगदी तपशीलवार सविस्तरपणे सांगितला आहे. त्याने आपल्या शुभवर्तमानाच्या पहिल्याच अध्यायात येशूविषयीची ऐतिहासिक वस्तुस्थिती मुळापासून नीट शोध करून लिहिली आहे. त्याच्या लेखनाला याच संशोधनाचा आधार आहे. येशू ख्रिस्ताच्या वृत्तान्ताची सत्यता व अधिकृत अस्सलपणा प्रमाणाने दाखवणारा आणखी एक थोर पुरावा येथे आपल्यासमोर आहे.

## लूक कोण होता? या वृत्तांतामध्ये तो कसा आला?

लूक कोण होता? शुभवर्तमानाच्या वृत्तांतामध्ये त्याचा प्रवेश कसा झाला? तो एक परराष्ट्रीय मनुष्य होता हे त्याच्या नावावरून स्पष्ट होते. तो औषधे देणारा डॉक्टर होता. कलस्सै.४:१४ मध्ये ''प्रिय वैद्य लूक'' हा त्याचाच उल्लेख आहे. केव्हा केव्हा आपणाला वाटते, त्या फार फार पूर्वीच्या जगात एकंदरीत सर्वच मागासलेले होते, बहुतेक निरक्षर, अडाणी होते आणि आज आम्हांला जेवढे ज्ञान आहे तेवढे त्या काळी निश्चित नव्हते. पण प्रत्यक्षात असे क्वचितच कोठे असेल! इतिहासकार आणि वैद्य या दोन्हीच्या संदर्भात अनेकवार आक्षेप घेऊन लूकाच्या वृत्तांतातील उणिवांवर बोटे ठेवली आहेत. पण या ऐरणीवर (लूक आणि त्याचे लेख) अनेकांचे (त्याचे टीकाकार, आक्षेपक) हातोडे आणि घण फुटून पडले आहेत. खरे पाहता लूकाचे लेख प्रत्येक आक्षेपाच्या कसोटीवर उतरले आहेत. इतिहास व वैद्यकशास्त्र या दोहोंच्या संबंधात समर्थन लूकाचेच झाले आहे.

इतिहासकार लूक आणि वैद्य लूक हे त्याच्या व्यक्तित्वाचे दोन पैलू, दोन भाग उलगडून दाखवणारे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. उदाहरणार्थ, डॉ. होबार्ट ह्यांनी द ***मेडिकल लँग्वेज ऑफ लूक*** या नावाचा एक उत्तम ग्रंथ लिहिला आहे. या पुस्तकात लूकचे ज्ञान, सूक्ष्म ग्रहणशक्ती व त्याच्या या दोन्ही पुस्तकामध्ये वैद्यकीय परिभाषेचा तंत्रशुद्ध उपयोग याबद्दल त्याची प्रशंसा केली आहे. विज्ञानशास्त्रे वस्तुनिष्ठ संशोधन करतात तेव्हा अखेर त्यांना पवित्र शास्त्राचे प्रत्यंतर येतेच.

पण हा वैद्य सुवार्ताप्रसारकार्यात सहभागी कसा झाला? त्याने दोन पुस्तके लिहिली ती आपल्या नव्या करारामध्ये आहेत हे कसे झाले? यासाठी आपण क्षणभर इतिहास, दिव्यदृष्टांत प्रकटीकरण आणि बुद्धीविचार एकत्र करू या. पौल दुसऱ्या सुवार्ताप्रसारफेरीवर असताना तो व सीला दोघेही गलतीया प्रांतात आले (प्रे.कृ.१६:६). येथे असतानाच पौलाच्या डोळ्यांना काही अतिशय गंभीर रोग झाला (अगर पूर्वीचा दृष्टिदोष आता जबर बळावला - अचानक नजर कमी झाली). पुढे गलतियातील मंडळ्यांना लिहिलेल्या पत्रात पौल म्हणतो, ''पाहा, मी आपल्या हाताने केवढ्या मोठ्या अक्षरांनी तुम्हांस लिहीत आहे'' (गलती.६:११). गुडस्पीड ह्यांच्या अनुवादात ''मी किती मोठे अक्षर काढले आहे पाहा,'' नॉक्सच्या अनुवादात ''ही पाहा किती मोठी अक्षरे!'' असे आहे, तर न्यू इंग्लीश बायबलमध्ये ''ही मोठाली अक्षरे पाहात आहात ना?'' असे आहे. चर्मपत्रावर लेखणीने लिहिण्यास पौलाला कमी दिसत असल्याने पुष्कळ कष्ट होत होते. नेहमीप्रमाणे लिहिता येत नव्हते, म्हणूनच त्याने मोठी अक्षरे काढली! त्याचे डोळे तेव्हा अधू झाले होते.

पौलाने गलतीकरांना सांगितले आहे, ''तुम्हांला सुवार्ता सांगण्याचा पहिला प्रसंग मला माझ्या शारीरिक व्याधीमुळे मिळाला हे तुम्हांला ठाऊक आहे; आणि तुमची परीक्षा होण्याइतके माझ्या प्रकृतीत जे होते त्याचा तुम्ही धिक्कार अथवा कंटाळा केला नाही, तर देवाच्या दूतासारखा, ख्रिस्त येशूसारखा माझा स्वीकार केला, तेव्हाची तुमची ती धन्यता कोठे? *मी तुम्हाविषयी साक्ष देतो की, शक्य असते तर तुम्ही आपले डोळे उपटून ते मला दिले असते''* (गलती.४:१३-१५). देवाने पौलाची ही गंभीर व्याधी बरी केली नाही हे लक्षात घ्या. आपल्या या प्रेषिताला





आरोग्य देण्याबरोबरच आणखीही काही उत्तम व हितकर साधावे हीच देवाची योजना होती. पौलाच्या या आजाराच्या द्वारे तो आपला एक प्रमुख प्रवक्ता नेमणार होता.

पौल आपल्या सहकाऱ्यांसह आशिया मायनर प्रांतातून आग्नेयेपासून वायव्येकडे गेला. मग ते त्रोवस येथे आले. एजिअन समुद्राच्या उत्तर बाजूचे त्रोवस हे समुद्रकाठचे एक बंदरगाव होते. येथे पौलाला नीटशी झोप लागत नसावी. कारण येथेच रात्री त्याला दृष्टान्त झाला. ''मासेदोनियाचा कोणीएक माणूस उभा राहून आपल्याला विनंती करीत आहे की, इकडे मासेदोनियात येऊन आम्हांला साहाय्य कर'' (प्रे.कृ.१६:८,९). दक्षिण युरोप खंडामध्ये अशा प्रकारे सुवार्ताप्रसार सुरू झाला.

पौल त्रोवस येथे काय करावे अशा विचारात गढून वाट पाहत असताना डोळ्यावर उपचार करून घ्यावे या विचाराने त्याने कोणी डॉक्टर आहे का अशी विचारणा केली असणार. काही विद्वान अभ्यासकांचे म्हणणे आहे की, पौल व लूक यांची पूर्वापासून ओळख होती. कारण त्या काळातील प्रसिद्ध वैद्यक पाठशाळा तार्सस येथे होती आणि तार्सस हेच पौलाचे जन्मगाव होते. दुसरे काही म्हणतात की पौलाने तेथे कोणी चांगला डॉक्टर आहे का अशी चौकशी केली. तेव्हा लोकांनी त्याला लूकचे नाव सांगितले असणार. (लूक हुशार, प्रसिद्ध डॉक्टर होता. ते कसेही घडलेले असो, पौलाने लूकची भेट घेतली, त्याच्याकडून आपल्या व्याधीवर उपचार घेतले अशी माझी पक्की खात्री आहे).

तेथे असताना पौलाने नेहमीप्रमाणे या हुशार विदेशी डॉक्टरला ख्रिस्ताची सुवार्ता सांगितली. देवाने लूकच्या अंतरात्म्यात प्रकाश प्रकट केला. डॉ. लूकने ख्रिस्तावर विश्वास ठेवला, तो ख्रिस्ती झाला. आपल्या पापांबद्दल त्याची पुरती खातरजमा झाली. तो तारणाऱ्याकडे वळला, त्याचे परिवर्तन झाले. पौलाने लगेच त्याला शिष्यत्वाचे शिक्षण देणे सुरू केले. पण त्याच्याकडे फारच कमी वेळ होता.

पौल आणि सीला यांना ''कामगिरीवर'' पाठवले होते. त्यांचे कार्यध्येय नेमलेले होते. त्यांचा प्रवासाचा मार्ग आणि कार्यक्रम वेळापत्रक वगैरे सर्व पवित्र आत्मा ठरवीत असे. पौलाने हळूच लूकला म्हटले, ''माझ्या बंधो, आता आम्हांला गेले

पाहिजे.'' त्यावर लूक बहुधा बोलला असेल, ''जायचे? गेले पाहिजे? तुम्ही आताच तर आला आहात. आताच तर तुम्ही मला नवा महान, अनन्य अनुभव दिला, येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालचे जीवन मी अनुभवले आणि आता लगेचच तुम्ही निघालात. हे कसे होईल?''

पण पौलाने जाण्याचा आग्रह धरला; मग लूकाने एकंदर परिस्थितीचा थोडा वेळ विचार केला आणि म्हटले, ''पौलभाऊ, तुमच्या सुवार्तासेवेमध्ये या प्रवासात आणखी एक प्रवासी आला तर चालेल काय?'' पौलाचा आध्यात्मिक उत्साह शिगेस पोचला. त्याने आनंदाने म्हटले, ''वा! वा! फारच छान. पण तुमच्या वैद्यक व्यवसायाचे काय? तो कोण चालवणार?'' लूकने शांतपणे उत्तर दिले, ''त्यात काही विशेष अडचण नाही. माझा व्यवसाय चांगला आहे. मी त्याची सहज व्यवस्था करीन.'' लूकाचा हा विचार पक्का आहे हे पौलाने ओळखले. त्याने विचारले, ''काय म्हणता? तुम्ही आपला व्यवसाय विकून टाकणार आणि उरलेल्या सर्व प्रवासात आमच्याबरोबर हे नक्की ना? माझा तर विश्वासच बसत नाही.'' लूक म्हणाला, ''पौलभाऊ, तुम्हांला सध्या रोज डॉक्टराची गरज आहे आणि तुम्हांला माझी तशी मला तुमची गरज आहे. होय, मी येतो तुमच्याबरोबर!''

हे सर्व माझ्या कल्पनेचे खेळ आहेत. मी हे सर्व माझ्या मनचे सांगतो आहे असे तुम्हांला वाटते का? पण मी सांगतो, तसे मुळीच नाही. प्रेषितांची कृत्ये अध्याय १६ वचन १० पर्यंत इतिहासकाराने (लूकने) सुवार्तिकांच्या या चमूचा उल्लेख ''ते'' असा केला आहे (प्रे.कृ.१६:८ - त्रोवसाविषयी पाहा), पण १६:१० पासून वृत्तांतनिवेदनात बदल झाला आहे. ''...आम्ही मासेदोनियात जाण्याचा लागलाच विचार केला.'' येथून पुढे प्रेषितांची कृत्येमध्ये ''आम्ही'' असे उल्लेख निवेदनात येतात. प्रेषितांची कृत्ये या पुस्तकाचा लेखक लूक आता त्रोवस येथे पौलाच्या चमूमध्ये सामील झाला.

## भक्तिमय सत्ये

येथे भक्तीविषयक काही महत्त्वाची सत्ये पाहण्यासाठी मी हा वृत्तान्त थोडा लांबवतो. शिष्य करणे ही कधीच एकांगी प्रक्रिया नाही. पौल तीताला शिष्यत्वाचे





धडे देत असताना तीत पौलाचे समाधान करीत आहे (२ करिंथ.७:५-६). पौल आपल्या अनुभवसिद्ध ज्ञानाचा, शहाणपणाचा वारसा तरुण तीमथ्याला देत असताना तरुण तीमथ्य आपला तारुण्यसुलभ ध्येयवाद वयस्कर पौलाला सांगून त्याचे मन उल्हासित करतो आहे. पौल वैद्य लूकाला ख्रिस्ताच्या जीवनाचे धडे शिकवीत असता स्वतः लूक आपले वैद्यकीय ज्ञान व हुशारी ईश्वरविद्यापारंगत पौलाला देत आहे.

ख्रिस्ताची मंडळी म्हणजे ख्रिस्ताचे शरीर हे साम्यअनुमान पौलाला कसे सुचले असेल हा विचार कधी तुमच्या मनात आला आहे का? मानवी दृष्टीने पाहता ही शंका येण्याचे काहीच कारण नाही. लूकने मानवी शरीराच्या अद्‌भुत, आश्चर्यकारक कार्याविषयी पौलाला वरचेवर सांगितलेच असणार यात शंकाच नाही. पौलाच्या आजारावर उपचार करताना त्याने मानवी देहरुपी यंत्राचे तपशीलवार वर्णन केले असेल.

कदाचित लूकने एक दिवस म्हटले असेल, ''पौल भाऊ, तुमच्या हनुवटीच्या खाली तुमच्या शरीरात कितीशी बुद्धी असेल? आणि तुमच्या देहामध्ये डोक्याच्या खालच्या भागात किती शहाणपणा आहे - किती ज्ञान असेल?'' त्यावर पौलाचे उत्तर असेल, ''मी याचा पूर्वी कधी विचार केला नाही. पण काहीच नाही, शून्य हेच तुमच्या प्रश्नाचे उत्तर आहे.'' लूकने म्हटले, ''अगदी बरोबर, पण चेहऱ्यापासून हनुवटीच्या खालच्या भागातील तुमच्या अवयवांना काय करावे, काय करू नये ते कसे समजते? कारण या सर्वच भागांना बुद्धी नाही, त्यांच्यामध्ये ज्ञान नाही.'' याचे उत्तर हेच की, ''हाही देहातील आणखी एक चमत्कार आहे.''

''पाहा, तुमच्या शरीरामध्ये ज्ञानतंतुंचे एक जाळे आहे. ते सुरचित आहे. तुमच्या शरीरातील अवयवांचा संपर्क या ज्ञानतंतूंच्या द्वारे मेंदूबरोबर होतो. कारण शरीरभर पसरलेल्या या तंतुजालाचा उगम तुमच्या मेंदूपासूनच आहे. मेंदूपासून शरीरातील अवयवांपर्यंत जाणारे ज्ञानतंतू मध्यवर्ती केंद्रापासून मेंदूत दिलेले आदेश अवयवापर्यंत पोचवत असतात आणि त्या त्या अवयवांपासून मध्यवर्ती केंद्रापर्यंत जाणारे ज्ञानतंतू अवयवातील संदेश मेंदूकडे पोचवतात. म्हणजे अवयवांकडे जाणारे व तेथून येणारे असे ज्ञानतंतूंचे दोन संच असतात. या तंतुजालातून मेंदू अवयवांना

आदेश देतो. शरीर निकोप असेल तर ते ते अवयव ताबडतोब आज्ञापालन करतात व तसे मेंदूला कळवतात : ''आदेशाचे पालन केले. हा पाहा मी माझा उजवा हात पुढे केला आहे. हाताचा पंजा वर करून बोटेही पसरलेली आहेत आणि मी जोपर्यंत दुसरे काही करण्यास सांगत नाही, तोवर हा हात असाच राहील कारण माझे मन व माझा हात यांच्यातील ज्ञानतंतू - संपर्क निकोप व कार्यक्षम आहे.''

लूक हे सर्व बोलत असताना पौलाच्या मनामध्ये पवित्र आत्मा जोरदारपणे कार्य करीत आहे. अचानक पौल बोलतो, ''अरे, मंडळीचे कार्यही नेमके असेच चालते. तुमचे शरीर तुमचे म्हणणे स्पष्ट करण्याचे साधन आहे तसे मंडळीही ख्रिस्ताचे शरीर आहे. त्याची स्वतःची इच्छा व्यक्त करण्याचे साधन आहे.'' आणि पवित्र आत्मा मंडळी ख्रिस्ताचे शरीर आहे हा सिद्धान्त ईश्वरविद्या पारंगत पौलाला स्पष्ट करून दाखवीत आहे; त्याची सुरूवात पहिला वैद्यकीय सुवार्तिक मिशनरी लूक ह्याजपासून झाली.

यानंतर बऱ्याच काळाने लूक या विदेशीय वैद्याने दोन अद्‌भुत पुस्तके लिहिली त्यांचा समावेश आपल्या नव्या करारामध्ये झाला आहे. थोर ख्रिस्ती मुत्सद्दी पौल ह्याने स्वतः व्यक्तिशः लूकाला शिष्यत्वाचे धडे दिले होते. हे कसे काय घडले? आणि महान कामगिरीच्याद्वारे शिष्य करण्याची जी आज्ञा दिली आहे त्याविषयी यातून काय समजते?

आता हे अगदी भरीव सत्य पाहा. नव्या करारामध्ये एकूण २७ पुस्तके आहेत, त्यातील फक्त दोनच लूकने लिहिली आहेत. तरी ही दोन पुस्तके नव्या कराराच्या सुमारे पाव हिस्सा एवढी आहेत. ही पुस्तके का बरे लिहिली? आपली ही दोन्ही पुस्तके कधी काळी पवित्र शास्त्रात जोडली जातील याची डॉ.लूकला तेव्हा कल्पना तरी होती का? नव्या करारात यांचा समावेश होईल असे त्याला वाटले असेल का? मुळीच नाही. कारण 'नवा करार' हा ग्रंथ पुढे प्रसिद्ध होणार आहे हेही त्याला ठाऊक नव्हते. मग त्याने ही दोन पुस्तके - हे दोन नवलपूर्ण लेख कशासाठी लिहिले?





## हा शिष्य कोण?

### नव्या कराराचा एक चतुर्थांश भाग एकाच व्यक्तीसाठी लिहिला आहे

दुसरा मुद्दा : हे दोन लेख ज्याच्यासाठी, ज्याला उद्देशून लिहिले आहेत त्याचा विचार करू या. या शिष्याचे नाव आहे 'थियफिल.' आपणाला हे नाव चमत्कारीक वाटते. तसे पाहता नावे तर अनेकदा आम्हांला चित्रविचित्र, चमत्कारिक वाटतात. एकदा एका लहान मुलाला विचारले, ''बाळ, तुझं नाव काय?'' तो बोलला, ''६ आणि ७.'' त्याच्या शिक्षकाने आश्चर्याने विचारले, ''म्हणजे काय? तुला हे नाव कोणी ठेवले?'' तो उत्तरला, ''माझ्या बाबांनी ते त्यांच्या टोपीतून काढले.'' दुसऱ्या एका शिक्षकाने एका हसतमुख पण खोडकर मुलाला त्याचे नाव विचारले. तो म्हणाला, ''माझं नाव जॉनी नाही.'' अमेरिकेतील इंडिअन आदिवासींचा एक प्रमुख जवळच्याच गावात गेला. तेथे न्यायाधीशांना भेटला व त्यांना म्हणाला, ''मला माझं नाव बदलायचंय!'' न्यायाधीशाने विचारले, ''तुझं आताचं नाव काय आहे?'' तो प्रमुख बोलला, ''आगगाडीची कर्कश शिटी वाजवणारा प्रमुख.'' ''ठीक मग आता कोणतं नाव हवंय?'' तो बोलला, ''टूटूस'' (हा तुतारीचा ध्वनी आहे.)

एका कुटुंबात नवे बाळ जन्मले. नव्या बाळाचे नाव काय ठेवायचे ह्याचा त्यांनी बरेच दिवस कर कर विचार केला आणि त्यांना आवडलेले आकर्षक नाव निवडले. त्यांनी त्याला 'थियफिल' हे चमत्कारीक नाव दिले. एका मित्राने त्यांना विचारले, ''काय हो, अगोदर तुम्ही चांगले आकर्षक नाव निवडले होते ना? मग आता हे असले नाव का ठेवले?'' मुलाच्या बापाने कुत्सितपणे म्हटले, ''जन्मताच हे बाळ असे काही विचित्र दिसत होते की, हेच नाव त्याला योग्य आहे असे आम्हांला वाटले.''

या माणसाचे नाव ग्रीक भाषेतील असून त्याचा अर्थ 'देवावर प्रीती करणारा' किंवा 'देवाला प्रिय' असा आहे. यावरून काही भाष्यकार म्हणतात ही काही कोणी एक व्यक्ती नाही तर हा लोकांचा एक वर्ग, एक समूह आहे. देवभक्तांना हे सामूहिक नाव दिले आहे. पण असे मुळीच नाही. लूककृत शुभवर्तमानाच्या पहिल्याच

अध्यायात या व्यक्तीचे नीट वर्णन दिले आहे. त्यावरून हे स्पष्टच होते.

लूककृत शुभवर्तमान आणि प्रेषितांचे कृत्ये *एकाच लेखकाने एकाच व्यक्तीसाठी एकाच विषयावर* लिहिलेली आहेत.

आता आपले दुसरे सुस्पष्ट, महान सत्य पाहा, नव्या कारारतील चौथा हिस्सा एकाच व्यक्तीला उद्देशून लिहिला आहे. येथे ख्रिस्ताच्या सुवार्तेचा अगदी ठळक आविष्कार प्रत्ययास येतो. ख्रिस्ताची सुवार्ता प्रत्येक व्यक्तीचे मूल्य, पवित्र शास्त्रातील सुवार्तासंदेशापासून, त्याचा आदर्श व प्रभाव यांच्यापासून आपण किती ढळलो आहोत ते पाहायचे असेल तर स्वतःला हा प्रश्न विचारा : एखाद्या व्यक्तीला ख्रिस्ताची सुवार्ता सांगून तिला ख्रिस्ताकडे आणण्यासाठी अलीकडेच कोणी तरी सविस्तर - लहान मोठा लेख लिहून त्या व्यक्तीकडे पाठवल्याचे तुम्ही ऐकले आहे काय?

*स्वच्छ सूर्यप्रकाश पडला असेल,आकाश निरभ्र असेल तेव्हा एक चांगले बृहद्दर्शक भिंग घ्या. काही जुने रद्दी पेपर घ्या आणि बाहेर जाऊन हा प्रयोग करा. त्या वर्तमानपत्रांची काही पाने घ्या. त्यांचा चुरगाळा करा आणि त्यांच्यावर त्या भिंगामधून सूर्याचे किरण पाडा. तुम्ही सूर्यकिरणाची शक्ती वाढवून मोठी करीत असला तरी तुमच्या या प्रयत्नातून विस्तव पेटणार नाही कारण तुम्ही ते भिंग सतत इकडे तिकडे हालवत आहात. पण ते भिंग तुम्ही कागदांच्या त्या बोळ्यावर एका जागी स्थिर ठेवलेत तर सूर्यकिरणांची शक्ती, ऊर्जा एकवटून त्या भिंगामधून कागदाच्या बोळ्यावर एकाच ठिकाणी पडेल. तुम्ही सूर्याची शक्ती नियंत्रित कराल आणि त्यातून विस्तव पेट घेईल. आणि मग ती आजूबाजूच्या सर्वच ज्वालाग्राही पदार्थांना आपल्या कह्यात घेईल. आमच्या या विवेचनामध्ये येशू सूर्य आहे. लूक हा ते बृहद्दर्श भिंग आहे. थियफिल हे व्यक्तिवाचक केंद्र आहे, त्यावरच सर्वकाही केंद्रित केले आहे, आणि हा विस्तव अद्याप पेटलेला आहे.*

## लूकाने हे दोन्ही लेख एकाच व्यक्तीला उद्देशून का लिहिले?

आता आपल्या पूर्वीच्या प्रश्नाकडे वळू या. लूकाने हे दोन्ही लेख, ही दोन्ही पुस्तके या एकाच व्यक्तीला उद्देशून का बरे लिहिली? या प्रश्नाचे उत्तर आपणाला मिळू शकेल का? होय, निश्चित मिळेल.





लूकाने थियफिलला उद्देशून आपले शुभवर्तमान लिहिले तेव्हा त्याची स्थिती कशी काय होती? तो हरवलेला, देवाला दुरावलेला, तारण न झालेला पापी होता हे तर स्पष्टच दिसते. लूकने त्याला 'थियफिल महाराज' म्हटले आहे (लूक.१:३). ही ग्रीक अमीर उमरावाची पदवी आहे. म्हणजे 'थियफिल' हा एक ग्रीक उमराव होता. तो उच्च कुलीन, प्रतिष्ठित होता. *संपूर्ण नव्या करारामध्ये कोणाही ख्रिस्ती व्यक्तीला 'महाराज' म्हटलेले नाही.* हा देवापासून हरवलेला, दुरावलेला मनुष्य होता. त्याने सुवार्तासंदेश ऐकला होता (लूक.१:४). परंतु त्याची खात्री पटली नव्हती. ''हेल्लेणी ज्ञानाचा शोध करतात'' (१ करिंथ.१:२२), आणि प्रथमदर्शनी मानवी बुद्धीला न पटणाऱ्या कल्पना - उदा. सुवार्ता त्यांना सहज पटत नाहीत. थियफिललाही प्रथम सुवार्तेचे सत्य सांगण्यात आले तेव्हा त्यानेही नाक मुरडलेच असणार, पण स्वतः लूक हाही विदेशी होता आणि सुवार्तेच्या संबंधात त्यालाही बौद्धिक प्रश्न, शंका होत्याच. परंतु येशू ख्रिस्त आणि त्याची सुवार्ता अस्सल, सत्य व अधिकारयुक्त आहेत अशी त्याची पक्की खात्री झाली होती. तेव्हा येशूविषयीची सत्य वस्तुस्थिती आणि सुवार्ता संदेशाची सत्यता क्रमवार व्यवस्थित मांडून ते सर्व खातरजमा न झालेल्या थियफिलला सांगण्याचे कार्य लूकाने स्वतःकडे घेतले.

ही पुस्तके लूकाने कोणत्या हेतूने लिहिली? या एकाच माणसाला ख्रिस्ताकडे आणायचे एवढाच त्याचा हेतू होता? दीर्घकाळ केलेले सविस्तर संशोधन, करावे लागलेले कष्ट आणि मग मान मोडून केलेले लेखन हे सर्व *एकाच व्यक्तीसाठी* - ''ज्या वचनाचे शिक्षण त्याला देण्यात आले होते त्याचा निश्चितपणा त्याच्या (आपल्या) लक्षात यावा.'' लूकाने लिहिलेल्या शुभवर्तामानाने हा उद्देश साध्य झाला का? होय, झालाच! पण आपल्याला हे कसे समजते? कारण दुसऱ्या लेखाच्या मायन्यामध्ये त्याच्या पदवीचा उल्लेख नाही. त्याला 'थियफिल' असेच म्हटले आहे. (पण मराठी पवित्र शास्त्रात तसे आढळत नाही.) सुवार्ताप्रसाराचे महान कार्य येथे विशिष्ट प्रकारे झाले आहे. एका ग्रीक वैद्याने, हुशार व्यावसायिकाने येशू ख्रिस्ताच्या एकंदर कार्याचे सखोल संशोधन करून एक विश्वाससमर्थनपर शुभवर्तमान एका ग्रीक सरदारासाठी लिहिले. या उमरावाने येशू ख्रिस्ताचा स्वीकार करावा, त्याच्याकडे यावे, तारणप्राप्ती करून घ्यावी हा लूकाचा हेतू होता व तो साध्य झाला.

मग लूकाने हे दुसरे पुस्तक, प्रेषितांची कृत्ये हा लेख का लिहिला? (तुमच्या नव्या करारामध्ये २८ अध्यायांचे आणखी एक पुस्तक). पहिल्या पुस्तकाचे वाचन-अभ्यास यामुळे तो गृहस्थ ख्रिस्ताकडे आला तर मग आणखी एका पुस्तकाची काय गरज होती? मित्रहो, या प्रश्नाचे उत्तर नीट पाहा. कारण त्यातून आधुनिक मंडळीची दुःखद, शोकदायी, पापी घोडचूक उघड होते. एखाद्या व्यक्तीचे तारण होते तेव्हा ख्रिस्ताच्या एकंदर उद्देशाच्या पूर्तीचा केवळ आरंभ होतो. आपल्या सर्व अनुयायांना, नव्याने जन्मलेल्या सर्व विश्वासणाऱ्यांना, जगदृष्टी ठेवून जगावर प्रभाव पाडण्यासाठी शिष्य करण्याच्या महान कार्यात गुंतवावे हाच येशूचा उद्देश आहे. प्रत्येक विश्वासणारा आपणा स्वतःप्रमाणे पुनरुत्पादन दिगंतापर्यंत असणार, हे त्याच्या मनात सदैव असावे. आम्ही त्याने घालून दिलेल्या नमुन्याप्रमाणे कार्य करावे हाच त्याचा हेतू आहे. *एका माणसाच्या द्वारे जनसमुदाय पाहणे आणि जनसमुदायाला प्रस्थापित करण्यासाठी त्या मनुष्याला तयार करणे* याच कारणाने डॉ. लूकने प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक लिहून तरुण थियफिल याला येशूला जग हलवण्याच्या योजनेची सर्वांगीण - संकल्पना व माहिती दिली.

याचा उपयोग झाला का? थियफिल जगदृष्टी घेऊन शिष्य तयार करण्यास, पुनरुत्पादन करणाऱ्यांचा उत्पादक होण्यास पुढे सरसावला का? अर्थात, हे आपल्याला माहीत नाही आणि ते चांगलेच आहे. कारण प्रत्येक विश्वासणाऱ्याला जास्तीत जास्त संधी दिली पाहिजे. *वैयक्तिक संपर्क, वैयक्तिक मार्गदर्शन* आणि *वैयक्तिक कार्यवाही* यांच्याद्वारे त्याला संधी दिलीच पाहिजे.

मग प्रत्यक्षात त्याच्याकडून पुनरुत्पादन होवो अथवा न होवो. शिष्य करा या आज्ञेने थियफिल प्रभावित झाला याचा काही पुरावा आपल्याकडे आहे - आज आपण प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक वाचतो आहोतच. हेच ते प्रमाण! जगातील सर्वांत महान कार्यामध्ये एका व्यक्तीने सहभागी व्हावे यासाठी त्याच्या मनाला वळण लावणे, अंतःकरणाला आवाहन करणे यासाठी लूकाने हे २८ अध्यायांचे दीर्घ पुस्तक लिहिले आहे.

देवाच्या पवित्र आत्म्याने नव्या करारामध्ये हे एक उदाहरण आपल्या समोर ठेवले आहे. व्यक्तीव्यक्तींच्या जीवनाला या प्रकारे वळण लावण्याचे आवाहन केले आहे.





तर मग मीही असेच केले पाहिजे. मीही एका लहान गटाला सातत्याने मार्गदर्शन देऊन माझे जीवन, माझा दृष्टांत त्यांच्या मनावर ठसवला पाहिजे. माझ्या जीवनात सतत महान कामगिरीची ज्वलंत जाणीव ठेवूनच वावरले पाहिजे आणि दुसऱ्यांना शिकवू शकतील अशा विश्वासू माणसांकडे ती जाणीव, तो आदेश व ती ध्येये हे सर्व सोपवले पाहिजे (२ तीमथ्य.२:२).

## वैयक्तिक साक्ष

येथे मी एक वैयक्तिक साक्ष नमूद करतो. गेले पाव शतकभर मी पाहिलेला दृष्टान्त सतत विस्तारत आहे आणि तो स्पष्ट करून सांगावा, इतरांचे सहकार्य मिळवावे यासाठी मी पुष्कळ वेळ खर्च केला आहे. कित्येक व्यक्ती, अनेक लहान गट, पाळक, सुवार्तिक, मिशनरी यांचे अनेक समूह, संपूर्ण मंडळ्या, त्यातील सर्व सभासद ह्यांना हा मापदंड समजावून सांगितला आहे. या कामी मला नेत्रदीपक यश मिळाले आहे. मी ज्यांना हा दृष्टान्त देऊन प्रभावित केले ते लोक आज जगाच्या दूरदूरच्या भागात आहेत. तिकडे ते शिष्य करून त्यांना प्रशिक्षण देत आहेत. तसेच अनेक वेळा या कामी अपयश आले आहे हे सांगताना मला अतिशय दुःख होते (केव्हा काही बाबतीत मीही चुकलो आहे, त्यामुळे पवित्र आत्मा नक्कीच खिन्न झाला असणार). जे शिष्य आपआपल्या सेवाक्षेत्रात गेले तेथे त्यांनी या मापदंडाप्रमाणे कार्य केले, पुनरुत्पादन केले त्यांच्या हकिगतींनी मला पानेच्या पाने भरून लिहिता येईल, आणि हे असेच आहे का नाही ते सहज तपासून पाहता येईल. त्यांच्यातील कित्येकजण पाळक आहेत (आणि आणखी अनेक पाळकांना शिकवून उत्तेजन देण्याची महान संधी मला मिळाली, ते सर्व आज त्यांच्या त्यांच्या सेवेमध्ये उत्तम कार्य करीत आहेत). काही परदेशात सुवार्ता-सेवक, मिशनरी आहेत. बरेचसे 'सामान्य - अदीक्षित सभासद' आहेत. त्यांच्या मनामध्ये दृष्टान्त जागृत आहे. ते राहतात, काम करतात, उपासनेसाठी जातात तेथेच शिष्य करावे यासाठी ते झटून कार्य करीत आहेत. या अजोड, विशेष संधीबद्दल मी देवाचा आभारी आहे आणि ''लोकांना शिष्य करण्याचे कामी'' आज मी पूर्वीपेक्षा अधिक समर्पित आहे, बांधलेला आहे.

## लेखनाचा हेतू स्पष्ट करणारे निवेदन

### येशूने जे जे करावयास व शिकवावयास आरंभ केला ते सर्व

प्रे.कृ.१:१ या वचनाच्या आपल्या रूपरेषेतील अखेरचा भाग पाहू या. पहिला लेख म्हणजेच लूककृत शुभवर्तमान लिहिण्याचा हेतू स्पष्ट करणारे निवेदन. तो लेख येशूने जे जे करावयास व शिकवावयास आरंभ केला त्याविषयी असल्याचे लूक सांगतो. येथे 'करणे,' 'शिकवणे' व 'आरंभ करणे' अशी तीन क्रियापदे आहेत. 'शिकवणे' व 'करणे' या दोन क्रियापदांमधून येशूच्या संपूर्ण सेवाकार्याचे वर्णनात्मक दर्शन होते. दिव्य इच्छेनुसार करणे व शिकवणे यात परिपूर्ण समतोल साधणारा येशू हाच इतिहासात एकमेवाद्वितीय, अनन्य आहे. पण इतर कोणत्याही सेवाकार्यात मग ते संपूर्ण मंडळीचे असो अगर एखाद्या ख्रिस्ती व्यक्तीचे असो, त्यामध्ये काही अंशी असमतोल असतोच असतो.

तुम्हांला माहीत असलेल्या ख्रिस्ती मंडळ्यांचा विचार करा. काही मंडळ्या *'करण्याच्या'* बाजूने अधिक झुकलेल्या असतात. ''तारण प्राप्त करून लगेच कामाला लागा'' हे त्यांचे ब्रीद आहे. कार्यपद्धतीवर, कृती करण्यावर त्यांचा सर्व भर असतो, पण शिकणे, शिकवणे या बाबतीत ते फारच ढिले असतात. कार्याच्या बाबतीत ते अग्रेसर, आघाडीला असतात, पण *सत्य, सिद्धान्त* या बाबतीत पिछाडीला असतात. एका माणसाने त्याच्याच मंडळीचे वर्णन उपरोधाने केले. तो म्हणाला, ''हर्ब भाऊ, आमची मंडळी सुमारे पाच मैल रुंद आणि सुमारे पाच इंच खोल आहे.'' हिरीरीने कार्य केल्याने मंडळीतील सभासदसंख्या सतत वाढत आहे, पण संख्यात्मक वाढीला पूरक अशी आध्यात्मिक खोली नाही, हीच खंत त्याने बोलून दाखवली.

उलटपक्षी काही मंडळ्या *'शिक्षणाच्या'* बाजूला नको तेवढ्या झुकल्या आहेत, तेथे सदस्यांना नेहमीच देवाचे वचन शिकवण्यात येते - पण त्याच्या जोडीला जोरदार कार्य करणाऱ्या सेवा असल्या तरच समतोल साधणार आहे. कारण येथे यथार्थ समतोल नसतो. या मंडळ्यांच्या सभासदांचे अंतःकरण हळूहळू कठीण होते. आत्मसंतुष्टपणाच्या छायेत ते आळसावून स्वस्थ बसतात, दांभिकपणे स्वतः चांगले,





नीतिमान समजू लागतात. या मंडळ्यांमध्ये थोडीशी वाढ होते, सभासदांना जरा बरे वाटते, पण महान कामगिरी हा विषय त्यांच्या कर्यक्रमपत्रिकेवर नाही. दानीएलाने स्वप्नात पाहिलेल्या पुतळ्याच्या डाव्या पायाच्या तिसऱ्या बोटाची ओळख पटण्यासंबंधात वाद घालतील, पण आपल्या जगातील कोट्यवधी लोकांनी अजून सुवार्ता ऐकली नाही त्याकडे ते अजिबात लक्ष देणार नाहीत.

येशूने आपल्या सेवाकार्यात 'करणे व शिकवणे' यात परिपूर्ण समतोल साधला होता आणि आमच्यापैकी प्रत्येकाने आमच्या जीवनात व आम्ही आहोत व सेवा करतो त्या मंडळीत असाच समतोल साधला जावा यासाठी आपण प्रार्थनापूर्वक विनंती केली पाहिजे.

आता आपण प्रे.कृ.१:१ मधील *''आरंभ केला'' - आरंभ करणे* या क्रियापदाचा विचार करू या. लूककृत शुभवर्तमानामध्ये येशूने जे जे करावयास व शिकवावयास आरंभ केला त्याचा वृत्तांत दिला आहे. येशूच्या जीवनातील ज्या ऐतिहासिक घटना प्रसंगांचा उल्लेख केला आहे, तो केवळ आरंभ आहे. आता पहिला ग्रंथ येशूने जे जे करावयास व शिकवावयास आरंभ केला त्याविषयी होता, तर हा ग्रंथ - प्रेषितांची कृत्ये - येशू जे जे करीत व शिकवत आहे त्यासंबंधाने असणार असे म्हणावयास काहीच प्रत्यवाय नाही. पण असे म्हटले तर लगेचच आपल्यापुढे एक प्रश्न उभा राहतो. प्रेषितांची कृत्ये या पुस्तकाच्या पहिल्याच अध्यायात येशू अचानक दृष्टीआड झाला आहे! मग उरलेल्या सत्तावीस अध्यायांतून त्याने करणे व शिकवणे ही कार्ये कशी चालू ठेवली आहेत?

## येशू आता काय करीत आहे?

आपण या प्रश्नाचा विस्ताराने विचार करू या. येशू आता काय करीत आहे? तो आजही या जगामध्ये त्याचा हेतू व उद्देश यांना अनुसरून कार्य करीत आहे व शिक्षण देत आहे. त्याच्या देहधारणेच्या दिवसात, येथे असताना तो जे करत होता, शिकवीत होता ते तसेच आताही करीत आहे. तो आजही या जगामध्ये त्याचा हेतू व उद्देश यांना अनुसरून कार्य करीत आहे व शिक्षण देत आहे. तो स्वदेहाने येथे होता तेव्हा ज्या प्रकारे कार्य करीत होता त्याच प्रकारे तो आजही तसेच कार्य करीत

आहे. तेव्हा त्याची रीत, पद्धत काय होती? आपण त्याला देहधारण म्हणतो. म्हणजे देवाचा शब्द देही झाला आणि त्याने आम्हांमध्ये वस्ती केली. देव आपल्या पुत्राच्या, येशूच्या द्वारे मानवी व्यक्तित्त्वात, आमच्यामध्ये आमच्या पातळीवर आला. तो आमच्यात राहिला, कार्य केले, आणि आम्हांला शिक्षण दिले. आता त्याची पद्धत काय आहे? ती अगदी तशीच आहे, मात्र त्यात काही बदल केले आहेत.

१. *नव्याने जन्मलेल्या सर्व विश्वासणाऱ्यांमध्ये तो वस्ती करतो आणि त्यांच्याद्वारे आपले कार्य करणे व शिकवणे पुढे चालू ठेवतो.*
२. *त्यांच्यापैकी प्रत्येकजण (आम्हीही) पापी आहे. मात्र येशू पापी नव्हता, तो पापरहित होता.*
३. *आमच्यापैकी कोणीही येशू नाही हा गुणात्मक फरक आहे. येशू हा देवाचा एकमेव पुत्र आहे.*

या बदलांसह प्रत्येक विश्वासणारा येशू ख्रिस्ताच्या देहधारणेचा विस्तार असायचा आहे! एखाद्या पापी व्यक्तीचे तारण होते त्याच क्षणी पवित्र आत्म्याची समक्षता व सामर्थ्य यांनी येशू ख्रिस्त त्या व्यक्तीच्या आंतरिक जीवनात करतो. पवित्र आत्मा येशू दुसरे 'स्वत्व' असल्याचे म्हटले आहे. आपण त्याला देहरहित येशू असे व्यापक अर्थाने म्हणजे विश्वासणाऱ्याने येशूचे करणे व शिकवणे सतत पुढे चालू ठेवावे हाच याचा प्राथमिक उद्देश आहे.

## येशूने कोणकोणत्या प्रकारच्या लोकांचा उपयोग केला?

यातून आणखी एक महत्त्वाचा मार्मिक प्रश्न पुढे येतो. स्वर्गारोहणानंतर सुद्धा आपले कार्य करणे व शिकवणे हे पुढे चालू राहण्यासाठी येशूने कोणत्या प्रकारच्या लोकांचा उपयोग केला? 'प्रेषितांची कृत्ये' मध्ये याविषयी काय आढळते? प्रेषितांची कृत्ये या पुस्तकाच्या आरंभीच्या वचनांमध्येच या प्रश्नाचे उत्तर मिळते. ख्रिस्ताच्या आरंभीच्या अनुयायांचे स्वभावदर्शन येथे उत्तम प्रकारे होते. आपण त्याच्या अनुयायांची येथील स्वभावचित्रे पुन्हा पाहू या.





### १. सर्वसामान्य माणसे

पहिली गोष्ट ही की, ती सामान्य माणसे होती. आणि हे नीट समजण्यासाठी शुभवर्तमानांमध्ये त्यांच्याविषयी दिलेल्या माहितीवरून हे स्पष्ट होते. ते समाजातील सामान्यातील सामान्य होते. एकाचा अपवाद वगळता ते सर्वच गालील प्रांतातील होते. तो एक अपवाद ''आढीतला कुजका आंबा'' यहूदा इस्कार्योत हा होता. गालील हा रोमन साम्राज्यामधील एक लहानसा उपेक्षित, दुर्लक्षित प्रांत होता, बहुतेक सर्वच या प्रांताचा तिरस्कार करीत, तरीपण येशूच्या पहिल्या शिष्यांपैकी अकराजण तिथलेच होते. ते सर्वच शून्यवत होते. पण त्यांना येशूने साहसी शूर वीर असे केले. हे पाहून आपल्याला मोठा दिलासा मिळेल, कारण येशू ख्रिस्ताचा हेतू, उद्देश साध्य करण्यासाठी आमच्या अंगी काही विशेष गुणवत्ता असलीच पाहिजे असे नाही. आमचा हा मातीचा देह सर्वस्वी त्याला समर्पित, त्याच्या अधीन असला पाहिजे. एवढे पुरेसे आहे.

### २. निवडलेली माणसे

ही सर्व *निवडलेली माणसे* होती. प्रे.कृ.१:१ पाहा. त्याच्या या पहिल्या शिष्यांना - माणसांना - 'प्रेषित' म्हटले आहे. ''येशूने जे प्रेषित निवडले होते'' असे तेथे आहे. प्रेषित या शब्दाचे मर्म जाणून घ्या. प्रेषित म्हणजे ''काही विशिष्ट कार्य करण्यासाठी पाठवलेला''. येशूला हव्या त्या इष्ट ठिकाणी त्यांनी जावे, त्याने सांगितले तेच सांगावे, करावे, आणि वागावे यासाठी त्यांची निवड करण्यात आली होती, आणि त्याच कार्यासाठी त्याने तुम्हांला आणि मला निवडले आहे. ''निवडले होते'' व. १ मधील हे शब्द पाहा. ग्रीक भाषेतील प्रत्येक क्रियापदावर तीनांपैकी एका प्रयोगात असते (प्रयोग म्हणजे येथे कर्म, क्रिया यांच्यातील संबंध).

हे तीन प्रयोग असे : १) कर्तरी, २) कर्मणी व ३) मध्य-प्रयोग. कर्तरी प्रयोगामध्ये क्रियापदाच्या द्वारे कर्ता कार्य करतो जसे ''मी पुस्तक वाचतो.'' येथे कर्ता 'मी' क्रियापदाच्या द्वारे वाचण्याची क्रिया करतो. कर्मणी प्रयोगामध्ये क्रियापदाच्या द्वारे कर्त्यावर क्रिया होते. जसे ''माझ्याकडून पुस्तक वाचले गेले.'' मध्य-प्रयोगात पहिले दोन्ही प्रयोग एकत्र केले आहेत. म्हणजे कर्ता क्रियापदाच्या

द्वारे कार्य करतो, परंतु कार्याचा परिणाम पुन्हा कर्त्याकडे येतो. ही कृती बूमरँग या हत्यारासारखी आहे. हे हत्यार फेकले की ते इष्ट स्थळी पोचून फेकणाऱ्याकडे पुन्हा माघारी येते. मी एक गोष्ट ऐकली - एका माणसाने एक नवे बूमरँग विकत घेतले. आणि जुने बूमरँग फेकून दिले. पण तेच परत येऊन त्याच्या मस्तकावर आपटले आणि कपाळमोक्ष होऊन तो मेला. बिचारा!!

*''निवडले''* हे क्रियापद मूळ ग्रीकमध्ये मध्य-प्रयोगातील आहे आणि त्यातून एक अतिमहान सत्य पुढे येते. देवाने तुम्हांला निवडले तेव्हा त्याने केवळ तुमचा फायदा व्हावा, आरोग्य, संपत्ती, सौख्य हे तुम्हांला मिळावे म्हणून नव्हे, तर त्याने आपणा स्वतःसाठी तुम्हांला निवडले आहे. देवासाठी तुमचे तारण केले आहे. तुम्ही ख्रिस्तासाठी ख्रिस्ती आहात. स्वतःच्या गरजा भागवणे, स्वतःसाठी सुखसमाधान मिळवणे यासाठी तुम्ही ख्रिस्ती नाही. येशूने जे करावयास व शिकवावयास आरंभ केल होता ते पुढे चालू ठेवण्यासाठी उपयोग व पाठवणी करावी यासाठी तुम्ही ख्रिस्ती आहात.

*मी लहान असताना माझ्या वडिलांनी मला बेसबॉल हा खेळ शिकवला. त्या खेळाविषयी माझ्या मनात प्रेम व आवड उत्पन्न केली. माझ्या वडिलांकडून मला या खेळातील खाचाखोचा समजल्या आणि स्पर्धात्मक खेळ करण्याचे बाळकडू मला माझ्या आईकडून मिळाले. आमच्या शेजारची मुले दर शनिवारी एकत्र जमून आमच्या घराशेजारी असलेल्या बखळीमध्ये बेसबॉल खेळत. मलाही त्यांच्यात खेळायचे असे, पण त्या घरांचे प्रमुख कॅप्टन मला घेत नसत. मला पुष्कळ राग येई. कारण आवड व इच्छा असूनही मला खेळण्याची संधी मिळत नव्हती. असे आठवडेच्या आठवडे गेले. मग एक दिवस मला खेळावयास मिळाले! त्या दिवशी पुरेसे खेळाडू नव्हते, त्यांना माझी निवड करणे भागच होते. ज्या कॅप्टनने मला निवडले त्याला मी आवडलो म्हणून त्याने माझी निवड केली नव्हती. माझी निवड केल्याने त्याच्या संघाला जिंकता आले असते हेच माझ्या निवडीचे कारण होते.*

या उदाहरणाचे प्रयोजन तुमच्या लक्षात आलेच असेल. येशू ख्रिस्त माझ्यावर प्रीती करतो आणि तो प्रीती करीतच राहणार, त्यात खंड पडणार नाही. मी नको म्हटले तरी त्याची प्रीती खुंटणार नाही. मी दिसायला चांगला, गोंडस, मनोहर





आहे, प्रेमळ आहे, म्हणून तो माझ्यावर प्रीती करतो असे नाही. तो स्वतः प्रीती आहे. प्रीती करणे हा त्याचा स्वभाव आहे. त्याची प्रीती अथांग, अमाप आहे. त्याची माझ्यावर प्रीती आहे एवढ्याचसाठी त्याने मला निवडलेले नाही. माझी निवड केल्याने त्याच्या पक्षाला विजय मिळवता येईल असे वाटल्यानेच त्याने मला निवडले आहे! त्याच्या जगातील कार्यध्येयामध्ये माझा सक्रिय सहभाग आहे का? त्यामुळे त्याने माझी निवड केली हे योग्य होते असे प्रत्ययास येते का? किंवा मी 'सीयोनेमध्ये' मजेत आराम करतो आहे? ख्रिस्ताच्या जागतिक कार्यध्येयाकडे मी दुर्लक्ष करतोय का?

हा मजकूर वाचणाऱ्या प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने येथेच क्षणभर थांबावे आणि स्वतःचे परीक्षण करावे. स्वतःला विचारावे : राजांच्या राजाने मला निवडून घेतले आहे! गौरवी, वैभवी प्रभूने स्वतःच्या हातांनी माझी निवड केली आहे. पण ज्यासाठी त्याने मला निवडले तो त्याचा हेतू मी पूर्ण करीत आहे का?

## ३. खातरजमा झालेली माणसे

त्यांची खात्री पटली होती. प्रे.कृ.१:३ : ''मरण सोसल्यानंतरही त्याने त्यांना पुष्कळ प्रमाणांनी आपण जिवंत आहो हे दाखवले. चाळीस दिवसपर्यंत तो त्यांना दर्शन देत असे'' (निस्संदिग्ध पुरावे). येथे 'दर्शन देणे' हे शब्द यथार्थपणे वापरले आहेत. येशूला त्यांनी प्रत्यक्ष स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले (चाळीस दिवस पाहिले) हा भाव त्यातून व्यक्त होतो. त्याचे मरण व पुनरुत्थान झाल्यानंतर त्यांनी पाहिले. नंतर त्यांच्यापैकी एकाने लिहिले, ''...जे आम्ही आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे, जे आम्ही न्याहाळले... त्या जीवनाच्या शब्दाविषयी आम्ही सांगतो'' (१ योहान. १:१).

''दर्शन दिले, पाहिले'' या शब्दांमध्ये मूळ ग्रीक भाषेत एक महत्त्वाची बाब आहे. प्रे.कृ.१:३ मध्ये 'डाया' म्हणजे दरम्यान हे एक अव्यय आहे. त्याचे अचूक भाषांतर करणे कठीण आहे. येशू त्यांना चाळीस दिवसांच्या काळात वेळोवेळी दिसला असा त्याचा अनुवाद यथार्थ होईल. याचा अर्थ असा की, तो सतत प्रेषितांच्या नजरेसमोर नव्हता. चाळीस दिवस व रात्री त्यांना दिसत होता असे नाही. या चाळीस दिवसांमध्ये त्याच्या इच्छेनुसार त्यांना दर्शन देऊन अदृश्य होई

आणि काही वेळाने त्यांना पुन्हा दर्शन देई. तो त्याच्या स्वतःच्या मनाप्रमाणे त्यांना प्रकट होई व अदृश्य होत असे हा क्रम चाळीस दिवस चालू होता. कल्पना करा, मी आणि माझा एक मित्र बोलत आहोत. संभाषण करण्यात अगदी गुंग झालो आहोत. आम्ही एकटक नजरेने परस्परांना पाहत आहोत. आजूबाजूच्या जगाचे आम्हांला अजिबात भान नाही. अशा स्थितीत *अचानक* एखादा मनुष्य आमच्यामध्ये आला तर आमची पाचावर धारण बसेल, थरकाप उडेल याच कारणाने येशूने प्रथम 'भिऊ नका,' 'तुम्हांस शांती असो' असे शब्द उच्चारले. मग मी आणि माझा मित्र आम्ही आमचे पूर्वीचे बोलणे साफ विसरतो. या 'आगंतुक' व्यक्तीकडेच आमचे सर्व लक्ष लागते. आणि कल्पना करा त्याने आमचे लक्ष सर्वस्वी वेधून घेतले असताना अचानक तो अदृश्य झाला, दिसेनासा झाला, आमच्या नजरेआड झाला! जसा दिसला तसा दिसेनासा झाला. येथेही असेच झाले आहे. पुनरुत्थानानंतर चाळीस दिवसांच्या काळात नेमके असेच घडले आहे. येशू ख्रिस्त त्या चाळीस दिवसांमध्ये अधूनमधून दिसत असे व नंतर दिसेनासा होई.

किती आश्चर्यकारक! चमत्कारीक! येशूने असे का बरे केले असेल? प्रत्यक्षपणे उपस्थित असणे अथवा अप्रत्यक्षपणे उपस्थित असणे दोन्ही सारखेच आहे हे शिष्यांनी नीट ओळखावे, समजावे हाच येथे त्याचा हेतू होता. येशू दृश्यपणे बरोबर आहे तसा अदृश्यपणे आहे हेच सत्य शिकवले आहे. आजही हे सत्यच आहे. प्रभू येशू ख्रिस्त पवित्र आत्मा या व्यक्तीमध्ये एवढा सामावलेला आहे की, त्याला वाटले तर तो प्रत्यक्ष देहरूपाने दृश्य होऊ शकतो. पण प्रत्येक विश्वासणाऱ्याने त्याला आपल्या अंतरंगात वसती करू द्यावी. त्याला देहरूप द्यावे हाच त्याचा उद्देश आहे. प्रत्येक विश्वासणाऱ्याने आपले स्वतःचे शरीर 'मंदिर,' 'परमपवित्र स्थान' होण्यासाठी समर्पित करावे कारण त्यातून - या मंदिरातून येशू स्वतःला प्रकट करतो.

त्यांनी - प्रेषितांनी येशूला पाहिले तसे तुम्हीही पाहिलेत तर तुमची पुरी खातरी पटेल असे तुम्हांला वाटते ना? नीट काळजी घ्या, सावध असा, आमच्या अंतरंगामध्ये पवित्र आत्म्याची समक्षता आहे त्याचा लाभ आरंभीच्या विश्वासणाऱ्यांना नव्हे तर आम्हांलाच होतो आहे (योहान.१६:७).





येशूची सत्यता, खरेपणा याविषयी तुमची कितपत खातरजमा झाली आहे? त्याचे सांगणे, म्हणणे यथार्थ, वैध, उचित आहे हे तुम्हांला पटले आहे का? त्याची शक्ती, त्याचा अधिकार, त्याचे सत्य, प्रामाणिकपणा, त्याचे जागतिक उद्देश, सुवार्ताप्रसाराचे उद्दिष्ट या सर्वांविषयी तुमची खात्री झाली आहे का? संशयी, शंकेखोर, खातरी न पटलेले अशा माणसांच्या कडून देवाचे कोणतेही महान कार्य कधीच झालेले नाही. येशूचे व्यक्तित्व आणि उद्दिष्ट पूर्णपणे पाहून समजून आत्मसात करण्यासाठी देवाने पुन्हा नव्याने आमचे नेत्र उघडावेत.

## ४. आज्ञाधारक माणसे

ही माणसे आज्ञाधारक होती. *आज्ञा पाळण्यास* बांधलेली होती. प्रे.कृ.१:१ मध्ये असे आहे : ''येशूने पवित्र आत्म्याच्याद्वारे आज्ञा दिल्या.'' व. ४ पाहा : ''व ते एकत्र जमले असताना त्याने त्यांना आज्ञा केली की, यरुशलेम सोडून जाऊ नका, तर पित्याने देऊ केलेल्या ज्या देणगीविषयी तुम्ही माझ्याकडून ऐकले आहे तिची वाट पाहा.'' पित्याने देऊ केलेली देणगी हा पेंटेकॉस्टच्या दिवसाचा संदर्भ आहे. याच दिवशी पवित्र आत्म्याचे उद्धारक तारणदायी सामर्थ्य पूर्णत्वाने आले. हा दिवस लवकरच येणार होता.

उतावळा, आक्रमक, शिमोन पेत्र या वेळी काय बोलला असेल? त्याची कल्पना करवते का? तो असे म्हणाला असेल : ''येशू, पक्का निश्चय करणार तरी केव्हा? तुम्ही तीन वर्षे आम्हांला तयार केले आहे, जाण्यासाठी सज्ज केले आहे आणि आता आम्हांला थांबायला सांगता. हे कसे?'' पण असा प्रतिवाद कोणीच केला नाही. कोणी चकार शब्दाने आक्षेप घेतला नाही. या वेळेपर्यंत येशूबरोबर उलट वाद करायचा नाही. हे सूत्र प्रेषित शिकले होते. जो अखिल विश्वाचा प्रभू, सार्वभौम सत्ताधारी आहे तो कधीही चुकत नाही, तो सांगतो ते नेहमी बरोबर होते. आजच्या मंडळीनेही असेच सुज्ञ, समंजस असले पाहिजे. मंडळीने दीर्घकाळ प्रार्थना करून पवित्र शास्त्रात शोधून पाहावे आणि फक्त ख्रिस्ताच्या मनोदयाप्रमाणे काम करीत आहोत की नाही त्याची खात्री करून घ्यावी, आणि मग उरलेल्या वेळात सतत त्याचे आज्ञापालन करीत राहावे.

प्राचीन काळी अरब लोकांनी घोड्यांच्या एका खास जातीची पैदास केली होती. त्यांनाच अरबी घोडे म्हणत. आरंभी हे घोडे फक्त राजांसाठीच शिकवून तयार केले जात. या घोड्यांना विशेष प्रकारे प्रशिक्षण दिले जाई. घोड्यांना शिकवणारा प्रशिक्षक चांगला तरबेज असे. या शिक्षकाच्या गळ्यात कातडी वादीमध्ये ओवलेली शिटी असे. प्रशिक्षकाची शिटी ऐकताक्षणी घोड्याने इतर सर्व सोडून सरळ शिक्षकाकडे यायचे असे त्याला शिकवीत. घोड्याने आज्ञा सर्वस्वी पाळावी हीच अपेक्षा होती. घोडा जरा जरी चुकला तरी तो आज्ञाभंग होत असे. मग त्या घोड्याला पाच दिवस खायला देत नसत. तीन दिवस प्यायला पाणी देत नसत. प्रशिक्षणाच्या या कसोटीच्या दिवसात त्याला तबेल्यात कोंडून ठेवीत.

मग शेवटच्या दिवशी तबेल्याच्या बाहेर सुमारे १०० मीटर अंतरावर घोड्याचे खाणे व पाणी ठेवीत. भुकेने व तहानेने व्याकूळ झालेला हा घोडा तबेल्यात पाय आपटीत असे. अन्न ठेवलेल्या दिशेने बाहेर येण्याचा प्रयत्न करीत असे. मग अचानक तबेल्याचे दार उघडले जाई. चकित झालेला घोडा दौडत दौडत खाणे ठेवलेल्या भांड्याकडे धाव घेई. हा घोडा त्या भांड्यापासून १५-२० मीटर अंतरावर असताना शिक्षक शिटी वाजवीत असे. घोडा गोंधळून जाई. आता काय करावे? पुढे जाऊन भांड्यात तोंड घालायचे का निमूटपणे शिक्षकाकडे जायचे? काय करावे? ताबडतोब निर्णय करणे अगत्याचे होते. घोडा सरळ त्या उथळ भांड्याकडे गेला, त्याने आपले पोट भरून घेतले, पाणी पिऊन तहान भागवली, आणि शिक्षकाच्या आज्ञा मोडल्या, तर पुन्हा त्याला पहिले धडे गिरवणे भाग होते किंवा ते शक्य नसल्यास त्याचे शिक्षण बंद करायचे! त्या घोड्याने आपल्या इच्छा, आकांक्षा, वासना दाबून शिक्षकाचे ऐकले, तो ताबडतोब शिक्षकाकडे गेला तर मग त्याला अन्नपाणी घेण्यास जाऊ देत.

मित्रहो, आपल्यासमोरही नेहमी असाच निवडीचा प्रश्न असतो. आत्मसुखाचे क्षणिक समाधान मिळवायचे का प्रशिक्षकाच्या आज्ञांप्रमाणे वागायचे? येशूने या प्रेषितांना आज्ञा केल्या आहेत आणि येशूची आमच्याकडूनही एवढीच अपेक्षा आहे.





## ५. नियंत्रित माणसे

हे लोक *नियंत्रित, अधीन* आहेत. येशूने त्याने पित्याने देऊ केलेल्या देणगीविषयी सांगितले. ही देणगी पवित्र आत्म्याची होती. पेन्टेकॉस्टच्या दिवशी येशूच्या मंडळीला समर्थ, सक्षम करण्यासाठी पवित्र आत्मा येणार असे हे अभिवचन होते.

व. ५ मध्ये सांगितले आहे : ''...पण तुमचा बाप्तिस्मा थोड्या दिवसांनी पवित्र आत्म्याने होईल.'' पवित्र आत्मा म्हणजे देहविरहित येशू असे समजता येईल. या पृथ्वीवर असताना येशू जे करीत होता तेच पवित्र आत्मा करील, तीच उद्दिष्टे साध्य व्हावीत म्हणून कार्य करील आणि त्याच प्रकारचे लोक तयार करील. कार्यासाठी सज्ज करील. येशूने बेबंद दुराग्रही, कडवे लोक तयार केल असते तर पवित्र आत्माही तसेच करील, पण येशूने तसे लोक तयार केले नाहीत. त्याने तयार, कार्यावर निष्ठा असणारे समर्पित असेच लोक तयार केले. कोणत्याही स्थितीत काही झाले तरी येशूचे प्रतिनिधीत्व करतील अशी ती माणसे होती. त्यांनी देवाच्या वचनातील बारकावे अगदी चतुराईने उलगडून दाखवले व ते प्रत्येक प्रसंगाला, घटनेला लागू केले. आणि पेन्टेकॉस्टच्या दिवसापासून आता व पुढेही पवित्र आत्मा आमच्या अंतरंगात राहणारा आमचा थोर मित्र, कैवारी आहे. तो नेहमीच आमच्या बरोबर राहतो, प्रभूच्या कार्यासाठी आम्हांला चालवतो व आम्हांला शक्तीसामर्थ्य देतो. तुम्ही थोर आणि सौम्य, स्नेहाळ पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाला आहात का? तुमच्या अंतरंगावर त्याचेच नियंत्रण आहे ना? तुमचा स्वभाव, तुमचा आचार, विचार आणि उच्चार, तुमचा कार्यक्रम, तुमचे अग्रक्रम हे सर्व त्याच्याच अधीन आहेत ना? त्याने तुमच्या जीवनाला योग्य ते वळण लावावे हे तुम्हांला मान्य आहे का?

### *प्रकरण ५*

# शिष्य करण्यासाठी अतिआवश्यक बाबी
# किंवा
## महान कामगिरी पूर्ण करण्यासाठी डॉक्टरी उपाय

*''ज्या गोष्टींसंबंधाने आपल्यामध्ये पूर्ण खात्री झाली आहे, त्या गोष्टी आरंभापासून प्रत्यक्ष पाहणारे लोक व वचनाचे सेवक ह्यांनी आम्हांस सांगून ठेवलेला वृत्तांत लिहून काढण्याचे काम पुष्कळांनी हाती घेतले आहे; ह्यास्तव, थियफिल महाराज, मलाही वाटते की, सर्व गोष्टींचा मुळापासून नीट शोध केल्यामुळे मी त्या आपल्याला अनुक्रमाने लिहाव्या; ह्यासाठी की, ज्या वचनांचे शिक्षण आपल्याला देण्यात आले आहे, त्यांचा निश्चितपणा आपल्या लक्षात यावा.''*

लूक.१:१-४ (बायबल सोसायटी)

*''(सर्वांना माहीत आहे त्याप्रमाणे) आमच्यामध्ये जी कृत्ये निश्चितपणे करण्यात आली आणि येशूच्या सेवाकार्याच्या अगदी आरंभापासून ज्यांनी ती पाहिली त्यांनी म्हणजेच वचनाच्या सेवकांनी त्याविषयी आम्हांला स्पष्टपणे सांगितले आहे. हे सेवकच ती कृत्ये पाहणारे प्रत्यक्ष साक्षीदार असून (ख्रिस्ताच्या द्वारे देवाच्या राज्यात तारणप्राप्ती व सिद्धान्ततत्त्वे) वचनाचे सेवक आहेत.*

*त्याविषयीचा वृत्तांत क्रमवार सविस्तरपणे लिहून काढण्याचे काम अनेकजण करीत आहेत म्हणून मीही तसाच वृत्तांत लिहून काढावा आणि त्यापूर्वी या वृत्तांतामधील प्रत्येक बारीकसारीक लहानमोठ्या बाबीची सत्यता पडताळून पाहावी, खातरजमा करून घ्यावी आणि माननीय थियफिल महाराज, तो वृत्तांत आपणापुढे सादर करावा असा मी निश्चय केला. तुम्हांला संपूर्ण सत्य समजावे आणि ज्या विश्वासाविषयी तुम्हांला सांगितले आहे व तोंडी माहिती दिली आहे तो सर्व वृत्तांत - इतिहास व विश्वास सिद्धान्त हे सर्व तुम्हांला अचूकपणे समजावे हाच माझा उद्देश आहे.''*

लूक.१:१-४ (विस्तारित भाषांतर)

*मुळात या गोष्टी प्रत्यक्ष पाहणाऱ्या साक्षीदारांनी - जे आता त्या संदेशाचे - सुवार्तेचे सेवक आहेत त्यांनी आम्हांला आमच्यामध्ये घडलेल्या घटनांचा वृत्तांत सांगितला आणि अनेकांनी त्या वस्तुस्थितीचा वृत्तांत क्रमवार लिहून काढण्याचे काम सुरू केले आहे, म्हणून थियफिल महाराज, मीही त्या सर्व गोष्टींचा मुळापासून नीट शोध करून तुमच्यासाठी तो वृत्तांत व्यवस्थित लिहावा असे ठरवले. यामुळे ज्या गोष्टी तुम्हांला शिकवल्या आहेत त्या तशाच आहेत का नाही याची खात्री पटेल.*

लूक.१:१-४ (विल्यम्स भाषांतर)

*''प्रिय थियफिल महाराज,*

*आमच्यामध्ये घडलेल्या घटनांचा वृत्तान्त एकत्र करून क्रमवारीने व्यवस्थित लिहून ठेवण्याचे काम अनेकांनी हाती घेतले आहे. या घटनांविषयी प्रत्यक्ष पाहणाऱ्या साक्षीदारांनी, शुभवर्तमानाच्या सेवकांनी आम्हांला सांगितले आहे. ते पाहून मीही विचार केला की, तुमच्यासाठी एक अचूक व अधिकृत वृत्तांत लिहावा. म्हणूनच मी स्वतः प्रत्येक गोष्टीचा अगदी आरंभापासून बारकाईने व काळजीपूर्वक शोध केला आणि तुम्ही इतरांच्या तोंडून जे ऐकले ते नेमके तसेच आहे हे समजावे, त्याचे अचूक ज्ञान व्हावे या उद्देशाने मी हा लेख लिहिला आहे.''*

लूक.१:१-४ (न्यू इंग्लिश बायबल)





स्तोत्र.११९:१८ मध्ये ही प्रार्थना आहे : ''तू माझे नेत्र उघड, म्हणजे तुझ्या नियमशास्त्रातील अद्‌भुत गोष्टी माझ्या दृष्टीस पडतील.'' हे प्रकरण वाचीत असताना, अभ्यास करताना तुम्ही ही प्रार्थना सतत करावी असे मी आवर्जून सांगतो आहे. स्तोत्र.११९:३० मध्ये असे आहे : ''तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो; त्याने भोळ्यांना ज्ञान प्राप्त होते.'' आपण एकत्र अभ्यास करीत असताना आपणाला हे अनुभवास येवो हीच प्रार्थना!

या अभ्यासाच्या आरंभी आपण पुढील शब्दसाखळीचा विचार करू, या शब्दांवर मननचिंतन करू :

**शब्द ▸ देह ▸ शब्द ▸ देह ▸ शब्द ▸** (येथे तुमचे नाव लिहा) **▸ शब्द ▸ देह.**

या प्रगती साखळीतून ख्रिस्ती विश्वासचळवळीच्या इतिहासामध्ये सुवार्तेची आगेकूच कशी होत गेली ते स्पष्ट होते (रोम.१०:१४). याचा आरंभ शब्द-लोगोस पासून झाला. शब्द देही झाला, त्याने मनुष्यांमध्ये वस्ती केली (योहान.१:१४) आणि त्यानंतर पुढे पडलेले प्रगतीचे प्रत्येक पाऊल, प्रत्येक टप्पा 'शब्द देही होणे' याच सूत्राने साकार झाला आहे. यथावकाश काळाच्या ओघात देवाची कृपा आणि सामर्थ्य यांच्या चमत्काराने त्याचे तारण तुमच्यामध्ये 'देही' झाले, आकारास आले आणि त्याच वेळी या प्रगतीशृंखलेमध्ये तुमच्याही नावाचा समावेश झाला आणि मग तुमचे भवितव्य आणि कार्यक्षेत्र ही दोन्हीही कायमची बदलली गेली! आता येथे एक कळीचा प्रश्न पुढे येतो. आता या साखळीमध्ये तुमचे नाव जोडले आहे तर भूतकाळातून वर्तमानाच्या वाटेने भविष्यकाळाकडे होणारा हा प्रवास ही शृंखला अशीच एक एक दुवा जोडत पुढे वाढत राहील का? अगर तुमच्याबरोबर म्हणजे तुमचे देहावसान होईल तेव्हा ही साखळी तेथेच संपेल का? ही साखळी अशी दिसेल का? देह ▸ शब्द ▸ देह...? पुढे सतत चालू राहावयाची ही साखळी येथेच तुमच्याबरोबरच खुंटणार का?

हा प्रश्न पुन्हा नीट पाहा. ही साखळी भविष्यकाळात अशीच पुढे चालू राहील काय? तुमच्या हयातीत तुम्ही तुमची जबाबदारी नीट सांभाळली का नाही? ही साखळी भावी काळात अशीच एकही दुवा न तुटता अखंडित चालू राहायची तर

तुम्ही तुमची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. तुमचे कार्यध्येय समजून ते पूर्ण करण्यास झटले पाहिजे. हे कार्य कोणते ते देवाच्या वचनामध्ये नेमून दिलेच आहे. तुम्ही आणखी एका व्यक्तीला ख्रिस्ताकडे आणले व पुढे काहीच केले नाही तर तुम्ही आणलेली ती व्यक्ती या साखळीतील अखेरचा दुवा ठरेल व साखळी तेथेच संपेल. परंतु तुम्ही एखाद्या व्यक्तीला ख्रिस्ताकडे आणलेत त्याला नीट प्रशिक्षण दिलेत आणि जगदृष्टीचा मापदंड समोर ठेवून बहुगुणन व्हावयाच्या शिष्यत्वाची जाणीव त्याला करून दिली नाहीत तर त्यातून पुढे जगावर काही प्रभाव पडणार नाही, तुम्ही त्या व्यक्तीला एक चांगला ख्रिस्ती केले एवढेच होईल आणि ही प्रगतीसाखळी तेथेच खुंटेल. परंतु पवित्र शास्त्रात दाखवलेल्या मानदंडानुसार तुम्ही एखाद्याला ख्रिस्ताकडे आणल्यावर नीट शिक्षण द्याल तर ही साखळी अखंड राहील याची देवाने हमी दिली आहे आणि तुम्ही स्वतः पुढील अनेक पिढ्यांसाठी योग्य पाया घालून त्या साखळीचे सातत्य राहण्याची हमी द्याल.

लूककृत शुभवर्तमान एका विदेशीय लेखकाने लिहिले आहे. संपूर्ण पवित्र शास्त्रात लूक हा एकमेव विदेशी लेखक आहे. हे शुभवर्तमान अत्यंत महत्त्वाचे आहे. ते जगावर प्रभाव पाडतील असे शिष्य तयार करण्यास प्रेरणा देणारे आहे. नव्या करारातील सुवार्तेच्या प्रगतीचा मापदंड येथे दाखवला आहे. जगाला प्रभावित करणारे शिष्य तयार करणे व त्यांना व्यापक जगदृष्टी देणे हेच सुवार्तेच्या प्रगतीचे गमक असल्याचे येथे स्पष्टपणे दिसते. एक गोष्ट लक्षात ठेवा : लूक हा काही प्रेषित नव्हता. उपदेशक नव्हता, सुवार्ताप्रसारक नव्हता अगर दिक्षित सेवक सुद्धा नव्हता, तर तो कोण होता? पाहा, लूक हा परराष्ट्रीय होता, वैज्ञानिक, वैद्य डॉक्टर होता आणि हौशी इतिहासकारही होता. पवित्र आत्म्याच्या प्रेरणेमुळे त्याने लिहिलेला इतिहास अचूक, निरपवाद आहे. ''हौशी'' हा शब्द नीट लक्षात घ्या. हा शब्द इतिहासकार लूकला चांगला शोभणारा आहे. हौशी म्हणजे एखादी गोष्ट मनापासून आवडते म्हणून ती करणारा. शब्द ▸ देह ▸ शब्द या नव्या करारामधील मापदंडाचे डॉ. लूक हे बिनतोड, सर्वांत महान उदाहरण आहे. लूकाने लिहिलेल्या शुभवर्तमानातील पहिली चार वचने या संपूर्ण पुस्तकाची, लेखाची प्रस्तावना आहे आणि त्याची शब्दरचना व्याकरणदृष्ट्या पाहता संपूर्ण पुस्तक अथवा लेख लिहून





झाल्यावर हा परिचय लिहिला असे वाटते. पवित्र शास्त्रामधील शिष्य करण्याचे एक सर्वात मोठे, आदर्श उदाहरण या वचनांमधून आपणाला दिसते.

या वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावनेमध्ये डॉ. लूकने जगदृष्टी ठेवून जगावर प्रभाव पाडणारे, बहुगुणन करणारे शिष्य तयार करण्याविषयीची चार आवश्यक सूत्रे सांगितली आहेत. देवाच्या महान दृष्टांताच्या सत्यतेचा अनुभव स्वतःसाठी, आपल्या पिढीसाठी व भावी पिढ्यांसाठी घेऊ इच्छिणाऱ्या कोणाही शिष्याने ही चारही सूत्रे प्रथम आपल्या जीवनामध्ये आत्मसात करून नंतर देवाने त्याच्याकडे आणलेल्या प्रत्येक शिष्याच्या जीवनात ती ठसवली पाहिजेत.

डॉ. लूकने थियफिलची जडणघडण करण्याची जबाबदारी व्यक्तिशः स्वीकारली. त्याने थियफिलच्या वतीने परिश्रमपूर्वक संशोधन केले. थियफिलच्या वतीने त्याच्याचसाठी अचूक *साधनसामग्री* जमवून त्याला सेवेसाठी सज्ज केले आणि शेवटी थियफिलच्या द्वारे आणखी दुसरे जगदृष्टी असणारे, जगावर प्रभाव पाडणारे, बहुगुणन करणारे शिष्य तयार करावेत, सातत्याने उत्पादन चालू राहावे यासाठी माणसाला शक्य ते सर्व त्याने केले. आता या परिच्छेतील हे शेवटचे वाक्य काळजीपूर्वक वाचा, त्यावर सविस्तर विचार करा : ''जे मी बोलतो ते समजून घे; कारण प्रभु तुला सर्व गोष्टी समजून देईल'' (२ तीमथ्य.२:७).

## वैयक्तिक जबाबदारी

नव्या करारातील मापदंडानुसार चालायचे तर *लोकांची जडणघडण करून त्यांना नव्या करारातील शिष्यत्त्वाचे शिक्षण देण्यासाठी तुम्ही प्रथम त्यांची वैयक्तिक जबाबदारी घेतली पाहिजे.*

येशूचे जीवन आणि सेवाकार्य यांचा वृत्तांत लिहिण्याचे काम अनेकांनी स्वतः घेतले आहे, हा उल्लेख करून लूकने त्यांच्या प्रयत्नांची दखल घेतली आहे. येशूच्या चरित्राचा वृत्तांत प्रसिद्ध करण्यासाठी इतरांनी पुष्कळ श्रम केले, कसून काम केले तरीपण लूक म्हणाला, ''मलाही हे करणे चांगले वाटले...'' पवित्र आत्मा लूकाच्या द्वारे महान कार्य करीत होता. त्याची लूकला कल्पनाही नव्हती, लूकच्या समोर थियफिल हा एकच मनुष्य होता. *पण देवाच्या नजरेसमोर अनेक पिढ्या*

*होत्या, त्यात आमचाही समावेश होता.* लूकने एका माणसाला उद्देशून एक पुस्तक, एक लेख लिहिला. देवाने अनेक पिढ्यांसाठी अद्‌भुत शुभवर्तमान तयार केले. ते सर्व भावी पिढ्यांना उपयोगी पडत आहे! आमच्या नजरेसमोर फक्त एकच शिष्य असेल, पण या शिष्याच्या प्रभावाने, कार्याने ख्रिस्ताकडे येणारे शिष्यांचे समुदाय देवाला दिसत असतात.

पण या दिव्य संकल्पनेकडे माणसाचे अगदी सहजपणे नकळत दुर्लक्ष होते, ही मोठी खेदाची गोष्ट आहे आणि ख्रिस्ती मंडळीच्या इतिहासातून याचे प्रमाण पटते. *तुम्ही शिष्य करीत नाही म्हणजेच येशूने घालून दिलेला आदर्श, मापदंड तुम्हांला मान्य नाही. एवढेच नव्हे तर तुम्ही येशूची अवज्ञा करता, त्याची आज्ञा पाळत नाही. तुम्ही तुमच्याकडे आलेल्या शिष्याची जडणघडण करताना त्याला व्यापक जगदृष्टी दिली नाहीत. जगावर प्रभाव पाडण्याइतपत त्याची तयारी केली नाहीत, त्यानेही बहुगुणन करणारा शिष्य व्हावे अशी ऊर्मी त्याच्या मनात जाणवली नाहीत तर तुम्हांला येशूचा मापदंड मान्य नाही आणि तुम्ही तो अनुसरतही नाही, हेच स्पष्ट होते. मग तुमचे जीवन देवाच्या कितीही सान्निध्यात असो.* सुवार्तेचा प्रत्यय येणे हे देवाबरोबर एकमत होण्यावरच अवलंबून असते (रोम.१०:९; मत्तय.१०:३२). येथे ‘पत्कारणे’, ‘कबूल करणे’ म्हणजे सहमत होणे. प्रथम आम्ही देवाच्या मापदंडाला, कसोटीला उतरणारे नाही हे सुवार्ता आमच्या लक्षात आणून देते. याही बाबतीत आम्ही देवाशी सहमत असले पाहिजे. मग येशूने आपला पुत्र येशू याजविषयी जे सांगितले आहे ते मान्य करण्यास पवित्र आत्मा आम्हांला प्रवृत्त करतो आणि त्यानंतर पुढे सर्वकाळ आमचे संपूर्ण जीवन देवाच्या इच्छेला व सांगण्याला मान्य असले पाहिजे. आपण शिष्य करण्याविषयीची त्याची आज्ञा व मापदंड तपासून, पारखून पाहिला तर एखाद्या ख्रिस्ती व्यक्तीने लोकांची सेवा करणे, लोकांशी चांगले वागणे, लोकांच्या गरजा भागवण्याचा प्रयत्न करणे, अगर चांगली वागणूक ठेवून, निष्ठेने न चुकता उपासनेसाठी जाणे एवढचे पुरेसे नाही. आपण ‘स्वत्व’ बाजूला ठेवून एका अर्थी आपल्या मनाविरुद्ध निवड केली पाहिजे (‘स्वतःचा त्याग’ केला पाहिजे) आणि सर्वस्वी देवाबरोबर सहमत झाले पाहिजे. येशूने आपल्यावर सोपवलेली महान कामगिरी जाऊन पूर्ण करण्यास सांगितले आहे





म्हणूनच त्याची आज्ञा त्याच्याच रीतीने व पद्धतीने पूर्ण करण्याचा आरंभ केल्याशिवाय एकही पाऊल पुढे टाकू नये.

योहान.१५:१६ मध्ये आमच्या प्रभूने सांगितले आहे ते नीट लक्षात घ्या. ‘‘तुम्ही (विशेष भर) मला निवडले नाही तर मी तुम्हांला निवडले व तुम्हांला नेमले आहे. ह्यात हेतू हा की, तुम्ही (विशेष भर) जाऊन फळ द्यावे आणि तुमचे फळ टिकावे (त्रिकालसूचक वर्तमान) आणि जे काही तुम्ही माझ्या नावाने पित्याजवळ मागाल ते त्याने तुम्हांला द्यावे.’’ फळाचा नेहमीचा उपयोग काय? फळ देणारे झाड कधी आपले फळ आपणच खात नाही. झाडाची फळे दुसऱ्या कोणासाठी असतात. फळाचा एक भाग खाण्यासाठी असतो आणि दुसरा भाग पुनरुत्पादनासाठी असतो. फळामधील बी अन्नाचे उत्पादन आणि फळाची पुनरुत्पत्ती ही प्रक्रिया सतत चालू ठेवते. आंब्यामध्ये किती बिया असतात? फक्त एक, पण त्या एका बीमधून किती आंबे येणार ते फक्त देवालाच माहीत आहे.

*तुमच्या समोर येणाऱ्या व्यक्तीची वैयक्तिक जबाबदारी घेण्यासाठीच तुम्हांला देवाच्या राज्यामध्ये आणले आहे.* परंतु हे काही आपोआप विनासायास घडते असे मुळीच नाही. आज जीवनाच्या मार्गात अनेक लोक तुमच्या संपर्कात येतील व जातील. त्यातील कित्येक शिष्य करण्याच्या प्रक्रियेत तुम्हांला उपलब्ध होऊ शकतील (मात्र त्यासाठी योग्य माहिती, प्रशिक्षण आणि आधार घेणे अगत्याचे आहे). कदाचित या सर्वांमध्ये तुम्हांला एकही व्यक्ती आढळणार नाही. तुम्ही जोपर्यंत देवाच्या दृष्टीने पाहात व ऐकत नाही तोवर तुम्ही पुढे आलेल्या व्यक्तीच्या संबंधात तुमची वैयक्तिक जबाबदारी कधीच पूर्ण करू शकणार नाही.

मी तुम्हांला एक आठवण करून देतो. ‘‘मी काय माझ्या भावाचा राखणदार आहे?’’ हा प्रश्न देवाला विचारला आहे. जगातील पहिल्या खुनी माणसाने आपला स्वतःचा बचाव करण्यासाठी हा प्रश्न विचारला. त्याचे अंतःकरण आत्यंतिक द्वेषाने ओतप्रोत भरले होते. जगाला प्रभावित करण्यासाठी पुढे उपलब्ध असलेल्या व्यक्तीची जबाबदारी व्यक्तिशः स्वीकारण्यास मी येशूबरोबर सहभागी झालो नाही, तर मीही खुनी माणसाच्या भावनांशी हातमिळवणी करतो असे होईल. काइनाच्या प्रश्नाला देवाचे स्पष्ट उत्तर आहे, ‘‘होय, तू तुझ्या भावाचा राखणदार

आहेस एवढेच नव्हे तर त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही तुमच्या भावाचे भाऊ आहा!'' मग तुम्ही तुमच्या हाबेलबरोबर कसे वागत आहात? मला वाटते लूकने म्हटले तसे तुम्हीही म्हणावे, ''हेच मलाही योग्य, चांगले वाटले. देवाने मला दिलेल्या मनुष्याची वैयक्तिक जबाबदारी मी स्वीकारतो.''

## परिश्रमपूर्वक संशोधन

तुम्हांला नव्या करारातील मापदंडानुसार चालायचे तर *तुमच्या शिष्याखातर तुम्ही देवाच्या वचनाचे परिश्रमपूर्वक संशोधन, अभ्यास केला पाहिजे.* येशूने म्हटले, ''...मी त्यांच्याकरिता स्वतःस समर्पित करतो'' (योहान.१७:१७) आणि तुमच्या जीवनातून त्याच्या जीवनाचे पडसाद उमटले पाहिजे. केवळ पवित्र शास्त्राचा अभ्यास करणे पुरेसे नाही. पवित्र शास्त्राचा झटून अभ्यास करणारे लोक जिकडे तिकडे पुष्कळ आहेत. त्यांच्यापैकी एकाच्याही हातून जगाला प्रभावित करणाऱ्या पुनरुत्पत्ती करील अशा शिष्याची जडणघडण कधीच होणार नाही. याचे कारण अगदी साधे सोपे आहे. पवित्र शास्त्राचा शिक्षक आणि विद्यार्थी या दोहोंतून एकालाही जगाला प्रभावित करील असा दृष्टान्त पाहता येत नाही. पवित्र शास्त्राचे शिक्षण देणारे आहेत त्यांना हे जगाला प्रभावित करण्याचे साधन आहे याची कल्पनाही नसते तसेच जगाला प्रभावित करणारे विद्यार्थी घडवावेत या उद्देशाने ते पवित्र शास्त्राच्या आधारे योग्य तो पाठ्यक्रम तयार करीत नाहीत. याऐवजी ''अधिक शिकावे,'' ''अधिक चांगले ख्रिस्ती व्हावे'' याचसाठी ते पवित्र शास्त्राचा अधिक अभ्यास करतात. आणि ख्रिस्ती व्यक्तीने हेच उद्देश मनी धरावे का नाही यावरही मोठे प्रश्नचिन्ह आहेच! त्यांचे हे करणे ''ग्राहकहित'' जपणारा ख्रिस्ती विश्वास दाखवणारा अगर पश्चिमेकडील मंडळ्यांमधील संकुचित स्वार्थी मानसिकता अधिक करून दाखवत असते.

यातून शुभवर्तमानाचा प्रभाव एकदाच टाकला जातो. यातून पुन्हा पुन्हा उगवून येईल असे बीजारोपण होत नाही. कालाच्या अंतापर्यंत अमाप आध्यात्मिक पीक दिगंतापर्यंत मिळत राहील असे कार्य होत नाही. पवित्र शास्त्र कोणालाही आपले आपण वाचता येते. परंतु ख्रिस्ताला खरोखरी जाणून घ्यायचे, त्याला अनुसरायचे





आणि इतरांना त्याची ओळख करून द्यायची या उद्देशाने जाणूनबुजून शोधचौकशी करणाऱ्या व्यक्तींच्या जीवनांकडूनच जगावर प्रभाव टाकला जातो.

लूक.१:३ पाहा. ''मुळापासून नीट शोध केल्यामुळे'' हे शब्द लक्षात घ्या. या शब्दामध्ये २ तीमथ्य.२:१५ मधील ''सत्याचे वचन नीट सांगणे'' यातील बल आहे. २ तीमथ्य.३:१० मधील ''ओळखून आहेस'' या शब्दासारखाच हाही शब्द आहे. तेथे पौल तीमथ्याला सांगतो, ''तू माझे शिक्षण, आचार, संकल्प, विश्वास, सहनशीलता, प्रीती, धीर, माझा झालेला छळ, माझ्यावर आलेली संकटे ही ओळखून आहेस.'' लूक.१:१३ आणि २ तीमथ्य.३:१० या वचनांमध्ये *पॅराकोलुथिओ* हा ग्रीक शब्द आहे. ''बरोबर, सोबत घेणे, अगदी जवळून अनुसरणे, काळजीपूर्वक लक्ष देणे'' हे त्याचे अर्थ आहेत. अलंकारिक अर्थाने *पॅरोकोलुथिओ म्हणजे पूर्वी ज्याने वारंवार सर्व निरीक्षण परीक्षण केले आहे त्याने दाखवलेल्या मानसिक विचारांच्या वाटेने मागोवा घेत, प्रत्येक तपशील नीट शोधून पाहत, अगदी बारीकसारीक तपशीलही पाहत पुढे जाणे* असे आहे. वाचकांनी वरील अर्थाचे नीट चिंतन करावे. पुन्हा हे पाहा : ''जे मी बोलतो ते समजून घे; कारण प्रभू तुला सर्व गोष्टी समजून देईल'' (२ तीमथ्य.२:७). या वचनांमध्ये मनोविचारांचा जो मागोवा घ्यायचा आहे अगर जो घटनाक्रम आहे तो येशू ख्रिस्ताविषयीच्या सर्वकाळापासून सर्वकाळापर्यंतचा आहे. येशूने स्वर्ग सोडला आणि काळ व अवकाश या परिमाणामध्ये प्रवेश केला तेव्हाच त्याने इतिहासाच्या कठोर, कडक पृष्ठभागावर आपला ज्वलंत ठसा उमटविला आहे. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने मानसिक व आध्यात्मिक अशा दोन्ही दृष्टींनी त्या वाटेने मागोवा घेत चालले पाहिजे. प्रत्येक तपशील नीट शोधून आत्मसात केला पाहिजे. त्याला आपल्या स्वतःच्या जीवनात ते सर्व तपशील पुन्हा ठसवता, उत्पन्न करता आले पाहिजेत आणि त्यातूनच आपल्या स्वतःच्या शिष्यांसाठी पाठ्यक्रम व अभ्यासक्रम तयार केला पाहिजे. अर्थातच यासाठी परिश्रमपूर्वक संशोधन करावेच लागते.

*'पॅराकोलुथिओ'* या शब्दामध्ये आणखीही एक अर्थछटा आहे. 'शिकणे', 'नकलून काढणे', 'मागोवा घेणे,' 'माग काढणे,' या अर्थछटा त्यात आहेत. लहान मुले चित्रावर दुसरा पातळ कागद ठेवून चित्राची रूपरेषा काढतात तसे हे

आहे. जे चित्र काढायचे ते घ्यायचे, त्यावर चांगला पातळ कागद ठेवायचा व अगदी बारकाईने लक्षपूर्वक मूळ चित्र जसेच्या तसे काढायचे. अशा प्रकारे काढलेले चित्र मूळ चित्राची हुबेहूब नक्कल असते. त्यात बारीक सारीक तपशीलही उतरलेला असतो.

लूकने नासरेथकर येशूचे स्वभावचित्र रेखाटून त्याचे अंतःकरण आणि मनोदय येथे उलगडून दाखवला आहे. लूकने आपल्या या शुभवर्तमानाचे अखेरचे पान लिहिले आणि लेखणी बाजूस ठेवली तेव्हा येशूचे सौंदर्य, त्याची मानवता आणि सर्व मानवांविषयी त्याची अपार करुणा गौरवी तेजाने सर्वांसाठी या लेखातून प्रकट झाली. लूकने पूर्ण केलेला हा ग्रंथ इतर कोणत्याही शुभवर्तमानाच्या लेखकाच्या लेखापेक्षा वेगळा आहे. पवित्र आत्म्याने लूकाच्या लेखणीतून उतरणाऱ्या प्रत्येक अक्षराला योग्य ते वळण देऊन येशूच्या मानवतेमध्ये देवाचे प्रतिरूप रेखाटण्यास, ठसवण्यास साहाय्य केले आहे. येशूचे स्वभावचित्र रेखाटताना तो ज्या प्रकारे चालला, लोकांना प्रभावित करण्यासाठी त्याने योजिलेला पाठ्यक्रम हे सर्व आपण लूकाच्या मार्गदर्शनाने पाहावे आणि पुढे सरसावून तसेच करावे.

वर आम्ही २ तीमथ्य.२:१५ चा संदर्भ दिला आहे.'' तू (सत्याचे वचन) नीट सांगणारा'' यासाठीचा मूळ ग्रीक शब्द 'पॅराकोलुथिओ' या शब्दाशी निगडीत आहे. तो शब्द आहे 'आर्थोटोमिओ.' आर्थो म्हणजे सरळ, नीट आणि टेम्नो-टोमिओ म्हणजे 'कापणे, विभागणे, वाटणी करणे, कौशल्याने हाताळणे'. लूक स्वतः चतुर, सक्षम आणि कुशल डॉक्टर होता. त्याच्या व्यवसायात तांत्रिक परिपूर्णता अत्यंत महत्त्वाची हे तो स्वतः जाणून होताच. रोगनिदान करताना एखाद्या बारीकशा, क्षुल्लक वाटणाऱ्या लक्षणाकडे दुर्लक्ष झाले तर तेवढे निमित्त रोगी दगावण्यास पुरेसे होते हे त्याला चांगलेच माहीत होते. जीवनमरणाचा प्रश्न तर नेहमीच त्याच्यापुढे असे आणि आणि रोग्याचे प्राण वाचवण्यासाठी मोठ्या जबाबदारीने तो आपले ज्ञान व कसब वापरीत असे. आणि त्याने लिहिलेल्या या ग्रंथाचा विषयही जीवन-मरण, स्वर्ग-नरक असा आहे. हेही तो जाणून होताच.

इतिहासात बारकाईने शोध केला असता हे स्पष्ट होते की, लूकने तार्स येथील वैद्यकीय पाठशाळेत वैद्यकीचे पद्धतशीर शिक्षण घेतले होते. (काही अभ्यासक





म्हणतात, पौल, लूक आणि थियफिल हे तिघेही तार्स येथील विद्यापीठामध्ये एकाच वेळी शिक्षण घेत होते). या वैद्यक पाठशाळेत लूकला त्या वेळी उपलब्ध असलेले सर्वोत्तम शिक्षण मिळाले होते. ते कसेही असो. हुशार, चतुर, वैद्यकशास्त्राचा अभ्यासक लूक आणि मान्यताप्राप्त शास्त्रशिक्षक (शास्त्री) आणि ईश्वरविद्यापारंगत शौल या दोघांची पूर्वीपासून ओळख असावी. प्रे.कृ.१६ मध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहवास घडण्यापूर्वीपासून त्यांचा परिचय असावा असे म्हणण्यास काही आधार आहे. पौल गंभीर व्याधीने त्रासलेला होता. तो उपचार करून घेण्यास वैद्यराज लूककडे गेला. या भेटीमध्ये आणि पुढे उपचार घेत असताना पौलाने वैद्यराज लूक यास ख्रिस्ताची सुवार्ता सांगितली असावी. पौलाच्या दृष्टीदोषावर उपचार करीत असताना पवित्र आत्म्याने लूकच्या अंतःकरणात प्रकाश उजळला. याचे 'आध्यात्मिक अंधपण' देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या तेजाच्या सुवार्तेच्या प्रकाशाने दूर केले (२ करिंथ.४:४) आणि ''...अंधारातून उजेड प्रकाशित होईल असे जो देव बोलला तोच येशू ख्रिस्ताच्या मुखावरील देवाच्या गौरवाच्या ज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठी 'लूकच्या' अंतःकरणात प्रकाशला...'' (२ करिंथ.४:६). नंतर काही काळाने पौलाने आपल्या सुवार्तिकांच्या चमूसह त्रोवसाहून पुढे जाण्याचा बेत जाहीर केला, दुसऱ्या गावात जाण्याचे ठरले तेव्हा लूकने ''मलाही तुमच्या बरोबर येऊ द्या'' अशी विनंती केली. त्यावर पौलाने कदाचित म्हटले असेल, ''पण वैद्यराज, तुमचे रोगी, व्यवसाय वगैरे सोडून तुम्ही कसे येणार?'' आणि डॉ. लूकने म्हटले असेल, ''त्याची चिंता नको, माझा व्यवसाय चांगाल सुस्थितीत आहे. मी तो माझ्या सहकाऱ्याकडे सोपवतो आणि येतो.'' मग लूकने आपला व्यवसाय दुसऱ्याला दिला आणि पुढील सर्व सुवार्ताप्रसार फेऱ्यांमध्ये तो पौलाबरोबर राहिला.

वैद्यकीय शास्त्राचे, विज्ञानाचे पद्धतशीर शिक्षण घेतलेला लूक हा एकच शुभवर्तमानकार. त्याने आपले तर्कशुद्ध शास्त्रीय शिक्षण आणि कौशल्य यांचा चांगला उपयोग करून येशूला प्रत्यक्ष पाहणाऱ्या, त्याच्या सहवासात राहिलेल्या लोकांपासून ख्रिस्तचरित्रासाठी सत्य माहिती व साधने जमा केली. पौलाबरोबरच्या प्रवासात तसेच स्वतंत्रपणे त्याने केलेल्या प्रवासात त्याला हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आशिया मायनर (आशिया प्रांत) आणि पॅलेस्टाईन देशात विविध ठिकाणी

विशेषतः यरुशलेम येथे भेटले. हळूहळू लूकने मिळेल तशी माहिती आपल्या वह्यांमध्ये लिहून ठेवली. तो अनेकांशी व्यक्तिशः बोलला. या मुलाखतींची टिपणेही त्याने नोंदून ठेवली. जाताजाता एक सांगतो, जो द्रष्टा शिष्य करणारा आहे त्याची टिपणवही नेहमी मोठी मोठी होत असते हा एक अनुभवसिद्ध नियमच आहे. लूकच्या टिपणवह्या अशाच येशूने जे जे केले, तो जे जे बोलला त्या सर्व माहितीने भरलेल्या होत्या. कोणी व्यक्ती भेटली आणि ती येशूला ओळखत होती असे कळताच लूक त्याला प्रश्नावर प्रश्न विचारून माहिती घेत असे. हे प्रश्न असे असत : ''तुमची येशूची ओळख कुठे कशी झाली? त्याने केलेले चमत्कार तुम्ही पाहिलेत का? तेव्हा काय घडले? तुम्ही येशूला भेटलात तेव्हा तो काय करीत होता? खरंच तुम्ही येशूला स्वतः ओळखत होता? त्याच्याविषयी तुम्हांला माहीत आहे ते सगळे सगळे मला सांगा.'' पेत्र, याकोब, योहान ह्यांना त्याने अनेक प्रश्न विचारून माहिती मिळवली, तसेच मूळ बारा प्रेषितांपैकी इतरांच्याकडूनही त्याने येशूसंबंधी विचारून घेतले. त्या वेळीच मार्ककृत शुभवर्तमान लिहीत असणाऱ्या योहान मार्कलाही तो निश्चित भेटलाच असेल, त्याच्याशी चर्चा केली असणार यात शंकाच नाही. येशूची आई मरीया हिच्याबरोबर लूकने अनेक वेळा संभाषण केल्याचा सबळ पुरावा आहे. डॉक्टर लूकने कुमारीच्या उदरी येशूचा जन्म याविषयी विस्ताराने लिहिले आहे तेवढे पवित्र शास्त्राच्या इतर कोणाही लेखकाने लिहिलेले नाही. डॉक्टर, वैद्य, वैज्ञानिक वगैरेंना कुमारीच्या उदरी जन्म ही वस्तुस्थिती सहज मान्य होत नाही. विल्यम होबर्ट नावाच्या एका लेखकाने डॉ. लूकच्या वैद्यकीय भाषेविषयी विस्ताराने लिहिले आहे. लूकने हे शुभवर्तमान लिहिताना त्यात वैद्यकीय परिभाषेतील चारशेपेक्षा अधिक तांत्रिक शब्द वापरल्याचे दाखवले आहे. सत्य, समर्थ पुराव्याच्या आधारे ख्रिस्त कुमारीच्या पोटी जन्मला याविषयी लूकाची पुरती खात्री पटली होती. मरीयेशी प्रत्यक्ष संभाषण केल्याने त्याला येशूच्या जन्माविषयीचे मर्म समजले होते.

मग या कुशल वैद्याने शास्त्रीय दृष्टी ठेवून प्रभूच्या जीवनचरित्राचा क्रमवार वृत्तांत पद्धतशीरपणे लिहिला. येशूचा जन्म, त्याचे बालपण, जीवन, शिकवण, त्याचे मरण, त्याचे पुनरुत्थान, पुनरुत्थानानंतरच्या चाळीस दिवसांमधील काही घटना





आणि त्याचे स्वर्गारोहण हे सर्व लूकने विस्ताराने लिहिले आहे. येशूचे व्यक्तित्त्व, शिकवण, कृत्ये आणि त्याने केलेले महान कार्य याविषयी लूकने व्यापक संशोधन केले आहे. लूक.१:३ मध्ये मुळापासून नीट बिनचूक शोध केल्याचा उल्लेख आहे. येथे 'मुळापासून' यासाठी 'ॲक्रिबॉस' हा ग्रीक शब्द वापरला आहे. त्याचा अर्थ आहे : 'बारकाईने, आस्थेने, सर्वांगीण.' लूकने येशूविषयीचे संशोधन वरपासून खालपर्यंत केले. (ॲक्रॉन म्हणजे सर्वात उंच बिंदू. ॲक्रॉपॉलिस म्हणजे उंच शहर, ॲबिस म्हणजे तळ). लूकने थियफिलला उद्देशून म्हटले आहे, थियफिल, मी येशूविषयी सर्वांगीण संशोधन केले आहे. अगदी वरपासून ते खाली मुळापर्यंत प्रत्येक तपशील बारकाईने पाहिला आहे. त्यात अजिबात कसूर केली नाही. येशूच्या जीवनातील प्रत्येक बाब, प्रत्येक तपशील आपण अगदी बारकाईने वरपासून खालपर्यंत पाहिला आहे याची लूकला पक्की खात्री होती.

नव्या करारामधील चार शुभवर्तमाने त्या त्या लेखकांनी अगदी विशुद्ध पोकळीत, एकांतात लिहिली नाहीत. त्यांचे लेखन रोजच्या जीवनातील धकाधकीत झाले आहे. प्रत्येक शुभवर्तमान पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने लिहिले गेले आहे, तरीपण त्या प्रत्येकावर त्या त्या मानवी लेखकाची छाप आहेच. प्रत्येकाच्या विशिष्ट लकबी दिसतातच. योहानाने योहानासारखे, मार्कने मार्कसारखे, मत्तयने मत्तयसारखे लिहिले आहे. प्रत्येकजण परिपूर्ण लेख लिहीत आहे, प्रत्येक लेखाचा विषयही परिपूर्णच आहे. लूक.१:१ मध्ये डॉक्टर लूकने म्हटले आहे की, त्याने लिहिलेल्या वृत्तांतामध्ये येशूविषयी लिहिले आहे ते सर्व त्याने ज्यांच्या मुलाखती घेतल्या, ज्यांच्याकडून माहिती घेतली त्यांच्या डोळ्यांदेखत घडलेले आहे. शुभवर्तमानाचा दुसरा लेखक प्रेषित योहान ह्याने आपल्या पहिल्या पत्रामध्ये ह्या साक्षीदारांनी येशूला डोळ्यांनी पाहिले आहे, न्याहाळले आहे, ऐकले आहे, आपल्या हातांनी चाचपले आहे असे लिहिले आहे. म्हणजेच या लेखकांनी दृश्य, श्राव्य व स्पर्शनीय साक्ष सादर केली आहे.

'साक्षीदार - प्रत्यक्ष पाहणारे' या अर्थी लूक.१:१ मध्ये 'ऑटोप्टेस' हा शब्द आहे. हा सामासिक जोडशब्द असून 'स्वतः पाहणे' त्याचा शब्दशः अर्थ आहे. मरणोत्तर शवविच्छेदन या अर्थी इंग्रजीत 'ऑप्टोप्सी' हा शब्द आहे. म्हणजे

शवविच्छेदन करणाऱ्या डॉक्टरने स्वतः पाहून संबंधित व्यक्ती कशामुळे मेली ते निश्चित समजून घेतले आहे. लूकने प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या तोंडून ऐकलेली हकिगत, गोष्टी वगैरे पुरेपूर सत्य, खात्रीशीर होते आणि ते वृत्तांत कोणाचीही सहज खातरजमा करतील असे अस्सल, समर्थ आहेत याविषयी लूकच्या मनात कसलीही शंका नव्हती. हा वृत्तांत वाचून आणखी कोणी असाच शोध केला तरी त्यालाही हेच सत्य समजणार, सापडणार, याहून अधिक काही पुढे येणार नाही हेही लूक जाणून होता. प्रेषितांची कृत्ये या पुस्तकामध्ये त्याने ''पुष्कळ प्रमाणांनी'' किंवा ''पुष्कळ निश्चित प्रमाणांनी'' (प्रे.कृ.१:३) असा उल्लेख केला आहे; आणि आता तीच प्रमाणे, तोच निश्चित निरपवाद पुरावा या शुभवर्तमानातून लूकाने सादर केला आहे.

याशिवाय ख्रिस्ताच्या आरंभीच्या, मूळच्या सेवकांकडून आपण माहिती व साक्ष वृत्तांत मिळवला, शोधून घेतला असे लूकने आम्हांला सांगितले आहे. या सेवकांपैकी अनेकांनी स्वतःचे प्राण देऊन आपली साक्ष पक्की मोहरबंद केली होती अगर ते रक्तसाक्षी होऊन येशूविषयीची साक्ष देणार होते. लूक.१:२ या वचनात 'वचनाचे सेवक' या अर्थी मुळामध्ये 'हुपेरेटस' हा ग्रीक शब्द आहे. त्याचा अर्थ 'साहाय्यक वल्हेकरी' असा आहे. जहाजावर वल्हवणाऱ्यांच्या मध्ये काम करणारा दास या अर्थी हा शब्द वापरीत. कोणाला तरी त्याच्या इच्छित स्थळी पोचवण्यासाठी सर्वात खालच्या जागी राहून काम करणारा हेच या वल्हेकरी दासाचे काम असे.

अशा वल्हेकरी दासाला जहाजाच्या तळाशी नेऊन तेथे वल्हेकरांच्या रांगेमध्ये त्याच्या जागेवर बसवून साखळीने बांधून ठेवीत. सतत वल्हे मारणे, खलाश्यांच्या प्रमुखाकडे लक्ष ठेवायचे आणि त्याच्या आदेशाप्रमाणे इतर वल्हेकऱ्यांच्या बरोबर एका लयीत, एकवटून वल्हवत राहायचे. (येशूच्या) या सेवकांना येशू ख्रिस्ताचे व्यक्तित्त्व आणि प्रतापी वैभव याविषयी सर्वस्वी खात्री पटली होती म्हणूनच 'कृपेच्या उत्तम जहाजावर ते स्वेच्छेने वल्हेकरी दास झाले. प्रभू येशू ख्रिस्ताकडे पाहत राहून त्याचे आज्ञापालन करायचे हेच त्यांचे कार्यकर्तव्य होते. कोणाला तरी त्याच्या/तिच्या अंतिम स्थली पोचवणे हेच त्यांचे एकमेव उद्दिष्ट होते. लूकानेही हेच





जीवितध्येय व जीवनशैली समर्थपणे या शुभवर्तमानामधून दाखवली आहे. येशूच्या वृत्तान्ताचा शोध करून त्याने हे अद्भुत पुस्तक लिहिले. थियफिल या एकाच व्यक्तीला या जीवनामध्ये आणि येणाऱ्या जीवनामध्ये इष्ट तेच भवितव्य मिळावे या उद्देशाने लूकाने हे लिहिले आहे. लूककृत शुभवर्तमान आणि प्रेषितांची कृत्ये या दोन्ही पुस्तकांमधून शिष्य करणाऱ्याच्या ध्येयाचे, ब्रीदाचे पडसाद उमटत आहेत. 'कोणीतरी दुसरा कोणीतरी दुसरा, कोणीतरी दुसरा...' प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने स्वतःला साखळीने बांधून ठेवलेल्या वल्हेकरी दास समजावे, प्रथम ही सुवार्ता नीटपणे आत्मसात करावी, त्यातील सूचनांप्रमाणे वागावे, पाठ्यक्रम तयार करावा आणि शिष्य तयार करावे, त्यांना शिक्षण देऊन सेवेसाठी सज्ज करावे, हे सर्व दुसऱ्या कोणाला तरी त्याच्या अंतिम स्थळी नेण्यासाठी करावे.

## अचूक साधनसामग्री

नव्या करारातील मापदंडानुसार आचरण ठेवायचे, कार्य करायचे तर इतर शिष्यांना तयार करण्यासाठी नेमकी अचूक साधनसामग्री मिळवणे, तयार करणे अगत्याचे आहे. लूकाने थियफिल ह्यास येशू ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाचा क्रमवार, सविस्तर वृत्तांत लिहून देण्याचे निश्चित केले होते. लूकने येथे पहिल्या वचनात 'अनाटॅसोमय' हा एक लष्करी पारिभाषिक शब्द वापरला आहे. शिपाई, सैनिक, वस्तू वगैरेंची रचना व्यवस्थित करणे या अर्थी हा शब्द वापरतात. येशूविषयीचे सर्व सत्य लूकने अगदी मुद्देसूद मांडले आहे. मांडणी करण्याची त्याची एकंदर पद्धत जग जिंकण्यासाठी रणांगणावर उतरलेल्या आणि आक्रमणासाठी सज्ज अशा सैनिकांच्या रचनेसारखीच आहे. लूकाने थियफिलाला अवर्जून सांगितले आहे की, त्याने येशूविषयी सर्व गोष्टींचा अगदी मुळापासून शोध केला आणि मगच तो सर्व वृत्तांत नीट क्रमवार लिहिला आहे. दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनावर अधिकाधिक प्रभाव पडावा यासाठी अगदी नेमकेपणे लूकने येथे पाठ्यक्रम तयार केला आहे. लूकाचा हा उद्देश कोणाही विचारी शिष्याच्या लक्षात येईल.

पौलाने लूकला शिक्षण देऊन शिष्य केले. मग त्यानेही इतर लोकांना तयार करण्याचे काम स्वतःवर घेतले. शास्त्रलेखांचे नीट यथार्थ विवरण, विवेचन करू

शकणाऱ्या व्यक्ती तयार करायच्या होत्या (२ तीमथ्य.२:१५). २ तीमथ्य.३:१० मध्ये पौलाने तीमथ्याला सांगितले आहे : ''तू माझे शिक्षण... ओळखून आहेस.'' पौलाने शुभवर्तमानाची महान सत्ये नीट क्रमवार मांडून शिकवल्याने, सांगितल्याने तीमथ्याला ती उत्तम प्रकारे आत्मसात करता आली आणि त्या शिक्षणाला सिद्धान्ताला बिलगून राहिल्याने तेच शिक्षण दुसऱ्याला देणे त्याला सहज शक्य झाले. लूकला पौलाने शिष्यपणाचे शिक्षण दिले आणि आता स्वतः लूक येशूने घालून दिलेल्या नियमाचे उत्तम उदाहरण देतो. येशूने म्हटले, ''...पूर्ण झालेला प्रत्येक शिष्य आपल्या गुरूसारखा होईल'' (लूक.६:४०). तसेच या आरंभीच्या वचनांमध्ये लूकने शिष्य तयार करण्यासाठी आवश्यक आदर्श पाठ्यक्रम कसा असावा तेही सांगितले आहे. यातून होणाऱ्या शिष्याला आपल्यासारखेच आणखी दुसरे शिष्य तयार करण्यास याचा उपयोग होणार आहे. येशूविषयीचे सत्य वृत्तांत व घटना यांची क्रमवार मांडणी करून लूकने पूर्णपणे अचूक वृत्तांत तयार केला आहे. एका व्यक्तीला शिकवून तयार करणे, सिद्धान्त त्याच्या मनावर ठसवणे व त्याला जगावर प्रभाव पाडण्याची संधी देणे हा येथे लूकाचा उद्देश दिसतो. एफ. एफ. ब्रूस ह्यांनी म्हटले आहे : 'ॲनातासोमाय' या शब्दावरून विषयावर अगर कालक्रमानुसार व्यवस्थित मांडलेली वृत्तांतमालिका असा अर्थ सूचित होतो. यात केवळ सुट्या सुट्या गोष्टी नसतात. हा लेख लिहून पाठवण्यापूर्वी लूकाने (अगर इतर कोणा ख्रिस्ती व्यक्तीने) थियफिल ह्याला तोंडी सांगितले होते (लूक.१:४) 'शिक्षण देणे' या अर्थी मुळात 'कॅटेलिओ' हा ग्रीक शब्द आहे. पद्धतशीर शिकवणे विशेषतः प्रश्नोत्तर स्पष्टीकरण सुधारणे, पुनरावृत्ती अशा प्रकारे शिकवून तयार करणे हे अर्थभाव या शब्दातून व्यक्त होतात. शुभवर्तमान पद्धतशीरपणे तोंडी सांगितले पाहिजे आणि ती व्यक्ती ख्रिस्ताकडे आल्यावर त्याला ख्रिस्ती विश्वास व कार्यध्येय यांचे पद्धतशीर शिक्षण देऊन स्वतःसारखे इतर शिष्य करण्यासाठी सक्षम केले पाहिजे. म्हणजेच यासाठी तोंडी व लेखी अशा दोन्ही प्रकारे शिक्षण देणे गरजेचे आहे हेच लूकाने यातून दाखवले आहे.

थियफिलाला येशू ख्रिस्ताविषयी संपूर्ण माहिती, ज्ञान मिळावे व त्याच्याविषयी कसल्याही शंकेला जागा राहू नये, पुरती खात्री पटावी याच एका उद्देशाने लूकने





हे सर्व केले आहे. व. ४ मधील 'निश्चितपणा' या शब्दावर आल्फ्रेड प्लुमर ह्यांनी भाष्य केले आहे : यावरून शुभवर्तमानाला अभेद्य ऐतिहासिक आधार पाया आहे अशी थियफिलाची खात्री होईल. आपणही असाच अभ्यासक्रम तयार करावा, त्यासाठी यथार्थ उदाहरणे दाखले गोळा करून एखाद्या वहीत लिहून ठेवावे (येशूने सांगितलेले व लूकाने नमूद केलेले दाखले नमुना म्हणून पाहावे). आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या गौरवी शुभवर्तमानाच्या अढळ पायावर आमच्या शिष्यांची उभारणी बांधणी करण्यासाठी आपण शास्त्रलेखांची जुळणारी प्रत्येक बाब उदाहरण देण्यास, संदर्भ सांगण्यास आपल्या संग्रही ठेवावी.

चांगले, विचारी, ज्ञानी माहितगार असे अनेक ख्रिस्ती लोक आहेत पण व्यापक जगदृष्टी असलेला, जगाला प्रभावित करील, स्वतःसारखे शिष्य तयार करण्यास सक्षम असा एकही शिष्य ते कधीच तयार करणार नाहीत. कारण? कारण दुसऱ्या कोणाला तरी त्याच्या अंतिम स्थानापर्यंत नेण्यासाठी योग्य असा अभ्यासक्रम स्वतः तयार करणे अगर दुसरा एखादा तयार अभ्यासक्रम घेऊन त्याचा उपयोग करणे ही आपली जबाबदारी ते कधीच स्वीकारीत नाहीत. सामान्य, अदीक्षित व्यक्तीने हे सत्य डावलण्याचा प्रयत्न करून नये, यासाठी एफ. एफ. ब्रूस ह्यांनी आवर्जून सांगितले आहे की, ''लूक विदेशी, अदीक्षित होता. तो पाळक, उपदेशक नव्हता!!'' लूक उत्तम डॉक्टर होता. उपचारासाठी अनेक रोगी त्याच्याकडे नेहमी येत, तरीपण त्याने वेळात वेळ काढून हे शुभवर्तमान लिहिले. आपल्या प्रभूचे जीवन, सेवाकार्य, शिकवण, केलेले कार्य व (शिष्यांना) नेमून दिलेली कामगिरी हे सर्व व्यवस्थित अनुक्रमाने वृत्तांतरूपाने एका माणसासाठी लिहून ठेवले.

## चिकाटीने पुनरुत्पादन

नव्या करारातील मापदंडानुसार आचरण करायचे तर शिष्यांची सतत पुनरुत्पत्ती व्हावी यासाठी तुमच्या सर्व शक्तीनिशी चिकाटीने तुम्ही सतत शक्य ते सर्व केले पाहिजे. व्यापक जगदृष्टी असणाऱ्या प्रत्येक शिष्य करणाऱ्याने शिष्यांची पुनरुत्पत्ती - बहुगुणन होत राहावे, त्यात खंड पडू नये यासाठी देवावर सर्वस्वी अवलंबून राहावे आणि शक्य ते सर्व करावे. संपूर्ण जग हेच आपले कार्यक्षेत्र आहे हे लक्षात घेऊन

या नव्या शिष्यांनी जगावर प्रभावर पडेल असेच आचरण हेतूपुरस्सर ठेवले पाहिजे, जगदृष्टी असणारा, दिव्य दृष्टान्त पाहिलेला अशा कोणत्याही शिष्याला हे चांगले माहीत असते की देवाचे अद्भुत सामर्थ्य साहाय्यासाठी आवश्यक आहे. हे साहाय्य नसेल तर मापदंड निश्चित करणे, अगर ध्येय, उद्दिष्ट साधण्याचे प्रयत्न करणे व्यर्थ आहे. तसेच शिष्य करणाऱ्याने प्रथम स्वतः मर्यादेवरील खुणेकडे धावत राहून त्या मापदंडानुसार आचरण केले पाहिजे. तसे न होईल तर देव दुसऱ्या कोणालाही या धावण्यात सहभागी होऊ देणार नाही. ऑगस्टीनचा नियम नीट लक्षात घ्यावा : ''देवाशिवाय आम्ही काहीच करू शकत नाही. आमच्याशिवाय देव काही करणार नाही.''

लूकाने आपल्याला उत्तम, चतुर शिष्य करणाऱ्याचे अविस्मरणीय उदाहरण दिले आहे. तो करीत होता त्या कार्याचे महत्त्व त्याला पुरेपूर माहीत होते. नासरेथकर येशूचे चरित्र व कार्य जाणून घेण्यासाठी लूकाने अगदी कसून, मन लावून शोध केला. मिळणारी माहिती अगदी अचूक असावी यासाठी योग्य ती दक्षता घेतली. हा सर्व वृत्तांत यथाक्रम घडलेल्या काळानुरूप सांगण्याचे महत्त्व त्याला चांगलेच माहीत होते. लूकाने हे काम अतिशय एकाग्र निष्ठेने केले. मिळणारी सर्व माहिती घटनांचे सर्व तोंडी व लेखी वृत्तांत एकत्र केले. अनुक्रमाने सर्व वृत्तांत व्यवस्थित एकत्र केले आणि थियफिल या एका हरवलेल्या माणसासाठी हा लेख लिहिला.

हा लेख वाचून थियफिलाने काय केले असेल? यातील सत्याविषयी त्याची पूर्ण खातरजमा झाली. त्याने हे सत्य पूर्णपणे स्वीकारले. यातून सादर केलेल्या व्यक्तीवर आणि संदेशावर त्याने विश्वास ठेवला आणि या लेखाचे नीट जतन व्हावे व तो इतरांनाही वाचण्यास मिळावा यासाठी शक्य ते सर्व केले. मुळात हा लेख एकाच मनुष्यासाठी लिहिला असला तरी आज त्या लेखाची एक प्रत तुमच्या भाषेत, तुमच्या हातात आहे! येशूने घालून दिलेल्या शिष्य करण्याच्या, जगाला प्रभावित करण्याच्या मापदंडाचे केवढे हे अद्भुत आश्चर्यकारक उदाहरण! येशूच्या प्रत्येक अनुयायाने याच मापदंडानुसार आचरण ठेवावे ही त्याची इच्छा आहे. त्याने दिलेल्या या आज्ञेला आपण महान कामगिरी म्हणतो.

आपण आता ज्याला लूककृत किंवा लूकाने लिहिलेले शुभवर्तमान म्हणतो तो





लेख लिहून लूकाने थियफिलाला ख्रिस्ताकडे आणले. थियफिलाने व्यक्तिशः ख्रिस्तावर विश्वास ठेवून प्रतिसाद दिला तेव्हा थियफिलाला शिष्यपण शिकवण्यासाठी लूकाने अठ्ठावीस अध्यायांचा आणखी एक लेख लिहिला यालाच आपण 'प्रेषितांची कृत्ये' म्हणतो. या पुस्तकातून लूकाने येशूची आज्ञा आणि जगाला प्रभावित करण्याची पद्धत यांचा परिचय थियफिलला करून दिला. मानवी मापदंडाला देवाच्या वचनाचे केवढे हे आश्चर्यकारक, अद्भुत उदाहरण! लक्षात घ्या. या मापदंडाचे आचरण प्रथम एका अदीक्षित माणसाने केले आहे. तो उपजीविका चालवण्यासाठी लोकांवर औषधोपचार करीत असे पण लोकांना शिक्षण देऊन शिष्य करणे हेच त्याचे कार्यध्येय होते.

माझे एक पाळक, मित्र आहेत. त्यांचे नाव जिम डेव्हिडसन. त्यांनी मला सांगितलेला हा दाखला मी तुमच्यासाठी तेथे दिला आहे.

*माझा खापरपणजोबा इझॅक किल्गोर वयाच्या १८ व्या वर्षी १८६२ मध्ये कॉन्फेडरेट आर्मीमध्ये दाखल झाला. त्याने प्रथम शिलोह येथील लढाईत भाग घेतला. ही लढाई हातघाईची, घनघोर होती. पुढे कोणताही सैनिक एखाद्या लढाईविषयी बोलताना म्हणे, 'शिलोह येथे वाटली नाही एवढी भीती अमुकतमुक लढाईत वाटली.'*

*इझॅक याने अनेक लढायांमध्ये भाग घेतला. चिकाऊगा, चॅटानगा, केनेसॉ पर्वत, ॲटलांटा, फ्रँकलिन, नॅशव्हिले आणि इतर अनेक ठिकाणच्या लढायात त्याने शत्रूशी दोन हात केले. या सर्व ठिकाणच्या लढाया भयंकर होत्या. काही काळ त्याच्या पलटणीचा ध्वज सांभाळण्याची जबाबदारी त्याच्याकडे होती. ध्वज सांभाळणाऱ्या माणसाला लढाईत केव्हाही सर्वात अधिक धोका व भय होते, कारण तोच रणांगणावर सर्वात पुढे असे. पण इझॅक यातूनही वाचून परत आला. त्या यादवी युद्धामध्ये सहा लक्ष वीस हजारांपेक्षा अधिक लोक प्राणास मुकले.* ***या मनुष्यहानीचा आज लोकसंख्येवर कसा प्रभाव पडला आहे त्याचा विचार करा.***

*युद्ध संपल्यावर इझॅक सैन्यातून निवृत्त झाला. तो नॉर्थ कॅरोलिनापासून वॉकर काउंटी, अलाबामा येथवर चालत गेला. तेथे त्याने दोनदा विवाह केला. त्याला सतरा मुले झाली.* ***त्याचाही आज लोकसंख्येवर परिणाम झालाच आहे, नाही***

*टॅली हो द फॉक्स!*

***का?*** *भर युद्धात तो टिकून राहिला, त्याला सतरा मुले झाली. त्या मुलांना पण अशीच मुले झाली - याप्रमाणे पिढ्यानूपिढ्या वाढत गेल्या. त्याची वंशवेल वाढतच गेली. मीही त्याचा एक वंशज आहे. मला दोन मुले आहेत. आणि त्यांनाही मुले होतील. हे सर्व छान आहे, पण समजा इझॅक लढाईत मारला गेला असता, तर काय झाले असते?*

*या सर्व वृत्तांतामधून तुम्ही हाच धडा घ्यायचा आहे. एखाद्या सैनिकाप्रमाणे तुम्हाला यथार्थ प्रशिक्षण मिळाले आहे आणि तुम्ही युद्धात तग धरून राहाल, आणि हे युद्धच आहे, तर तुम्ही सातत्याने नेमस्तपणे पिढीमागून पिढी अशी पुनरुत्पत्ती करीत राहाल. येशू ख्रिस्तासाठी शिष्यांच्या अनेक पिढ्या तुमच्या कार्यातून येतील. पण त्याचबरोबर नीट लक्षात घ्या. यावर चांगला सखोल विचार करा.* ***तुम्ही प्रथम स्वतःला मेला असाल*** *तरच येशू ख्रिस्तासाठी या पिढ्या उत्पन्न कराल. येशूने म्हटले आहे : ''मी तुम्हांला खचित खचित सांगतो, गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेला नाही तर तो एकटा राहतो, आणि मेला तर पुष्कळ पीक देतो''* (योहान.१२:२४).

यासाठी तुम्ही व्यक्तिशः जबाबदारी घ्याल का, त्यासाठी मुळापासून शोधचौकशी कराल का? नव्या करारानुसार शिष्य तयार करण्यासाठी त्यांची बांधणी उभारणी करण्यासाठी अचूक साधनसामग्री उपयोगात आणाल का? आणि पुनरुत्पत्तीचे कार्य भावी काळातही पिढ्यानपिढ्या चालू राहावे यासाठी देवाला स्वतःचे संपूर्ण समर्पण कराल का? देव आणि जगातील माणसे तुमच्याच प्रतीक्षेत आहेत.[२]

---

[२] माझा प्रिय तीमथ्य, ख्रिस्तामधील बंधू क्लिंट डेविस ह्यांचा मी फार फार आभारी आहे. हे पुस्तक प्रकाशनासाठी तयार करण्यासाठी त्यांनी एका ध्वनिमुद्रित संदेशाचे शब्दांकन केले. क्लिंट, देव कृपाळू आहे तो तुमच्या या कार्याचा उपयोग जगाला प्रभावित करण्यासाठी पिढ्यानूपिढ्या होऊ देईल!



## *प्रकरण ६*

# देवाचे गुणाकार कोष्टक

*''ज्या गोष्टी तू पुष्कळ साक्षीदारांसमक्ष माझ्यापासून ऐकल्या त्या इतरांना शिकवण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून दे''* (२ तीमथ्य.२:२).

पेन्टेकॉस्टच्या दिवशी महान आध्यात्मिक स्फोट झाला. त्या स्फोटाच्या शक्तीसामर्थ्याने आरंभीची मंडळी त्या काळी ज्ञात असणाऱ्या जगाच्या शेवटापर्यंत झेपावणार होती. पेत्राने नुकताच आपला संदेश सांगणे संपवले होते. येशूचे मरण व पुनरुत्थान यांचे शुभवर्तमान व पवित्र आत्म्याचे आगमन हे सर्व त्याने जाहीर केले. प्रे.कृ.२:४१ मध्ये सांगितले आहे : ''तेव्हा ज्यांनी त्याच्या संदेशाचा स्वीकार केला त्यांचा बाप्तिस्मा झाला; आणि त्या दिवशी त्यांच्यात सुमारे तीन हजार माणसांची भर पडली.'' खरेच भरपूर भर पडली होती! सुवार्तासंदेश सांगितल्याबरोबर एकाच दिवसात एवढे तीन हजार लोक ख्रिस्ताकडे आले तर कोणत्याही पाळकाचा आनंद गगनात मावणार नाही, त्याला आकाश ठेंगणे होईल यात शंकाच नाही. ''भर पडणे'' या शब्दाकडे विशेष लक्ष द्या. व.४७ मध्ये तोच शब्द आला आहे. ४२ ते ४४अ ही वचने पाहा नंतर हे वाक्य वाचा : ''... आणि प्रभू तारण प्राप्त होत असलेल्या माणसांची दररोज त्यांच्यात भर घालीत असे.'' भर घालणे हा शब्द पुन्हा लक्षात घ्या.

आता प्रे.कृ. ५:१४ हे वचन पाहा. हनन्या आणि सप्पीरा ह्यांच्या पापाचा व त्यांना झालेल्या शिक्षेचा वृत्तांत सांगितला आहे. व.१३ मध्ये असे आहे : ''आणि

त्यांच्यात सामील होण्यास इतर कोणाचे धैर्य होत नसे तरी लोक त्यांना थोर मानीत.'' ज्या मंडळीत सामील होण्याची लोकांना धास्ती वाटते अशा आध्यात्मिक दृष्ट्या शक्तिमान, समर्थ मंडळीचे सभासद होणे तुम्हाला आवडेल का? तरीपण व. १४ मध्ये असे आहे : ''विश्वास ठेवणारे पुष्कळ पुरुष व स्त्रिया ह्यांचे समुदाय प्रभूला मिळत गेले.'' त्यांचे ''मोजणीयंत्र'' बिघडले आहे. प्रभूकडे एवढे लोक येत होते की त्यांची मोजणी करणेही शक्य नव्हते.

आता सहावा अध्याय पाहा. त्यात लक्षणीय बदल दिसतो. आरंभीच्या मंडळीची वाढ करण्यासाठी देवाने केलेली गुणन योजना आता वेगाने वाढते आहे. पहिल्या वचनात आपण पाहतो : ''त्या दिवसांत शिष्यांची संख्या वाढत चालली असता हेल्लेणी यहूद्यांची इब्री लोकांविरुद्ध कूरकूर सुरू झाली; कारण रोजच्या वाटणीत त्यांच्या विधवांची उपेक्षा होत असे.'' 'संख्या वाढणे', 'वाटणीत पक्षपात', व 'कुरकुर' असा हा घटनाक्रम आहे. एखाद्या मंडळीमध्ये शिष्यांची सभासदांची संख्या वाढली की आणखी अधिक सेवांचा आरंभ होणे, अगत्याचे असते. म्हणजे नव्या सभासदांच्या हातांना काम मिळते आणि त्यांच्यासाठी योग्य ती तरतूद होते. आणि असे झाले नाही तर अंधारानंतर प्रकाश, रात्रीनंतर दिवस तसे सभासद वाढणे हा कुरकुरीचा आरंभ होय. जेवढे लोक जास्त तेवढ्या समस्या अधिक हा नित्याचा अनुभव आहे. विचार करा - तुम्ही स्वतःच कोणत्या ना कोणत्या प्रकारची समस्या आहातच!

या समस्येचे स्वरूप पाहा. तेथे दररोज पंक्तिसेवा होत असे. त्यात अन्न, इतर आवश्यक गोष्टी गरजवंत ख्रिस्ती व्यक्तींना देत असत. नवे ख्रिस्ती लोक मंडळीत बहुसंख्येने आले. ख्रिस्तावरील त्यांच्या विश्वासामुळे इतर लोक व समाज यांनी त्यांच्याशी संबंध ठेवणे थांबवले. त्यांना जणू वाळीत टाकले. परिणामी त्यांना आर्थिक अडचणींना तोंड देणे भाग पडले. हेल्लेणी हे ग्रीसमध्ये राहणारे त्यांच्या परंपरांनी चालणारे ग्रीकभाषी यहूदी होते. त्यांचा जन्म व रहिवास इस्राएल देशाच्या बाहेर होता. वल्हांडण व पेंटेकॉस्ट या सणांसाठी ते यरुशलेम येथे आले होते. यरुशलेममध्ये घडलेल्या नाट्यपूर्ण घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिल्या आणि सुवार्तासंदेशही ऐकला. परिणामी ते ख्रिस्ताकडे आले. इब्री (हिब्रू) लोक





इस्राएलमध्ये जन्मलेले यहूदी होते. पॅलेस्टिनी यहूद्यांची अरेमिक भाषा ते बोलत. या समूहात हेल्लेणी अल्पसंख्य होते. इब्री लोक बहुसंख्य होते. मग हेल्लेणी लोकांनी साहजिकच कुरकुर सुरू केली. रोजच्या वाटणीमध्ये आमच्या विधवांची उपेक्षा होते, त्यांना त्यांचा योग्य वाटा मिळत नाही हीच त्यांची तक्रार होती. बहुसंख्य लोक आपला स्वार्थ साधतात. आम्हा अल्पसंख्य लोकांकडे कोणीच लक्ष देत नाही, असे ते म्हणत. हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रेषितांनी सात ग्रीक भाषिक सेवकांची नेमणूक केली हे अगदी रास्त झाले नाही का? समस्या सोडवणे, कुरकुर थांबवणे, सर्वांना समान वागणूक देणे यासाठी कुरकुर, तक्रार करणाऱ्या पक्षातूनच देखरेख ठेवण्यासाठी कारभारी, सेवक नेमले. रोजची वाटणी त्यांच्या नजरेखाली होणार होती. प्रश्न सुटला. ''मग देवाच्या वचनाचा प्रसार होत गेला, यरुशलेमेत शिष्यांची संख्या फार वाढत गेली, याजकवर्गातील पुष्कळ लोकांनी ह्या विश्वासाला मान्यता दिली'' (प्रे.कृ.६:७). हे बहुहुणन एवढे प्रचंड होते की, यहूदी याजकवर्गालाही गळती लागली. अनेक याजक विश्वासात आले, यरुशलेममध्ये ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांच्या समूहात सामील झाले. आरंभीच्या मंडळीमध्ये गुणाकार बहुगुणन हाच वाढीचा सर्वसामान्य मापदंड आहे हे लक्षात घ्यावे.

अध्याय ९ मध्ये ही वाढ वेगाने होतच आहे. याच नवव्या अध्यायामध्ये सर्वांत थोर ख्रिस्ती विश्वासणाऱ्याचे, तार्सकर शौलाचे परिवर्तन कसे झाले, तो ख्रिस्ताकडे आला तो वृत्तांत सांगितला आहे. त्याचे परिवर्तन व त्याने दिलेले संदेश यामुळे यहूदी व ख्रिस्ती अशा दोन्ही जगामध्ये एकच खळबळ उडाली. ही खळबळ शांत झाल्यावर पुढे प्रे.कृ.९:३१ मध्ये पाहा : ''अशा प्रकारे सर्व यहूदीया, गालील व शोमरोन ह्या प्रदेशातील मंडळीस स्वस्थता मिळाली, आणि तिची उन्नती होऊन ती प्रभूच्या भयात व पवित्र आत्म्याच्या सामाधानात चालत असता वाढत गेली.'' आता मंडळ्यांची जोराने वाढ होत आहे. या प्रकारे मंडळ्यांची वाढ आज का होत नाही? असा प्रखर ख्रिस्ती विश्वास आज कुठे गेला? तेव्हा सुवार्ताप्रसारक संस्था, मिशनरी सोसायट्या, समित्या, मंडळीरोपण कार्यासाठी नेमलेले कामदार, परदेशातील सुवार्ताकार्य यातील काहीच नव्हते आणि तरी मंडळ्यांची वाढ झाली. असे आज का होत नाही? असला ख्रिस्ती विश्वास आज कुठे आहे?

आज अमेरिकेत अगर कोठेही पाळकांच्या परिषदेला, संमेलनाला जा, तेथे काय चालते ते पाहा. तुम्हांला या प्रश्नाचे उत्तर मिळेल. पाळक सभेसाठी येतात, परस्परांचे कुशल विचारतात तेव्हा काही ठराविक प्रश्नोत्तरे होतात, ''रविवारी भक्तीला भरपूर लोक येतात का?'' ''होय येतात.'' ''या वर्षी किती लोक आले?'' हा पुढचा प्रश्न. मित्रहो मंडळ्यांमध्ये सभासद किती वाढले हे महत्त्वाचे नाही. जगाची लोकसंख्या बहुगुणित होत असताना आमच्या मंडळ्यांमध्ये काही जणांची भर पडल्याने जगावर प्रभाव कसा पडेल? गुणाकाराने संख्या वाढतात तशा बेरजेने वाढत नाहीत. भर पडणे व बहुगुणन वेगळे. या बाबतीत कोणीतरी कोठेतरी आमची घोर फसवणूक केली आहे.

महापूर ओसरला. नोहाचे तारू जमिनीला टेकले. तारवाची द्वारे उघडली आणि सर्व प्राणी आनंदोत्सव करीत बाहेर येऊ लागले. सर्वजण आनंदी होते. पण फक्त दोघांची तोंडे वाकडी होती. हे दोन साप होते. तारवातून बाहेर येताना ते धाय मोकलून हंबरडा फोडून रडत होते. नोहाने त्यांना विचारले, ''अरे, तुम्हांला काय झालं. आज मोठा ऐतिहासिक दिवस आहे माहीत नाही का? रडता कशाला? बाकी सगळेजण आनंदाने नाचतबागडत आहेत.'' त्यातला एकजण दुःखाने बोलला, ''तुम्ही आम्हांला बहुगुणित व्हायला सांगितलं - ते आम्हांला कसे जमणार?'' आम्ही तर ॲडर आहोत.'' (येथे ॲडर [adder] या इंग्रजी शब्दावर कोटी केली आहे. हे ॲडर जातीचे साप आहेत. ॲडरचा एक अर्थ साप तर दुसरा अर्थ बेरीज करणारा असा आहे). या बालीश गोष्टीतून ख्रिस्ती समाजाची महान शोकांतिका दृष्टीसमोर येते. देवाने आम्हांला बहुगुणित होण्यासाठी पाचारण केले आहे आणि आम्ही केवळ बेरीज करण्यातच समाधानी आहोत. ही दुःखशोकास कारण होणारी स्थिती किती व्यापक आहे ते सांगणे, समजणे फार अवघड आहे.

ख्रिस्ती मंडळीत भर पडणे महत्त्वाचे आणि मोलाचे आहेच. लोक ख्रिस्ताकडे आल्याने पडणारी भर, वाढणारी संख्या नक्कीच वाढीस पोषक आहे. पण पडणारी ही भर पुढे बहुगुणित होण्यास कारण झालीच पाहिजे. तसे झाले नाही तर आपल्या कार्यपद्धतीत उणीव आहे हे नक्की आणि त्याचा विपरीत परिणाम जागतिक ख्रिस्ती समजावर होणार हेही नक्की.





येशूने आपल्या मंडळीला ''महान कामगिरी'' सोपवून दिली आहे. ती पूर्ण करण्याची आज्ञा केली आहे. ही महान कामगिरी देताना त्याने जे म्हटले त्यात सात क्रियापदांची रूपे असली तरी सुस्पष्ट अशी एकमेव आज्ञा आहे. ''शिकवा'' हीच ती आज्ञा आहे. पण यातही कोणीतरी आमच्यापासून काहीतरी दडवून ठेवले आहे. ''शिकवा'' यात केवळ शिक्षण देणे, शिकवणे केवळ एवढाच अर्थ नाही, तर त्यात शिष्य करा, मनुष्यांना शिकवून शिष्य करा हा सूचित अर्थ आहे (व.१९ मध्ये ''लोकांस शिष्य करा'' असे आहेच.) आपण कितीजणांनी ख्रिस्ताचा स्वीकार केला हा प्रश्न विचारण्याचे सोडून द्यावे आणि तुम्ही किती शिष्य शिकवून तयार करीत आहात हा प्रश्न विचारावा.

येशूने आपल्या बारा प्रेषितांसह सुमारे तीन वर्षे सेवाकार्य केले होते. शिष्य करणे, सुवार्ताप्रसार करणे या कामाचा परिपूर्ण आदर्श वस्तुपाठ देऊन एक कित्ता घालून दिला होता. योग्य प्रकारे कार्य होण्यासाठी पद्धत, प्रक्रिया व मापदंड हेही उदाहरणाने दाखवले होते. येशू ख्रिस्त हाच आद्य शिष्य करणारा. शिष्य करण्यासाठी त्याने योजलेली पद्धत आपण नीट पाहावी, समजून घ्यावी, अभ्यासावी आणि आत्मसात करावी. त्याने केले तसे आम्हांलाही करायचे, पुनरुत्पत्ती करणारे शिष्य तयार करायचे तर आपण त्याच्या पावलांवर पाऊल ठेवून चालले पाहिजे. कोणीही व्यक्ती स्वतः शिष्य करणारी असल्याशिवाय शिष्य असू शकत नाही हे माझे वैयक्तिक मत आहे. आम्ही त्याच्या अधीन असायचे, त्याचे प्रभूपण स्वीकारायचे तर महान कामगिरी केलेल्या करारात, दिलेल्या वचनात दुसरे शिष्य तयार करण्याच्या अटीचा समावेश आहेच असे मला वाटते. आपण नव्या कराराला अनुसरून शिष्य आहोत तर आपण शिष्य करणारे असणारच, असलेच पाहिजे यात शंका नाहीच.

## बहुगुणन करणाऱ्या शिष्याचे स्वभावचित्र

आता २ तीमथ्य अध्याय २ पाहा. येथे आपणाला शिष्याची सात लक्षणे स्पष्ट करणारी सात रेखाचित्रे दिली आहेत. तसेच ''देवाचे बहुगुणन कोष्टकही'' येथे आहे. प्रथम आपण शिष्याचे स्वभावचित्र पाहू. ही सात लक्षणे अगर वैशिष्ट्ये नव्या करारातील शिष्याच्या स्वभावचित्राचा एक एक भागच आहे.

## पुत्र

सर्वप्रथम नव्या करारातील शिष्य मुलगा, पुत्र आहे (व.१०). वरून जन्म झाल्याने तो देवाचा मुलगा आहे. पण येथे तो त्याला ख्रिस्ताकडे आणणाऱ्या विश्वासणाऱ्याचा आध्यात्मिक मुलगा-पुत्र आहे. पौल तीमथ्याला ''माझ्या मुला'' असे म्हणतो, कारण त्याने त्याला ख्रिस्ताकडे आणले. पौल सुवार्ताप्रसारासाठी प्रवास करीत असे. एका प्रवासात तो तीमथ्य राहत असे त्या गावात आला. तेथे त्याचा एका कुटुंबाशी परिचय झाला. त्यात लोईस नावाची आजी व युनिके नावाची आई होत्या. त्या दोघीही जुन्या कराराचा अभ्यास करीत (२ तीमथ्य.१:५).

युनिके हिचा मुलगा तीमथ्य. त्याचे वडील ग्रीक होते. तीमथ्याला पवित्र शास्त्राची चांगली ओळख होती त्यामुळे पौलाचे काम सोपे झाले. त्याने त्याला सुवार्ता सांगून ख्रिस्ताकडे आणले. तीमथ्याला आणखी शिक्षण देत असता त्याला चांगली आध्यात्मिक समज आहे असे पौलाच्या लक्षात आले. पौल सुवार्ताप्रसारासाठी पुढे प्रवासास गेला तेव्हा त्याने तीमथ्याला प्रोत्साहन दिले. येशूबरोबर चालत राहा असे सांगितले. तसेच तीमथ्यासाठी दररोज प्रार्थना करण्याचे अभिवचन देऊन शक्य तेव्हा पुन्हा येऊन तुला भेटेन असे सांगून पौल पुढील प्रवासास गेला.

त्यानंतर काही काळानंतर दुसऱ्या एका सुवार्ताप्रसार फेरीच्या वेळी पौल पुन्हा तीमथ्याच्या घरी, त्याच्या गावी आला. तीमथ्याची आध्यात्मिक प्रगती पाहून पौलाला फार आनंद झाला. तेथून पुढच्या प्रवासाला जाताना त्याने तीमथ्याला विचारले, ''तीमथ्या, माझ्याबरोबर येतोस का?'' तीमथ्य चकित झाला. ''मी तुझ्याबरोबर येऊ?'' त्याने विचारले. पौल म्हणाला, ''होय, माझ्याबरोबर चल.'' ''ठीक आहे, पण आपण काय करायचं?'' ''मी काय करतो, कसा बोलतो ते तू पाहा, माझ्यासाठी प्रार्थना कर. मग आपण रात्री बोलत बसू.'' तुम्ही ख्रिस्ती असाल, तुम्हांला दूरदृष्टी असेल तर तुम्हीही अशाच प्रकारे शिष्य करीत राहाल.

चांगला मुलगा काय करतो? तो आईवडिलांकडून शिकतो. त्यांच्यावर प्रेम करतो, त्यांच्या आज्ञा पाळतो. कुटुंबाचे रीतीरिवाज पुढे चालवतो आणि आध्यात्मिक पुत्रही तसेच करतो.





## सैनिक-शिपाई

दुसरा मुद्दा : नव्या करारातील शिष्य सैनिक आहे. ''ख्रिस्त येशूचा चांगला शिपाई या नात्याने माझ्याबरोबर दुःख सोस, शिपाईगिरी करणारा माणूस संसाराच्या कार्यात गुंतत नाही; ह्यासाठी की, ज्याने त्याला सैन्यात दाखल करून घेतले त्याला त्याने संतुष्ट करावे'' (२ तीमथ्य.२:२,३). चांगला शिपाई काय करतो? त्याच्यावर सोपवलेले काम, कर्तव्य नीटपणे करण्यासाठी तो आपले स्वतःचे बेत आणि उद्देश बाजूस ठेवतो. तो अगदी कसून मेहनत करतो, अंगी शिस्त बाणवून घेतो आणि प्रशिक्षण घेतो. तो स्वदेशाचे हित जपतो. जरूर तेव्हा तो लढण्यास तयार असतो. थोडक्यात, तो कष्ट व त्याग करण्यास, संकटाशी दोन हात करण्यास सज्ज असतो. आणि दिलेली जबाबदारी सांभाळून कर्तव्य करीत राहण्यासाठी त्याला नेहमीच तयार, तत्पर राहावे लागते.

*प्रिय सेनापती, लढाईत झालेल्या जखमा तुमच्याच होत्या,*
*त्यातील काही दुःखे वेदना माझ्या वाट्याला आल्या*
*तर त्याचे नवल वाटू नये*
*हे प्रभू माझ्या अंतरंगाची हीच आशा असावी*
*की युद्धामध्ये तुझ्याबरोबर जखमेत सहभागी व्हावे.*

## कसरतपटू-मल्ल

तिसरा मुद्दा पाहा, नव्या करारातील शिष्य एखाद्या मल्लासारखा आहे. व.५ मध्ये सांगितले आहे, ''जर कोणी मल्लयुद्ध करितो, तर ते नियमाप्रमाणे केल्यावाचून त्याला मुकुट घालीत नाहीत.'' नव्या करारामध्ये मल्ल, कसरतपटू, तालीमबाज वगैरे संबंधात ५० पेक्षा अधिक उल्लेख, संदर्भ आहेत असे सांगतात. चांगला मल्ल - खेळाडू काय करतो? तो त्याने निवडलेल्या क्रीडाप्रकाराला सर्वस्वी वाहून घेतो. त्याचे प्रशिक्षण घेऊन सतत सराव करतो. आवश्यक ती कौशल्ये अंगी बाणवतो, मनाला तसेच शरीराला कडक शिस्त लावतो, सर्व बाबतीत संयम ठेवतो आणि

पहिला क्रमांक मिळवण्यासाठी कसून यत्न करतो. ख्रिस्ताच्या मागे चालणारा ख्रिस्त शिष्यही असेच करील. कोणत्याही बाबतीत तो उणा पडणार नाही.

## शेतकरी

चौथा मुद्दा आहे : नव्या करारातील शिष्याची तुलना एखाद्या शेतकऱ्याबरोबर केली आहे (व.६). चांगला शेतकरी काय करतो? तो कष्ट करतो, शेताची मशागत करतो, नांगरणी व पेरणी करतो. मग उगवलेले पीक जपतो, शेतातले तण काढून टाकतो, आवश्यक तर पिकाला पाणी देतो आणि अखेरीस पिकाची कापणी करतो. पीक गोळा करतो. नंतर पुढे पेरणीचा हंगाम आला की, पेरणी करण्यासाठी बियाणे राखून ठेवतो. पेरणी, कापणी, बहुगुणन म्हणजे भरपूर. पेरलेल्याच्या शतपटीने पीक घेणे हे सर्व शिष्य असणे व शिष्य करणे या कामी मार्गदर्शक आहे. शिष्यत्त्वाचे शिक्षण देणे हेही आध्यत्मिक नांगरणी, पेरणी, मशागत, कापणी, साठवणी व परत पेरणी इ. सारखेच आहे. शेती करणे व शिष्य करणे या दोहोंत बरेच साम्य आहे.

## कामकरी

हा पाचवा मुद्दा पाहा : नव्या करारातील शिष्य कामकरी आहे (व.१५). शिवाय तो कुशल कामकरी आहे. त्याने लाज वाटण्यास कसलेही कारण नसणारा, सत्याचे वचन नीट सांगणारा कामकरी असले पाहिजे आणि यासाठी त्याने आपण ''देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी'' असावे यासाठी आवश्यक ते सर्व काही केले पाहिजे. ख्रिस्ती शिष्य या नात्याने आम्ही येथे मजेत भटकण्यासाठी नाही तर कष्ट, कसून काम करण्यासाठी आहोत.

## पात्र

आता सहावा मुद्दा : नव्या करारामधील शिष्य एखाद्या पात्रासारखा आहे (व.२०-२१). पात्र, भांडे म्हणजे काय? पात्र हे धातूचे अगर लाकडाचे आणि मातीचेही घडवलेले असते. ते खोलगट, गोलाकार असून त्यामध्ये पदार्थ, पाणी इ.





ठेवता येतात. आपण ख्रिस्ती आहोत, पात्र आहोत. या पात्रामध्ये म्हणजेच आपणामध्ये प्रत्यक्ष ख्रिस्ताचे जीवन सामावून व्यक्त केले पाहिजे. उत्तम पात्र काय करते? ते धन्याच्या कामी येण्याच्या प्रतीक्षेत फळीवर अगर फडताळात बसून असते. धन्याच्या इच्छेप्रमाणे त्याने वापरावे याचीच ते प्रतीक्षा करते. आपला प्रभू आपणाला काही सेवा सांगेल का तसेच मोकळे ठेवील अशा शंकेने व्याकूळ होण्याचे ख्रिस्ती शिष्याला काहीच कारण नाही. ''आत्म्याने परिपूर्ण व्हा'' (इफिस ५:१८). ही आज्ञा त्याला दिलीच आहे. पात्र भरले की ते पुन्हा रिकामे होण्याची वाट पाहते. इतर पात्रे, भांडी वापरतात तसेच आपणालाही वापरावे यासाठी हे पात्र धन्याची प्रतीक्षा करते. ख्रिस्ती शिष्यानेही असेच असावे आणि वागावे.


## दास

अखेरचा मुद्दा : नव्या करारातील शिष्य ''दास'' ''गुलाम'' यांच्यासारखा आहे (व.२४). दासाला स्वतःची इच्छा नसते. त्याचा स्वतःचा काही कार्यक्रम नसतो, हक्क नसतो आणि स्वतःची अशी मालमत्ता, चीजवस्तू काहीच नसते. तो सर्वस्वी त्याच्या मालकाच्या अधीन असतो. धनी सांगेल ते करण्यास तो हरघडीला तयार असतो. परंतु त्याला साधनसामग्रीची कधी उणीव पडत नाही. धनी सांगेल ती कामगिरी पूर्ण करण्यासाठी त्याच्या धन्याचे भांडार विपुल आहेच. ख्रिस्ती शिष्याचेही तसेच आहे. सांगितलेले काम कसे करावे याची चिंता त्याला नाही, त्याचा प्रभू साधनसामग्री पुरवण्यास समर्थ आहे.

## बहुगुणन होण्यासाठी शिष्य तयार करणे

आपण शिष्य कसा असतो, काय करतो ते २ तीमथ्य २ मधून पाहिले. आता शिष्यांचे बहुगुणन म्हणजे त्यांची संख्या झपाट्याने वाढावी यासाठीची प्रक्रिया पाहूया. या पद्धतीला मी ''देवाचे गुणाकार कोष्टक'' हे नाव दिले आहे. ही रीत २ तीमथ्य.२:२ मध्ये नमूद केली आहे. पौलाने तीमथ्याला सांगितले आहे : ''ज्या गोष्टी तू पुष्कळ साक्षीदारांसमक्ष माझ्यापासून ऐकल्या त्या इतरांना शिकविण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून दे.'' या एकाच वचनामध्ये शिष्यांच्या चार

पिढ्यांचा उल्लेख आहे हे लक्षात घ्या.'' माझ्यापासून - तू - विश्वासू माणसे - इतर लोक.'' या वचनातील गुणाकाराची प्रक्रिया पुढीलप्रमाणे दाखवता येईल :




आरंभी साधारण बीजरुपाने सुरू होणारी ही प्रक्रिया पुढे व्यापक होते. तिचा विस्तार होतो असे या आकृतीतून दिसते. सर्व काही मी आणि तू येथून सुरू होते. हे मी व तू येथे अनुक्रमे पौल व तीमथ्य आहेत त्यांच्या सहचर्यावरून शिष्य करण्यासंबंधातील दोन अतिमहत्त्वाच्या गोष्टी स्पष्ट होतात

१) व्यक्तीचे महत्त्व आणि

२) विधायक नातेसंबंध असण्याचे महत्त्व

आरंभीच्या दोघा व्यक्तींमधून कोणा एकाला जरी वजा केले - पौलाला अगर तीमथ्याला बाजूस ठेवले तर ही प्रक्रिया आरंभालाच कोसळणार हे सांगणे नकोच. गुणाकार व्हायचा तर आरंभीच एक सज्जड पूर्ण संख्या हवी आणि तिच्याशी संबंधित संख्याही हव्यात.

बहुगुणन होण्यासाठी पौल व तीमथ्य दोघेही विशिष्ट गुणांचे आणि शिष्य म्हणून समर्पित झालेले असणे अगत्याचे आहे. तसेच त्यांचा परस्पर आपुलकीचा, जिव्हाळ्याचा संबंध असणे गरजेचे आहे. शिवाय ते एकमेकांच्या विश्वासास पात्र असावेत. ईश्वरविज्ञानाच्या दृष्टीने मंडळीमध्ये असे परस्परसंबंध शोधणे, सविस्तरपणे प्रस्थापित करणे जरुरीचे आहे. मंडळीमधील नातेसंबंधाचे हे विश्व अद्याप कोणीच पाहिले नाही, शोधले नाही मग त्याचा लाभ घेणे दूरच. पौल आणि तीमथ्य यांचे परस्पर संबंध विश्वासावर आधारलेले नसते, ते परस्परांशी हितगुज करण्यात, संपर्क साधण्यात तत्पर नसते तर शिष्य करण्याची ही साखळी पहिला





दुवा जुळण्यापूर्वीच तुटली असती पण आपणासाठी व सर्व भावी पिढ्यांसाठी आनंदाची गोष्ट हीच की पौल चांगला मनमिळाऊ, ख्रिस्ताची उत्तम वकिली करणारा, खुल्या दिलाचा, पाहता क्षणी दुसऱ्यावर छाप पाडणारा होता. आणि तीमथ्य शिकण्यास तयार, विश्वासू, आज्ञाधारक शिष्य होता.

## शिष्याशी संपर्क कसा साधावा?

पौलाने तीमथ्याला कसे शिकवले? त्याच्याशी संपर्क कसा साधला? हे प्रश्न साहजिकच पुढे येतात. पौलाच्या अंतःकरणाला असलेली सुवार्ताप्रसाराची, शिष्य करण्याची ओढ तीमथ्याच्या अंतःकरणातही कशी गेली? शिष्य करणे, त्यांना शिकवून तयार करणे यासाठी तो कसा उत्सुक झाला? पौलाने म्हटले, ''ज्या गोष्टी तू... माझ्याकडून ऐकल्या...'' ही काही फक्त ऐकण्याची गोष्ट आहे का? शिक्षणक्रम केवळ शैक्षणिक संकल्पना घेऊन तयार केला गेला आहे काय? त्यात फक्त तात्त्विक विचार कल्पना वर्गखोलीच्या चार भिंतीमध्ये शिकवल्या जातात काय? हे विचार पाठशाळेत, वर्षानुवर्षे पिढ्यान्‌पिढ्या शिकवायच्या आहेत काय? नाही, असे मुळीच नाही. नव्या करारामध्ये 'ऐकणे' याचा अर्थ काय आहे? आध्यात्मिक ज्ञान घेण्यासंदर्भात पाहणे, वास घेणे, चव घेणे, स्पर्श करणे या कशाचाही उल्लेख न करता 'ऐकणे' असा उल्लेख का बरे केला आहे? प्रत्येक शारीरिक ज्ञानेंद्रियाच्या जोडीला पूरक आध्यात्मिक सूत्र आहेच. तरीपण 'ऐकणे' असा एकच उल्लेख का केला आहे? ऐकण्याच्या माध्यमातून वस्तुनिष्ठ सत्यता अगदी थेट अंतरंगापर्यंत पोचते हे तर त्याचे कारण नसेल का? इतर कोणत्याही ज्ञानेंद्रियाच्याद्वारे बाह्य गोष्टींचा अनुभव घेण्यासाठी काही रूपांतरण प्रक्रिया होण्याची गरज असते. उदाहरणार्थ, पाहणे, दृश्य प्रतिमा पाहिल्यावर त्या अंतरंगात पोचण्यासाठी प्रथम कल्पना व विचार यात त्यांचे रूपांतरण होते अगत्याचे आहे. स्पर्श, रस, गंध याही बाबतीत असेच आहे. पण ऐकण्याचे तसे नाही. येथे सर्वांत थेट संपर्क संवाद साधला जातो. ''विश्वास वार्तेने (ऐकण्याने) आणि वार्ता (ऐकणे) देवाच्या वचनाच्या द्वारे होते.'' (वचन - ऱ्हेमा - प्रेमाने - आपुलकीने सांगितलेले वचन).

## ऐकण्याच्या प्रक्रियेत आवश्यक बाब

शिष्य करण्याच्या एकंदर प्रक्रियेमध्ये या सर्वसमावेशक ''ऐकण्याचे'' महत्त्व कसे आहे? २ तीमथ्य.३:१०-११ या दोन वचनांमधून आपणाला याचे मर्म कळते. पौलाने लिहिले आहे : ''तू माझे शिक्षण, आचार, संकल्प, विश्वास, सहनशीलता, प्रीती, धीर, छळ, माझ्यावर आलेली संकटे ही ओळखून आहेस.'' तीमथ्याच्या सहवासात असताना पौलाचे जीवन त्याच्यासमोर उघड्या पुस्तकासारखे पूर्णपणे पारदर्शक होते. पौलाचे विचार सिद्धान्ततत्त्वे (शिक्षण), आचरण, राहणी, जीवनक्रम, उद्दिष्ट, (संकल्प), विश्वास (एकनिष्ठ समर्पित वृत्ती), सहनशीलता (छळ, त्रास, धीराने सोसण्याची क्षमता), प्रीती या सर्व गोष्टी तीमथ्याला चांगल्या माहीत होत्या. पौलाने त्याच्यापासून काहीही लपवून ठेवले नाही.

'माझ्याबरोबर माझ्या सहवासात' या तत्त्वानुसार चालल्याने वरील परिणाम पूर्णपणे साधला जातो. येशूने ''त्यांनी आमच्याबरोबर असावे यासाठी बारा जणांची नेमणूक केली'' (पाहा मार्क.३:१४). शिष्य होणे, असणे व शिष्य करणे या जीवनशैली शिकून घ्यायच्या नाहीत तर प्रत्यक्ष अनुभवाने, सहवासाने आत्मसात करायच्या आहेत. पौलाच्या सहवासात राहून त्याच्या बरोबर दीर्घकाळ प्रवास केल्यावर एखाद्या व्यक्तीमध्ये बदल झाला नाही असे कधीच होणार नाही.

## शिष्याला सज्ज केल्यावर तो काय करतो?

तीमथ्याला शिकवून तयार केले, पूर्णपणे सज्ज केले, पूर्णपणे प्रशिक्षित केले. मग पुढे काय? त्याचे काय करायचे आहे? ''ज्या गोष्टी तू पुष्कळ साक्षीदारांसमक्ष माझ्यापासून ऐकल्या त्या इतरांना शिकवण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून दे.''

यातील तीमथ्याची भूमिका समजून घेण्यासाठी दोन शब्दांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. त्याने ''त्या गोष्टी'' (संपूर्ण विश्वास, जीवनक्रम, जीवनशैली व





समर्पितपणा, बांधिलकी हे सर्व) विश्वासू माणसांना सोपवून द्यावयाच्या आहेत. येथे आपण पुष्कळच दक्षता घेणे जरूर आहे. ख्रिस्ती विश्वासाच्या आगळ्यावेगळ्या मर्माचे हे एक आवश्यक वैशिष्ट्य आहे. जेव्हा हे कार्य व्यवस्थित होते तेव्हा त्यातून दुसऱ्या तिसऱ्या पिढीपर्यंत नेतृत्त्व तयार होण्याची, टिकून राहण्याची हमी मिळते. म्हणूनच शिष्य करणाऱ्याने ही प्रक्रिया, या गोष्टी फक्त विश्वासू लोकांच्या अंतःकरणावर ठसवणे महत्त्वाचे आहे. त्याचे शिष्य अविश्वासू निघाले तर ही प्रक्रिया, हे कार्य तेथेच त्यांच्याबरोबर संपुष्टात येते आणि पुढील सर्व पिढ्या एका अर्थी पोरक्या होतात. त्यांना कुशल आध्यात्मिक नेता कोणीच मिळत नाही.

''सोपवून दे'' हे या वचनातील महत्त्वाचे शब्द आहेत. आपण हे शब्द नीट समजून घेतले पाहिजेत. मुळात ही सावकारी पेढीवरची संज्ञा आहे. तुम्ही एखाद्या सावकाराकडे अगर बँकेकडे ठेव ठेवता तेव्हा तुमच्या ठेवीवर व्याज मिळणार ही तुमची अपेक्षा असते. तसेच तुम्ही एखाद्याला शिष्य करता तेव्हा तुम्ही एका पापी व्यक्तीला पापापासून परावृत्त करता एवढेच नाही तर तुम्ही त्याच्यामध्ये संख्यात्मक व गुणात्मक गुंतवणूक करता आणि त्यावर तुम्हांला सर्वकाळ व्याज मिळत राहील.

## गुंतवणूक का खर्च?

मी आता तुम्हांला एक महत्त्वाचा गंभीर प्रश्न विचारतो, तुमचे सध्याचे जीवन आचरण एक गुंतवणूक आहे का खर्च आहे? तुम्ही तुमचे जीवन खर्च करीत आहा का गुंतवीत आहात? नीट बारकाईने विचार करा. तुम्ही ते खर्च करीत असाल तर लक्षात घ्या खर्चून टाकले की संपले, मागे काही शिल्लक राहत नाही. त्यापासून काही नफा, व्याज वगैरे मिळत नाही. खरे सांगायचे तर आपली बहुतेक 'ख्रिस्ती कामे' मंडळीत प्रार्थनेला जाणे, पवित्र शास्त्रवाचन, प्रार्थना वगैरे अधिक करून खर्चच आहेत. त्यातून गुंतवणूक होत नाही! ''आपण चांगले ख्रिस्ती व्हावे,'' तग धरून टिकून राहावे, समाजात मान्यता असावी या हेतूने ही कृत्ये केली जातात. पृथ्वीच्या टोकापर्यंत, काळाच्या अंतापर्यंत जगाला प्रभावित करील अशी ही गुंतवणूक मुळीच नाही.

तीमथ्याला पौलाकडून ख्रिस्ताच्या जीवनाची संपूर्ण गुंतवणूक ठेव मिळाली होती. ती घेऊन त्याने विश्वासू माणसांकडे सोपवून द्यायची आहे. आणि हे लोक इतरांना शिकवण्यास योग्य असले तरच ही एकंदर प्रक्रिया व्यवस्थितपणे पूर्ण होते. तसे झाले नाही, तर 'ठेव' खर्च होते, गुंतवणूक शिल्लक राहत नाही आणि व्याज, नफा काहीच मिळत नाही. शिष्य करण्याची ही प्रक्रिया अधिक आणि अधिक विस्तृत होणे आवश्यक आहे. या प्रक्रियेचा व्याप सतत वाढत राहून त्यात सतत लोकांची भर पडली पाहिजे.

## बहुगुणनाचे महत्त्व व त्यातील सुप्त शक्ती दाखवणारी उदाहरणे

बहुगुणनाचे महत्त्व त्यातील सुप्त शक्ती दाखवण्यासाठी मी आपल्यापुढे काही सर्वसाधारण उदाहरणे ठेवतो.

### सुवार्तिक

समजा एक सुवार्तिक आहे. तो दररोज एक हजार व्यक्ती ख्रिस्ताकडे आणतो (आणि ते सर्व ख्रिस्ती होतात). तसेच आणखी असेही समजा की, जगाची एकंदर लोकसंख्या आज मितीला ''गोठवली'' म्हणजे जगातील अखेरच्या व्यक्तीला ख्रिस्ताकडे आणीपर्यंत कोणीही जन्मणार नाही अथवा मरणार नाही, तर आजच्या जगातील सर्व लोकांना ख्रिस्ताकडे आणण्यासाठी पंधरा हजाराहून अधिक वर्षे लागतील. आणि लक्षात घ्या हे सर्वजण ख्रिस्ताकडे आले आहेत त्याचे शिष्य झाले आहेतच असे नाही.

### दररोजच पेन्टेकॉस्ट

किंवा अशी कल्पना करा. पेन्टेकॉस्टच्या दिवशी जे घडले तेच, तसेच दररोज घडले. रोज ३००० लोकांनी ख्रिस्ताचा स्वीकार केला, तर जगाची आजची लोकसंख्या सर्वच्या सर्व ख्रिस्ताकडे येण्यासाठी पाच हजार वर्षे लागतील. आणि ही लोकसंख्या स्थिर नाही, चल आहे म्हणजे दर क्षणाला कोणीतरी मरते आहे आणि जन्मते आहे. लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढते आहे. आपले कार्य पूर्ण होण्याची





काही आशा वाटत नाही. होय नाही?

म्हणूनच आपण पवित्र शास्त्रातील मापदंडानुसार बहुगुणन केले पाहिजे. हे यांत्रिक, तांत्रिक अनुमानावर आधारलेले उदाहरण आहे. पण आध्यात्मिक गुणाकार केल्याने काय साध्य होते ते आपणाला यातून चांगले समजेल, एका जरी शिष्य करणाऱ्याने हे काम सर्वस्वी मनावर घेतले असेल तर तो चांगला शिक्षक होऊ शकतो आणि त्याने एका शिष्याला एक वर्षभर प्रशिक्षण देऊन तयार केले आणि दर वर्षी त्याने हाच क्रम चालू ठेवला, तसेच त्याने तयार केलेले शिष्य त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर एकेका शिष्याला शिक्षण देत राहिले आणि ही प्रक्रिया अशीच चालत राहिली. वर्षानुवर्षे बहुगुणन झाले तर दररोज १००० व्यक्ती ख्रिस्ताकडे आणणाऱ्या सुवार्तिकाने केलेले कार्य तेविसाव्या वर्षाच्या आरंभीच पूर्ण होईल आणि (याच अनुमानविचारानुसार) सुमारे ३५ वर्षांमध्ये जगातील सर्व लोकांना शिष्यपणाचे शिक्षण दिले जाईल. सुवार्तिकाने व्यक्तींना केवळ 'ख्रिस्ताकडे आणले, ते ख्रिस्ती झाले' आणि या दूरदृष्टीच्या बहुगुणन करणाऱ्याने ख्रिस्तासाठी 'शिष्य' केले यातील फरक लक्षात घ्या.

येथे एक महत्त्वाचा इशारा : ही उदाहरणे फक्त एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी दिलेली आहेत. सुवार्तिक, सुवार्ताप्रसारक, आत्मे जिंकणारे यांचे कार्य आणि शिष्य करण्याचे कार्य यांची परस्पर तुलना करणे त्यातून एकाचे काम चांगले, दुसऱ्याचे कमी प्रतीचे असे सुचवलेले नाही आणि तसा कोणी प्रयत्नही करू नये. या सर्व भूमिका परस्परपूरक आहेत. प्रत्येक भूमिका पूर्णपणे आवश्यक आहेच आणि प्रौढ, अनुभवी विश्वासणाऱ्या व्यक्तीमध्ये या दोन्ही भूमिका एक झाल्या तर फारच चांगले होईल.

### पैसा दुप्पट होणे

आणखी एक साधे, परिचयाचे उदाहरण पाहा. समजा ३१ दिवसांच्या महिन्यात मी पहिल्या दिवशी तुम्हांला एक पैसा दिला व पुढे प्रत्येक दिवशी त्याच्या दुप्पट याप्रमाणे एकतीस दिवस पैसे देऊ केले (म्हणजे पहिल्या दिवशी एक पैसा, दुसऱ्या

दिवशी दोन पैसे, तिसऱ्या दिवशी चार पैसे, पाचव्या दिवशी आठ पैसे वगैरे). अगर तुम्हांला एकंदर एक लाख रुपये देऊ केले तर तुम्ही ९७ लक्ष रुपयांहून अधिक रक्कम गमावली असे होईल. पण लक्षात ठेवा, याचा आरंभ फक्त एक पैशाने झाला आहे. पहिला पैसा गुंतवल्याशिवाय ही प्रक्रिया सुरू होतच नाही हे विसरू नका.

शिष्य तयार करण्याच्या कामाला चांगली गती का मिळत नाही? खरं सांगायचं तर देवाला पुरेसे गुणवत्तायुक्त पहिले पैसे मिळतच नाही. संपूर्ण जगामध्ये ही प्रक्रिया सुरू करण्यास आवश्यक एवढे दूरदृष्टीचे शिष्य करणारे लोक उपलब्धच नाहीत. पण यामुळे आपण धीर सोडायचे, निराश होण्याचे काहीच कारण नाही. दूरदृष्टी ठेवली व यथार्थपणे संवाद साधला तर ही उणीव आपल्याला वाटते त्याहून अधिक वेगाने झपाट्याने पूर्ण करता येईल. आणि लक्षात ठेवा, पौल तीमथ्यासाठी 'दुसरा पैसा' आहे. ही प्रक्रिया विशेषतः पहिल्या दोन पैशांची गुणवत्ता, कार्य, निष्ठा, दृष्टान्त, दूरदृष्टी व बांधिलकी यांवर अवलंबून आहे. याचे कारण हेच की, सामान्यपणे आरंभी या प्रक्रियेची आदर्श उदाहरणे आहेत व त्यांच्या सोबत्यासहकाऱ्यांच्या नजरेस एवढेच नमुनेदार दिसणार हे शोचनीय तरीही सत्यच आहे.

तेव्हा पैसा क्रमांक एक व पैसा क्रमांक दोन हे सर्वात महत्त्वाचे आहेत पण एकाचे दोन, दोनाचे चार, चाराचे आठ याप्रमाणे वाढ होऊन अखेर एकतिसाव्या दिवशी किती वाढ होईल याचा विचार करा. याप्रमाणे रोज दुप्पट या प्रकारे दिलेली रक्कम शेवटच्या दिवशी त्रेपन्न लक्ष रुपयांवरून सुमारे १०६ लक्ष रुपये एवढी होते. अंतिम परिणाम साधण्यासाठी प्रत्येक दिवसाचा गुणाकार महत्त्वाचा आणि आवश्यक आहे. गुणाकाराच्या या प्रक्रियेत एक जरी ख्रिस्ती अपयशी ठरला तर त्याच्या हयातीत महान कामगिरी पूर्ण केली जाण्याची शक्यता तो निम्म्याने कमी करतो, पुसून टाकतो. पण एक ख्रिस्ती माणूस गुणाकाराच्या कार्यात यशस्वी झाला तर त्याने ही कामगिरी त्याच्या हयातीत पूर्ण करण्याची शक्यता दुपटीने वाढते.

## शिष्य करून जगावर प्रभाव टाकण्याची दूरदृष्टी

ख्रिस्ती बांधवहो, शिष्य तयार करून जगाला प्रभावित करणे असा दृष्टान्त





दूरदृष्टीने तुम्ही पाहिला आहे का? तुम्ही व्यक्तींच्या जीवनामध्ये येशूची जीवनशैली, येशूची दूरदृष्टी, आणि येशूसारखी बांधीलकी यांची गुंतवणूक करीत आहात का? त्यांनीही तुमच्याप्रमाणे दृष्टान्त पाहावा तशीच समर्पित बांधिलकी ठेवावी आणि हे सर्व इतरांनाही द्यावे यासाठी तुमचे प्रयत्न सुरू आहेत का? कोणीतरी अगदी सुज्ञपणे म्हटले आहे की, आपल्या सारखीच दूरदृष्टी इतरांना यावी, त्यांनाही दृष्टांत पाहता यावा, दिसावा यासाठी प्रथम तुम्ही स्वतः तो दृष्टान्त

- *स्पष्टपणे पाहायला हवा.*
- *सृजनास उपयुक्त अशा प्रकारे सादर करावा.*
- *सातत्याने दाखवीत राहा.*
- *सहानुभूतीपूर्वक आपुलकीने त्याविषयी बोला* आणि
- *काळजीपूर्वक जतन करा.*

स्टॅसी राईनहार्ट ह्यांनी त्यांच्या **'लिव्हिंग इन द लाइट ऑफ इटर्निटी'** या पुस्तकात सांगितले आहे : ''१९६०-६९ या काळात ख्रिस्ताकडे आलेल्या आमच्यापैकी काहीजणांना वाटत होते, आम्ही आमच्या पिढीतच संपूर्ण जग बदलून टाकू! लोकांचे थवेच्या थवे येऊन रांगा लावून शिस्तीने उभे आहेत, त्यांना जीवनाचे पाणी हवे आहे, ते आमच्याकडून घेण्यासाठी सर्व शांतपणे वाट पाहत आहेत. अशी स्वप्ने आम्ही मनाशी रंगवत होतो. पण तेव्हापासून आतापर्यंत जग अधःपाताच्या गर्तेत खोल खोल कोसळत आहे. जगाची अवस्था अतिशोचनीय, दुःखकारक झाली आहे. आम्ही सर्वांनीच आमच्या अपेक्षांची पातळी व्यक्तिशः पूर्वीपेक्षा खूपच खाली खाली आणली आहे. आता हयातभर कार्य करून अखेरीस अगदी मूठभर लोकांना साहाय्य करता आले तर आम्ही त्यातच धन्यता मानू. परंतु या प्रकारे भ्रमनिरास होऊन अपयशाने खचून जाऊ नये यासाठी आम्ही स्वतःलाच एक प्रश्न विचारतो : आम्ही खरोखरच आमच्या अपेक्षा कमी केल्या आहेत का? आमचा दृष्टान्त अगदीच क्षुल्लक, लहानसा होता का? खरोखरी त्या करण्याच्या लायकीचा तो नव्हता का? नाही, आम्ही त्या एकाचा विचार मनात आणतो तेव्हा आम्हांला तसे वाटत नाही. त्याने मूठभर लोकांना घेऊन सर्व जगाशी संपर्क साधला. तो

सातत्याने लोकांच्या मध्ये त्याचे स्वतःचे जीवन बहुगुणित करीत आहे. त्यातून मिळणारे परिणाम फळ नोंदून ठेवण्यास आम्ही तेथे असू वा नसू तरी त्याचे कार्य चालूच आहे.''

वास्तविक पाहता मूठभर लोकांना सहाय्य करण्याचे उद्दिष्ट ठेवणे म्हणजे अपेक्षा कमी करणे, खालच्या पातळीवर आणणे नव्हे. काळाच्या अंतापर्यंत, पृथ्वीच्या शेवटापर्यंत जगावर एका व्यक्तीने गुणात्मक प्रभाव पाडण्याची हीच एकमेव रीत, पद्धत आहे.

पुढे त्याच पुस्तकात श्री. राइनहार्ट ह्यांनी म्हटले आहे : ''अनेक असंख्य जीवनावर सार्वकालिक प्रभाव पाडण्याची सुप्त शक्ती, क्षमता प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीमध्ये आहे.'' परंतु काही गंभीर, अवघड वाटणारे प्रश्न विचारलेच पाहिजेत. येशू ज्याचा पाठलाग करीत होता, त्याच ''कोल्ह्या''चा पाठलाग आम्ही करतो आहोत का? आमचे दोघांचे 'त्याचे' व 'आमचे' लक्ष एकच. लोकांनी भरलेले हे विशाल जग! आम्ही ज्यांच्याबरोबर कार्य करीत आहो त्या व्यक्तींच्या जीवनात प्रत्यक्षात पद्धतशीरपणे गुणात्मक गुंतवणूक करतो आहोत का? तो ''कोल्हा'' आता आमच्या आवाक्यात आला आहे याची हमी यातून मिळते आहे का? आम्ही तोच दृष्टान्त, तीच दूरदृष्टी दुसऱ्यांना देत आहोत का? आमचे शिष्य त्या दृष्टान्ताने प्रभावित, उत्तेजित व प्रेरित झाले आहेत काय?आणि तेही आपोआप, विनासायस हीच दूरदृष्टी इतरांना देत राहतील अशी खातरजमा झाली आहे का?

जगावर प्रभाव टाकल्यावर होणाऱ्या परिणामांचा, तुम्ही नीट विचार करा आणि ही प्रक्रिया व्यवस्थित चालू आहे का नाही ते तपासून, पारखून पाहण्यासाठी आपले स्वतःचे यथार्थ प्रश्न तयार करा. शिष्य तयार करण्यासाठी निरंतर शिक्षण देणे, माहिती पुरवणे, अभ्यास सिद्धान्ततत्त्वे ठसवणे, चर्चाविचार, प्रोत्साहन, उत्तेजन, उत्तरदायित्व आणि वैयक्तिक सुधारणूक हे सर्व आवश्यक आहे.

पीटर वॅग्नर ह्यांनी म्हटले आहे, "या जगाच्या सुवार्ताप्रसार, सुवार्तासेवाक्षेत्रांमध्ये सुवार्ताविषयक *कार्यक्रमांची प्रचंड रेलचेल, भरती झाली आहे आणि त्यातील एकही कार्यक्रम व्यवस्थित होत नाही. आणि याहून दुःखकारक गोष्ट*





*म्हणजे या कार्यक्रमामध्ये गुंतलेल्या अनेकांना हे वास्तव समजत नाही. विश्वास ठेवा अगर विश्वास ठेवू नका, ह्यांपैकी कित्येक कार्यक्रमांतून इष्ट तो परिणाम साधतो का नाही, त्यातून काय फळ मिळते तेही कोणी तपासून पाहत नाही!''* मित्रहो, कसास न लावलेले जीवन आणि तपासून न पाहिलेले सेवाकार्य ही चैन आम्हांला परवडणारी नाही.

डिट्रिच बॉमहॉफर ह्यांनी एकदा परखडपणे म्हटले, ''पुढच्या पिढीसाठी जगतो तोच नीतिमान असतो.'' (नीतिमान व्यक्ती पुढच्या पिढीसाठी जगत असते.) शिष्य करण्याचे काम यथार्थपणे योग्य प्रकारे केले तर या प्रकारचे नीतिमत्त्व निश्चितच अनुभवास येईल. अजूनही तुम्ही ''अधूनमधून'' मंडळीत भर पडली की झाले असा विचार करीत आहा का? किंवा तुम्ही देवाच्या गुणाकार कोष्टकामधील पूर्णांक आहा? नीट विचार करा. कारण तुमच्या विचारावर, करण्यावर कित्येक पिढ्या विसंबून आहेत.

*प्रकरण ७*

# येशूच्या योजनातंत्रामागील अलौकिक बुद्धिवैभव

आपण या प्रकरणातील विवेचनाचा आरंभ एक अगदी वरकरणी साध्या वाटणाऱ्या शास्त्रवचनापासून करू. पौलाने थेस्सलनीका येथील मंडळीला लिहिलेले पत्र आजवर तुम्ही अनेक वेळा वाचले असेल आणि या वचनाकडे विशेष लक्ष दिले नसेल. परंतु देवाने या वचनामध्ये एक महत्त्वाचे सत्य मार्मिकपणे गोवलेले आहे. स्वर्गीय दिव्य संदेश असेच सहज लक्षात येणार नाहीत अशा प्रकारे शास्त्रवचनातून अनेकदा मांडलेले असतात. या वचनामध्ये ख्रिस्ती विश्वासाचे गौरवी, दिव्य मर्म दडलेले आहे. आता हे वचन नीट पाहा : ''कारण जर तुम्ही प्रभूमध्ये स्थिरचित्त असला तर आता आमच्या जीवात जीव आल्यासारखे होईल'' (१ थेस्सल.३:८). या वचनामध्ये सर्वच शब्द अगदी साधे सोपे आहेत. या वचनाचा अर्थही सहज समजण्याजोगा आहे. पण वरकरणी साध्या वाटणाऱ्या या वचनामध्ये गहन अर्थ भरलेला आहे.

मुळात नवा करार ग्रीक भाषेत लिहिला गेला हे लक्षात घ्या. वाक्यामध्ये कोणत्या शब्दांवर विशेष भर आहे. कोणत्या शब्दाला अधिक महत्त्व दिले आहे, कोणत्या शब्दाला कमी महत्त्व आहे ते सर्व शब्दांची रचना व मांडणी यावरून दाखवले जाते (कमी महत्त्व असले तर पवित्र आत्मा जरा मोठ्याने बोलतो) व

अधिक असेल तर ओरडून बोलतो. त्या त्या वचनातून एकच महत्त्वाचा शब्द आमच्या मनावर ठसवतो. या वचनामध्ये कोणत्या शब्दावर अधिक भर आहे हे ओळखा असे मी वारंवार माझ्या श्रोत्यांना सांगतो. या वचनामध्ये फक्त तेरा शब्द आहेत. अनेक ठिकाणी श्रोत्यांना हा प्रश्न विचारला आणि आणि साधारणपणे सहा ते आठ पर्याय सुचवलेले असतात आणि त्यातील एकही बरोबर नसतो. आमच्या मानवी मनाला आणि बुद्धीला देवाविषयी अगदी यथार्थ विचार करताच येत नाही. आणि चुकूनमाकून उत्तर बरोबर आले तरी ती केवळ अटकळच असते. म्हणूनच आपण पवित्र शास्त्राचा चांगला अभ्यास केला पाहिजे, वचन नीट समजून घेतले पाहिजे (२ तीमथ्य.२:१५).


या वचनामध्ये ''तुम्ही'' हा सर्वांत महत्त्वाचा शब्द असून त्यावरच अधिक भर दिला आहे. क्षणभर थांबा. हे वचन 'तुम्ही' या शब्दावर विशेष जोर देऊन मोठ्याने वाचा, त्यातले मर्म, अर्थ लक्षात आला का? ख्रिस्ती विश्वासातील बुद्धिचातुर्य दिसले का? 'तुम्ही' याच शब्दावर अधिक भर का आहे ते समजले का? आपण आणखी शोध विचार करू आणि यातील खुबीदार मर्म नीटपणे लक्षात घेऊ या.

सामान्यतः दोन प्रकारे जीवनक्रम चालवता येतो. म्हणजेच दोन प्रकारच्या जीवनशैली आहेत आणि माणसे यातील एका प्रकारचे जीवन जगत असतात. बहुतेक माणसांना याची कल्पनाही नसते की या दोहोंपैकी एक सैतानाची जीवनशैली आहे आणि दुसरी तारणाऱ्याची - ख्रिस्ती जीवनपद्धती आहे. एक आहे पापी माणसाची जीवनपद्धती (आणि हरवलेली, देवाला दुरावलेली व्यक्ती याच प्रकारे जगत असते) आणि दुसरी जीवनपद्धती आहे पवित्र जनांची, देवाच्या मार्गाने चालणाऱ्याची. हे शब्द मी अगदी जपून वापरले आहेत कारण तारण झालेली कोणीही व्यक्ती कोणत्याही वेळी सैतानाच्या रीतीनुसार जीवक्रम चालवू लागण्याची शक्यता आहे.

हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी, या परस्परविरोधी जीवनशैलीतील भेद स्पष्ट होण्यासाठी पुढील आकृती पाहा :








या जीवनशैलीला मी ''बाहेरून आत'' जीवनशैली असे म्हणतो. जिचा जन्म देवापासून झालेला नाही अशी प्रत्येक व्यक्ती याच रीतीने आपला जीवनक्रम चालवते आणि हे अटळच आहे. त्याचे व्यक्तित्व सर्वकाही शोषून घेणाऱ्या ''स्पंज''सारखे असते. तो आपल्या आसपासच्या परिसरातून सर्व काही स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी ओढून, ओरबडून, शोषून घेतो. सैतानाची जीवनपद्धती अगदी अशीच आहे. यातूनच सैतानी वृत्ती आकारास आली. तो सतत ''मी, माझे, माझी इच्छा - मीच हे करणार'' असे घोकत राहिला. त्याने देवावरचा आपला भरवसा उचलला व स्वतःवर ठेवला. हेच पाप आहे. पाप म्हणजे सर्व काही आपल्याकडे ओढून घ्यायचे. जीवनातील सारसर्वस्व आपल्या दिशेला वळवायचे. पाप म्हणजे देवाला बाजूला ठेवून स्वतःसाठी व स्वतःमध्ये जीवनाचा अर्थ व परिपूर्ती मिळवण्याचा प्रयत्न करणे.

आता कितीही वाईट वाटले, खेदजनक, दुःखकारक असले तरी हे मान्य केलेच पाहिजे की, नव्याने जन्मलेली व्यक्तीही पुन्हा परत पूर्वीच्या सैतानी जीवनशैलीकडे जाऊ शकते. ख्रिस्तामधील नवीन जीवनामध्ये त्याने देहस्वभावही आणलेला असतो. परिणामी तो केव्हाही स्वतःवर भरवसा ठेवून स्वार्थ साधून घेण्याकडे वळेल. ख्रिस्तावर विश्वास ठेवून देवाच्या गौरवासाठी जीवनक्रम चालवण्याऐवजी तो स्वतःसाठी जगू लागतो. ख्रिस्ती माणून स्वार्थीपणाणे जगू लागतो तेव्हा तो या दोन्हींपैकी एका वर्गात जातो. तो स्वार्थीपणे अगर 'टिकून राहण्यासाठी' जगत असतो. तो करतो ती प्रत्येक गोष्ट त्याला असमाधानीच ठेवते. स्वतःचा स्वार्थ, फायदा साधण्यासाठी अगर टिकून, तग धरून राहण्यासाठी जगत राहिल्याने कोणालाही कधीच समाधान अगर संतोष होत नाही. त्याने पवित्र शास्त्र वाचले,

प्रार्थना केली, देवाची सेवा करण्याचा प्रयत्न केला तरी ते सर्व कोणत्या तरी स्वार्थी कारणाने करीत असतो. अशा स्वार्थी आत्मकेंद्रित उद्दिष्टाला पवित्र शास्त्रामध्ये ''दैहिक'' म्हटले आहे.

पुढील आकृतीमध्ये दुसऱ्या प्रकारची जीवनशैली दाखवली आहे.



डावीकडील आकृती येशूची दर्शक आहे व दुसरी आकृती नव्याने जन्मलेल्या विश्वासणाऱ्याची दर्शक आहे. तारण झालेल्या व्यक्तीने आपल्या स्वतःवरचा भरवसा आणि स्वतःचे प्रयत्न, आटापिटा सर्व काही ख्रिस्ताकडे सोपवले आहे. ख्रिस्त व तो स्वतः यांच्यामध्ये आंतरिक देवाणघेवाण झाली आहे. आता ख्रिस्ताचे जीवन त्याच्यामध्ये प्रवेशले आहे आणि त्याच्यामधील गुरूत्वमध्य स्वतःवरून ख्रिस्तामध्ये स्थिर झाला आहे. पवित्र शास्त्रातील विश्वासाच्या परिभाषेत यालाच ''तारण'', ''परिवर्तन'', ''पालट'', ''पुनरुज्जीवन'', ''नवा जन्म'' असे म्हटले आहे. या सर्वच शब्दांमधून देवाचा परम अद्भुत चमत्कार प्रतीत होतो. यात पापी माणसाच्या आंतरिक स्वार्थाला मुळापासून हादरा देऊन स्वार्थाचे उच्चाटन करून जीवनाच्या केंद्रस्थानी गौरवी प्रभू येशू ख्रिस्ताची स्थापना होते. सैतानप्रणीत स्वार्थी जीवनाऐवजी प्रभू येशूचे जीवन अंतरंगात येते. हा देवाने केलेला अति अद्भुत चमत्कार आहे हे मी पुन्हा ठामपणे सांगतो. तारण न झालेल्या लोकांना नवा जन्म म्हणजे काय ते नीटसे समजतच नाही. त्यांना वाटते ही नवी सुरुवात आहे, अगर हा कट्टर धार्मिक शब्दप्रयोग आहे असे वाटते. ज्याचा जन्मच झाला नाही त्याला मानवी जीवन काय समजणार? हा प्रश्नच निरर्थक आहे.






वरील दुसऱ्या आकृतीमध्ये ''आतून बाहेर'' (माझा शब्द) जीवनशैली दाखवलेली आहे. ही देवाची जीवनशैली आहे. येशूने ''स्वतःला आमच्यासाठी दिले.'' यातून देवाची सर्वसाधारण कृती दिसून येते. ख्रिस्ती आचरण ठेवणारी व्यक्ती येशू ख्रिस्ताबरोबर विश्वासाच्या नात्यामध्ये असते आणि अशा खऱ्या विश्वासाच्या खऱ्या जीवनासाठी आवश्यक महत्त्वपूर्ण साधनसामग्री त्याला सतत मिळते. ही साधनसामग्री त्याचे समाधान करून त्याच्यामधून दुसऱ्या कोणाकडे तरी जाते.

आता ते वचन पुन्हा वाचा : ''कारण जर तुम्ही प्रभूमध्ये स्थिरचित्त असला तर आता आमच्या जिवात जीव आल्यासारखे होईल.'' हे वचन सर्वसाधारण ख्रिस्ती दृष्टीने असे वाटते : ''मी पुरेशी प्रार्थना केली तरी जगेन,'' ''मी पुरेशा प्रमाणात पवित्र शास्त्र वाचले तर मी (ख्रिस्ती म्हणून) जगेन,'' ''मी पुरेसा चांगला असलो तरी जगेन, मी पुरेसा समर्पित असलो तरी जगेन,'' ''मी पुरेसा निष्ठावान असलो तर मी जगेन, मी पुरेशा प्रेरणेने कार्य केले तर मी जगेन,'' ''मी पुरेसा प्रभावी असलो तर मी जगेन.'' परंतु प्रामाणिकपणे, प्रांजलपणे केलेली ही सर्व विधाने दिसतात तशी नसतात, त्यात व्यक्तीचे जीवन पुन्हा कळत न कळत आत्मकेंद्रित करण्याची सूक्ष्म प्रवृत्ती असते. पुन्हा हे दैहिकतेचे वाकडे वळण आहे. येथे तारण पावलेल्या अनेकांची फसगत होते.

येशूने म्हटले, ''कारण जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो तो त्याला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरिता व सुवार्तेकरिता आपल्या जिवाला मुकेल तो त्याला वाचवील'' (मार्क.८:३५). तेव्हा पहिल्या आकृतीमध्ये दाखवलेली जीवनशैली हानिकारक, नुकसानीची आहे, पण दुसऱ्या आकृतीमध्ये दाखवलेली स्वतःला विसरणारी, स्वतःला देणारी, स्वतःचा विचार, स्वार्थ न पाहणारी जीवनशैली हेच तारण प्राप्त झालेले जीवन आहे.

आता ती आकृती थोडी बदलू या. मंडळ्यांच्या बाबतीतही अगदी असेच व्यक्तींच्या सारखेच आहे. मंडळ्या देखील आत्मकेंद्रित, फक्त स्वतःपुरतेच पाहणाऱ्या असतात. त्या स्वार्थ साधण्यासाठी आणि स्वतःचे अस्तित्व

टिकवण्यासाठी धडपडणाऱ्या असू शकतात. (लोकांना आपल्यामध्ये सामावून घेण्याचे त्यांचे प्रयत्नही अखेर आत्मकेंद्रितच असतात, आपला वाढविस्तार करण्याकडे लक्ष लावण्याऐवजी त्या सातत्याने देवावर विसंबून राहतात त्याची परीक्षा पाहतात).



खिस्ती जीवनशैली म्हणजे नाती सांभाळून, निःस्वार्थीपणे राहणे, स्वतःचा विचार बाजूला ठेवून दुसऱ्याचा विचार करणे, स्वतःला विसरून दुसऱ्याचे हित जपणे, असे करणारा खिस्ती मनुष्य त्याचा शिष्य प्रभूमध्ये सुस्थिर असला तरच जगतो. पौल म्हणतो, ''म्हणजेच खिस्ती मनुष्य त्याच्या शिष्यांच्या द्वारे, त्यांच्यासाठी, त्यांच्यामध्ये आणि त्यांच्यामुळे जगतो.''

जगावर प्रभाव पाडण्याची येशूची सर्वांगीण पद्धत, रीत व साधने अशीच आहेत ना? तो त्या बारा जणांच्या मध्ये एवढा सामावला होता की तीन वर्षांचा प्रशिक्षण काळ संपल्यावर अखेरीस तो म्हणाला, ''ठीक, आता मी तुमचा निरोप घेतो, देव तुमच्याबरोबर असो. आता माझे जीवन सर्वस्वी तुम्हांला सूपूर्द केले आहे. तुम्हीच त्याची जोपासना करायची आहे. तुम्ही स्थिरचित्त असलात तरच मी जगणार!''

मित्रहो, शिष्य करण्याचे सर्व मर्म हेच आहे. एखादा अनमोल हिरा घेऊन त्याचे पैलू पुन्हा पुन्हा शोधून त्याची तेजस्वी चमक पाहत राहावे तसे हा मुद्दा पुन्हा पुन्हा घोळून घोळून स्पष्ट करावा. त्यातला धागा न धागा उलगडून दाखववा आणि





''आतून बाहेर'' जीवनशैलीचा अंगीकार करून प्रत्येक वाचकाने त्यातील गौरवी नेत्रदीपक तेजाने येशूच्या चरणी लीन व्हावे.

''सततच्या सरावाने परिपूर्णता शक्य होते'' हे बोधवाक्य सर्वांच्याच परिचयाचे आहे. मला हे अगदी लहानपणी शिकवण्यात आले. हा नियम अपरिवर्तनीय, अचूक आहे हे माझ्या मनावर बिंबवले गेले. पण आता मला येथे एक गंभीर आक्षेप घ्यायचा आहे. समजा आपण ज्या मापदंडानुसार आचरण करतो तो मापदंडच अपूर्ण असला तर! मग आपण आयुष्यभर सराव करीत राहिलो तरी परिपूर्णता लाभेल का? मुळीच नाही! सरावाने एखादी गोष्ट कायमची पक्की होईल, पण ती परिपूर्ण होईल असे मुळीच नाही. आता याचा संबंध कसा लागू करायचा ते पाहा. येशू खिस्ताची मंडळी आजवर पारंपरिक मापदंडांना आणि समजुतींना अनुसरून कार्य करीत आली आहे. त्यामुळे तिचे सर्व आचरण करणे अपुऱ्या मापदंडामध्ये दृढ करणे असे झाले असण्याची शक्यता आहे असे दिसते.

या चर्चाविवेचनाचा मूळ आधार बरोबर असेल तर महान कामगिरीमधून येशू खिस्ताने आपल्या मंडळीला कूच करण्याचे आदेश दिले आहेत, आणि त्याशिवाय अन्य कोणते आदेश नाहीत आणि या चर्चाविवेचनामध्ये या कामगिरीचे दिलेले स्पष्टीकरण योग्य असेल तर मग सर्वसाधारण मंडळीने केलेली सर्वसाधारण योजना चुकीची आहे. आजच्या मंडळीमध्ये व्यक्ती व्यक्तीची जडणघडण करण्याऐवजी संस्थासंघटना उभारणे, बांधणे यावरच सर्व लक्ष केंद्रित केले आहे काय? लक्षात ठेवा, ''लोकांना शिष्य करणे'' या आदेशाचे अर्थविवरण व उपयोजन येशूची आज्ञा व पद्धती ह्यांना अनुसरूनच ठरते. या महान कामगिरीमधील ''लोकांना शिष्य करा'' या एकाच आज्ञेवर त्याचे सांगणे आधारलेले आहे आणि त्याने बारा जणांच्या सहकार्याने लहान गटात कार्य केले. त्यातूनच त्याची पद्धत स्पष्ट होते. शिष्य करण्याची योजना लहान गटांमधूनच राबवावी हेच इष्ट आहे.

मी तुम्हांला पुन्हा तोच प्रश्न विचारतो. तुमच्या मंडळीमधून दिसणाऱ्या, प्रकट होणाऱ्या खिस्ती विश्वासणाऱ्यांकडून प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक लिहून झाले असेल का? हा तसा अवघड प्रश्न आहे, म्हणूनच त्याचे ताबडतोब, तयार उत्तर मिळणार

नाही. हेच दुसऱ्या प्रकारे सांगायचे तर पहा. प्रेषितांची कृत्येमधील ख्रिस्ती विश्वास जगातली आजची परिस्थिती सहजपणे सहन करील का? हे सर्व मूकपणे पाहत राहील? आजची परिस्थिती कशी आहे पाहा. आज जगातील एकंदर माणसांपैकी निम्म्या माणसांनी अद्याप - ख्रिस्तानंतर २००० वर्षांनीसुद्धा सुवार्ता ऐकलेली नाही! आणि ज्यांनी ही ऐकली आहे त्यांच्यातील ४/५ लोकांना सुवार्तासंदेश पूर्णपणे मिळालेला नाही. जेथे जेथे सुवार्ताप्रसार झाला आहे. तेथील मंडळ्यांमधील परिस्थिती प्रेषितांची कृत्येमधील ख्रिस्ती विश्वासाला आज मान्य होईल का? ही परिस्थिती अशीच एकसुरी रीतीने पॅट्रिक जॉन्स्टन यांच्या ऑपरेशन वर्ल्ड या पुस्तकात नमूद केली आहे. ''या देशामध्ये प्रशिक्षित नेते, पुढारी नाहीत हीच येथे मोठी उणीव आहे.'' हेच शब्द जगातील बहुतेक सर्व देशांसंबंधाने लिहिले आहेत. वरील सर्व अवघड प्रश्नांचे ''नाही, नाही!'' हेच सडेतोड उत्तर असेल तर मग सध्या चालू असलेल्या योजना आणि पद्धती यांच्याद्वारे या उणिवा दूर करता येतील का? हे पुस्तक लिहित असताना त्या पद्धतींचा काही उपयोग झालेला नाही. अशा स्थितीत आपण थोडे मागे सरून येशूची मूळची योजना पुन्हा नीट तपासून पाहू नये काय? त्याच्या योजनापद्धतीत कोणते बदल केल्याने आम्ही त्याच्या योजनेपासून दूर गेलो आहोत? हे तपासून पाहणे अगत्याचे आहे.

मंडळीमध्ये अनेक पारिभाषिक संज्ञा वापरल्या जातात, त्यात ''ख्रिस्तासारखे'' किंवा ''ख्रिस्तासमान'' ही एक संज्ञा आपण वारंवार पाहतो, त्याचा अर्थही केवळ ''वर वर'' समजावून घेतो. प्रत्येक विश्वासणाऱ्या व्यक्तीला ख्रिस्तासमान करणे हेच ख्रिस्ती जीवनाचे ध्येय असल्याचे सर्वच ख्रिस्ती लोक मान्य करतील. खरे पाहता देवाने आपल्या प्रत्येक मुलामुलीसाठी हेच उद्दिष्ट स्पष्टपणे नेमले आहे. आम्ही ''देवाच्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे'' अगर आम्हांला ख्रिस्ताप्रमाणे करावे हा त्याचा अगदी आरंभापासून हेतू ठरलेला आहे. परंतु आपण मागे राहिलो आहोत. आम्ही गलती.५:२२-२३ या वचनातील आत्म्याचे फळ याच्या संदर्भात ख्रिस्ताप्रमाणे या शब्दाची व्याख्या करतो. आता या व्याख्येमध्ये उणेपण आहे असे कोण बरे म्हणेल? एखादी व्यक्ती आत्म्याचे फळ देत असेल तर त्याचा आंतरिक स्वभाव थेट ख्रिस्तासारखा आहे. पण फळाची ती तुलना, हे अनुमान आणखी थोडे





बारकाईने पाहा : एखादी व्यक्ती आत्म्याचे फळ देत आहे तर फाळाला फक्त आतलाच भाग असतो का बाहेरचाही भाग असतो? एखादी स्त्री मंडईत लिंबू घ्यायला गेली तर ती काय मागेल कशाचा शोध करील? ती ''लिंबूपणा'' द्या असे म्हणेल का? नाही. ती लहान गोलाकार पिवळ्या सालीचे फळ कोठे मिळते ते पाहील. म्हणजेच लिंब या फळाचे बाह्य रूप अगदी वेगळे असते. ते पेरू, जांभळे, आंबा, केळी, संत्री, मोसंबी वगैरे फळांहून भिन्न असते. ख्रिस्ती लोकांची व्याख्या करताना आत्म्याच्या फाळापासून आरंभ करणे चांगले असते. ख्रिस्तासारखे असणे याला बाह्यरूप आणि आंतरिक सारसत्व असे दोन्ही आहे काय?

हा महत्त्वाचा मुद्दा थोडक्यात पाहू : लोकसमूहांना प्रशिक्षण देणे, त्यांनी अंतरंगातून येशू ख्रिस्ताशी संयुक्त होऊन राहावे आणि बाह्यतः संपूर्ण विस्तृत जगाला प्रभावित करणे, पुनरुत्पादन व बहुगुणन करण्याचे शिक्षण देणे हेच ख्रिस्तासारखे वागणे आहे. येथे ''प्रशिक्षण'' (येशूने दाखवलेल्या योजनेप्रमाणे व त्याच्या पाठ्यक्रमास अनुसरून), ''गटसमूह'' (येशूने दाखवलेल्या नमुन्याप्रमाणे गटाचा आकार ठरवणे), ''संयुक्त होणे'', ''ऐक्य'' (यातून ख्रिस्ताचे जीवन, सेवाकार्य आणि प्रेरणा, उद्देश आमचे करणे) आणि ''संपूर्ण जगाला प्रभावित करणे'' (यातून देवाच्या प्रत्येक मुलामुलीने क्षणोक्षणी ठेवायचे ध्येय, उद्दिष्ट स्पष्ट होते), आणि हे सर्व आम्ही ज्या योगे ध्येय - उद्दिष्ट साध्य करायचे त्यामागील व्यूहरचना योजना निश्चित करण्यासाठी आहे.

योहान,१९:३० मध्ये अत्यंत गंभीर आणि पवित्र अशा ऐतिहासिक क्षणाला येशूने उच्चारलेला एक शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. वधस्तंभावरून येशूने सर्वांत शेवटी ''टेटलेस्टॉय'' हा शब्द उच्चारला. या ग्रीक शब्दाचा अर्थ आहे ''पूर्ण झाले'', ''संपले'', ''केले''. त्या क्षणाला उद्धाराचे कार्य पूर्ण झाले, संपले. या एकाच सर्वसमावेशक शब्दाने देवाने पापी जनांचे तारण करण्यासाठी जे जे केले त्याचा बोध होतो.

योहान.१७:४ या वचनातही येशूने हाच शब्द वापरला आहे : ''जे काम तू मला करावयास दिले ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझे गौरव केले आहे.'' येथे येशूने कोणते

काम ''पूर्ण केले''? हे विधानही उद्धारकार्याविषयी आहे असे बहुतेक भाष्यकार सांगतात. पण हे म्हणणे बरोबर नाही, कारण तारणाचे कार्य येशूने वधस्तंभावर पूर्ण केले. येशूने येथे भूतकाळी क्रियापद वापरले आहे आणि वधस्तंभावर जाण्यास अद्याप काही अवकाश होता. येथे येशू उद्धार, तारण याविषयी नव्हे, तर पुनरुत्पादन कार्याविषयी बोलतो. दोन आवश्यक व प्रमुख कामे करण्यास येशू आला. तारण (खंडणी भरून सोडवणूक) आणि पुनरुत्पादन हीच ती कामे होती. वधस्तंभावरील ख्रिस्ताच्या मरणाने तारणाचे कार्य साध्य झाले हे आवश्यक कार्य पूर्ण झाल्यावरच पुनरुत्पादनाच्या कार्याला आरंभ व्हायचा आहे. परंतु पुनरुत्पादनाचे कार्यही आवश्यक आहेच. या कार्यातून ख्रिस्ती लोकांची संख्या वाढत राहिली तर तारणाच्या, उद्धाराच्या कार्याची विशेषशी माहिती लोकांना मिळणार नाही. मिळालेली माहिती अर्धवट, अर्धीमुर्धी असेल (आजच्या जगात आणि आजच्या ख्रिस्ती मंडळीत सुद्धा अगदी अशीच परिस्थिती आहे).

येथे पुन्हा एकदा महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करणे भागच आहे. नव्या कराराच्या दृष्टीने पुनरुत्पादन म्हणजे काय? हे पुनरुत्पादन अगर पुनरुत्पत्ती किती लोकांनी करायची आहे? आणि त्यांनी किती उत्पादन करायचे आहे? त्यांच्याकडून कितीची अपेक्षा आहे? पुनरुत्पत्ती म्हणजे केवळ पहिल्यासारखा हुबेहुब दुसरा तयार करणे (आत्मे जिंकण्याचा मापदंड, किंवा पापी जनांना ख्रिस्ताकडे वळवणे) असे आहे का बहुगुणन करणे - एकाचे एकवीस, पाचाचे पंचवीस असे करायचे आहे? बहुगुणन असेल तर त्याचे प्रमाण किती मोठे? आणि या वर्गवारीत योग्य उद्दिष्टे कशी साध्य करायची? पुन्हा या बाबतही येशूने अनुसरलेली पद्धत हाच आमचाही नमुनेदार आदर्श असावा.

आता आपण एक नमुना, आदर्श घेऊन त्याचे परीक्षण करू या. पुनरुत्पादनासाठी येशूने कोणता नमुना वापरला? त्याने बहुगुणन करणारे कसे तयार केले? त्याच्या मरणानंतर अवघ्या साठ वर्षांच्या अवधीत त्यावेळी ज्ञात असलेल्या जगाच्या टोकापर्यंत सुवार्तासंदेश पोचवून लोकांना अतिप्रभावित करण्याची क्षमता, मानसिकता त्या बाराजणांच्या मध्ये यावी म्हणून येशूने काय केले? हा प्रश्न पुन्हा





वाचा. यातील भावार्थ तुमच्या मनावर ठसू द्या. या प्रश्नाने तुमचे अंतःकरण प्रेरित होवो. कसे? त्याने हे कसे केले? बारा जणांच्या मध्ये त्याने ही विशिष्ट मानसिकता कशी उत्पन्न केली? त्यांच्याकडून जगावर प्रचंड प्रभाव कसा टाकला गेला? त्या काळी ज्ञात असलेल्या जगाच्या कानाकोपऱ्यात हा संदेश कसा पोहला? त्याच्या मृत्यूनंतर केवळ साठच वर्षात एवढे मोठे कार्य कसे झाले? तेव्हा त्याच्याकडे दूरदर्शन, टेलिफोन, मोबाईल, इंटरनेट, वेबसाईटसारखी संपर्कसाधने नव्हती. फक्त एक व्यक्ती होती. कसे? कसे? कसे? नकारात्मक दृष्टीने बोलायचे तर त्याच्या कार्यक्रमातील एकही बाब लोकसमुदायावर अवलंबून नव्हती. तसेच त्याच्या एकंदर कार्यक्रमातील काहीही उपदेशावर, अवलंबून नव्हते (तथापि, सेवाकार्य, शिकवणे, व शिष्यांची निवड करणे यासाठी त्याने व्यापक जनसंपर्क साधला होता). पण त्याच्या कार्यक्रमामध्ये संस्थासंघटनात्मक कार्याला स्थान नव्हते. (ही केवळ वस्तुस्थिती दाखवली आहे - संस्थासंघटनांचे मूल्यमापन केले नाही). त्याचा कोणताच कार्यक्रम मंडळीत जाण्यावर केंद्रित नव्हता (पण तो स्वतः नियमाने सभास्थानात जात असे). **मग त्याची योजना, त्याची पद्धत नेमकी कोणती होती? त्याने व्यूहरचना कशी केली होती?**

त्याने आपल्या ज्या शिष्यांना ''प्रेषित'' म्हटले त्यांची नावनिशी पवित्र शास्त्रात चार ठिकाणी दिली आहे. त्या याद्यांमधून आपणाला त्याच्या कार्यपद्धतीविषयी काय समजते ते पाहू या. सर्वप्रथम हे लक्षात घ्या. त्यांना शिष्यांना शिकवून तयार केले ते त्याच्यापासून दूर दुसऱ्या ठिकाणी पाठवण्यासाठी. तो होता तेथेच त्यांनाही ठेवून घेऊन लोकसमुदायाचे केंद्रिकरण व्हावे हा त्याचा उद्देश नव्हता. त्याचे हे योजनातंत्र आजच्या मंडळीतील तंत्रासारखे मुळीच नव्हते. आजच्या मंडळ्यांमध्ये मंडळीचे व तिच्या पुढाऱ्यांचे यशापयश मोठी इमारत, मोठी सभासदसंख्या, मोठा अर्थसंकल्प, मोठी सेवाकार्य यांच्या आकारावरून मोजले जाते. येशूच्या शिष्यांची नावे मत्तय. १०, मार्क.३, लूक.६ व प्रेषितांची कृत्ये १ अशा चार ठिकाणी नमूद केली आहेत. या चारही याद्या वारंवार बारकाईने पाहाव्या. त्यांमधून बरेच काही शिकण्यासारखे आहे. त्यांचे पुनःपुन्हा परिशीलन करावे. त्यातून अनेकानेक सार्वकालिक धडे शिकण्यासारखे आहेत. या चारही याद्या एकत्रितपणे येथे दिल्या आहेत.

| मत्तय | मार्क | लूक | प्रेषितांची कृत्ये |
|---|---|---|---|
| (पेत्र म्हटलेला) शिमोन | शिमोन त्याला पेत्र हे नाव दिले | शिमोन (ह्याला पेत्र हेही नाव दिले) | पेत्र |
| अंद्रिया | जब्दीचा मुलगा | आंद्रिया | योहान |
| जब्दीचा मुलगा याकोब | योहान | याकोब | याकोब |
| योहान | योहान | आंद्रिया | योहान |
| फिलीप | फिलीप | फिलीप | फिलीप |
| बर्थलमय | बर्थलमय | बर्थलमय | थोमा |
| थोमा | मत्तय | मत्तय | बर्थलमय |
| मत्तय | थोमा | थोमा | मत्तय |
| अल्फीचा मुलगा याकोब | अल्फीचा मुलगा याकोब | अल्फीचा मुलगा याकोब | अल्फीचा मुलगा याकोब |
| तद्दय | तद्दय | शिमोन जिलोत | शिमोन (जिलोत) |
| शिमोन (जिलोत) | शिमोन (जिलोत) | याकोबाचा मुलगा यहूदा | याकोबाचा मुलगा यहूदा |
| यहूदा इस्कार्योत | यहूदा इस्कार्योत | यहूदा इस्कार्योत | .. |

या चारही याद्यांचा तुलनात्मक अभ्यास केल्याने अनेक गोष्टी लक्षात येतील. प्रत्येक यादीमध्ये पहिले नाव सारखेच असले तरी त्यात थोडा फरक आहे. पहिल्या तीन ठिकाणी शिमोन पेत्र व शेवटी पेत्र असे आहे. चारही ठिकाणी एकच व्यक्ती





असली तरी त्यांचे व्यक्तित्त्व एकच नाही. आरंभी ''शिमोन'' (पेत्र) असणारी व्यक्ती आता अखेरीस फक्त पेत्र आहे. आता पेत्राने शिमोनाचे जू झुगारून दिले आहे. हे जे प्रचंड स्थित्यंतर झाले त्यातून शिष्यांची जडणघडण करण्यासाठी येशूने योजिलेली रीत, तंत्र, पद्धत व प्रक्रिया हे सर्व बारकाईने अभ्यासून पाहणे जरूर आहे. शिष्यांची जडणघडण करणे ही एकच आज्ञा आमच्यावर सोपवलेल्या महान कामगिरीत त्याने दिली आहे, नाही का? तर मग आपणही येशूची पद्धत, त्याची योजना, त्याची तंत्रप्रक्रियाच शक्य तो मुळाप्रमाणे वापरली पाहिजे. शक्य तेवढे येशूने केले तसे केले पाहिजे. (तसे झाले नाही तर आमच्या प्रयत्नांना काही वेगळेच फळ येईल. आजच्या मंडळीमध्ये सर्वत्र असेच वेगळे फळ दिसते ही खेदाची गोष्ट आहे). येशूने शिमोन पेत्राला कसे शिकवून तयार केले तेवढे जरी नीट पाहिले तर अनेक गोष्टी लक्षात येतील. येशू व पेत्र ह्यांची परस्पर भेट, बोलणे, संभाषण आणि शिकवण हेच आजच्या मंडळीमध्ये शिष्यांची जडणघडण करण्याचे मापदंड आहेत, तर आज इष्ट ते फळ का मिळत नाही ते सहज समजू शकेल (अर्धवट किंवा अजिबात जडणघडण न झालेले ख्रिस्ती लोक आणि सुवार्ताप्रसार न झालेला जगाचा मोठा भाग). प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने हा अभ्यास जरूर करावा. येशूने शिमोन हे त्याचे पालट होण्यापूर्वीचे दैहिक नाव बदलले आणि ''पेत्र'' (प्रेषितांची कृत्येमध्ये सर्वत्र पेत्र हेच नाव आढळते). हे नाव रूढ कसे केले ही प्रक्रिया कशी झाली, येशूने कोणते तंत्र वापरले ते या अभ्यासातून समजेल.

आता या यादीमधील दुसरी ओळ पाहा. येथे सर्वत्र तेच ते नाव नाही. तिसऱ्या ओळीतही असेच आहे. चौथ्या ओळीतही एकच नाव नाही. पण थांबा, पाहा या पाचव्या ओळीमध्ये चारही ठिकाणी एकच नाव आहे. आता सहाव्या ओळीत एकच नाव सर्वत्र नाही. सातव्या ओळीतही तसेच दिसते. आठव्या ओळीत पाहिले तर सर्वत्र एकच नाव नाही. पण पुन्हा नीट पाहा. नवव्या ओळीत सर्वत्र एकच नाव आहे. दहाव्या ओळीत वेगवेगळी नावे आहेत. अकरा आणि बारा या ओळींमध्येही हीच स्थिती आहे. (शेवटच्या ओळीत अगदी शेवटी मत्थियाचे नाव घाला. यहूदा इस्कार्योतच्या जागी शिष्यांनी त्याचीच निवड केली होती).

जगदृष्टी असणारे, जगावर छाप पाडणारे, पुनरुत्पादन व बहुगुणन करणारे

स्वतःसारखे दुसरे तयार करणारे अशा शिष्यांची जडणघडण करण्यासाठी येशूने वापरलेले मुख्य तंत्र आपण येथे पाहू या. येशूची योजना, पद्धती वगैरे सर्वच बाराजणांच्या एका लहान गटावर केंद्रित झाली होती यात जराही संशय नाही. येशूने आपल्या सर्व शक्ती, युक्ती आणि आशा या लहान गटावरच ठेवली होती हेही अगदी खरे आहे. जगावर छाप पाडण्याची छाप पाडण्याची त्याची संपूर्ण योजना बाराजणांच्या हातात सोपवली होती. आणि त्यांच्या उत्पादनक्षमतेवर या योजनेचे यशापयश ठरायचे होते. या प्रेषितांच्या नामावळ्यांमधूनही या लोकांची जडणघडण करण्याची त्यांची पद्धत दिसून येते. त्याने आपल्या या बारा जणाचे तीन समान गट केले हे स्पष्टच दिसते. प्रत्येक गटासाठी त्याने एक पुढारी नेमला. पण खरे कशावरून? त्यासाठी कोणता आधार अथवा पुरावा आहे? पुरावा तर भरपूर आहे आणि तो काही निव्वळ योगायोग नाही. पहिल्या गटातील सर्वचजण (आणि तुमच्या समजुतीप्रमाणे फक्त हेच तेवढे) बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे शिष्य होते. त्यांच्या नेत्याने त्यांना निःस्वार्थीपणे उत्तेजन दिल्याने ते येशूच्या मागे चालण्यासाठी आले. या पहिल्या गटातील सर्वचजण सळसळत्या उत्साहाने भरलेले आहेत. त्यांचा नेता शिमोन पेत्र याच्याप्रमाणे हे सर्वच थोडेसे उतावळे आहेत. स्वतः येशूने त्यांना बोआर्नेगेस म्हणजे गर्जनेचे पुत्र हे टोपण नाव दिले होते. आकाशात मेघांची दाटी होते. आंद्रिया आपणाला वाटते त्यापेक्षा अधिक चपळ, गतिशील आहे हे निश्चित. स्वगृही, स्वदेशात सुवार्ताप्रसार करणारा तोच आद्य मिशनरी आहे (योहान.१:४०-४२). तो पहिला तरुणांमध्ये, समाजामध्ये कार्य करणारा होता (योहान.६:८-९), तसेच परदेशी सुवार्ताप्रसार करणारा तोच पहिला सुवार्तासेवक (योहान १२:२०-२२) होता. या वचनांमधून जे काही केल्याचे दिसते ते एखादा भित्राबुजरा अबोल मनुष्य करणे कधीच शक्य नसते. खरेच ही सर्व उत्साही गतिशील माणसे होती.

दुसऱ्या गटाचा प्रमुख आहे फिलिप्प. शुभवर्तमानामध्ये त्याचे जे चित्रण आहे ते एखाद्या विचारी, तत्त्वाने चालणाऱ्या माणसाचे आहे. तसेच त्याच्या गटातील प्रत्येक जण तसाच तत्त्वाने चालणारा तात्त्विक, विचारी आहे. उदा. संशयी थोमा, आणि लेवी मत्तय. त्यानेच येशूचे तात्त्विक शिक्षण सांगणारे शुभवर्तमान लिहिले.





येशूने प्रमुख नेतेपदी तत्त्वविचारी माणसाची नेमणूक केली नाही हे लक्षात घ्या. कारण त्याच्याकडून काहीच कार्य झाले नसते! तात्त्विक बाबींचाच खल करणारे लोक नेहमी संशयी, शंकेखोर असतात. सतत प्रश्न विचारतात. थोर शोधक, थोर निषेधकर्ते, महादीर्घसूत्री, कालापव्यय करणारे आणि ते ख्रिस्ती सुवार्तासेवाकार्यात भरपूर योगदान देणारे असतात. पण तत्त्वविचारी माणसे कधी उत्तम आघाडीचे नेते होऊ शकत नाहीत.

आता तिसऱ्या गटाकडे वळू या. तुम्ही तयार असणारच! या तिसऱ्या गटामध्ये सर्वच राजकीय क्रांतीकारक आहेत. मात्र त्यांचा नेता अल्फीचा मुलगा याकोब हाच बहुधा या गटात मवाळ होता. यहूदाचे आडनाव इस्कार्योत हे बहुधा ''सिकाराय'' म्हणजे क्रांतिकारी लोक नेहमी याच सिकारायच्या खंजिराची शपथ घेत असत. गर्दीत, बाजारात कोठेही यांचा एखाद्या रोमन अधिकाऱ्याशी संपर्क आला तर या खंजिराने त्याची जागच्या जागी हत्या करायची अशी शपथ ते घेत असत. आणखी एक मजेशीर गोष्ट पहा. याकोब व मत्तय हे दोघेही भाऊ असल्याचा सबळ पुरावा आहे. दोघांनाही अल्फीचा मुलगा म्हटले आहे. यातून तुमच्या मनात काही महत्त्वपूर्ण विचार येतो काय? त्या दोहोंतील एकाने - मत्तयने रोमशी हातमिळवणी का केली? रोमन सरकारकडून यहूदी लोकांकडून कर वसूल करण्याचे काम का स्वीकारले? आणि दुसरा भाऊ (याकोब) कट्टर यहूदी देशभक्त कसा झाल? एकाने दुसऱ्याचे टोकाचे विचार व कृती पाहून नेमके त्याच्या उलट वर्तन करायचे ठरवले का? किंवा मत्तयने शत्रूशी हातमिळवणी केली म्हणून याकोब अतिरेकी राजकीय क्रांतिकारी कृती करण्याकडे वळला का? का यातील काहीच खरे नाही. वस्तुस्थिती वेगळीच आहे? आम्ही कितीही उलटसुलट चर्चा केली, मुद्दे मांडले तरी त्याला शास्त्रलेखात काही आधार नसल्याने ते सर्वच निरर्थक आहे. पण या प्रश्नातून आपल्याला बराच अंदाज करता येतो. जिलोत म्हटलेला माणूस त्याच नावाच्या पक्षात असल्यामुळे त्याचा तसा उल्लेख केला आहे. हा राजकीय पक्ष कट्टर देशभक्त, बंडखोर, हिंसक अतिरेकी लोकांचा होता. समजा सर्वसाधारण परिस्थितीत मत्तय जकातदार आणि जिलोत शिमोन यांची भेट झाली असती तर शिमोनाने मत्तयाला क्षणार्धात ठार केले असते. येशूने केलेला सर्वात महान चमत्कार कोणता असे मला

विचाराल तर मी म्हणेन हजारो लोकांना पोटभर जेवण देणे, रोग्यांना बरे करणे, किंवा मेलेल्यांना जिवंत करणे हे महान चमत्कार नाहीत. अगदी 'अशक्य' अशा बारा जणांचा एक गट घेऊन त्याने त्यांची अशी काही जडणघडण केली की त्यांनी त्या काळी माहीत असलेल्या जगात अगदी कान्याकोपऱ्यापर्यंत सर्वत्र उलथापालथ केली, आध्यात्मिक पुनरुत्पादनांच्या लाटांचा कल्लोळ उसळला. माझ्या दृष्टीने हाच त्याने केलेला सर्वात महान चमत्कार आहे आणि मंडळीने येशूची मूळ योजना बदलून (व्यक्तींची जडणघडण करणे) तिला योग्य वाटणारी बदली योजना स्वीकारली आहे, म्हणून मंडळीत आज सर्वच बाबतीत अनास्था दिसून येते. सर्वत्र व्यक्तींच्या ऐवजी संस्थासंघटना उभारल्या जात आहेत असे दिसते. परंतु मूळ योजना स्वीकारून त्यानुसार कार्य चालू ठेवले असते तर तो लाटांचा कल्लोळ - त्या सुवार्तेच्या लाटा आजही पृथ्वीला प्रभावित करीत असत्या आणि काळाच्या अंतापर्यंत तसाच प्रभाव पडत राहिला असता!

सुप्रसिद्ध विनोदी नट चार्ली चॅपलिन हयात होता तेव्हा मोनॅको येथे चार्ली चॅपलिनसारखे दिसणाऱ्या लोकांची एक स्पर्धा घेतली होती. चॅपलिन तेथे गेला आणि त्याने टोपणनावाने त्या स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेचा निकाल लागला. त्यात चॅपलिनला तिसरे बक्षीस मिळाले! आजच्या मंडळ्यांमध्ये ख्रिस्ताप्रमाणे दिसणाऱ्या लोकांची स्पर्धा ठेवली तर खऱ्या 'येशूला' त्यात कितवा क्रमांक मिळेल हा एक गंभीर प्रश्न मला अनेकदा पडतो.

या प्रकरणातील चर्चाविचार नीट लक्षात घ्या. उगाच गैरसमज करून घेऊ नका. आपणही अगदी तेवढाच म्हणजे बाराजणांचा गट करणे आवश्यक आहे असे कोठेच स्पष्टपणे सांगितलेले नाही.पण एक गोष्ट निश्चित आहे ''ख्रिस्तासारखे'' म्हणजे अगदी ''ख्रिस्तासारखे'' हे दिसायला समजायला सोपे वाटते पण त्यातील सत्य मंडळीमध्ये कोणाला समजले आहे असे दिसत नाही. येशूने निवडलेल्या समूहाचा आकार आणि त्याची विभागणी हे अगदी योग्य आहे. त्यामुळे उत्तरदायित्व ठरवणे, कामे सोपवणे, सहभागिता वगैरे सर्वच गोष्टी सहजसुलभ होतात. परंतु हे काही काटेकोरपणे फेरबदलास जराही वाव नसणारे अगदी कडक असे गट नव्हते. त्यातून साधलेला परिणाम पाहिला तर येशूचे कुशल संघटनचातुर्य आणि गटागटामध्ये





आंतरिक समन्वय साधण्याची हातोटी स्पष्ट दिसते आणि आपणही सुज्ञपणे तसेच करू नये काय? आणि आम्ही तसे न करणे शहाणपणाचे ठरेल काय?

मी पुन्हा पुन्हा सांगतो जगावर प्रभाव पाडण्यासाठी येशूच्या योजनेनुसार व्यक्तीव्यक्तीला प्रशिक्षण देऊन तयार करणे याहून ख्रिस्तासारखे असे दुसरे काहीही तुम्हांला तुमच्या उभ्या आयुष्यात कधीही करता येणार नाही!

येशूने आमच्यावर सोपवलेली कामगिरी आम्ही सातत्याने संपूर्णतः पुरी करतो आहोत का नाही ते आपण तपासून पाहण्याची वेळ झालीच आहे असे नाही का तुम्हांला वाटत?

*प्रकरण ८*

# या तंत्रानुसार मंडळीमध्ये कार्य कसे करावे?

*''तरी आपणापैकी प्रत्येकाला ख्रिस्ताने दिलेल्या दानाच्या परिणामाप्रमाणे अनुग्रहरूपी देणगी प्राप्त झाली आहे. म्हणून तो म्हणतो, 'त्याने उच्चस्थानी आरोहण केले तेव्हा त्याने कैद्यांना कैद करून नेले व मानवांना देणग्या दिला'. त्याने आरोहण केले यावरून तो पृथ्वीच्या अधोलोकी उतरला होता ह्यापेक्षा दुसरे काय समजावे? जो खाली उतरला होता त्यानेच सर्व काही भरून टाकण्याच्या उद्देशाने सर्वोच्च स्थानावर आरोहण केले; आणि त्यानेच कोणी प्रेषित, कोणी संदेष्टे, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक व शिक्षक असे नेमून दिले; ते ह्यासाठी की, त्यांनी पवित्र जनांस सेवेच्या कार्याकरिता व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतेस नेण्याकरिता सिद्ध करावे. देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या व तत्संबंधी परिपूर्ण ज्ञानाच्या एकत्वाप्रत, प्रौढ मनुष्यपणाप्रत, ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त होईल अशा बुद्धीच्या मर्यादेपर्यंत आपण येऊन पोहोचू तोपर्यंत दिले. ह्यासाठी की, आपण यासाठी बाळासारखे असू नये, म्हणजे माणसांच्या धूर्तपणाने भ्रांतीच्या मार्गास नेणाऱ्या युक्तीने; प्रत्येक शिकवणरूपी वाऱ्याने हेलकावणारे व फिरणारे असे होऊ नये''* (इफिस.४:७-१४).

सध्या तुमच्या मंडळीत दिसणाऱ्या, अनुभवास येणाऱ्या ख्रिस्ती विश्वासाकडून

अगदी आरंभी ''प्रेषितांची कृत्ये ''किंवा त्यासारखे पुस्तक लिहून झाले असते का? हा अगदी खोचक व शोधक आणि मर्मभेदक प्रश्न आहे. अगदी खरे, प्रामाणिकपणे याचे उत्तर नाही असे एकाच शब्दात देता येईल. मग ज्यातून ''प्रेषितांची कृत्ये'' हे पुस्तक आकारास आले तो ख्रिस्ती विश्वास आणि आज बहुतेक सर्वच अमेरिकन ख्रिस्ती मंडळ्यांमधून दिसणारे ख्रिस्ती विश्वासाचे विपरीत व चमत्कारिक स्वरूप यात फरक कोणता आहे?

आरंभीच्या मंडळीत उपयुक्त जबाबदार लोकांना तयार करण्यासाठी त्यांनी येशूचा आदर्श समोर ठेवला होता. तेव्हा संख्या महत्त्वाची नव्हती. आज लोक किती आहेत हेच पाहिले जाते, तेव्हा लोक कसे आहेत ते पाहात. आज यशाचे मोजमाप आकार, संख्या, अशा गोष्टींवरून केले जाते. शिवाय आणखी सांगायचे तर आमचा आदर्श शुद्ध स्वच्छ जीवनासाठी पापी लोकांना शुद्ध, पापजंतूच्या संसर्गापासून मुक्त करणे ही आमची रीत आहे. आणि जगावर प्रभाव पाडण्यासाठी पवित्र जणांना शिष्यत्वाचे, शिष्य करण्याचे प्रशिक्षण देणे ही त्यांची रीत होती. पण त्यामुळे शुद्ध स्वच्छ जीवनाचे महत्त्व कमी झाले, अवमूल्यन झाले असे मुळीच नाही. ख्रिस्ताकडे आलेल्या लोकांचा पालट झाला की आपण त्यांना ''सार्वकालिक सुरक्षा'' या नावाच्या तिजोरीत बंदिस्त करून ठेवतो हीच आमची रीत, पद्धत आहे. वास्तविक पाहता विश्वासणाऱ्याने आपले संपूर्ण जीवन तारण पावलेल्या इतर व्यक्तींच्यामध्ये गुंतवले पाहिजे. जगदृष्टी असणारे, दूरदृष्टीचे, जगाला प्रभावित करणारे, दुसरे प्रभावी पुनरुत्पत्ती करणारे उत्पन्न करावे यासाठीच सर्व प्रयत्न केले पाहिजेत.

मग. इ. स. ४२ मधील ख्रिस्ती विश्वास आणि इ. स. २००० मधील ख्रिस्ती विश्वास या दोहोंमध्ये कोणता फरक आहे? येशू बदलला, वेगळा झाला आहे काय? नाही; त्यांना माहीत होता त्याच येशूची आपण उपासना व सेवा करतो. पवित्र आत्मा वेगळा आहे का? नाही. आज ज्याच्याशी माझे नाते आहे तोच पवित्र आत्मा पेंटेकॉस्टच्या दिवशी तारणदायी पूर्ण सामर्थ्याने आला होता. पवित्र शास्त्र वेगळे आहे काय? नीट विचार करून उत्तर द्या. या प्रश्नाचे उत्तर आहे, ''होय''. तेव्हा त्यांच्याकडे संपूर्ण पवित्र शास्त्र नव्हते. प्रेषितांची कृत्ये या पुस्तकात नमूद





केलेल्या कार्याच्याद्वारे पवित्र शास्त्र लिहून पूर्ण करण्याचे कार्य चालू होते. त्यामुळे संपूर्ण पवित्र शास्त्र उपलब्ध असण्याचा सर्व फायदा त्यांना नव्हे तर आम्हांलाच आहे. तांत्रिक बाबतीत प्रवासाच्या साधनात काही वेगळेपण आहे का? आता पूर्वीपेक्षा काही सुधारणा, लाभ वगैरे आहेत का? हा प्रश्न किंवा विचार निरर्थक, हास्यास्पद आहे. सर्व सुखसोयी साधने आमच्याकडेच आहेत. त्यांना नियोजनव्यवस्थेचा कसलाच फायदा नव्हता. देवाने रोमन साम्राज्याच्या सत्ताबलाने सर्व जगात शांतता नांदेल असे केले होते. रोमन साम्राज्यात सर्वत्र उत्तम रस्ते बांधले होते, रस्त्यांचे जाळेच तयार झाले होते. पण आम्हांला आज उपलब्ध असलेल्या गोष्टी पाहता त्यांना अगदीच नगण्य सोयी उपलब्ध होत्या असेच म्हणावे लागते. त्यांच्याकडे रेडिओ, टेलिव्हिजन, टेलिफोन, इंटरनेट, उपग्रहाद्वारे संपर्क यातील कोणतेही साधन नव्हते. ते फक्त एका एका व्यक्तीला संदेश देत. त्यांच्याकडे फक्त, वस्तुस्थितीदर्शक गोष्टी होत्या, पण त्या तर आज आमच्याकडेही आहेत. परंतु त्यांनी अगदी आश्चर्यकारक प्रकारे, अल्पकाळात त्या काळी माहीत असलेल्या संपूर्ण जगाला सुवार्तासंदेशाने प्रभावित केले. आणि आज जगातील एकंदर माणसांपैकी दोनपंचमांश लोकांनी अद्याप सुवार्ता ऐकलेली नाही. शिवाय आणखी दोन पंचमांश लोकांनी सुवार्ता अर्धवट ऐकली आहे. उरलेल्या एकपंचमांश लोकांना सुवार्ता सांगण्यासाठी आज भरपूर मनुष्यबळ आणि आर्थिक बळ उपलब्ध आहे आणि ते आरंभीच्या मंडळीला होते, त्याहून असंख्य पटींनी अधिक आहे. पण वस्तुतः तसे नाही. आरंभीच्या मंडळीतील ख्रिस्ती लोक काही आजच्या सर्वसामान्य ख्रिस्ती लोकांपेक्षा अधिक समर्पित, बांधील होते असे मुळीच नाही. आजचा सर्वसामान्य ख्रिस्ती माणूस अगदी न चुकता, निष्ठापूर्वक आठवड्यातून तीन वेळा उपासना - प्रार्थनेला जातो. नाताळ ईस्टरसारख्या विशेष प्रसंगी तो न चुकता हजर राहतो. तोही समर्पित, बांधील आहे. परंतु ज्यांनी ख्रिस्ताविषयी कधीच काही ऐकलेले नाही अशा सुमारे दोन अडीच अब्ज लोकांवर त्याचा काहीच प्रभाव नसतो. प्रेषितांची कृत्येमधील ख्रिस्ती विश्वासाला ही आकडेवारी कधीच सहन होणार नाही. पण आजच्या मंडळीत हे सर्व चालते, तेथे नित्याचे सर्वच कार्यक्रम चालू असतात. आपल्या महत्त्वाच्या कामांकडे दुर्लक्ष झाल्याने आपण या पृथ्वीवर प्रचंड

अपयशाचे धनी झालो आहोत याची कोणालाच खंत नाही, खेद नाही!

पहिल्या शतकातील आलेक्सांद्र, रूफ, त्रुफैना आणि अंद्रोनीक ह्यांचा ख्रिस्ती विश्वास आणि विसाव्या शतकातील ज्यो, सुझन, सॅम आणि एडी ह्यांचा ख्रिस्ती विश्वास ह्यांच्यात काय फारक आहे? मी सांगतो हा फरक सर्वस्वी योजनेचा, तंत्राचा आहे. काम करण्याची त्यांची योजना, तंत्र वेगळे होते आणि आमचे तंत्र वेगळे आहे. दोहोंमध्ये जमीनअस्मानाचा फरक आहे.

आजच्या अमेरिकन ख्रिस्ती मंडळीतील पारंपरिक संघटनात्मक नमुन्याचे, साच्याचे एक उदाहरण मी देतो. समजा एक मोटार बस आहे. ती एका ठरावीक रस्त्याने ठरावीक स्थळी जाते आहे. बसमध्ये उतारू आहेतच. रस्त्याने जाताना हे उतारू आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी उतरतात. पुढे जाणारे उतारू बसमध्ये येतात असा हा क्रम संपूर्ण प्रवासात ठरलेल्या ठिकाणी पोहोचेपर्यंत चालतो. ख्रिस्ती मंडळी या बससारखी आहे. पाळक या बसच्या चालकासारखे आहेत. बसचा चालक (पाळक) बसमध्ये उतारूंचे स्वागत करतो. (सहप्रवासीही त्यांचे स्वागत करून विचारपूस करतात). सर्व उतारू आसनांवर बसतात आणि गरजेनुसार उठून उभे राहतात. वाटेने दिसणाऱ्या वनशोभेची, सुंदर स्थळाची माहिती सांगण्यासाठी चालक (पाळक) भाषण देतो. इकडे बसमध्ये उतारू स्वस्थ बसून सर्व पाहतात. ऐकतात (बऱ्याच जणांचा हा प्रवास झोपेतच होतो!) सर्वसाधारण प्रवासी हा प्रवास धीराने सोसतो, सहन करतो पण क्वचितच आणखी एखादा उतारू आणतो. तसेच बसचे चालक, तो रस्ता, वाटेने दिसणारी शोभा अगर प्रवास याविषयी जवळजवळ कधीही काहीही बोलत नाही. कौतुकाचे दोन शब्दही उच्चारीत नाही! थोडक्यात, या प्रवासात जे काही साध्य होते ते सर्व बसची क्षमता उत्तम, यांत्रिक संचलन आणि बसचालकाचे कौशल्य यामुळेच असते. येशू ख्रिस्त आणि आरंभीचे शिष्य ह्यांचा ख्रिस्ती विश्वास अगदी सर्वस्वी वेगळा होता. पूर्वीचा विश्वास व आजचा विश्वास यांची तुलना यथार्थ करण्यास कोणताच आधार नाही! प्रेषितांच्या कृत्यांमधील ख्रिस्ती विश्वास प्रामुख्याने लोकचळवळीतून वाढत होता. ती लोकांची चळवळ होती (प्रे.कृ.१:८; ८:१ आणि ४). ती पाळकांची किंवा संघटनेची चळवळ नव्हती!





उत्तर ध्रुवावर बर्फाची बनलेली एक प्रचंड टोपी आहे. त्यावर अधिकाधिक बर्फ साचत राहते. शास्त्रज्ञ म्हणतात हा बर्फ वितळला तर जगातील बहुतेक भाग पाण्याखाली जाईल. सामान्य लोक त्याला देवाचे 'राखीव भांडवल' असे म्हणतील. ते सर्व देवासमोर वितळवण्यात आले आणि त्याला त्याची दृष्टी, त्याचा हेतू व त्याचे उद्दिष्ट ह्यांची जोड मिळाली तर ''...जल समुद्राला व्यापून टाकिते तशी पृथ्वी परमेश्वराच्या प्रतापाच्या ज्ञानाने भरेल'' (हबक्कूक २:१४).

देवाने आपल्या मंडळीसाठी नेमलेला आदर्श, साचा कसा आहे ते इफिस.४:७-१४ मध्ये स्पष्टपणे सांगितले आहे. आध्यात्मिक कृपादाने हाच या शास्त्रभागाचा सर्वसाधारण विषय आहे. पण येथे ज्यांची चर्चाविचार आहे ती दाने नव्या करारामध्ये इतरत्र सांगितलेल्या दानांसारखी नाही. रोम.१२; १ करिंथ.१२ व १४; आणि १ पेत्र ४ मध्ये उल्लेख केलेली कृपादाने सामान्यपणे अगदी वेगळी आहेत. ही कृपादाने वरून स्वर्गातून दिलेल्या देणग्या असून त्या पवित्र आत्म्याने विश्वासणाऱ्यांच्या अंतरंगात स्थापन केल्या आहेत आणि ही येथील कृपादाने प्रत्यक्षात कृपादाने प्राप्त झालेले नेते, पुढारी आहेत. पवित्र आत्मा हे मंडळीला देतो. विशिष्ट हेतूने विशेष कार्य साधण्यासाठी ते मंडळीला दिले आहेत. त्यांच्याकडून मंडळीची विशिष्ट ध्येये साध्य होतात.

या संपूर्ण शास्त्रभागाची रूपरेषा पुढे दिली आहे. तिच्या आधारे या वचनातील विषय समजून घेता येईल (इफिस.४:७). या शास्त्रपाठामध्ये कृपादाने देणारा, कृपादानी (कृपादान प्राप्त असलेल्या व्यक्ती) आणि ज्यासाठी कृपादाने दिली आहेत ती उद्दिष्टे :

## कृपादाने देणारा (इफिस.४:७-१४)

### १. ही कृपादाने देणाऱ्याने केलेले कार्य व. ८-१०

येशूविषयी तीन महान सत्ये सांगितली आहेत :

अ. तो खाली उतरला, व.९-१०

ब. त्याने आरोहण केले, व.८,९,१०

क. तो स्वर्गातील सर्वांत उच्चस्थानी आहे, व.१०ब

**२. कृपादाने (कृपादाने मिळालेल्या व्यक्ती) – त्यांचे स्वरूप, व.११**

अ. ''प्रेषित''

ब. ''संदेष्टे''

क. ''सुवार्तिक''

ड. ''पाळक-शिक्षक''

**३. ही कृपादाने देण्याचे उद्देश स्पष्ट केले आहेत, व. १२,१३**

अ. मंडळीसाठी (ख्रिस्ताचे शरीर) सभासद करून घेणे, व. १२ब

ब. मंडळीतील सभासदांना सज्ज करणे, व.१२अ

क. मंडळीच्या द्वारे व त्यापुढे सभासदांना सेवा नेमून देणे, व.१२-१६

''कृपादाने देणारा'' या शीर्षकाखाली दिलेल्या या वचनांमध्ये नव्या करारामधील ख्रिस्तज्ञानाचा एक महान शास्त्रपाठ आहे (ख्रिस्तज्ञान ख्रिस्ताच्या व्यक्तित्वाचा सिद्धान्त), यातून एक नियम समोर येतो. सैतानाचा अधःपात वरून होतो तर देवाचा मार्ग खालून वर असा आहे. ''जो स्वतःला उंच करतो (सैतानासारखा) त्याला खाली आणले जाईल, नीच केले जाईल (विश्वासाच्या अधःस्थळी आणले जाईल) पण जो स्वतःला (येशूप्रमाणे) लीन, नम्र करील त्याला (येशूप्रमाणे) उंच, उन्नत केले जाईल.''

अकराव्या वचनामध्ये कृपादानप्राप्त माणसांचा उल्लेख केला आहे. या विषयावर भरपूर अभ्यास व चिंतन करण्यास वाव आहे. उदाहरणार्थ, पहिली दोन कृपादाने पाहा - आज ही कृपादाने किंवा कृपादाने असलेले लोक मंडळीत आहेत का? प्रेषितांचे अधिकृत पद फक्त आरंभीच्या मंडळीमध्येच होते, कारण या पदासाठी आवश्यक असणारी गुणवत्ता (येशूला प्रत्यक्ष पाहिलेले व त्याच्या सहवासात असणे) पहिल्या शतकानंतर अन्य कोणाच्या ठायी आढळणे शक्यच नव्हते. तसेच 'संदेष्टा' हे पदही जुन्या करारातील विशेष प्रकारचे पद होते. शिवाय इफिस.२:२० मध्ये ''प्रेषित व संदेष्टे या पायावर'' मंडळी रचिलेली असल्याचे सांगितले आहे.





पाया महत्त्वाचा आहेच, पण त्याचे महत्त्व त्याच्या ठिकाणीच आहे. वर केलेल्या बांधकामात नाही.

पण असे अंदाज, अटकळी करण्यात मुख्य मुद्द्याकडे आमचे दुर्लक्ष होईल. ''जसा पुढारी तसे अनुयायी'' हा नियम वारंवार सांगितला जातो. अनुयायी-शिष्य-नेत्यासारखा-गुरूसारखा होईल (लूक.६:४० - येशूचे उद्‌गार). येशूने आपल्या मंडळीला निश्चितपणे लक्षात येणारी समजणारी कृपादाने असलेले चार पुढारी दिले आणि त्यावरून आपली संपूर्ण मंडळी कशी असावी, व्हावी ते त्याने स्पष्टपणे सांगितले आहे.

## प्रेषित

''प्रेषित'' म्हणजे ''०कडून पाठवलेला.'' आपली संपूर्ण मंडळी (!!!) ''जाणाऱ्या व पाठविणाऱ्या'' व्यक्तींची सहभागिता असावी हीच येशूची इच्छा आहे. कित्येकजण जाण्याच्या जबाबदारीतून पळवाट म्हणून आम्ही पाठवणारे आहोत, आम्ही पाठवतो - तुम्ही जा असे म्हणतात. पण नव्या कराराला अनुसरून या गोष्टीचे अजिबात समर्थन करता येत नाही.

आजच्या मंडळीमध्ये काय स्थिती आहे? आजची मंडळी ''येणाऱ्या'' लोकांनी भरलेली आहे. अगदी विश्वासूपणे, निष्ठेने येणे व सेवा करणे हेच त्यांच्या ख्रिस्ती विश्वासाचे गमक आहे. प्रेषित या शब्दावरून येशूने त्यांचीच निवड का केली ते स्पष्ट होते (इफिस.१:३; प्रे.कृ.१:३-८). निवडणे हे क्रियापद ग्रीकमध्ये कर्मकर्तरी प्रयोगात योजिले आहे. येशूने त्यांना ''आपणा स्वतःसाठी निवडले'' असा अर्थ त्यातून ध्वनित होतो. त्यांची वाढ व्हावी, त्यांचे आरोग्य चांगले राहावे, त्यांना सुखसंपत्ती मिळावी यासाठी किंवा त्यांना परिपूर्तीचे समाधान मिळावे याहीसाठी निवडले नाही तर ''त्याच्या स्वतःसाठी'' निवडलेले आहे. पण या क्रियापदावर चुकीचा भर दिल्याने ख्रिस्ती विश्वासाच्या ''ग्राहकाचे हित जपणारा'' असा अर्थ लावला गेला. यात नव्या कराराचा एकंदर अर्थ भलत्याच प्रकारे लावला जातो. नव्या करारामध्ये देव हाच ग्राहक-उपभोक्ता आहे आणि आम्ही त्याच्या

उपभोगासाठी, उपयोगासाठी आहोत. जिम एलियटने अगदी मनःपूर्वक खरेपणाने प्रार्थना केली, ''हे देवाच्या अग्निज्वाले मला तुझे इंधन होऊ दे!'' किंवा ''मला देवाच्या अग्निज्वालेचे इंधन व्हायचंय!'' येशूने आम्हांला का, कशासाठी निवडले आहे? जाण्यासाठी आमची निवड केली आहे. त्याची इच्छा असेल, तसे तो पाठवील तेथे आपण जायचे आहे. ०कडून दूर जायचे आहे. ०कडून मागे यायचे नाही! तसेच तो सांगेल तसे व्हायचे आणि त्याच्या इच्छेप्रमाणे करायचे. तेव्हा प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने जगाच्या टोकापर्यंत सर्वत्र प्रभाव पाडण्याचे ध्येय ठेवणे हेच योग्य व इष्ट आहे. अशा प्रकारच्या योजनेला काही नेमक्या मर्यादा वगैरे घातल्याचे प्रेषितांची कृत्येमध्ये आढळते का? होय! त्यांनी आपले कार्य स्थानिक पातळीवर आत्मकेंद्रित ठेवण्याचा प्रयत्न केला खरे पण देवाने छळणूक पाठवली. या छळाच्या वावटळीने ते बियांसारखे (प्रे.कृ.८:१ मध्ये याच अर्थाचा शब्द आहे. प्रे.कृ. ८:४; १ पेत्र.१:१ मध्येही हाच शब्द आहे). चहूकडे विखुरले गेले (त्यांची पांगापांग झाली). रोमन साम्राज्याच्या मिश्र भूमीमध्ये सुवार्तेचे बी या प्रकारे पेरले गेले. ख्रिस्ती बांधवहो, सावध व्हा, जागृत राहा. शेवटच्या काळातील प्रचंड मोठा छळणुकीचा प्रसंग अमेरिकन ख्रिस्ती मंडळीवर येऊ घातला आहे. तशी चिन्हे आता दिसतच आहेत. आक्रमक मूलतत्त्ववादी इस्लाम धर्म जगात सर्वत्र प्रबळ होत चालला आहे आणि येशू ख्रिस्ताची दीनदुबळी मंडळी तेवढी त्याच्या वाटेत आड येते आहे. तंत्रज्ञानाने साध्य केलेल्या गोष्टी, ख्रिस्ती विश्वासाला सर्वत्र छुपे, सुप्त वैरी आणि छळणूक करणारे तयार झाले आहेत. ख्रिस्ती धर्मविश्वासाचे सुखासमाधानाचे दिवस आता फारच थोडे उरले आहेत. आपल्याच कोशात, आपल्याच जागेवर आरामात सोयीनुसार थोडेफार कार्य करण्याची सवड आता राहिली नाही. स्वतःला आपल्यातच बंदिस्त ठेवण्याची मानसिकता ही आता फार काळ टिकणारी नाही. ख्रिस्ती लोकांची लवकरच आणखी एकदा पांगापांग होणार आहे. ही पेरणी करणारा देवाच आहे. जा आणि सांगा, तारणाचा संदेश सांगा ही आज्ञा आपण सोयीस्करपणे कानाआड टाकतो, ऐकूनही न ऐकल्यासारखे करतो. पण हे चालणार नाही. देवाने हे अधिकच गंभीरतेने घेतले आहे.





## संदेष्टा

संदेष्टा (प्रॉफेट) म्हणजे केवळ सत्याचे भाकीत करणारा नव्हे, तो ''स्पष्टवक्ता,'' देवाचा संदेश परखडपणे सांगणारा आहे. हा संदेष्टा सत्य सांगणारा आहे. केवळ ''शांतीवचन'' उच्चारणारा नाही. संदेष्टा ''अग्रगामी'', ''निरोप्या'', ''घोषणा करणारा'', ''साक्ष देणारा'' आहे. येशूने आपल्या मंडळीला संदेष्टे देणगी म्हणून दिले आणि त्यावरून हे दाखवले की, त्याची मंडळी सतत अथकपणे कार्य करणारी, सदा विश्वासू, सदोदित धीट, धैर्यवान, नेहमी संदेश देत, बोलत राहणारी लोकांची सहभागिता असावी हाच त्याचा उद्देश आहे. परमेश्वराने उद्धारिलेले जन असे (त्याची दया सनातन आहे) म्हणोत (स्तोत्र.७:२). यातून अनेक दिव्य उद्दिष्टे साध्य होतात. यातूनच बोलणारा, वक्ता, प्रौढ परिपक्व होतो, कारण कोणतीही व्यक्ती आपण उच्चारलेल्या शब्दांप्रमाणे वर्तन करील. मग ते शब्द, ते बोलणे कोणतेही असो. यामुळे देवाचे गौरव होते, कारण त्याच्या लोकांची स्तुती व साक्ष यांमध्ये त्याची वसती असते. आणि यातूनच सुवार्ता प्रत्येक श्रोत्याच्या कानी पडते. कोणत्याही ख्रिस्ती माणसाने सुवार्तेविषयी बोलण्यापूर्वी जगाचे तापमान, मनोवृत्ती कशी आहे. जगाचा रक्तदाब वाढला आहे का अशा नसत्या गोष्टींची पंचाईत करू नये, कारण त्याने इकडेतिकडे लक्ष दिले तर त्याच्या मुखातून सुवार्ता हा शब्दही येणार नाही. आपण सर्वप्रथम देवाबरोबर, देवाला उद्देशून देवाविषयी आणि देवासाठी बोलत असतो आणि म्हणूनच आपण कधीच गप्प बसून राहता कामा नये. मी विश्वास ठेवतो, माझा विश्वास आहे, म्हणूनच मी बोललो आहे, बोलतो आहे. संदेष्टे, उपदेशक, पाळक, शिक्षक आणि मंडळीचे पुढारी या सर्वांनीच मोकळेपणाने पूर्णपणे स्पष्टपणे आणि धिटाईने बोलले पाहिजे - आणि सर्व विश्वासणाऱ्यांनीही तेच, तसेच केले पाहिजे.

## सुवार्तिक

''सुवार्तिक'' म्हणजे चांगली बातमी देणारा. तो लोकांना येशूविषयीची चांगली बातमी सांगतो. तसेच लोकांविषयी येशूला सांगतो. शुभवर्तमानामध्ये काही वाईट

बातमीही आहे - सैतान त्याच्या कुयुक्त्या, त्याची विपरीत रीत, मनुष्य, त्याची पापी अवस्था, पापी वर्तन, देव आणि पापाविरूद्ध त्याची सात्त्विक पवित्र प्रतिक्रिया आणि सर्वस्वी आशाहीन, उलटे वर्तन करणारे पापी आणि त्यांचे अंतिम स्थान नरक याविषयीही सुवार्तेमध्ये सांगितले आहे. पण खेदाची गोष्ट अशी की मंडळीने ही वाईट वार्ताच अधिक वेळा, वरचेवर आणि अधिक जोरदारपणे सांगितली आहे. शास्त्रलेखांतील सर्वांत महान संदेश सुवार्ता हाच आहे. हाच संदेश शास्त्रलेखांच्या पानोपानी आढळतो. आणि खरोखरी शुभवर्तमानाचा स्वीकार करायचा तर प्रथम देव, येशू, पवित्र आत्मा, आपण स्वतः, आपले तारण, आपले सध्याचे भवितव्य, अंतिम मुक्कामाचे ठिकाण आणि सर्व गोष्टींचा अंतिम शेवट याविषयी चांगले वाटले पाहिजे, समजले पाहिजे. सुवार्तासंदेश सांगण्याच्या संबंधात आपली मंडळी गौरवी आणि विजयी व्हावी हाच देवाचा उद्देश आहे.

## पाळक-शिक्षक

''पाळक-शिक्षक'' या जोडशब्दामधून देवाला आपल्या मंडळीकडून कोणती अपेक्षा आहे ते अखेर खरोखरी समजते. पाळक या अर्थी मूळ ग्रीक भाषेतील शब्दाचा अर्थ आहे मेंढपाळ. यावरून देवाच्या लोकांनी नेतृत्व करावे हा त्याचा उद्देश स्पष्ट दिसतो आणि नेतृत्व करण्यासाठी ख्रिस्ती व्यक्तीला पुढील बाबी चांगल्या स्पष्टपणे व निश्चितपणे माहीत असणे अगत्याचे आहे : आपण कोण आहो, आपल्याजवळ काय आहे, आपणाला कोठे जायचे आहे, तेथे कसे पोहोचायचे, आज आपले कोणते उद्दिष्ट ठरलेले आहे, दररोज कोणता उद्देश साधायचा, आपल्यावर सोपवलेली कामगिरी कशी पूर्ण करायची हे सर्व नीट माहीत असले पाहिजे. ज्याला या सर्व गोष्टी उत्तम प्रकारे, खात्रीशीर माहीत आहेत तो कोणालाही ठामपणे उत्कृष्ट मार्गदर्शन करू शकेल. शिक्षक या शब्दावरून आपली मंडळी सत्य सांगणारी, शिकवणारी, पालनपोषण करणारी सहभागिता असावी हा येशूचा उद्देश स्पष्ट होतो. आणि हीच कामगिरी प्रत्येक विश्वासणाऱ्याला सोपवून दिली आहे आणि ती सर्व प्रकारे (१ करिंथ.९:२२) साध्य केली पाहिजे. उत्स्फूर्तपणे बोलणे, तयार केलेली साक्ष, औपचारिक शिक्षण, उपदेश, संदेश, प्रवचन सुवार्ता





(हस्तपत्रिकांचे वितरण, पुस्तके, मासिके, पत्रे, देवाला पत्रांची विशेष आवड आहे), कॅसेट, व्हिडिओटेप, रेडिओ, टेलिव्हिजन, समोरासमोर भेटून, दूर अंतरावरून संपर्क साधून अशा सर्व प्रकारे कित्येकांचा तारण साधावे यासाठी छाप पाडावी, मन वळवावे.

याप्रमाणे ह्या ''कृपादानांचे'' वर्णन केले आहे. यातून मंडळीची घटना, रचना, कामगिरी व जबाबदारी स्पष्टपणे दिसून येते.

## ही कृपादाने देण्याचे उद्देश

### मंडळीमध्ये सभासद करून घेणे

कृपादाने प्राप्त झालेल्या या व्यक्ती त्यांचे पुढे येणारे अनुयायी यांचा उपयोग करून आपण ख्रिस्ताच्या शरीराची - मंडळीची रचना, बांधणी करायची आहे. म्हणूनच सभासद करून घेण्यासंबंधी मंडळीने नवे मापदंड लावणे जरूर आहे. सभासद म्हणून नोंद करून घेण्याची सर्व अवस्था, अटींची पूर्तता मंडळीने ताबडतोब करून घेणे अगत्याचे आहे. ख्रिस्ताला स्वीकारण्याचा निश्चय केल्याच्या पहिल्या क्षणापासून ख्रिस्ती कराराच्या सर्व अटी स्पष्टपणे सांगून त्या स्वीकारल्या पाहिजेत. स्वसुखाचा, स्वार्थाचा त्याग, वधस्तंभ उचलून वाहणे, (या आरंभीच्याच आवश्यक बाबी आहेत - त्या नंतर प्रौढपणी स्वीकारायच्या अशा नाहीत). पारदर्शक जीवन आचरण, पवित्र शास्त्राचा भक्तिमय आणि तपशीलवार विवेचनात्मक अभ्यास, उपासना आणि प्रार्थना, युद्धासाठी सज्जता वगैरे वगैरे हे सर्व यथाकाळ अंगवळणी पडणे जरूर आहे. पण दर आठवडी तास दोन तास अगर अधिक वेळ शिक्षण देऊन या गोष्टी ठसवता येत नाहीत.

आमच्या सुवार्ताप्रसारकार्यात त्या मूर्तिप्रेम, श्रीमंत तरुण सरदाराला अगर त्याच्यासारख्या एखाद्याला नाकारण्याचा, त्याच्याकडे लक्ष न देण्याचा मापदंड अगर प्रथा कोठे आहे का? हा विघातक, विध्वंसक मापदंड येशूने लावला आणि एक सभ्य, सौजन्यशील, सनातनी, आस्थेवाईक शोधक व्यक्तीला रिकामेच घरी पाठवले (मत्तय.१९:१६-२६ काळजीपूर्वक वाचा). जाता जाता त्या तरुणाने विचारलेले

प्रश्न पाहा : ''मला सार्वकालिक जीवन वतन मिळावे म्हणून मी कोणते चांगले काम करावे?'' हाच प्रश्न एका शास्त्र्याने (शास्त्री = मोशेचे नियमशास्त्र शिकवणारा) वेगळ्या प्रसंगी, वेगळ्या ठिकाणी विचारला आहे (पाहा लूक १०:२५) आणि प्रत्येक वेळी येशूने, आपल्याला वाटते तशी ''तारणाची परंपरागत योजना'' पर्याय म्हणून सांगितली नाही. त्याने तारणाच्या मार्गातील मध्यावधी कसोटी अगदी आरंभीच लावली व त्यांची पारख केली.

तारणाच्या मार्गाविषयी फोड करून सांगताना आपण ''विश्वास ठेवणे'' हे क्रियापद वापरतो. पण मूळ ग्रीकमध्ये यासाठी दोन शब्द मिळून झालेला जोडशब्द वापरला आहे. त्याचा अर्थ जीवनक्रम चालवणे, ०च्या प्रमाणे, आधारे चालणे. तुमचे आचरण वर्तन हे सर्व तुमच्या विश्वासातून येत असते. इतर सर्व वायफळ बडबड आहे. क्षुल्लक नगण्य गोष्टीचे मोठे अवडंबर माजवायचे! शब्द मोठे सात्त्विक आणि धार्मिकतेने थबथबलेले असतात. जाडे जाडे पांडित्यपूर्ण शब्द पण त्यातून काहीच अर्थ मिळत नाही, कारण सर्व पोकळच असते. हा ख्रिस्ती विश्वास नेहमीच चर्चा, परिसंवाद रंगवतो पण कधीच काही करत नाही! तो आढ्यता मिरवतो. पण एक पाऊल उचलून कधी बाहेर लोकांकडे जात नाही, आनंदी असतो पण आज्ञाभंग करतो. शुद्धतेसाठी स्वतःची आंतरिक शुद्धी - स्वच्छता करतो, पण जिंकण्यासाठी स्वतःला झोकून देत नाही, हिरीरीने पुढे येत नाही. रविवारी न चुकता मंडळीत उपासनेसाठी गर्दी करतो पण पृथ्वीच्या टोकापर्यंत सुवार्तेचा प्रभाव पडावा यासाठी काहीच करीत नाही. मला वाटते आपण विश्वासामध्ये प्रवेशासाठी ही एक अट घातली पाहिजे. नवा जन्म झाल्यावर (नव्याने जन्म होणे अथवा न होणे हे सर्वस्वी देवाच्या हाती आहे). त्यामागोमाग नवजीवन आलेच पाहिजे (हेही देणे न देणे देवाकडेच आहे). आमच्या ख्रिस्ती मंडळीमध्ये नव्याने सभासद भरती होणे गरजेचे आहे. यात प्रत्येक सभासदाला येशूचे संपूर्ण प्रकटीकरण समजलेले असावे. करारावर सही करणारा अगोदर संपूर्ण करार, त्यातील अटी वगैरे सर्व नीट वाचून मगच त्यावर स्वाक्षरी करतो, नाही का?





## मंडळीतील सभासदांना सज्ज करणे

तसेच प्रत्येक सभासदाला ''सेवेच्या कार्याकरिता'' सज्ज केले पाहिजे (इफिस.४:१२). या वचनामध्ये नव्या करारातील एक व्यापक आणि निश्चित अर्थाचा अति महत्त्वाचा शब्द आहे. पवित्र शास्त्रात याचा अनुवाद ''पूर्णतेस नेण्याकरिता'' असा केला आहे. पण कसाही अनुवाद केला तरी मूळ शब्दाचा समग्र अर्थ व्यक्त होणे आणि अन्य भाषक वाचकांना तो समजणे अवघड आहे. ''सज्ज करणे'', ''तयार करणे'', ''साधनसामग्री देणे'' असे वेगवेगळे अनुवाद आहेत. यात एक गोष्ट निश्चित आहे. सर्वच ख्रिस्ती व्यक्तींना सज्ज करायचे, सेवेसाठी तत्पर होणे असे पाहायचे, सिद्ध करायचे, सर्व साधनसामग्री देऊन तत्पर करायचे - त्यात कसलाही अपवाद नाही, कोणालाही वगळायचे नाही अगर यातून सूट द्यायची नाही. आजची मंडळी स्व-केंद्रित, सर्वस्वी अंतर्मुख आहे. मंडळीमध्ये पाळक हाच सर्वेसर्वा असून त्यालाच सर्व महत्त्व असते. मंडळीच्या रंगमंचावर प्रमुख भूमिका त्याचीच असते. अदीक्षित सामान्य सभासद असतात, त्यातील काहीजण किरकोळ जबाबदाऱ्या सांभाळतात, जसे - उपासनामंदिराची स्वच्छता ठेवणे, दान गोळा करणे, सभासद नोंद ठेवणे, दप्तर सांभाळणे वगैरे. इतर सभासद स्वस्थपणे पाहतात, ऐकतात. ते केवळ प्रेक्षक व श्रोते असतात! हे चित्र बदलले पाहिजे. या नमुन्याला नव्याने आकार दिला पाहिजे. यात पाळकांनी प्रत्येक सभासदाला सेवेसाठी सिद्ध करायचे आणि प्रत्येकाने सेवा करणारे व्हायचे असे झाले पाहिजे. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने सेवेचे कार्य करावे यासाठी प्रत्येकाला सिद्ध केले पाहिजे हा उद्देश अगदी स्पष्ट आहे. लक्षात घ्या, तुमचे तारण झाले त्याच दिवशी तुम्हांला सेवेसाठी पाचारण केले आहे. तुमचे पाळक सेवक आहेत तसे तुम्हीही सेवक आहात - त्यात कोणी कमी वा अधिक नाही. खरे पाहता तुम्हीच सेवा करायची आहे आणि तुमच्या पाळकांनी तुम्हांला सेवेसाठी सिद्ध करायचे आहे. आता वेळ आली आहे. आपण 'अदीक्षित अथवा सामान्य सभासद' हे शब्द मंडळीच्या शब्दकोशातून काढून टाकून प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला पूर्णवेळ सेवेत घेतले पाहिजे. त्याने जाऊन सुवार्तेची घोषणा करावी, नेतृत्त्व द्यावे, शिक्षण देऊन तयार करावे. असे झाले तर

मंडळीची सेना विजयाने घोषणा देत कूच करीत, हर्षाने जयघोष करीत सर्वत्र मिरवेल. युजिनिया प्राइज ह्यांनी म्हटले आहे : ''आजच्या मंडळीने यहूदाच्या सिंहाला अगदी नरम मवाळ करून घोर पातक केले आहे!'' ख्रिस्ती विश्वासामधील सर्व धोके, सर्व साहस, धाडस, दहशत, भय, जिवाचे भय, हौतात्म्य हे आम्ही वजा केले आहे, त्याची नावनिशाणीही उरू दिली नाही, आणि यातील जे काही उरले सुरूले आहे ते अगदीच सपक, अळणी आहे. येशू ख्रिस्ताच्या मंडळीने आपले झेंडे उभारून मिरवणूक काढली तर लोकांना काहीच वाटत नाही. तेच क्रिकेटचा सामना असला तर लोकांच्या उत्साहाला ऊत येतो!

''सिद्ध करणे'' या अर्थी मुळामध्ये जो शब्द आहे तो बहुव्यापी आहे. या शब्दाचा नव्या करारातील उपयोग पाहून आपण आश्चर्यचकित होतो. ग्रीक भाषेत ''काटारिसमॉन'' असा शब्द आहे. त्यात काट हा प्रत्यय शब्दाच्या आरंभी लावला आहे आणि मन हा प्रत्येक शब्दाच्या शेवटी लावला आहे. हे दोन्ही प्रत्यय काढून टाकले तर आपणाला सिद्ध करणे, असा अनुवाद केलेला आर्टिस हा शब्द मिळतो. त्यावरून इंग्रजीत आर्टीझन हा शब्द आला आहे. आर्टिझन म्हणजे कुशल कारागीर. मंडळीमधील प्रत्येक व्यक्तीला, सभासदाला सत्याचे - देवाचे वचन नीट हाताळणारा, कुशलतेने अर्थविवरण करणारा, अगदी कुशल सेवक करावे हीच पाळक - शिक्षकाची जबाबदारी आहे. येशूनेही आपल्या बारा शिष्यांना याच प्रकारे भावी सेवेसाठी शिकवून तयार केले. आपल्या सहवासात, देखरेखीखाली सतत तीन वर्षे, रात्रंदिवस त्यांना मार्गदर्शन दिले. प्रत्यक्ष सेवाकार्यातून अनुभव व प्रशिक्षण दिले. ''ख्रिस्तासारखा'', ''ख्रिस्ताप्रमाणे'' म्हणजे काय? आपण ख्रिस्ताचे योजनातंत्र बाजूला ठेवले, महान कामगिरी वगळली आणि त्याने घालून दिलेल्या आदर्श नमुन्याकडे दुर्लक्ष केले तर मग अखेर आज दिसते त्याहून वेगळी परिस्थिती दिसणार तरी कशी?

ख्रिस्ताच्या सेवाकार्याचा गाभाच आपण वगळला तर आजची ख्रिस्ती मंडळी आणि हीन दशा पाहून अश्रू ढाळण्याचे, वाईट वाटून घेण्याचे काहीच कारण नाही. आम्ही जे उत्पादन केले तेच घेऊन स्वस्थ राहणे भागच आहे. लक्षात ठेवा, ज्ञान





- जाणीव झाली की प्रक्रिया सुरू होते आणि प्रक्रियेतून उत्पादन होते. उत्पादन केलेली वस्तु जर चुकीची, सदोष असेल (आणि अनेकदा असेच होते) तर मग प्रक्रियाही सदोषच असणार यात शंकाच नाही.

''सिद्ध करणे'' हा शब्द पुन्हा पाहा. पहिल्या शतकात ग्रीक भाषक जगात हा शब्द व्यापक प्रमाणात उपयोगात होता असे संशोधनातून आढळते. या शब्दाच्या अनेक अर्थछटा आहेत. त्या अशा :

१. *फुटीमुळे विभक्त झालेले शहर पूर्ववत करण्यासाठी संबंधितांना शांत करणे.*
२. *निखळलेल्या हाडाचा सांधा नीट करणे.*
३. *व्यायामाने शरीर बलवान व पुष्ट करणे.*
४. *चळलेल्या माणसाचे मन पुन्हा ताळ्यावर आणणे.*
५. *काही कारणाने मैत्री तुटली आहे अशा मित्रांमध्ये समेट करणे.*
६. *एखादा विशिष्ट हेतू किंवा उद्दीष्ट साधण्यासाठी काहीतरी पूर्णपणे तयार करणे, साधनसामग्रीने सज्ज करणे.*
७. *वस्तूंची यथोचित मांडणी करणे किंवा वस्तू व्यवस्थित क्रमवारीने लावून ठेवणे.*
८. *कोणती तरी गोष्ट प्रगतीपथास लावणे.*

वरील यादी घाईघाईत गडबडीने वाचून विसरून जाऊ नका. ही यादी, हे मुद्दे पुन्हा वाचा आणि ख्रिस्ताच्या मंडळीत पुढाऱ्यांची कार्यकर्तव्ये याच आधारे निश्चित करा. आणि ख्रिस्ताच्या सर्वच अनुयायांच्या जीवनात वरील सर्व विधानांचा प्रत्यय येईल असे करा; कारण शिष्य त्यांच्या गुरूसारखे होणारच (लूक.६:४०).

## सभासदांना सेवा नेमून देणे

आता ''पाळक'' दीक्षित सेवक व सामान्य सभासद यांच्या पारंपरिक भूमिका बदलल्या पाहिजेत. अदीक्षित सभासद आघाडीवरचे सैन्य होतात (पूर्णपणे शस्त्रसज्ज, पूर्णपणे तयार व पूर्णपणे सक्रिय, कार्यकारी आहेत) आणि एकवटलेल्या

मंडळीबरोबर पाळकवर्ग त्यांना पाठबळ देत आहेत. चार्लस कोल्सन ह्यांनी यथार्थपणे लिहिले आहे : ''विश्वासणारे या नात्याने आम्ही स्वतःला सुवार्तेचे सेवक समजले पाहिजे. उपासनेसाठी नुसते मंदिरात जाऊन बसायचे, कानी पडते ते ऐकायचे आणि करायचा तो देवधर्म केला असे म्हणून समाधान मानणे आता थांबवले पाहिजे!'' ज्याचे काही वैयक्तिक सेवाकार्य नाही, ज्याच्या कार्याकडून जगाला काही प्रभाव पडत नाही तो ख्रिस्ती माणसांचा विकृत नमुना आहे. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने आयुष्यभर ख्रिस्ती आचरण ठेवले पाहिजे आणि येशूच्या योजनातंत्राचा वापर करून जगामध्ये सेवाकार्य चालवून सर्वत्र प्रभाव पाडला पाहिजे. जगदृष्टी असणारे दूरदृष्टीचे, जगावर प्रभाव टाकून बहुगुणन करणारे लोक तयार करणे यालाच सर्वात प्रथम क्रम दिला पाहिजे. महान कामगिरीमध्येही हेच महत्त्वाचे आहे. मंडळीने आपल्यामधील खेदजनक उणिवा दूर करून सर्व सुधारण्यासाठी नव्याने, वेगळ्या प्रकारे सभासद नोंदवले पाहिजेत. नव्याने वेगळ्या साधनांनी त्यांना सज्ज केले पाहिजे, तसेच नव्या आणि वेगळ्या प्रकारे त्यांना सेवेसाठी पाठवले पाहिजे. परमेश्वराने आमच्या अंतःकरणाचे नेत्र उघडावे आणि ते दिव्य प्रकाशाने पूर्णपणे भरावे (इफिस.१:१७-१९).


विश्वासणाऱ्यांच्या सहभागितेमध्ये पवित्र जनांना सेवेसाठी सिद्ध करणे हेच तातडीचे उद्दिष्ट असले पाहिजे. यासाठी प्रत्येक टप्प्यावर प्रत्येक विश्वासणाऱ्याला योग्य प्रशिक्षण दिलेच पाहिजे. मंडळीची उभारणी करणे अगत्याचे आहे. तोच अंतिम उद्देश आहे - आतून गुणात्मक बांधणी करण्यासाठी प्रबोधन केले पाहिजे आणि बाहेरील बाजूने विस्तार करून आपण संख्यात्मक विस्तार केला पाहिजे. पण बाहेरून किती अंतरापर्यंत? प्रत्येक मंडळीने आपले हे नेमलेले कार्य पृथ्वीच्या शेवटापर्यंत विस्तारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी मंडळीने आपली आधार यंत्रणा वाढवली पाहिजे. आपले सेवक, कार्यकर्ते, आर्थिक तरतूद, योजना, विशेष तंत्रे व कृती अगदी पृथ्वीच्या शेवटापर्यंत विस्तारणे जरूर आहे. दूरपर्यंत पोचणारा प्रकाश मूळ ठिकाणी, स्वगृही अतिशय उज्ज्वल असतो.





## विश्वासणाऱ्यांच्या स्थानिक सहभागितेचे नमुने

विश्वासणाऱ्यांची स्थानिक सहभागिता कशी असावी, कशी नसावी त्याचे दोन नमुनेदार साचे या अभ्यासचर्चेच्या शेवटी सादर केले आहेत. यातील एक नमुना सामान्यपणे अमेरिकन मंडळ्यांमध्ये आढळतो आणि दुसरा आदर्श साचा आहे. आमच्या या चर्चेमध्ये याच साच्याचे विवेचन केले आहे.




या पहिल्या नमुन्यातील उपासनासमूहामध्ये सर्व सभासद आहेत. त्यात श्रोते, पाहणारे, आर्थिक साहाय्य देणारे, अपुरे, असमाधानी विश्वासणारे आहेत. जेव्हा बांधिलकी, समर्पण, थोडे तीव्र होते, तेव्हा ती व्यक्ती अधिक समर्पित व्यक्ती मंडळीमध्ये पुढारी होते. समर्पण - बांधिलकी अधिक तीव्र झाली (बहुधा हे समर्पण फक्त स्थानिक मंडळीपुरते मर्यादित असते) की मग मंडळीतील सेवक समोर येतात आणि मंडळीमधील सर्वात समर्पित व्यक्ती समान्यतः पाळकच असतात. या नमुन्यातील विपरीतपणा, अगदी सुस्पष्ट आहे. मंडळीची जबाबदारी, भार सर्व काही एकट्या पाळकांच्या खांद्यावरच राहते. मंडळीच्या मध्ये व बहुतेक सर्व जबाबदाऱ्या एकटे पाळक सांभाळतात. असंख्य गोष्टींसाठी केवळ त्यांनाच

जबाबदार धरले जाते. तसेच मंडळीच्या बाहेरच्या जबाबदाऱ्याही अनेकदा सोयीस्करपणे त्यांच्यावरच टाकल्या जातात किंवा त्यांनाच त्या सांभाळाव्या लागतात. विशेष कार्यक्रमांचे आयोजन केल्याने अधिक समर्पित, स्वतःची बांधीलकी स्मरणारे सभासद आत्मे जिंकण्याच्या विशेष कार्यात सहभागी होतात, सुवार्तासेवाकार्य, समाजसेवा वगैरे कार्यक्रमाला तेच हातभार लावतात हे खरे, परंतु कार्य साध्य करणे, फळ मिळवणे व जगाला प्रभावित करणे हा संपूर्ण कार्यभार जबाबदारी पाळकांनाच उचलावा लागतो.

या नमुनेदार साचाचे तिहेरी परिणाम आहेत. ते असे :

१. अतिशय निराश नेतृत्त्व. दरवर्षी १००० पेक्षा अधिक पाळक सदर्न बॅप्टिस्टमधील उपदेशाचे कार्य सोडून जातात. सदर्न बॅप्टिस्ट कन्व्हेन्शनच्या पुलपिटांवरून ३०० पेक्षा अधिक जणांना सक्तीने काढून टाकले जाते. यामुळे आम्हांला लाज वाटते का? लाज वाटलीच पाहिजे, कारण ही परिस्थिती सुधारता येते.


२. मंडळीचे सभासद प्रामुख्याने दैहिक (स्वार्थी, आत्मकेंद्रित, आपलेच सुख जपणारे) आहेत. या नमुन्यामधील सभासद श्रवणभक्ती (संदेश ऐकणे). मंडळीशी एकनिष्ठ राहणे व नियमितपणे प्रार्थनाउपासनेला हजर राहणे याहून अन्य बांधीलकी मानीत नाहीत. मग ते स्वार्थी, दैहिक आहेत यात आश्चर्य काहीच नाही!

३. जगाच्या बऱ्याच भागात सुवार्ताप्रसार झालेला नाही. जगातील बहुतेक माणसांनी अद्याप येशूचे नावही ऐकलेले नाही आणि ऐकलेच तर अर्धवट ऐकलेले असे. पण प्रेषितांची कृत्ये या पुस्तकामध्ये पाहावे तर तेव्हा आजच्यापेक्षा अधिक निराशाजनक परिस्थिती होती. पण त्या वेळच्या ख्रिस्ती विश्वासाने ते सर्व अगदी अल्पकाळात बदलले हे पाहून आश्चर्याचा धक्का बसतो. आणि आजही एकंदर परिस्थिती अगदी तशीच नाट्यमय रीतीने बदलता येईल, पण तोच पूर्वीचा लंगडा आदर्श समोर ठेवून ते शक्य होणार नाही. त्यासाठी नवाच नमुना घेतला पाहिजे.





हा दुसरा नमुना पहिल्या नमुन्याच्या अगदी उलट आहे.




या नमुन्यामध्ये कालक्रमानुसार प्रथम जबाबदारी पाळकांवर आहे. त्यांचे पद प्रतिष्ठेचे नसून जबाबदारीचे आहे. अशा पदापासून मिळणाऱ्या अगर मिळवता येणाऱ्या प्रतिष्ठेपेक्षा यातील जबाबदारी अतिशय मोठी, अमाप आहे. खरे तर हा एक नियमच सांगता येईल : मंडळीचे कोणतेही चित्रण तिच्या नेत्याची कीर्ती वाढण्यास कारण होते ते ख्रिस्ती दृष्टीने संशयास्पद आहे! आपल्याकडे लोकांनी लक्ष द्यावे, मानमरातब द्यावा, सत्कार करावा यासाठी दैहिकता, देहस्वभाव भुकेलेला असतो. देहस्वभावाचे दुबळेपणे अनेक बाबतीत दिसते. त्यातील हे एक आहे. अतिलोकप्रिय चित्रपट तारे, महानायक व नायिका ह्यांना मिळणारा मानसन्मान पाहून दैहिकतेचे डोळे फिरतातच!

या नमुन्यामध्ये (अमेरिकन मंडळीचे नमुनेदार उदाहरण) आपल्या हाताखालच्या लोकांना शिकवून तयार करणे व उत्साहाने प्रेरित करणे ही पाळकांची मुख्य जबाबदारी आहे. संपूर्ण जगामध्ये खोलवर प्रवेश करून सुवार्तासंदेश सांगायचा, शिष्य करायचे, त्यांना शिक्षण देऊन दृष्टान्त मनावर ठसवायचा आहे. हा समान दृष्टान्त पाहिल्यास, अशीच दूरदृष्टी ठेवल्याने सेवेतील प्रत्येकाचे सेवाक्षेत्र

ठरते आणि त्यातूनच तो ज्यांना तयार करीत आहे त्या शिष्यांसाठी नेमून द्यावयाची ध्येये कोणती तेही समजेल. पुढाऱ्यांना शिक्षण देऊन तयार करणे, प्रेरणा देणे ही पाळकांचीही जबाबदारी आहे. पण आता त्यांचा दुपटीने लाभ होणार आहे. पुढाऱ्यांना ''दुपटीने सिद्ध केले जाते.'' त्यांनी समान दृष्टान्त पाहिला आहे. त्यांची दूरदृष्टी व योजना समानच आहे. त्यांना पाळकांकडून मार्गदर्शन मिळते आणि मंडळीच्या सेवकांकडूनही मिळते. आणि आता सर्वच पवित्र जनांना सेवेसाठी सिद्ध तयार करण्यासाठी पाळक, सेवक आणि पुढारी एकत्रितपणे कार्य करीत राहतील. ही अपेक्षा, हे उद्दीष्ट कार्यवाहीत आणले की ''निरर्थक जड भार'' गळून पडेल आणि ''तरुण श्रीमंत सरदार अधिपतीही'' कोणी उरणार नाही. परंतु शरीराचे (ख्रिस्ताच्या मंडळीचे) डोळे, तोंड कान, हात, गुडघे व पाय असे सर्व पाहतील, बोलतील, ऐकतील, करतील, गुडघे टेकतील, चालतील. आणि हे सर्व एकचित्ताने दृढतेने नेहमी पुढे पुढे, पृथ्वीच्या शेवटापर्यंतच्या दिशेने होत राहील. स्थानिक मंडळी सहभागिता ही काही सेवाकार्याची प्राथमिक जागा नाही (पण बरेचसे सेवाकार्य तसेच होते). तर हे सेवाकार्यासाठी समर्थ आधारस्थान आहे. लोक जेथे आहेत तेथे ते आपोआप ख्रिस्त दाखवतात, त्याची साक्ष देत असतात. सुवार्तासंदेश पृथ्वीच्या शेवटापर्यंत पोचावा यासाठी ते स्वतःचा जाणीवपूर्वक कार्य करतात. डेविड ब्रायंट ह्यांनी ''इन द गॅप'' नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. ते प्रत्येकाने मिळवून वाचावे, आत्मसात करावे हे माझे अगत्याचे सांगणे आहे. सुवार्ताप्रसार झाला आहे आणि अजून सुवार्ताप्रसार झाला नाही अशा दोन टोकांच्या भूभागामधील मोकळ्या खिंडीत प्रत्येक विश्वासणाऱ्याने उभे राहावे (यहेज्केल २२:३०) असे या पुस्तकात मोठ्या आस्थेने सांगितले आहे. माझ्या एका सहकाऱ्याने म्हटले, पवित्र शास्त्र सोडले तर हेच पुस्तक सर्वांत वाचनीय व उपयुक्त आहे.

मंडळीचा हा दुसरा नमुना प्रत्यक्षात उतरला तर काय परिणाम होईल? याचे तिहेरी परिणाम होतात :

१. *कार्य केल्याचे समाधान लाभलेले, कर्तव्यपरिपूर्तीचा आनंद घेणारे या जगातील सर्वांत उत्साही पुढारी, नेते.*
२. *आध्यात्मिक विश्वासणाऱ्यांची सातत्याने वाढ होत राहणे (हे पवित्र जन ख्रिस्तकेंद्रित, देवाचा बहुमान करणारे, जगावर छाप उमटवणारे असे असतात).*
३. *जगभर झपाट्याने व्यापक प्रमाणावर सुवार्ताप्रसार.*





दुसऱ्या प्रकारच्या नमुन्यानुसार मंडळीची उभारणी करण्याच्या सूचना, योजना व तंत्रे हे सर्व काही येशूने दाखवलेल्या नमुन्यात व दिलेल्या कामगिरीतच सामावले आहे. तसेच इफिस.४ मधील आज्ञा व नमुना यातही हाच नमुना व्यक्त होतो. पण आपण काळजीपूर्वक कार्य केले पाहिजे. देवाची तातडीची उद्दिष्टे पूर्ण होण्यावरच त्यांची अंतिम उद्दिष्ट्ये पूर्ण होणे अवलंबून असते. तुम्ही स्वतः शिष्यपणाचे शिक्षण घेत आहात ना? जगाला प्रभावित करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर अनुभव घेत आहात का? तुम्ही इतरांना तयार करीत आहात का? जगाला प्रभावित करण्यासाठी दुसऱ्यांनाही कार्याचा प्रत्यक्ष अनुभव यावा, त्यांनीही कार्यक्षेत्रावर अगदी मन लावून सेवा करावी यासाठी त्यांना उत्तेजन, मार्गदर्शन देत आहात ना?

### *प्रकरण ९*

# त्याचे अखेरचे शब्द, त्याची अखेरची इच्छा

*''परंतु पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनांत व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल''* (प्रे.कृ.१ः८).

''१९८४'' आणि ॲनिमल फार्म या पुस्तकांचा सुप्रसिद्ध लेखक, जॉर्ज ऑर्वेल ह्याने लिहिले आहे : ''आता आपण एवढ्या खालच्या पातळीवर गेलो आहोत की त्या ठिकाणी जे स्पष्ट आहे तेच पुन्हा सांगणे हेच बुद्धिमान माणसांचे आद्य कर्तव्य झाले आहे.'' आजच्या मंडळीमध्ये येशूने स्पष्टपणे सोपवलेली 'कामगिरी' पूर्ण करण्याकडे, त्यानुसार आज्ञापालन करण्याकडे क्वचितच कोणी लक्ष देत आहे! म्हणूनच येथे उघड दिसते ते अगदी 'क्रांतिकारी' आहे. हे उघड दिसणारे पुन्हा सांगितले व लागू केले तर मंडळी पायापासून हादरणार यात शंकाच नाही.

येशूने सोपवलेली कामगिरी व त्याबरोबर दिलेली आज्ञा यांचा उल्लेख चार शुभवर्तमाने व प्रेषितांची कृत्ये या पुस्तकांमध्ये केला आहे. शुभवर्तमानातील वृत्तांतकथन पुढे प्रेषितांची कृत्येमध्येही केले आहे. यातील वृत्तांत कालक्रमानुसार लिहिला आहे. यातील घटना घडतात तो भौगोलिक परिसर सहज लक्षात

राहण्याजोगा आहे. त्याचा नमुना प्रे.कृ.१:८ मध्ये आढळतो : ''यरुशलेम... यहूदीया... शोमरोन.. पृथ्वीचा शेवट.'' प्रेषितांची कृत्ये या पुस्तकाचे तीन विभाग करता येतील (१-७, ८-१२, १३-२८). येशूने आरंभलेले कार्य यरुशलेममध्ये कसे पुढे चालू ठेवले ते पहिल्या विभागात दाखवले आहे. हे कार्य आरंभीची मंडळी करीत होती. दुसऱ्या विभागातून यहूदा व शोमरोन या प्रदेशात सुवार्तेची प्रगती कशी झाली ते दाखवले आहे आणि शेवटच्या भागात पृथ्वीच्या शेवटापर्यंत सुवार्तेचा प्रवास कसा झाला ते सांगितले आहे.

प्रे.कृ.१:८ मध्ये येशू ख्रिस्ताने आपल्या शिष्यांना उद्देशून बोललेले अखेरचे शब्द नमूद केले आहेत आणि यानंतर तो लगेचच स्वर्गात चढून गेला. पुनरुत्थान झाल्यावर येशू आपल्या शिष्यांना प्रथम भेटला आणि त्यांना सर्व राष्ट्रांना त्याची साक्ष सांगण्याची आज्ञा दिली असे लूक व योहान शुभवर्तमानांमध्ये लिहिले आहे. आणि त्याच सायंकाळी त्याने हीच जबाबदारी पुन्हा एकदा शिष्यांकडे सोपवली. पुन्हा गालील प्रांतातील वर्वतावर त्याने ह्याच आज्ञेचा पुनरुच्चार केला आहे. हा वृत्तांत मत्तय २८ मध्ये दिला आहे. आता ४० दिवसांनंतर तो आणि त्याचे शिष्य यरुशलेम शहराच्या बाहेर येशूचे स्वर्गारोहण होण्यापूर्वी काही काळ एकत्र जमले होते. हे सर्व पाहता ही आज्ञा, ही महान कामगिरी काय आहे ते आम्हांला स्पष्ट समजण्यास कसलीच हरकत नाही. पण हे सर्व स्पष्ट असतानाही आपण या आज्ञेकडे लक्ष दिले नाही हे पुढील प्रश्नावरून उघड होईल. पहा तुम्ही जे काही करता, बोलता, मनात आणता त्याचा संपूर्ण जगावर कितीसा प्रभाव पडतो? जगावर प्रभाव पाडणे याविषयी येशू आग्रही होता. पण त्यासाठी वापरायच्या पद्धतीसंबधात त्याने आग्रह धरला नाही. आपण हे अगदी उलट केले आहे. पद्धती शिकणे, त्यावर चर्चा करणे यासाठी आम्ही वारंवार चर्चासत्र, सभासंमेलने, परिसंवाद, परिषदा अशा कार्यक्रमांना न चुकता हजेरी लावतो, पण प्रत्यक्षात सहभागी होण्याचे बाबतीत आम्ही काढता पाय घेतो?

येशूने दिलेल्या आज्ञेप्रमाणे कृती करणे आवश्यक आहे. त्याची तीच अपेक्षा आहे, इच्छा आहे. महान कामगिरीचा मसुदा ऐकावा, पाहावा, वाचावा आणि त्याचा अभ्यास करावा या उद्देशाने ती दिलेली नाही. ही कृतीसाठीची योजना आहे.





आपल्या या अभ्यासामध्ये आम्ही फक्त त्या कामगिरीची आज्ञा तपासून पाहणार आहोत. त्यासाठी प्रे.कृ.१:८ या वचनाचा आधार घ्यायचा आहे. पण अखेर महत्त्वाचा प्रश्न तसाच आहे. त्याचे उत्तर द्या. महान कामगिरी पूर्ण करण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर पावलोपावली तुम्ही सहभागी व्हाल का? त्यासाठी हातभार लावाल का?

## सुवार्तेच्या प्रगतीसाठी योजना (प्रे.कृ.१:८)

या विधानामध्ये प्रथम सुवार्तेच्या प्रगतीसाठी केलेल्या योजनेचे स्वरूप दिसते. याही योजना आमलात आणण्याचे तंत्र साक्षी या शब्दामध्ये आहे. साक्ष - साक्षी या अर्थी असणारा शब्द बहुव्यापी आहे. या शब्दात अर्थाचा आशय भरपूर भरलेला आहे. हा ग्रीक शब्द आहे ''मार्दुरिआ''. यावरून हा काही सीधासाधा मवाळ शब्द नाही हे लगेच लक्षात येते. इंग्रजीमध्ये ''मार्टिर'' म्हणजे रक्तसाक्षी हा शब्द याच शब्दावरून आला आहे. या शब्दाने व्यक्त होणारी जीवनशैली धोका पत्करणारी, प्राणांची पर्वा न करणारी आहे हेच स्पष्ट होते. अशा प्रकारे ''साक्षी'' होणे म्हणजे जगणे-मरणे समान मानून घेतलेले काम करीत राहणे, काढता पाय न घेणे.

व्हर्जिनिया ओवेन्स हिने लिहिले आहे, ''ख्रिस्ती असणे म्हणजे सुरक्षित, निर्धास्त असणे असे नाही. हे तर अगदी टोकाला जाणे, प्राणांची पर्वा न करणे आहे. ख्रिस्ताला अनुसरणे म्हणजे प्रतिष्ठितपणे मानसन्मान मिळावा म्हणून मध्यम मार्गाने चालणे नव्हे.'' ख्रिस्ती विश्वासाची ही टोकाची भूमिका मनाला पटलेल्या ईश्वरविद्येच्या एका अभ्यासकाने लिहिले आहे : नव्या कराराच्या आज उपलब्ध असलेल्या सर्वच्या सर्व प्रती एकत्र करून मोकळ्या मैदानात त्यांची रास करू या, किंवा त्या सर्व प्रती उंच डोंगरावर नेऊन ठेवू या. मग आपण सर्वजण त्या प्रतींच्या ढिगासमोर गुडघे टेकून बसू आणि देवाला विनवून सांगू या : ''हे देवा, कृपा करून तुझे हे पुस्तक परत घे. आम्ही माणसे आता जशी आहोत ते पाहता आम्हांला या पुस्तकाचा उपयोग करायची ताकद नाही. हे पुस्तक आम्हांला केवळ दुःखी करते!'' गदरेकरांच्या देशातील लोकांच्यासारखाच हा प्रस्ताव आहे. आम्ही ख्रिस्ताला हात धरून विनंती करतो, ''आमच्या हद्दीबाहेर निघून जा!''

प्रेषितांची कृत्ये या पुस्तकात ''मार्टिर'', ''मार्टर्स'' (साक्षी, रक्तसाक्षी इ.) हा शब्द तिसाहून अधिक वेळा आला आहे. या पुस्तकामध्ये हा एक प्रमुख शब्द आहे. आपल्या जिवाला अगोदर जपायचे अशा प्रकारची राहणी जीवनक्रम आम्ही विसरावा हेच या पुस्तकात सांगितले आहे. याची काही उदाहरणे पाहा :

*एक शेतकरी आपल्या कुत्र्यासह शिकारीला जंगलात गेला. ते दोघे त्यांच्या घरापासून काही मैल दूर होते. तेथे गेल्यावर आपण जेवणाची सामग्री आणायला विसरलो हे शेतकऱ्याच्या लक्षात आले. मग त्याने आपली बंदूक खाली ठेवली आणि कुत्र्याला सांगितले, मी घरी जाऊन जेवण आणतो. मी परत येईपर्यंत इथेच बसून राहा. शेतकरी गेल्यावर काही वेळाने जंगलाच्या या भागात कुठेतरी आग लागली. आगीचा वणवा भडकला. कुत्रा बसला होता त्याही पलीकडे आग पसरली. तो कुत्रा बसल्या जागी होरपळून मेला. नंतर शेतकरी परत आला. कुत्र्याचे जळलेले शरीर तेवढे त्याला दिसले. बाजूला त्याची बंदूक होती. शेतकरी स्वतःशीच बोलला, ''मी त्या कुत्र्याला सांगितले ते जरा विचार करून सांगायला हवे होते, कारण तो नेहमीच सांगितले ते सर्व करतो हे मी जाणून होतो.'' ख्रिस्ती बांधव हो, आपण येशू ख्रिस्त सांगतो तेच करीत राहावे, जिवेभावे तेच लक्षपूर्वक करावे आणि जंगलातील वणवा वगैरे इतर गोष्टींची अजिबात पर्वा करायची नाही.*

*जीवशास्त्राच्या एका प्राध्यापकांनी एक दिवस विज्ञानाच्या वर्गातील विद्यार्थ्यांना सांगितले, ''आत्मसंरक्षण हाच निसर्गाचा पहिला नियम आहे.'' वर्ग संपल्यावर एका ख्रिस्ती विद्यार्थ्याने हसत हसत त्यांना म्हटले, ''निसर्ग आणि कृपा (दिव्य कृपा) या दोहोंतील फरक पाहणे मोठे मनोरंजक आहे. आत्मसंरक्षण हा निसर्गाचा नियम असेलही पण आत्मसमर्पण हा कृपेचा पहिला नियम आहे!''* तो अगदी बरोबर बोलला.

काल्वरीवरचे आत्मसमर्पण, आत्मयज्ञच देवाच्या कृपेच्या केंद्रस्थानी, अंतरंगात आहे. तसेच ख्रिस्ती शिष्यपणाचे पहिले तत्त्व येशूच्या पुढील शब्दांमधून प्रकट झाले आहे : ''...जर कोणी माझा अनुयायी होऊ पाहतो तर त्याने स्वतःला नाकारावे (आत्मत्याग करावा), आपला वधस्तंभ उचलून घ्यावा आणि मला अनुसरत





राहावे'' (मार्क.८:३४). स्वतःला नाकारायचे म्हणजे पेत्राने येशूला नाकारले तेव्हा तो जे बोलला ते आपणा स्वतःविषयी बोलणे : ''या माणसाची माझी ओळख नाही. याच्याबद्दल कधीच काही ऐकलेले नाही.''

ब्रूस मॉर्गन ह्यांनी लिहिले आहे : ''आज ख्रिस्ती लोकांना मारून टाकावे, त्यांचा अतोनात छळ करावा असे कोणालाच वाटत नाही. हे लक्षण काही चांगले नाही.'' युजिनिया प्राइस ह्यांनीही हाच विचार मांडला आहे. त्या म्हणतात : ''ख्रिस्ती मंडळीने येशू ख्रिस्ताला अगदी मवाळ केले आहे. हेच तिने केलेले घोर पाप आहे.''

प्रे.कृ.१:८ प्रमाणे साक्ष दिल्याने आपल्यावर नेहमी संकटेच येतात, अवघड परिस्थिती होते (पण त्याचबरोबर आमच्या अंतरंगात नेहमी आनंद उत्पन्न होतो आणि सतत चमत्कारांचाही अनुभव येतो).

संपूर्ण अमेरिका देशातील शेकडो धर्मपुढारी एकदा चर्चाविचार करण्यासाठी एकत्र जमले. या सभेपुढे विचारासाठी हा प्रश्न होता : ''आमचे हे राष्ट्र पुन्हा देवाकडे वळवण्यासाठी आमचा कसा उपयोग होईल? आम्ही काय करावे?'' या प्रश्नाला थोडक्यात उत्तर देण्यासाठी सभेला आलेल्या प्रत्येकाला संधी देण्यात आली. एका कृष्णवर्णी पुढाऱ्याने उठून म्हटले, ''बंधूंनो अमेरिकेमधील ख्रिस्ती लोकांनी प्रथम आपले मरणाचे, मृत्यूचे भय सोडून दिले पाहिजे, मगच ते या समाजावर इष्ट तो प्रभाव पाडू शकतील.'' एवढे बोलून तो खाली बसला. त्याने दिलेले उत्तर तेथे जमलेल्या इतर कोणाच्याही उत्तरापेक्षा अधिक चांगले होते असे अनेकांनी बोलून दाखवले.

कित्येक वर्षांपूर्वी रॉबर्ट वाईल्डर मिशिगन येथील होप कॉलेजमध्ये जागतिक मिशनसेवाकार्य या विषयावर बोलण्यासाठी गेले. ते थोर मिशनरी, वक्ते होते. तेथील उपासनामंदिरात त्यांनी पुलपिटसमोर भारताचा एक मोठा नकाशा लावला आणि नकाशासमोर संगीताचा ताल दाखवणारे कालदर्शक यंत्र मेट्रोकेम ठेवले. संदेशातून ते म्हणाले, ती तालदर्शक घंटी वाजली की त्या त्या प्रत्येक वेळी भारतात एक व्यक्ती - एक जीव - ख्रिस्ताचे नावही न ऐकता मरण पावते. त्या दिवशी

ख्रिस्त आणि त्याचा दृष्टान्त यांनी सॅम्युएल इवेमर या तरुण विद्यार्थ्याच्या अंतःकरणाची पकड घेतली. त्याच्या अंतरंगात या दृष्टान्ताची ज्योत उजळली तेव्हा त्याने देवाला विनवून म्हटले, ''मला पृथ्वीवरच्या सर्वांत कठीण ठिकाणी पाठव. तेथे मी कार्य करीन.''

कालांतराने इराणच्या आखातात बहारिन येथे मुस्लिम समाजाच्या अगदी केंद्रस्थानी त्याने वस्ती केली. अलीकडील काळात आखाती युद्ध झाले तेव्हा प्रसारमाध्यमे वरचेवर बहारिनचा उल्लेख करीत हे सांगणे नकोच! या बेटावरील इस्लामी सरकारने इवेमरला सुवार्ताप्रसारासाठी परवानगी दिली नव्हती. तरीपण तो सुवार्तापत्रिका छापून लोकांना देत असे. पुढे एकाच आठवड्यात इवेमर ह्यांच्या दोन लहान मुली (वय वर्षे चार व सात) आजारी पडल्या. या बेटावरील भयंकर उष्णता सहन न झाल्याने त्या मरण पावल्या. सॅम्युएल इवेमर यांनी सरकारी अधिकाऱ्यांकडे मुलींची प्रेतक्रिया करण्याची परवानगी मागितली. पण या मुली ख्रिस्ती आहेत त्यांना आमच्या देशाच्या भूमीत पुरले तर जमीन भ्रष्ट होईल अशी सबब सांगून परवानगी नाकारली. मग इवेमरनी पुन्हा विनंती केली तेव्हा परवानगी दिली, पण प्रेते पुरण्यासाठी कबरा तुमच्या तुम्हीच खणा असे फर्मावले. इवेमरनी स्वतः कबरा खणून आपल्या मुलींचा अंत्यसंस्कार केला. नंतर त्यांनी त्या कबरांवर एक फलक लावला. त्यावर लिहिले होते : ''वधलेला कोकरा संपत्ती घेण्यास पात्र आहे.'' येशूने आपल्या अनुयायांना या प्रकारची मरेपर्यंत देत राहण्याची, काम करीत राहण्याची धीरोदत्त वृत्ती ठेवण्यास सांगितले आहे.

आरंभीच्या एका मिशनरी सेवासंस्थेने कॅमरून या देशात ७० मिशनरी सेवक पाठवले. कॅमरून हा महत्त्वाचा देश असून तो पश्चिम आफ्रिका आणि दक्षिण मध्य आफ्रिका यांच्यामधील एक दुवा आहे (एक लक्षात घ्या, कॅमरून देशात सर्वस्वी आपल्याच धर्माचे प्राबल्य व्हावे म्हणून मुस्लीम लोक जारीने प्रयत्न करीत आहेत). या ७० मिशनरींपैकी ६८ जण तेथेच सेवाक्षेत्रात मरण पावले. हे ७० मिशनरी सेवाक्षेत्रात गेल्यानंतर सरासरी दोन अडीच वर्षांत मेले. त्या देशात तेवढेच आयुष्य त्यांना मिळाले! त्यांच्यापैकी कित्येकजणांनी आपल्या शवपेट्या बरोबर नेल्या होत्या. हे वास्तव आहे. कारण आपण बहुधा परत स्वदेशी येणार नाही याची त्यांना





जाणीव होती. येशूला याच प्रकारच्या अशाच मरेपर्यंत सर्वस्वी देत राहणाऱ्या जीवनशैलीची अपेक्षा होती.

विश्वासाच्या आधारे सुवार्ताप्रसार करणाऱ्या एका संस्थेच्या बरोबर एक मिशनरी कुटुंब चीन देशात सुवार्ता सांगण्यासाठी गेले होते. शाळा शिक्षक म्हणून ते निवडले गेले होते. तिकडून ते परत सुटीसाठी स्वदेशी आले. तेव्हा ते दीर्घ मुदतीच्या रजेवर येणाऱ्या मिशनरीसारखेच आले - म्हणजे चित्रपट्ट्या (स्लाईड) आणि त्यांच्या कामाची माहिती सांगणारी पत्रके घेऊन आले. अशा प्रकारे रजेवर येणारे मिशनरी सेवक अशा स्लाईड पेट्या घेऊन येत व ठिकठिकाणी मंडळ्यांमध्ये त्या दाखवीत असत. सर्वत्र हाच शिरस्ता होता व लोकही ती चित्रे पाहत व त्यांचे बोलणे मनापासून ऐकत. चित्रे दाखवणे व व्याख्यान देणे, माहिती सांगणे संपल्यावर मंडळीतील एका सभासदाने उठून उभे राहून विचारले, ''आपण कदाचित तिकडेच मरून जाऊ अशी तुम्हांला भीती वाटली नाही का?'' तेव्हा त्या मिशनरी जोडप्यामधील पतीने उत्तर दिले, ''नाही, भीती वाटली नाही. कारण तिकडे जाण्यापूर्वीच आम्ही मेलो होतो!'' त्यांच्या या बोलण्यातून मार्टर्स (रक्तसाक्षी) या शब्दांचे पडसाद उमटले आहेत, नाही का?

मेथडिस्ट मंडळीचे पाळक चार्लस क्रो हे एक दिवस सकाळी आपल्या उपासनामंदिराकडे चालले होते. तसे ते रोजच तिकडे जात. शिकागो येथील हे उपासनामंदिर भव्य होतेच, पण त्यापेक्षा त्या इमारतीवरील उंच शिखर आणि त्यावर लावलेला क्रूस हे लोकांच्या नजरेत भरणारे होते. उत्तर अमेरिकेतील कोणत्याच उपासनामंदिराचा मनोरा एवढा उंच व भव्य नव्हता. त्या सकाळी क्रो पाळक उपासनामंदिराकडे गेले तेव्हा त्यांना त्या इमारतीच्या समोर रस्त्याच्या कडेला पदपथावर बरेच लोक जमल्याचे दिसले. ते सर्व मान उंचावून वर मंदिराच्या मनोऱ्याकडे पाहत होते. पाळकांनी पुढे जाऊन पाळकांसाठी असलेल्या जागेवर आपली मोटार उभी केली व तेही लोकांच्या गर्दीत जाऊन वर पाहू लागले.

त्या मनोऱ्यावर क्रूस लावला होता. एक रंगारी तो क्रूस रंगवीत होता. तो रंगारी त्या क्रूसाला पट्ट्याने बांधलेला होता, त्याच्या कंबरेला रंगाचा डबा त्याच्या

कपड्यालाच अडकवलेला होता. तो हळूहळू क्रूस रंगवीत खाली खाली सरकत होता. त्याच्या प्रत्येक हालचालीबरोबर तो क्रूस मागेपुढे झुकत होता. जिवावरचा धोका पत्करून तो रंगारी ते अवघड काम करीत होता आणि देहभान विसरून लोक तेच पाहत होते. काही मिनिटांनी चार्लस क्रो त्या जमावातून बाहेर येऊन मंदिरातील आपल्या कचेरीकडे जाऊ लागले. अचानक पवित्र आत्मा बोलतो आहे असे त्यांना जाणवले, ''माझ्या मुला, तू या रस्त्याने शेकडो वेळा आलागेला असशील, पण शेकडो लोक चर्चसमोर उभे राहून वरती पाहत आहेत असे यापूर्वी कधीच दिसले नव्हते; क्रूस तर तिथे कित्येक दिवसापासून आहे, मग आजच वेगळं काय झाल? आज त्या क्रुसावर एक माणूस होता. क्रुसावर खरोखरी मनुष्य दिसला तर सगळे जग ते पाहायला थांबेल. खोळंबून राहील.''

आज सर्व जग जणू मंडळीला थोमा संशयाने व अज्ञानाने बोलला तेच सांगत आहे. : ''त्याच्या हातात खिळ्यांचे वण पाहिल्यावाचून व खिळे होते त्या जागी आपले बोट घातल्यावाचून... मी विश्वास धरणार नाही.'' जगाला ख्रिस्तकेंद्रित ख्रिस्ती माणसाने निरपेक्षपणे केलेले समर्पण पाहण्याची आतुरता आहे. त्याशिवाय ते विश्वास ठेवणारच नाहीत.

आपण थोडे थांबून विचार करावा. या प्रकारच्या ख्रिस्ती जीवनशैलीला अन्य कोणता पर्याय आहे ते पाहावे. असा पयार्य एकच आहे. येशूने म्हटले, जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो तो त्याला मुकेल तो त्याला वाचवील. (जीव वाचवणे = रक्षण करणे, बचाव करणे). या वचनाच्या पहिल्या भागामध्ये आत्मकेंद्रित, स्वतःला सांभाळण्याची, आपला जीव वाचवायचा ही वृत्ती दिसते. तर दुसऱ्या भागात स्वतःचा विचार न करणारी, पर-केंद्रित, दुसऱ्याचे हित जपणारी, ख्रिस्ती माणसाची जीवनशैली दिसून येते.

उत्तरेकडे प्रवास करणारे दोघे प्रवासी बर्फाच्या वादळात सापडले. त्या वादळातून बर्फाचा मारा चुकवीत कसेबसे वाट काढीत पुढे जाताना त्यांना बर्फात पडलेला एक माणूस दिसला. तो अगदी गारठून गोठला होता. हालचाल करीत नव्हता. तो मेला असे वाटत होते. त्या दोघांपैकी एकजण बोलला, ''मीच कसाबसा पुढे जायची





धडपड करतोय. मी काही थांबणार नाही'' आणि तो निघून गेला. दुसरा प्रवासी म्हणाला, ''त्याच्यात अजून थोडी धुगधुगी आहे. अशा स्थितीत मी कोठल्याच माणसाला सोडून जाणार नाही.'' असे बोलून तो खाली बसला आणि त्या माणसाला मालीश करून ऊब देण्याचा प्रयत्न करू लागला. अखेरीस त्या गारठलेल्या माणसाने आपले डोळे उघडले, हळूहळू त्याच्या जिवात जीव आला. तो उठला आणि त्याला जीवनदान देणाऱ्या त्या प्रवाशाबरोबर पुढे चालू लागला. ते दोघे मोठ्या मेटाकुटीने पुढे चालले, वाटेत त्यांना काय दिसले असेल? स्वतःचा जीव वाचवू पाहणारा, सरळ पुढे गेलेला तो माणूस बर्फात पडून मेला होता. तो अगदी गोठला होता.

चांगल्या शोमरोन्याप्रमाणे वागलेल्या त्या माणसाने दुसऱ्याचा जीव वाचवण्यासाठी कष्ट केले, पण त्यामुळे त्याचा स्वतःचा जीवही वाचला. त्या गारठलेल्या माणसाचे शरीर जोरजोरात चोळल्याने त्याच्या स्वतःच्या शरीरात उष्णता निर्माण झाली. त्यामुळे तो गारठला नाही. हा नियम नेहमीच खरा व रास्त आहे : ''जो कोणी (ख्रिस्ती मनुष्य अथवा मंडळी) आपला जीव वाचवू पाहतो तो त्याला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरिता व सुवार्तेकरिता आपल्या जिवाला मुकेल तो त्याला वाचवील.''

सी. एस. ल्युईस ह्यांनी आपल्या ''द क्रॉनिकल ऑफ नार्निया'' ह्या पुस्तकात ख्रिस्ती जीवनातील साहसी, धाडसी वृत्तीचे उदाहरणे दिले आहे. द लास्ट बॅटलमधील एका व्यक्तीच्या तोंडी पुढील शब्द आहेत : ''नार्नियासाठी लढता लढता मरण आलं तर मला आनंदच होईल. घरी स्वस्थ बसून म्हातारं होऊन मरण्यापेक्षा ते शतपटीनं चांगलं. मरण तर शेवटी आहेच!'' मित्रहो, आपण सर्वच एक ना एक दिवस मरणारच आहोत. पण ख्रिस्ती समर्पित वृत्ती कशी आहे ते पाहा : ''नेहमीप्रमाणे आताही जगण्याने किंवा मरण्याने माझ्या शरीराच्या द्वारे ख्रिस्ताचा महिमा होईल... हे मला ठाऊक आहे'' (फिलिप्पै.१:१९,२०).

येशूच्या बोलण्याचा विस्तारित भावार्थ असा आहे : ''विश्वासणाऱ्यांनो तुम्हीच माझे साक्षी, माझी अधिकारपत्रे, माझे प्रतिपादन, विवरण, माझी शिफारसपत्रे,

माझी प्रसिद्धी, माझ्या जाहिराती, माझी निवेदने आहात.'' आणि ख्रिस्त सादर करताना प्रत्येक वेळी वधस्तंभच केंद्रस्थानी असतो. जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्यांनी प्रश्न केला आहे : ''जगाची कल्पनाशक्ती तोकडी आहे म्हणून काय प्रत्येक पिढीत ख्रिस्ताला पुन्हा पुन्हा वधस्तंभावर खिळायचं की काय?'' महाशय, तुमच्या या प्रश्नाचं उत्तर आहे, ''होय!'' आणि आम्ही जराही स्वतःची जाणीव नसलेले, स्वार्थरहित कोकरे झाले पाहिजे. ''तुम्ही माझे रक्तसाक्षी, प्राणांची पर्वा न करणारे साक्षीदार आहात. सुवार्तेची प्रगती प्रसार करण्याचे हेच योजनातंत्र आहे.''

## सुवार्ता साक्षीचा उगम

आता आपण सुवार्ता साक्षीचा उगम कोणता आहे ते पाहू या. ''परंतु पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.'' या वचनामध्ये तुम्ही, तुम्हांवर, तुम्हांला या अनेकवचनी शब्दातून सुवार्तासाक्षीचा उगम दिसून येतो. येथे 'तुम्ही' वगैरे शब्द अनेकवचनी आहेत. ही कामगिरी ख्रिस्ताच्या संपूर्ण मंडळीला दिली आहे आणि मंडळीच्या प्रत्येक सदस्याने ही कामगिरी पूर्ण करायची आहे. प्रिय ख्रिस्ती बंधूभगिनींनो, येशूच्या योजनेमध्ये तुम्हा प्रत्येकाचा मोठा सहभाग आवश्यक आहे. सुवार्तासाक्षीचा स्रोत, उगम तुम्हीच आहात.

या वचनामध्ये पवित्र आत्म्याचा उल्लेख फक्त एकदाच आला आहे, तर तुम्ही वगैरे उल्लेख तीनदा आले आहेत. असे असले तरी पवित्र आत्म्याची भूमिका उणी होत नाही, तर तुमची जबाबदारी मात्र अधिक वाढते. तुम्ही कोण? तुम्ही म्हणजे देवदूत नव्हेत, महानायकही नाहीत, खास लोकही नाहीत. तुम्ही म्हणजे कोण हे पूर्वीच्या वचनातून सांगितले आहे. प्रे.कृ.१ः२ मध्ये ''येशूने जे प्रेषित निवडले होते'' त्यांचाच उल्लेख ''तुम्ही'' वगैरे शब्दांनी प्रे.कृ.१ः८ मध्ये आहे.

मित्रहो, सर्व प्रेषित पुरुष होते पण यामुळे स्त्रियांच्या भूमिकेला, सहयोगाला बाधा येत नाही. उलट त्यामुळे पुरुषांची जबाबदारी अधिक वाढली आहे. ख्रिस्ती इतिहासामध्ये भविष्यकाळात समस्या येणार हे अगोदरच जाणले होते. पुरुष आपली





जबाबदारी सहज झटकतील आणि सर्व भार स्त्रियांवर टाकतील हे खरे ठरले आहे. म्हणूनच आज आमच्या मंडळ्यांमध्ये महिलांचे सुवार्ताप्रसार सेवाविभाग आहेत. या सात्त्विक, कष्टाळू स्त्रियांबद्दल आपण देवाचे उपकार मानले पाहिजेत. परंतु लक्षात घ्या ही प्रामुख्याने पुरुषाची जबाबदारी आहे. तुम्ही एखाद्या पुरुषाला सुवार्तेकडे वळवलेत तर त्याच्या प्रभावाखाली असलेल्या सर्वांना ख्रिस्ताकडे आणण्याची सुसंधी मिळेल. कारण समाजाचा पायाभूत घटक म्हणून देवाने पुरुषालाच प्रमुख नेमले आहे. पण त्याच्या परिवारापैकी एखाद्या व्यक्तीला (पत्नी, मुले इ.) तुम्ही प्रथम ख्रिस्ताकडे आणले तर तेथील प्रमुखाला किंवा त्याच्या परिवारापैकी अन्य कोणाला ख्रिस्ताकडे वळवू शकणार नाही!

काही वर्षांपूर्वी एका उत्तम शुक्रवारी सकाळच्या थंड वेळी सेंट पॉल, मिनेसोटा येथील पीपल्स चर्चच्या इमारतीला आग लागली. ही आग लागली मध्यरात्रीनंतर लगेचच काही वेळाने. पण भयंकर थंडी आणि वारा यांमुळे अग्निशमन दलाला आग विझवणे फारच अवघड झाले. आग आटोक्यात येईपर्यंत इमारत अगदी जमिनीपर्यंत जळली होती. मग चांगले उजाडल्यावर इमारतीच्या समोर गावातले लोक आणि मंडळीचे सभासद जमू लागले. अद्याप त्या इमारतीमधून धूर येत होता. काही उरलेसुरले अवशेष धुमसत होते. या इमारतीमध्ये उपासना होत असे तसेच त्यातच एका भागात धार्मिक कलावस्तूंचे, चित्रांचे संग्रहालय होते. पर्यटकांचे हे आवडीचे ठिकाण होते.

उपसना होत असे त्या भागात पुलपिटच्या अगदी मागे आवाहन करणाऱ्या ख्रिस्ताची प्रतिकृती ठेवली होती. हा आठ फूट उंचीचा संगमरवरी पुतळा थॉर्सव्हाल्डन या प्रसिद्ध डॅनिश शिल्पकाराने तयार केला होता. मूळ पुतळा डेन्मार्क, कोपनहेगन येथे 'द चर्च ऑफ अवर लेडी' या उपासना मंदिरात आहे. अनेक वर्षांपूर्वी भारतामध्ये सुवार्तासेवा करणारे मिशनरी स्टॅन्ली जोन्स हे डेन्मार्क येथे गेले असताना त्यांच्या मार्गदर्शकाने त्यांना हा पुतळा दाखवला. येशू खाली जमिनीकडे पाहतो आहे, हात जगाकडे पुढे केले आहेत हे दाखवणारा हा पुतळा मत्तय.११ः२८ या वचनावर आधारला आहे : ''अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या मी तुम्हांला विसावा देईन.''

द चर्च ऑफ अवर लेडी येथील हा पुतळा पाहून बाहेर येणाऱ्या पर्यटकांना त्या मार्गदर्शकाने विचारले, ''तुमच्यापैकी कोणी प्रभूचा चेहरा, प्रभूचे मुख पाहिले का?'' त्यावर जोन्स उत्तरले, ''कसं शक्य आहे ते? प्रभूचा चेहरा तर जमिनीच्या दिशेने खाली वळलेला आहे.'' मार्गदर्शक शांतपणे बोलला, ''अगदी बरोबर महाशय, प्रभूचा चेहरा पाहायचा तर प्रथम तुम्ही गुडघे टेकून त्याच्या पायाजवळ बसले पाहिजे.''

द पीपल्स चर्चची इमारत जळून खाक झाली तेव्हा तो पुतळा खाली थेट तळघरात जाऊन पडला. दुसऱ्या दिवशी दुपारच्या सुमारास मंडळीतील कित्येकांनी इमारतीमध्ये प्रवेश करण्याची परवानगी घेतली. काही बहुमोलवान वस्तू मिळतात का पाहावे म्हणून ते आत गेले. त्यांना तो पुतळा आढळला. तो आगीच्या ज्वालांनी धगीने काळवंडला होता. त्याच्या पायाजवळचा एक कपचा उडाला होता, पण एरवी त्याचे काहीच नुकसान झाले नव्हते. त्यांनी तो पुतळा सावकाश काळजीपूर्वक थंड केला आणि सायंकाळच्या सुमारास त्यांनी तो पडक्या इमारतीतून बाहेर आणून रस्त्यावर कडेला ठेवला. पुतळ्याचे कोणी नुकसान करू नये म्हणून त्यांनी तेथे सहा लोक पहाऱ्यावर नेमले. मग आणखी काही मिळते का ते पाहण्यासाठी ते पुन्हा इमारतीत गेले. काही वेळाने ते परत बाहेर आले तेव्हा जमलेले लोक त्या जळक्या इमारतीमध्ये माना उंचावून पाहात नव्हते, तर ते त्या पुतळ्याभोवती उभे राहून ती महान कलाकृती नीट पाहण्यासाठी पुढची जागा मिळवण्याचा प्रयत्न करीत होते.

या उदाहरणावरून मी तुमच्यासमोर एक महत्त्वाचा आध्यात्मिक मुद्दा विचारासाठी ठेवतो आहे. पाहा, येशू त्या उपासनामंदिरात एवढी वर्षे होता आणि रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांनी त्याला पाहिलेच नव्हते, कारण त्याला पुलपिटपाशी ''जखडून ठेवले होते.'' त्या मंडळीला आग लागली आणि मंडळीतील लोकांनी त्याला उचलून बाहेर रस्त्याकडेला आणून ठेवले तेव्हा बाहेरच्या लोकांनी त्याला अगदी प्रथमच पाहिले. तेव्हा पाहा, ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांनो, सुवार्तासाक्षीचा स्रोत तुम्हीच आहात.





## सुवार्तासाक्षीचा विषय

पुढे आपल्या या वचनामध्ये सुवार्तासाक्षीच्या विषयाचा उल्लेख केला आहे. येशूने म्हटले, ''...तुम्ही माझे साक्षी व्हाल.'' आमच्या साक्षीचे मुख्य केंद्र एखादी मंडळी नाही. एखादा संप्रदाय नाही, एखादे तत्त्व नाही, अगर एखादा सिद्धान्त किंवा पद्धतीपण नाही. आमची साक्ष ख्रिस्तकेंद्रित असली पाहिजे. त्याने आपल्या वचनामधून स्वतःचे दर्शन घडवले तसे त्याला सादर करणे हा आमचा विशेष अधिकार आहे. आम्ही त्याला उद्धारक तारक (प्रे.कृ. १:३), पुनरुत्थित प्रभू (प्रे.कृ. १:३) व परत येणारा राजा (प्रे.कृ. १:११) असा सादर केला पाहिजे. केवढा गाढ, अथांग विषय! मनाची पकड घेणारा विषय!

जर्मनीमधील एका चित्रसंग्रहालयाच्या भिंतीवर आमच्यावर सोपवलेल्या कामगिरीचा काही भाग असलेले एक चित्र लावले आहे. या चित्रामध्ये थोर जर्मन धर्मसुधारक मार्टिन लूथर जर्मनमधील एका मंडळीत उपदेश करतो असे दाखवले आहे! तो सुवार्ता सांगतो आहे. चित्रामध्ये आपल्याला उपदेशक आणि श्रोते दिसतात. तथापि अगदी बारकाईने पाहिले तर एक विलक्षण गोष्ट दिसेल. श्रोत्यांपैकी कोणीही मार्टीन लूथरकडे पाहत नाही. उपदेशकाच्या तोंडाकडे कोणीच पाहात नाही. श्रोत्यांची नजर कोणत्या दिशेला आहे त्याचा मागोवा घेतला तर तुमच्या लक्षात येईल की त्या चित्राच्या एका बाजूच्या कोपऱ्यात देवाचा पुत्र येशू याची आकृती आहे. तेथे असलेल्या सर्वांचे डोळे त्याच्याकडेच लागले आहेत. ते लूथरचे प्रवचन ऐकत आहेत, पण ते येशूकडे पाहत आहेत!

आम्ही ख्रिस्ताची साक्ष देत असताना हाच परिणाम अपेक्षित आहे. आम्ही त्याची घोषणा करतो आणि आमच्या साक्षीमधून तो आपला स्वतःचा परिचय करून देतो. परिणामी अखेरीस श्रोत्यांचे लक्ष त्याच्यावरच खिळलेले असते.

## सुवार्तासाक्षीची व्याप्ती

याच वचनातून सुवार्तासाक्षीची व्याप्ती किती तेही सांगितले आहे. या वचनातील शेवटले समाप्तीचे शब्द पाहा : ''...आणि यरुशलेमेत, सर्व यहुदीयांत, शोमरोनात

व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.''

जवळच्या लोकांना सुवार्ता सांगण्याची जबाबदारी आमच्याकडे आहे. ''हेच आमचे यरुशलेम.''

''शेजारचे, आसपासचे लोक'' - त्यांना सुवार्ता सांगणे हाही आमच्याच जबाबदारीचा भाग आहे. ''हाच आमचा यहुदिया आहे.''

''दुर्लक्षित, उपेक्षित'' लोकांना सुवार्ता आम्हीच सांगायची आहे. हेच आमचे ''शोमरोन'' आहे. (शोमरोन हे तुमच्या मनात ज्यांच्याविषयी हट्टी पूर्वग्रह आहेत त्यांचे प्रतीक आहे) आणि मग उरलेले सर्वच आमच्या कामगिरीचा भाग आहेत. पृथ्वीच्या शेवटापर्यंत सर्वांना आम्हीच सुवार्ता सांगायची आहे.

''यरुशलेम'' म्हणजे तुमच्या अगदी जवळची तात्कालिक स्थिती, ''यहूदीया व शोमरोन'' म्हणजे तुमची मधली पार्श्वभूमी आणि ''पृथ्वीच्या शेवटापर्यंत'' म्हणजे तुमचा आंतरराष्ट्रीय परिसर. यरुशलेम हे आमच्या नागरी शहरातील साक्षीचे प्रतीक आहे. यहूदीया व शोमरोन ह्यांच्यावरून आमचे स्वदेशातील साक्ष सूचित होते आणि ''पृथ्वीच्या शेवटापर्यंत'' या शब्दांवरून आमच्या वैश्विक साक्षीचा बोध होतो.

आणि या सर्व देशांच्या, प्रांतांच्या - लोकांच्या संबंधात हे किंवा ते दोहोंतले एक असा प्रकार नाही हे नीट लक्षात घ्या. येथे दोन्ही म्हणजे हे आणि ते व ते सुद्धा असे आहे. आम्ही संपूर्ण जगाची जबाबदारी स्वतःवर घ्यावी हीच येशूची आमच्याकडून दृढ अपेक्षा आहे. पण ते करायचे कसे? त्यासाठी आपण शिष्य तयार करण्याचे योजनातंत्र शिकून त्याप्रमाणे करायचे आहे. यातूनच आम्ही त्या व्यक्तीच्या माध्यमातून जनसमुदाय पाहतो आणि समुदायावर प्रभाव पाडण्यासाठी त्या मनुष्याला तयार केले पाहिजे. येशूने आपल्या बारा शिष्यांना तयार केले त्याचप्रमाणे आपणही एककाला तयार केले पाहिजे.

पवित्र शास्त्रातील काही थोड्या पुस्तकांची रुपरेषा सहज करता येते. प्रेषितांची कृत्ये हे त्यातील एक पुस्तक आहे. एक ते सात या अध्यायांतून आरंभीच्या शिष्यांनी यरुशलेममध्ये दिलेल्या साक्षीचा वृत्तांत आहे. आठ ते बारा या अध्यायामधून यहूदीया व शोमरोन यांतील कार्याचा वृत्तांत आहे आणि तेरा ते





अठ्ठावीस या अध्यायामध्ये पृथ्वीच्या शेवटापर्यंत साक्ष देण्यास आरंभ झाल्याचे वर्णन आहे.

ख्रिस्ताच्या स्थानिक मंडळीच्या सामर्थ्य व परिणाम, प्रभाव यांचे खरे वास्तविक मोजमाप असे आहे : या मंडळीचा प्रभाव किती व्यापक आहे? स्थानिक मंडळीने संपूर्ण जगाची जबाबदारी घ्यावी अशी देवाची दृढ अपेक्षा आहे. कारण तसे पाहता येशूने हेच कार्य बारा जणांना घेऊन केले आहे आणि टेलिफोन, टेलिव्हिजन वगैरे कोणतीही अतिसंपर्कसाधने नसताना ते केले आहे. त्यांनी फक्त एका एका व्यक्तीला सुवार्ता सांगितली. आपल्या लहानशा साध्यासुध्या गटाकडून त्या काळच्या नागर जगावर प्रभाव पाडला.

आज आपण समजतो की अगोदर आपल्या घराच्या जवळच्या समाजसमूहांना ख्रिस्ताकडे आणले पाहिजे आणि मगच त्याच्या सांगण्याप्रमाणे जगाचा विचार केला पाहिजे. परंतु हा क्रम उलट केला आहे. ''दूर अंतरावर पडणारा प्रकाश त्याच्या उगमस्थानी तेजोमय असतो.'' जगातील जास्तीत जास्त ठिकाणी अतिशय झटपट त्वरेने सुवार्तासंदेश कसा पोचवावा त्याची योजना प्रत्येक मंडळीने सतत केली पाहिजे. जगदृष्टी ठेवणारे दूरदृष्टीचे शिष्य तयार करणे हे प्रत्येक मंडळीचे ध्येय असले पाहिजे. आणि हेच शिष्य काळाच्या अंतापर्यंत संपूर्ण जगावर प्रभाव पाडतील. देवाने म्हटले आहे : ''माझ्याजवळ माग म्हणजे मी तुला राष्ट्रे वतनादाखल देईन, पृथ्वीच्या दिगंतापर्यंतचे स्वामित्व तुला देईन'' (स्तोत्र.२:८). असे आहे तर आम्हांला अद्याप राष्ट्रे वतनादाखल व पृथ्वीच्या दिगंतापर्यंतचे स्वामित्त्व का मिळालेले नाही? याचे एकच कारण दिसते - आम्ही मागणी करत नाही! देवाच्या अंतःकरणावर, जे आहे ते एकंदरीत मंडळीवर नाहीच! तुमच्या मंडळीत काय स्थिती आहे? तुमच्याविषयी काय म्हणावे?

नीट लक्षात घ्या, त्या वचनामध्ये असे आहे : ''यरुशलेमेत व सर्व यहूदीयात व शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटार्यंत.'' येथे हे अगर ते - दोहोंतले कोणतेही एक असा पर्याय नाही तर व... व... व... असे आहे. आपण या सर्वच ठिकाणी एकदम एकाच वळी साक्ष देत राहिले पाहिजे आणि ह्या सर्वच ठिकाणांचा विचार आणि ओझे एकाच वेळी सतत आमच्या अंतःकरणावर असले पाहिजे. असे कसे

साधायचे? आपण संपूर्ण जगाविषयीचा दृष्टान्त दूरदृष्टीने पाहणे अगत्याचे आहे. त्यानंतर दृष्टान्त प्रत्यक्ष आणण्यासाठी व्यक्ती आणण्यासाठी व्यक्ती व्यक्ती तयार केल्या पाहिजेत. संपूर्ण जग हीच आमच्या कामगिरीची व्याप्ती आहे.

## सुवार्तासाक्षीची व्याप्ती

अखेर सुवार्तासाक्षीचे रहस्य येशूच्या शब्दांमधून उकलेले आहे. त्याने म्हटले, ''...पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल.'' शरीर गेल्यावर आत्मा मागे राहतो. देह नश्‍वर आहे. आत्मा अमर आहे असे आपण म्हणतो. पवित्र आत्मा म्हणजे देहविरहीत येशू असेही म्हणता येईल. पवित्र आत्मा या पृथ्वीवर ख्रिस्ताच्या जागी आला आहे. ख्रिस्त जे करीत होता तेच करण्यासाठी त्याचे कार्य पुढे नेण्यासाठी पवित्र आत्मा आला आहे.

एका लहान मुलाने आपल्या आईला विचारले, ''आई, आई, देव पाऊस कसा पाडतो?'' आणि आई काही बोलण्याआधी त्याचे स्वतःच उत्तर दिले, ''अग, विचार करू नकोस. मला माहीत आहे. तो पवित्र आत्म्याच्या संगती पाऊस पाडतो. कारण तोच तर सरळी कामे करतो!'' पवित्र आत्मा हीच देवत्वामधील कार्यकारी व्यक्ती आहे आणि आज तोच सर्व कामे करतो.

आता ''सामर्थ्य'' या शब्दाचा अर्थ पाहा. ग्रीक भाषेत ''सामर्थ्य'' या अर्थी ''दुनामीस'' हा शब्द आहे. याच शब्दावरून इंग्रजी भाषेत ''डायनामाईट'' हा शब्द आला आहे. डायनामाईट म्हणजे अत्यंत स्फोटक, विध्वंसक वस्तू. पण येशूच्या अभिवचनानुसार प्राप्त होणारा पवित्र आत्म्याचा अनुभव अतिशय स्फोटक, आम्हांला मुळापासून हादरविणारा असेल ही आमची अपेक्षा असते. पण वास्तविक पाहता तसे मुळीच नाही. शुभवर्तमानामध्ये अशा अति स्फोटक अनुभवाचा उल्लेख कोठेच नाही, शिवाय ग्रीक लोकांना डायनामाइट हा काय प्रकार आहेते मुळीच माहीत नव्हते. नोबेल प्राईसचा जनक आल्फ्रेड नोबेल ह्याने १८६६ मध्ये डायनामाइट तयार केले. तेव्हा दुनामीस व डायनामाइट ह्यांचा तसा काही संबंध नाही. तेव्हा पवित्र आत्म्याचा स्फोटक अनुभव येईल अशी कोणी अपेक्षा ठेवू नये. येशूच्या जीवनामध्ये व सेवाकार्यात जे कौशल्य, जो जिव्हाळा व करुणा होती ते





सर्व आमच्या जीवनामध्ये आणण्यास आपण पवित्र आत्म्याला वाव दिला पाहिजे.

प्रे.कृ. १ः८ मधील सामर्थ्य असे आहे :

शीलस्वभाव पालटण्याचे सामर्थ्य आहे.

हे प्रकाशण्याचे सामर्थ्य आहे.

हे सामर्थ्य संपर्क-संवादासाठी आहे.

हे सामर्थ्य धिमेपणे कार्य करण्यासाठी आहे.

हे सामर्थ्य साक्ष देण्यासाठी आहे तसे साक्षीमधले सामर्थ्यही आहे. शीलस्वभावाची शक्ती म्हणजे ''व्यक्तित्त्वाचा जबरदस्त आविष्कार'' अशी कोणी तरी व्याख्या केली आहे. देवाच्या सामर्थ्याची ही उत्तम व्याख्या आहे. केव्हा हा जबरदस्त आविष्कार म्हणजे प्रचंड उलथापालथ असाही असू शकतो. परंतु अनेकदा हा आविष्कार व्यक्तीच्या अंतःकरणात अगदी खोलवर होतो. त्यातून व्यक्तीचे मन वळवून तिची खातरजमा करून दिली जाते. खात्री पटल्यानंतर तो प्रभाव त्या व्यक्तीच्या सहवासात असणाऱ्यांवरही पडतो. पवित्र आत्म्याच्या कार्याच्या संबंधात येशूने दिलेली अभिवचने पुढीलप्रमाणे आहेत :

खात्री - खातरजमा (योहान.१६ः७-११)

मार्गदर्शन - ज्ञानप्रकाश (योहान.१६ः१३-१६)

संवाद - संपर्क (योहान.१५ः२६) आणि

जगावर प्रभाव (प्रे.कृ.१ः८)

हे सर्व स्फोटक अनुभवाचे धक्के देणारे नाही. हे तर गतिमान, आर्जवी मन वळवणे असे आहे.

लक्षात घ्या : हे सामर्थ्य ''मिळालेले आहे - प्राप्त झालेले आहे.'' ''...तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल.'' हे सामर्थ्य साध्य केलेले, (प्रयत्नपूर्वक) मिळवलेले, संपादन केलेले नाही. एखादी गोष्ट मिळण्यासाठी, घेण्यासाठी, स्वीकारण्यासाठी फार मोठ्या बुद्धिसामर्थ्याची गरज नाही. देऊ केलेल्या गोष्टी श्रीमंतांना घेता येतात, तशा गरिबांनाही घेता येतात. देऊ केलेले सरळ घ्यायचे असते! तुम्हांला पवित्र आत्म्याचे सामर्थ्य देण्यास देव उत्सुक आहे. पण तो ते त्याच्या अटीनुसार व फक्त त्याच्या उद्देशांसाठीच देणार. देवाचे सामर्थ्य अशा पवित्र

आत्म्याने परिपूर्ण व्हा ही तुम्हांला देवाची आज्ञाच आहे. १ योहान.५:१४ मध्ये म्हटले आहे, ''त्याच्यासमोर येण्यास आपल्याला जे धैर्य आहे ते ह्यावरून की, आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही सांगितले तर तो आपले ऐकेल.''

त्याने आम्हांला आज्ञा केली आहे : ''आत्म्याने परिपूर्ण व्हा.'' ही त्याचीच इच्छा आहे याची आम्ही खात्री बाळगावी. ''आम्हांला तुझ्या पवित्र आत्म्याने भरून परिपूर्ण कर,'' असे आम्ही अपेक्षेने मागावे, त्याने आमची मागणी पूर्ण करावी आणि आम्हांला त्याची परिपूर्णता मिळावी असे हे आहे. आमच्या प्रभूने सोपवून दिलेली महान कामगिरी पूर्ण करण्यासाठी आम्ही जीवनक्रम चालवीत असताना या प्रवासात पवित्र आत्मा सतत आमच्याबरोबर आहे ही आपण खात्री बाळगावी.





## *प्रकरण १०*

# ''टॅली हो द फॉक्स'' पुस्तकाच्या नावाविषयी थोडेसे

''टॅली हो द फॉक्स'' (सावध! सावज उठलंय - तो कोल्हा बघा) हे पुस्तकाचे नाव जरा चमत्कारिकच वाटतंय ना? कोणी एक मित्र येतो आणि म्हणतो, ''काय हो, याचा अर्थ काय? कसलं पुस्तक आहे हे? या प्रश्नाचे उत्तर मी मोठ्या आनंदाने देतो, कारण येशूने सोपवलेल्या कामगिरीचा मथितार्थ त्यातच सामावलेला आहे. या पुस्तकाचे शीर्षक निवडण्यामागची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे आहे :

शिकारी कुत्री टोळीने धावतात तेव्हा ती पुढील चारांपैकी एक अथवा अधिक गोष्टी करतात :

१. ते झोपी जातील.
२. ते आपलाच जीव वाचवावयास पाहतील.
३. कोणताच धोका दहशत नसला तर ते नव्या कुत्र्यांना आपल्या टोळीत घेतील.
४. ते आपापसात भांडतील.

पण यात सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे

जोवर समोर सावज/कोल्हा दिसत नाही तोपर्यंत हे होत राहील.

'पळणारे सावज दिसेपर्यंत' ही कुत्रे आपल्यातच दंग असतात.

''मंडळी'' म्हणजे काय? पुढे दिलेली व्याख्या अगदीच जुजबी, अति साधी, पराकोटीची सोपी आणि काहींना न रुचणारी असली तरी ती पाहा. मंडळी म्हणजे टोळ्याटोळ्यांनी धावणारे ख्रिस्ती लोक! ईश्वरपरिज्ञानाने तंत्रशुद्ध व्याख्या केली आहे. ती अशी : ''मंडळी म्हणजे येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या, नव्याने जन्मलेल्या व पाचारण केलेल्या ख्रिस्ती लोकांची सभा अगर सहभागिता, ते सर्वजण समान आध्यात्मिक उद्दिष्टे साधण्यासाठी एकवटलेले असतात.'' आम्ही केलेल्या व्याख्येत हाच विचार लोकांना सहज समजेल अशा शब्दचित्रांनी मांडला आहे. आमच्या या व्याख्येत एक मोठाच दोष राहून गेला आहे. दोष साम्यानुमानामध्ये नसून क्रियापदामध्ये आहे. बहुतेक मंडळ्या पळत नाहीतच - त्या चालवल्या जातात (तो ही मंडळी चालवतो. ही मंडळी कशी चालते - चालवली जाते वगैरे) पण स्वतः सभासद मात्र चालत नाहीत. धावतपळत नाहीत. एखादे यंत्र चालवावे, एखादा धंदा, उद्योग चालवावा तसे हे सर्व चाललेले असते, पण नेमून दिलेले ध्येय साध्य करण्याच्या उद्देशाने, अगदी जिवेभावे कोणी चालत नाही की पळत नाही.

आता आपण परत आपली व्याख्या पाहू या. मंडळी म्हणजे टोळ्याटोळ्यांनी, गटागटाने पळणारे ख्रिस्ती लोक. ख्रिस्ती लोक गटागटाने, टोळीटोळीने धावतात (खरेच धावतात) तेव्हा ते पुढीलप्रमाणे चारांपैकी एक अथवा अधिक गोष्टी करतात.

***१. ते झोपी जातील.*** अनेकानेक मंडळ्यांना शास्त्रलेखांतून तातडीची अगदी लागू पडणारी महत्त्वाची हाक हीच आहे : ''हे निद्रिस्ता जागा हो व मेलेल्यांतून ऊठ!'' कित्येक वर्षांपूर्वी जॉन हॅल्सी नावाच्या एका सुवार्तावादी मिशनरी सेवकाने अतिशय कडक टीका करणारे, वाचणाऱ्याची झोप उडवणारे हे निवेदन लिहिले आहे :

''मी लेखक, ग्रंथकार असतो आणि आजवर लिहिलेल्या सर्व पुस्तकांमध्ये सर्वांत लहान पुस्तक लिहिण्याचा विशेष मान मिळवण्याची महत्त्वाकांक्षा मला असती तर आमच्या सौजन्यशील उपनगरी मंडळ्यांच्या काही सभासदांकडे जाऊन





त्यांना म्हटले असते : 'तुम्ही ख्रिस्तासाठी आणि जगासाठी करीत आहात त्याचा वृत्तांत लिहिण्याची परवानगी द्या!' आणि हा इतिहासवृत्तांत अगदी छोटा कल्पनेपलीकडे छोटा झाला असता! ज्या प्रभूने त्यांना खंडणी भरून विकत घेतले त्याच्यासाठी आणि झपाट्याने विनाशाकडे जाणाऱ्या जगासाठी ते जे काही करीत होते एकाच शून्याने दाखवता येईल! पवित्र शास्त्रामध्ये एक वचन आहे ते या काही तथाकथित नामधारी ख्रिस्ती लोकांना मोठा दिलासा, समाधान देणारे ठरेल. 'ज्या विसाव्याविषयी त्याने सांगितले आहे त्यात ज्या आपण विश्वास ठेवला आहे ते आपण प्रवेश करीत आहो' (इब्री.४:३). पण लक्षात ठेवा हा श्रमाने थकलेल्या कष्टकऱ्याचा विसावा आहे. दिलेले काम संपवल्यावरच हा विसावा घ्यायचा असतो. कष्ट करण्याची टाळाटाळ करणाऱ्या आळशी माणसासाठी हा विसावा नाही. याच्या विरुद्ध असे एक वचन सांगतो : 'सीयोनेत सुखवस्तू असणारे व शोमरोनाच्या पर्वतांवर निश्चिंत असणारे यांस धिक्कार असो!' (आमोस ६:१). होय खरोखरी धिक्कार! कारण हा आराम, विसावा, निवांतपणा गुंगवून ठेवतो आणि जगातील सर्वांत समाधानकारक अशा महाकार्यामध्ये ख्रिस्ताबरोबर सहभागी होऊ देत नाही.''

कित्येक मंडळ्या आणि अनेक ख्रिस्ती लोक ह्यांना झोपेतून जागे करण्यासाठी पुनरुत्थानाचा प्रसंग यावा म्हणजे ते उठतील! असे म्हणण्यात जराही अतिशयोक्ती नाही. मी अगदी मोठ्या खेदाने, लाजेने मान खाली घालून हे सांगत आहे, कारण स्वर्गातून कर्ण्याचा, तुतारीचा नाद होत असताना मला नव्या कामगिरीसह आघाडीवर पाचारण होत असताना मी गाढ झोपून राहिलो होतो. तथापि ख्रिस्ताचे नाव मोठ्या अभिमानाने घेणाऱ्या अनेक मंडळ्या आम्ही प्रेषितांची कृत्ये लिहिणाऱ्या ख्रिस्ती विश्वासपरंपरेतील आहोत असे प्रतिज्ञापूर्वक सांगतात. पण त्या खरोखरी कबरांसारख्या निर्जीव प्राणहीन आहेत ही वस्तुस्थिती आहे. आपण स्वतःमध्येच गुरफटून गुंगून बसलो आहोत, साहजिकच आम्हांला वधस्तंभविरहित ख्रिस्ती विश्वासाची सवय लागली आहे (आमची इच्छाही तीच आहे!). ख्रिस्ती विश्वास लोकाभिमुख, लोकप्रिय करण्यास आम्ही अगदी उत्सुक आहोत. पण आमची अवस्था 'भोळ्या बाळू'सारखी आहे. त्या महान व्यक्तीच्या (येशूच्या) मागे

चालणे अगर तो महान उद्देश (संपूर्ण जगावर प्रभाव) अगर ती महान योजना (ख्रिस्ताच्या योजनातंत्राने, ख्रिस्ताप्रमाणे शिष्य तयार करणे) यातील काहीच त्यांना आणि आम्हांला जमत नाही, झेपत नाही. तेव्हा ते काय, आम्ही काय शांतपणे स्वस्थ झोपतो!

एका विनोदी माणसाने म्हटले, ''उपासनामंदिरात झोपी जाणाऱ्या लोकांना एका सरळ रेषेत ठेवले तर त्यांना अधिक आराम मिळेल.

दुसऱ्याने एकाने उपदेश करणे म्हणजे ''एका माणसाने दुसऱ्याच्या झोपेमध्ये बोलणे'' अशी व्याख्या केली आहे.

एका बाईसाहेबांनी पहाटे तीन वाजता त्यांच्या पाळकांना फोन करून सांगितले, ''पाळकसाहेब, माझी समस्या मोठी बिकट आहे. मला अजिबात झोप येत नाही, कृपा करून थोडा वेळ उपदेश कराल का?''

वरील सर्व विनोदी चुटके आहेत हे त्यातल्या त्यात बरे आहे. पण केव्हा केव्हा प्रार्थनाउपासना चालू असताना आसनावरच डुलक्या घेणारे काही महाभाग आढळतातच! म्हणूनच हे विनोद यथार्थ आहेत! परंतु संपूर्ण जीवनच अर्धवट झोपेत घालवणाऱ्या, स्वतःचे हित जपत जपत टिकून राहणाऱ्या ख्रिस्ती लोकांचा वास्तव लक्षात घ्या. याच प्रकारच्या मंडळ्याही आहेत. त्या सर्वांचे ''निद्रिस्त महाकाय'' असे स्पष्टपणे केलेले वर्णन रास्तच आहे. (खरे तर हे विधान अधिक स्पष्ट हवे, या बाबीकडे कोणीच गंभीरपणे पाहिलेले नाही कारण हा महाकाय जागा झाल्यावर उठून काम करू लागल्यावर काय करील आणि काय होईल याचा विचार कोणी केलेला नाही. त्यामुळे मंडळी खरोखरी किती निद्रिस्त आहे याचा अंदाज कोणालाच आलेला नाही.) हे सर्व मूल्यमापन केवळ विनोद म्हणून सोडून देण्यासारखे नाही. उलटपक्षी हे एका प्रकारे निवाडे आहेत. यातून उणिवा दाखवल्या आहेत. मंडळीला ''निद्रिस्त महाकाव्य'' म्हणणे ही वास्तविक सैतानाची कल्पना आहे.

आता आपल्या सूत्रामधील दुसरा मुद्दा पाहू या

***२. ते आपण स्वतः कसे टिकून तग धरून राहू याचीच काळजी घेतात.***





केवळ तग धरून जगणे आणि खरी सेवा यांमधील मूलगामी फरक लक्षात घ्या. हा ''मूलगामी फरक'' कित्येकदा दिसत नाही. कारण बहुतेक सर्व मंडळ्या या दोहोंच्या एकत्रीकरणातून ''मध्यम मार्ग'' काढतात, आणि कोणालाही न दुखवण्याचा, सर्वांना खूष करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्याकडे ''सेवा'' आहेत ते ''सेवेच्या संधी'' देतात. पण त्यातून परिणाम काय झाला? प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून साधलेला परिणाम आणि उत्पादकता यांच्या पासंगाला तरी हा परिणाम पुरणार आहे काय? खरी सेवा करण्यासाठी धोका पत्करला पाहिजे, त्याग केला पाहिजे तसेच धाडसही आवश्यक आहे. आणि सेवेसंबंधीच्या अटी वगैरे या कार्याचा व्यवस्थापकच येशू) नेमून देतो. आज एखाद्या मंडळीमध्ये कोणी एखादा खरी सेवा करतो तेव्हा ''असाधारण, उत्तम ख्रिस्ती'' म्हणून त्याचा मान, आदर करतात, पण अशी वर्गवारी केल्याने सर्वसाधारण विश्वासणाऱ्याचे अज्ञान आणि बालिशपणा हेच काय ते पुढे येते. पण सर्वसाधारण, सर्वसामान्य ख्रिस्ती माणूस कोणाला म्हणावे? तो कसा असतो? तो उत्तमांमधील अतिवाईट असतो का अतिवाईटांमधील सर्वांत चांगला असतो? ते कसेही असो, सर्वसाधारण मंडळी अगदी सरळसरळ टिकून तग धरून राहण्याच्या वाटेने चालली आहे. ती मेंढरे पुन्हा पुन्हा मोडून जागच्या जागी ठेवण्यातच दंग आहे. मेंढरांना चारणे, आणि त्यांना तयार, सज्ज करून ''लांडग्यांमध्ये कोकरे'' असे पाठवण्यात तिला काहीच रस नाही. ही मंडळी इमारती, अंदाजपत्रके, आर्थिक तरतुदी, पत्रके, समित्या, आणि पवित्र शास्त्राच्या प्रती अशा गोष्टींमध्ये सर्वथा गुंतलेली आहे. योग्य प्रकारे कारणी लावल्या तर या सर्वच गोष्टी उत्तम आहेत. पण त्यांनाच उद्दिष्ट केले तर त्याच सर्वस्वी मारक होतात. मंडळीमध्ये या सर्वच गोष्टी आवश्यक असल्या तरी पण त्यातच गुंतून पडल्याने मंडळीच्या खऱ्या उद्दिष्टांना घातक आहे. कसेही करून टिकून, तग धरून राहायचे याच उद्देशाने चालणारी मंडळी ही सैतानाचीच कल्पना आहे!

आता आपल्या सूत्रातील तिसरा मुद्दा पाहू या.

***३. आपणा स्वतःला कोणताच धोका नसेल तर टोळीतले कुत्रे दुसऱ्या नव्या कुत्र्यांना आपल्या टोळीत, गटात येऊ देतील, स्वीकारतील.*** मंडळीमध्ये नवे सभासद करून घेण्याची मोहीम, मंडळीची वाढ, आणि सुवार्ताप्रसारासाठी

चालवलेले सभा वगैरे कार्य या सर्वांच्या मागे नेमके कोणते उद्दिष्ट आहे ते तपासून पाहणे अगत्याचे आहे. पुढाऱ्यांची वैयक्तिक प्रतिष्ठा आणि त्यांच्या संघटनांचा लौकिक वगैरे गोष्टींना विशेष प्रसिद्धी दिली जाते तेव्हा मूळ उद्देश आणि हेतू विकृत, विपरीत होण्याची दाट शक्यता आहे. काही नेते, पुढारी मोकळेपणे बोलत नाहीत. प्रश्न विचारणाऱ्याकडे संशयाच्या दृष्टीने पाहतात. त्यावरून त्यांच्या ''ओठी एक आणि पोटी दुसरेच'' असणार याची खात्री पटते. संस्था, संघटना इमारती ''बांधणे, उभारणे, चालवणे'' वगैरेंमागे त्यांचे केवळ शुद्ध हेतू नाहीत हे आपण ओळखावे. अर्थात कोणाचेच हेतू शंभर टक्के शुद्ध नसतात. परंतु मंडळीची वाढ झाली की नेत्यांचा लौकिक आणि अहंभाव वाढतो. पण तो मनात दडवून आम्ही शुद्ध हेतूने प्रभूची सेवा करतो असे सांगत असतात. पाहा, आध्यात्मिकतेच्या अगदी झिरझिरीत आवरणाखाली दैहिकता डोके वर काढण्यास टपलेलीच असते आणि हे फारच घातक ठरते. येथे मी माझे स्वतःचे दोष कबूल करून ते पदरी घेतो. माझ्या माहितीचे अनेक सात्त्विक, आणि प्रामाणिक पाळक नम्रपणे स्वतःच्या चुकांची कबुली देतात. त्यांच्याच सुरात सूर मिसळून मीही पश्चात्तापी अंतःकरणाने तशीच कबुली देतो. माझ्या माहितीच्या दोन मध्यम आकाराच्या मंडळ्या आहेत. त्या स्थापन झाल्या आणि त्यांच्या भोवतालचा परिसर झपाट्याने विकसित झाला. तेथील वस्ती वाढली. मंडळीच्या पुढारीकार्यात 'जुनेजाणते' लोक होते त्यांनी मंडळीच्या वाढीसंबंधी आश्चर्यकारक प्रतिक्रिया दिली. लोकवस्ती वाढल्याने या मंडळ्यांची वाढ होणे अटळच होते. त्यावर या दोन्ही मंडळ्यांच्या ''अनुभवी'' पुढाऱ्यांनी पाळकांना सांगितले, ''पाळकसाहेब, आपल्या मंडळीत हे नवीन लोक येत आहेत, त्यांना सभासद करून घ्यावे की नाही याचा चांगला विचार केला पाहिजे. हे नवे लोक बहुसंख्य झाले तर आपली मंडळी हातची जाईल, तिच्यावर आपले नियंत्रण राहणार नाही!'' वाढत असणाऱ्या मंडळीमध्ये अशी आत्मकेंद्रित, स्वार्थी, संकुचित, काहीही करून टिकून राहण्याची वृत्तीप्रवृत्ती असणे चांगले आहे का? मंडळीचे नेतृत्व करणाऱ्यांनी अशी भलतीच विधाने करावीत का? मंडळीमध्ये काही काळ तरी नेतृत्व केलेल्या प्रत्येक व्यक्तीला मंडळीचे नेतृत्व करताना अशा गोष्टींना तोंड देणे भाग पडले असणार. कदाचित त्याला स्वतःमध्येही अशी वृत्ती





आढळली असेल. दुष्ट देहवासना प्रबल होण्याचा हा केवळ एक प्रकार आहे. दैहिकता नेहमी कार्य करण्यावर भर देते अगर निषेध करण्यावर भर देते. मंडळीचे आध्यात्मिक नेते आणि सच्चे विश्वासू सभासद ह्यांच्यावरच सैतान प्रथम लक्ष केंद्रित करतो आणि उघड उघड दैहिकतेचा पाठपुरावा करतो. चाळिसांहून अधिक वर्षे या सेवेमध्ये घालवल्यावर माझी पक्की खात्री पटली आहे की मी माझी ''दैहिकता'' नेहमीच तपासून कह्यात ठेवली पाहिजे (रोम.६:५,११; गलती.२:२०).

वर उदाहरणादाखल जो दाखला सांगितला आहे त्यातील महत्त्वाची बाब नीट लक्षात घ्या : **समोर सावज/कोल्हा जाताना/पळताना दिसत नाही, तोपर्यंत हे असेच होत राहते.** कोल्हा अगर सावज समोरून गेले, ते या कुत्र्यांनी पाहिले की मग सर्वांची झोप उडते. या कुत्र्यांना मग डोळे मिटायला पण वेळ नसतो. आता कोणालाच स्वतःचा जीव वाचवायची, कसेही करून टिकून, तग धरून राहण्याची फिकीर नाही, चिंता नाही. आता टोळीमध्ये येऊ पाहणाऱ्या सर्वच सभासदांचे मोठ्या उत्साहाने स्वागत होते. पण नव्याने येणाऱ्या कुत्र्यांनी कोल्ह्याचा पाठलाग करणे, त्याच्या शिकारीत प्राणपणाने सर्वांसह सहभागी होणे आवश्यक असते. अशी तयारी असणाऱ्यांनाच टोळीत प्रवेश मिळतो. आता टोळीतून एकत्र पळताना पूर्वीपेक्षा अधिक दाटी होणार. अंगाला अंग घासणार. धक्के बसणार, पण आता तिकडे लक्ष द्यायला, कुरकुर करायला कोणालाच वेळ नाही. एकमेकांवर गुरगुरणे, भुंकणे, कचकन चावे घेणे याहून आता मोठ्या गोष्टी करायच्या आहेत! सावज/कोल्हा समोर स्पष्टपणे दिसला की मग सर्वच कुत्रे एकदिलाने, एका ध्येयाने, एकच उद्दिष्ट साधण्यासाठी पुढे धावत राहतील.

## हा कोल्हा कोण आहे?

ख्रिस्ती मनुष्य, ख्रिस्ती मंडळी, विश्वासणाऱ्यांची सहभागिता यांच्या दृष्टीने हा कोल्हा/हे सावज कोण, काय, कसे आहे? ख्रिस्ती जीवनाचे लक्ष्य येशू ख्रिस्त हेच आहे. येशू ख्रिस्ताचा पाठलाग करणे, त्याच्या मागे नेटाने चालणे हीच ख्रिस्ती जीवनाची इतिकर्तव्यता आहे. माझ्या दृष्टीने हेच आपले अंतिम कर्तव्य आहे,

त्याविषयी दुमत नाही, अगर याला अन्य पर्यायही नाही. पण इतर अनुयायांना गटात सामील करून घेण्याविषयीची रीत आज्ञापिलेली आहे. आणि येशूने आपल्या शिष्यांसमोर 'महान कामगिरी' हेच सावज - कोल्हा - ठेवले आहे! ख्रिस्ती पुढारी नेते ''आपल्या लोकांसाठी'' लहान कोल्हे'' निर्माण करतात. लोकांनी त्यांच्याच मागे धावावे हाच पुढाऱ्यांचा उद्देश असतो. मंडळीत उपस्थिती वाढण्यासाठी मोहीम काढणे, अंदाजपत्रकी तूट भरून काढणे, इमारती बांधणे, सालाबादप्रमाणे संजीवन सभा घेणे व इतर अशीच लहानमोठी कामे करणे हे सर्व लहान कोल्हे आहेत आणि अखेरीस ते द्राक्षमळ्याची नासूधस करतात! स्थानिक पातळीवर याच गोष्टींवर लक्ष केंद्रित केले जाते. विश्वासणाऱ्यांचे सर्व परिश्रम स्वार्थ साधण्यासाठी खर्ची पडतात. या सर्वांचा जगावर कोणताच प्रभाव पडत नाही.

एकदा काही शिकारी लोक गप्पा मारीत बसले होते. बोलता बोलता त्यांनी शिकारी कुत्र्यांचे गुणवर्णन सुरू केले. प्रत्येकजण आपला कुत्राच कसा चांगला आहे ते सांगू लागला. एकजण बोलला, ''माझा कुत्रा सर्वांत सरस, माग काढण्यात अगदी पटाईत आहे. पन्नास वर्षांपूर्वीचा मागही तो केवळ वासावरूनच काढू शकतो!'' दुसरा एकजण बोलला, ''शक्यच नाही. इतका जुनाट माग आज कोणताच कुत्रा काढू शकणार नाही. उगाच बढाई मारू नको.'' असेलही तसे, पण माझा कुत्रा नक्कीच जुना माग काढू शकेल. मी अगदी खात्रीने सांगतो!'' त्या दोघांचे बोलणे थांबवीत तिसरा शिकारी बोलला, ''आपण हे खरे का खोटे ते पाहू. मला लहानपणीची एक गोष्ट आठवते, माझे बाबा सांगत की, आमच्या जुन्या घराच्या वळचणीखाली रोज रात्री एक कोल्हा येऊन इकडे तिकडे फिरत असे. या गोष्टीला जवळजवळ चाळीस - नाही त्याहून जास्त वर्षे झालीत! चला आपण तिकडे जाऊ या आणि तुमचा कुत्रा तो माग काढतो का ते पाहू या. जायचं का?'' मग ते सगळेजण त्या कुत्र्याला घेऊन मोटारीतून त्या जुन्या घराकडे गेले. त्या घरात आता कोणी राहत नव्हते. त्यांनी त्या कुत्र्याला सभोवती फिरवले आणि मग एका बाजूला, जेथे पूर्वी तो कोल्हा येत असे त्या बाजूला नेले. अचानक तो कुत्रा जोरजोरात शेपटी हालवून जमीन हुंगून भुंकू लागला. गळ्यातल्या साखळीला झटके देत पुढे पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागला. मालकाने कुत्र्याची साखळी सोडून





त्याला मोकळे सोडले. कुत्रा लांबलांब झेपा टाकीत घरापासून लांब जाऊ लागला. घरापासून ५०-६० फूट दूर गेल्यावर त्याने हवेतच सुमारे ६ फूट उंच उडी मारली. ते पाहून एकजण म्हणाला, ''या कुत्र्याला वेडबीड लागलंय काय? पूर्वी त्या घरात राहणारा शिकारी म्हणाला, ''अरे तो वेडा नाही, चाळीस वर्षांपूर्वी त्या जागेवर एक उंच कुंपण होते आणि तो कोल्हा कुंपणावरून उडी मारून इकडे येत असे!'' तो कुत्रा वास घेत, भुंकत त्या शेतातून पुढे पळाला. मग अचानक उजवीकडे वळून तो वळणाच्या वाटेने जावे तसा घरापासून दूर पुढे गेला. पूर्वी तेथे राहणारा शिकारी बोलला, ''चाळीस वर्षांपूर्वी तिकडे काही झाडे सरळ रेषेत लावलेली होती. त्यांच्या बाजूला बरीच झुडपेही होती आणि तो कोल्हा त्या झुडपांच्या बाजूने वळसा घेऊन इकडे येई. तीच त्याची रोजची येण्याजाण्याची वाट होती. तुमच्या कुत्र्याने त्या कोल्ह्याचा माग अगदी बरोबर, अचूक काढलाय यात शंकाच नाही.'' बघता बघता तो कुत्रा वास घेत, भुंकत दूर दूर जाऊ लागला. मग तो दिसेनासा झाला. लांब गेला. ते शिकारी हा प्रकार आश्चर्याने पाहत होते. कुत्रा दिसेनासा झाला हे कोणाला समजलेच नाही! मग त्यातला एकजण म्हणाला, ''चला आपण त्या कुत्र्याच्या मागे जाऊ या, तो नेमका कुठे गेला ते शोधू या.'' त्यांनी खूप शोधाशोध केली पण कुत्रा काही सापडला नाही. तो जणू बेपत्ता झाला! त्या दिवशी उरलेल्या वेळात अगदी अंधार पडेपर्यंत त्यांनी कुत्र्याला शोध शोधले, मग त्यांनी शोध थांबवला. कुत्रा आपोआप परत मालकाकडे येईल अशी आशा त्यांना होती. कुत्रा गेला तो गेलाच. शोधूनही सापडला नाही. त्यांची आशा फोल ठरली. पुढेही त्यांनी कित्येक आठवडे कुत्र्याची वाट पाहिली, अधूनमधून शोध केला, दुसऱ्या लोकांकडे चौकशी केली, अखेर निराश होऊन नाईलाजाने त्यांनी सगळा शोध थांबवला. कुत्रा परत येईल ही आशाच सोडली.

हा सगळा शोध थांबवल्यावर, कुत्रा परत येण्याची आशाच संपल्यावर सुमारे दोन वर्षांनी एका रात्री त्या कुत्र्याच्या मालकाला फोन आला. फोनवर बोलणाऱ्याने विचारले, ''हे घर रेक्स नावाच्या शिकारी कुत्र्याचे आहे काय?'' होय, एका काळी होते,'' कुत्र्याचा मालक बोलला, ''पण रेक्स कोठे गेला ठाऊक नाही. दोन वर्षांपासून त्याचा काहीच पत्ता लागला नाही. पण हे कोण बोलतंय? काय

झालंय?'' ''महाशय, तुम्हांला एक अगदी विचित्र, चमत्कारिक गोष्ट सांगायची आहे. न्यू यॉर्क येथील एका मोठ्या भांडाराचा मी व्यवस्थापक आहे. तुमच्या कुत्र्याच्या गळ्यातील बिल्ला पाहून मी त्याला ओळखलं. तुमचा पत्ताही तेथे मिळाला. आता हा कुत्रा माझ्याच भांडारात तळमजल्यावर आहे. त्याला बाहेर काढायचंय, पण ते जमतच नाही. कोल्ह्याच्या कातड्यापासून बनवलेला एक जुना गळपट्टा घेऊन तो ठाण मांडून बसलाय. काही केल्या तो बाहेर जात नाही की गळपट्टा सोडीत नाही.'' कुत्र्याचा मालक अगदी आश्चर्यचकित झाला. जरा सावरून तो बोलला, ''तुम्ही तो कुत्रा माझ्या खर्चाने इकडे पाठवाल का?'' ''मी तसाच विचार केला होता. किती खर्च येईल तेही पाहिले. पण कुत्रा पाठवायचा खर्च खूपच न परवडणारा आहे.'' ''ठीक मग तो गळपट्टा केवढ्याचा आहे?'' कुत्र्याच्या मालकाने विचारले. ''गळपट्ट्याची किंमत फक्त ६५ डॉलर आहे,'' भांडाराच्या व्यवस्थापकाने सांगितले. कुत्र्याच्या मालकाने जरा थांबून विचारले, ''महाशय, मग आजच तुम्ही मला तो गळपट्टा पाठवा आणि कुत्रा बसलाय त्या तळघराचे दार उद्या फक्त पाच मिनिटे उघडून ठेवा. मग सर्व ठीक होईल!''

मित्रहो, वेळ आली आहे. आधीच फार उशीर झाला आहे! देवासाठी ख्रिस्तासाठी असंख्य हरवलेल्या जिवांसाठी, विश्वासणाऱ्यांच्या सहभागितेसाठी जे काही उत्तम, उदात्त आणि सत्य आहे त्यांच्यासाठी आपण आपल्या जुन्या पूर्वीच्या आध्यात्मिक ''घराच्या परिसरात'' जाऊ या. तेथे पूर्वीचा मागोवा घेऊ या (महान कामगिरी), हा माग काढणे, मागोवा घेणे अतिशय समाधानकारक ठरो. जगाचे आणि देहाचे मोहक भुलवणारे भाग मागे सोडून देऊ या आणि त्या मोठ्ठ्या कोल्ह्याच्या मागावर जाऊ या.

हा मोठा कोल्हा कोण आहे बरे? जगावर संपूर्ण प्रभाव टाकला पाहिजे, संपूर्ण जगावर संपूर्ण प्रभाव टाकायचा आहे. संपूर्ण जगावर संपूर्ण प्रभाव हाच ख्रिस्ताचा मोठा कोल्हा आहे. याच कोल्ह्याचा पाठलाग करा ही आज्ञा त्याने आपल्या लोकांना - तुम्हांला व मला दिली आहे. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने जिवात जीव असेतो दररोज या मोठ्या कोल्ह्याकडे रोखून पाहावे, पुन्हा पुन्हा नीट पाहा, या कोल्ह्याकडे दीर्घकाळ रोखून पाहिल्याने ते दृश्य डोळ्यात साठवून ठेवल्याने अनेक महत्त्वाच्या संकल्पनांचा उमज पडेल. या संकल्पना अशा आहेत. एक, ***दृष्टान्त,***





दोन : ***योजना व योजनातंत्र, व्यूहरचना : मनाशी उद्देश धरून हेतूपूर्वक केलेले बहुगुणन, गुणाकार.*** प्रेषितांची कृत्ये या पुस्तकामध्ये बहुगुणनाचे, बहुउत्पादकतेचे विशेष महत्त्व आहे. संपूर्ण जगावर संपूर्ण प्रभाव ही चौथी व शेवटची संकल्पना आहे. ***संपूर्ण जगाला प्रभावित करण्याचा उद्देश*** आणि प्रभावाचे संपूर्ण उद्दिष्ट म्हणजेच सोपवलेली संपूर्ण कामगिरी व ती पूर्ण करण्यासाठी प्रकट केलेली साधने हे सर्वच ***समजून घ्यायचे आहे.***१

---

**टीप** - या अखेरच्या प्रकरणात मांडलेला कोणताही मुद्दा आणि विवेचन हे मंडळीच्या विरोधात आहे असे कोणीही समजू नये. ''मंडळीवर टीकेचे घाव घालण्याचे काम भरपूर प्रमाणात होत आहे त्यात आणखी एखादा घाव घालणार नाही. त्या दोषात वाटेकरी व्हायचे नाही. मी अगदी गंभीरपणे ही सावधगिरी, दक्षता घेतली आहे. ख्रिस्ताचे शरीर व वधू - देवाची इमारत, ''सत्याचा आधार आणि पाया'' अशा देवाच्या गौरवी मंडळीला आज पूर्वी कधी नव्हती एवढी निकडीची गरज आहे. प्रार्थना करणारे, सुवार्ताकार्यासाठी जाणारे, देणारे, आधार देणारे, बिलगून राहणारे असंख्य ख्रिस्ती बांधव हवे आहेत. परंतु तकलादू खोटे उद्दिष्ट अथवा पद्धती (''लहान कोल्हे'') हाच प्रकार चालू राहिला, तर त्यातून मंडळीच्या गौरवाचा नाश होईल आणि मग आपोआप अनेकजण तिच्यावर रास्त टीका करतील. कित्येकजण ती सोडून जातील, नाकारतील. ख्रिस्ताच्या मंडळीने महान कामगिरी पूर्ण करण्यासाठी त्याला पूर्णपणे कार्यकारी, कार्यक्षम संघटना द्यावी. ख्रिस्ताच्या वधूने, मंडळीने त्याच्यावर एवढी प्रीती करावी की ''महान कामगिरी'' एवढे शब्द उच्चारले तरी मंडळी ती कामगिरी पूर्ण करण्यास पुढे सरसावेल, उद्युक्त होईल आणि ख्रिस्ताच्या प्रीतीने प्रेरित होऊन ती कामगिरी तडीस नेईल! देवाची ही इमारत असे मंदिर व्हावे की त्यातून आमचा देव संपूर्ण जगाला दिसेल!

*समारोप*

# रानकुत्र्याचे मनोगत

शिष्य तयार करणे, जगाला प्रभावित करणे वगैरे सेवा करताना मला उत्तम सहकारी मिळाले ते चांगले, प्रेरित, सहेतुक कार्य करणारे ख्रिस्ती आहेत. आयन बॉवर्स हा त्यातलाच एक तरुण शिष्य. आयन गेली कित्येक वर्षे शिष्य तयार करण्याचे कामी साहाय्य करतो. त्याला चांगली तारतम्यबुद्धी, समज व कार्याची आस्था आहे. काही काळापूर्वी त्याने ''सावध सावज उठलंय - तो बघा कोल्हा'' या दाखल्याविषयी एक कविता लिहिली. मी ती कविता अनेकदा वाचली आहे. कवितेमधील संदेश खरोखरी माझ्या अंतःकरणाला भिडला तेव्हा माझ्या डोळ्यांतून घळघळा आसवे वाहिली. मला रडू कोसळले. आयनच्या परवानगीने याच कवितेने मी ह्या पुस्तकाचा समारोप करतो. यातून माझ्याप्रमाणे तुम्हांलाही आशीर्वाद मिळावा हीच माझी प्रार्थना आहे.

रानकुत्र्याचे जीवन अगदीच साधेसुधे
अर्थात त्यात काही आराम नसतोच
मी तुम्हांला एक नवाच दृष्टिकोन देतोय
आम्ही तर गरजेचे जीवन जगतो

या गरजाच जणू आमच्यावर ताबा ठेवतात
आमच्या जीवनावर वर्चस्व गाजवतात
तरीपण दररोज मनात एक शंका, एक प्रश्न येतो
या गरजा खोट्या खोट्या तर नाहीत?

हे पहा प्रत्येक दिवस आम्हांला जिंकावा लागतो
आम्ही काही कार्यक्रम ठरवलेला नाही
पण मग ही निकड, ही गरज थेट आमच्यावर येते
झोपी जावे अशी निकड लागते

एखाद्या शेतामळ्यात अगर एखाद्या झाडाखाली छायेत
अगर तारे भरल्या आकाशाखाली
आम्हांला आरामात पसरलेले पाहून आपल्यालाही
हे कुत्र्याचे जीवन मिळावे असे तुम्हांला वाटते ना?

पण आता असे पाठ फिरवून बसू नका
ऐका माझी गोष्ट नीट ऐकून घ्या
लक्षात घ्या झोपणाऱ्या कुत्र्याचे जीवन
नरकापासून फक्त एका पावलाच्या अंतरावर असते

कारण अचानक क्षणभर जाग येते
तेव्हा माझ्या आतमध्ये काही तरी फिरते
मला भूक लागलीय! मी भुकेने हैराण झालोय
ही तर काही खाण्याची गरज आहे

गावामध्ये मला कचराकुंडीत काही मिळेल
रानावनात एखादा लहानसा प्राणी मिळेल

पण एकदा का भूक मिटली की
मी ताबडतोब पुन्हा झोपी गेलो

माझ्यापेक्षा अधिक आळशी कुत्रा आला
कळपात त्याचे स्वागत झाले
तेव्हा मला जराही भयभीती वाटली नाही
मला वाटले हा सोन्याचा खजिनाच लाभला!

तुमच्या अंतःकरणाला, जिवाला अजूनही
कुत्र्याच्या जीवनाची ओढ, आस लागली आहे का?
माझ्या मित्रा, तुला जराही कल्पना नाही
कारण अजून खूप काही बाकी आहे, सांगायचं आहे





माझी गोष्ट लवकरच अगदी स्पष्ट होईल
आता हा प्रकाश घ्या आणि पाहा
रानकुत्र्याच्या जीवनाची अंधारी बाजू
म्हणजे लढण्याची, भांडण्यातंडण्याची गरज!

अहो, पण लढायचं कशासाठी? मी आताच तुम्हांला विचारतो
माझ्या बरोबरच्या कुत्र्यावर उठायचं
ते केव्हा कोणत्या वेळी त्याचा
जीव घ्यायचा का नुसतं भांडायचं?

तो केसाळ शेपटाचा कुत्रा आहे
त्याला दात आहेत, बघणारे डोळे आहेत
तरीपण त्याला आपले सरसपण सिद्ध करावे लागते
केव्हा मीही तोच, तसाच असतो

भुंका, गुरगुरा, ओरडा आणि चावे घ्या
हे सगळे आमचा अहंकार जपण्यासाठी करायचे
या खुळचट लढाईत कोणीतरी एकटा जिंकणार
आणि एकाला कदाचित मरावे लागेल

आणि ही लढाई संपल्यावर
नेहमी हानीच होते, लाभ कधीच काही होत नाही
यातून आम्ही एकच प्रमाणाने सिद्ध करतो की,
कुत्रे सुद्धा गर्विष्ठ बढाईखोर असतात

लढण्याची गरज आहे, हे म्हणणे
योग्य होईल असे नाही वाटत मला
खरे तर आम्ही कंटाळलेले आणि
मरणापासून एका पावलावरच असतो

अहो, तुम्ही नीट ऐकताय ना, लक्ष आहे ना?
माझ्या मित्रा, तू खरेच ऐकतोयस ना?
माझी ही गोष्ट अजून संपली नाही
आता तर ती सुरू झालीय!

एक गरज आहे, मी अगदी मान्यच करतो
मी अगदी प्रांजलपणे सांगतो
या रानकुत्र्याला पाठलाग करायचा आहे
त्या आनंदासाठीच तर तो जगतोय

पण मित्रा माझ्या, कोणताही कोणाचाही पाठलाग नव्हे
पाठलाग करायचा तो अगदी दिव्यभव्य हवा
माझ्या जीवनाला आव्हान देणारा पाठलाग
माझ्या मनाची पकड घेणारा, गुंग करणारा पाठलाग

नाही ते लहान कोल्हे ती खोकडे नाहीत
त्या सर्वांचा मी पूर्वीच पाठलाग केला आहे
त्यांना तर अगदी सहज पकडून गिळंकृत केले आहे
आणि मला त्याचा लगेचच कंटाळा आला

आणि मग एक दिवस ते घडले
मी कधीच ते विसरणार नाही
काहीतरी हवेतून घरंगळत होते
त्यामुळे माझी भूक चाळवली, भडकली

मी वर आकाशाकडे तोंड करून वास घेतला
माझ्या पायांवर उभा राहिलो
मग मी पाहिले तर दुसरे कुत्रेदेखील
अगदी माझ्यासारखेच सावध झाले होते

आम्हा बारा घरच्या बारा कुत्र्यांच्या टोळीचा
साल्वादोर आमचा पुढारी होता
त्याच्या अंगावरचे केस पिवळसर सोनेरी होते
त्याच्या पाठीवर लाल रंगाचे पट्टे होते

पाहा हाच तो, तुम्ही याचीच वाट पाहत होता
डोळे मिचकावीत तो बोलला
हाच तो कोल्हा, ह्याला पकडलंत तर
नक्कीच तुमच्या प्राणांची किंमत द्यावी लागेल





चला तोंडे वर करा, नाकाने वास घ्या
तो वास मिसळू दे तुमच्या श्वासाश्वासात
ओळखा, नीट लक्षात ठेवा त्या गंधाचे रूप
तो कसा आहे ते चांगले समजून घ्या

आणि जेव्हा मी तुम्हांला दिसणार नाही
तेव्हा तोंडे नाके वर कर, हवेतून श्वास घ्या
तो वास कुठून कुठे आहे ते पहा त्याच्या मागे जा
आणि लक्षात ठेवा मी तेथे आहेच

मला वाटले छातीचे ठोके वेगाने पडताहेत
सर्वांगात रक्त सळसळू लागले, उत्साह वाढला
तो वास तो गंध नाकात उरात भरला
अधिक जोराने रोमारोमात सामावला

आणि मग कसलाच इशारा दिल्याशिवाय
झेपावणाऱ्या आगीच्या लोळासारखा
आमचा नेता वळला आणि पुढे झेपावला
रात्रीच्या गडद अंधारात धावत गेला

आम्ही क्षणभर उभेच राहिलो
एकमेकांच्या डोळ्यात पाहिले
किंमत किती द्यावी लागेल ते माहीत होते
पण प्रतिफळ काय असणार ह्याची केवळ कल्पनाच होती

आता ह्या कोल्ह्याला पकडायचं तर
उशीर करून अजिबात चालणार नाही
कारण सावजाचा वास विरळ होत चालला
तशी कार्याची व्याप्ती वाढत राहिली

तो वास आमच्या नाकात सतत ताजा राहावा
आमचा उद्देश अगदी स्पष्ट, स्वच्छ असावा
आम्ही पकडूच या बलवान कोल्ह्याला
'सावज उठलंय' हेच आमचं घोषवाक्य आहे

माझ्या नाकपुड्या विस्फारल्या, सारे स्नायू ताठ झाले
माझ्या जागेवरून उडी मारून उठलो
माझे पंजे आपटले जमिनीवर
आणि सुरू झाला तो पाठलाग

पण माझ्या मित्रा मी कशासाठी धावत होत
ते आपणाला माहीत आहे असे समजू नको
ते बक्षीस केवळ कोल्हा पकडणे एवढेच नव्हते
बक्षीस तर त्यापेक्षा कितीतरी मोठे होते

आता गरजेची निकड पुढे गती देत नव्हती
खाणेजेवणे झोपणे सर्व विसरून गेलो
मी तर आता अगदी उत्साहाने पुरता भरलो होतो
ज्याची एकदा आस लागली होती त्यानेच माझी पकड घेतली

कान देऊन लक्षपूर्वक ऐकताहात ना?
माझ्या मित्र ऐकतो आहेस ना?
उत्तम प्रकारे जगलेले जीवन हेच आहे बक्षीस
उद्दिष्ट मनी धरून केलेले आचरण

खाण्यासाठी विसावा घेण्यासाठी मी थांबत होतो
दमछाक झाली की थांबायचे हे समजत होते
पण एकदा शक्ती पुन्हा आली, थकवा गेला
की पाठलाग पुन्हा सुरू पहिल्यापासून

आणि भांडाभांडी तक्रारी? हे सत्य ऐकून घ्या
त्यासाठी आम्हांला वेळच नव्हता
आमच्या मनाची पकड घेण्यासाठी आम्हांला
आमच्या जीवनाचे आव्हान उद्दिष्ट मिळाले होते

कारण आम्ही काही डोळे मिटून पळत नव्हतो
न दिसणाऱ्या कोल्ह्याच्या मागे धावत नव्हतो
आम्ही जाणून होतो, तो अट्टल धूर्त होता
म्हणूनच आम्ही व्यूहरचना करून धावत होतो





आमच्या टोळीमध्ये नव्याने येणाऱ्यांना
आम्ही हिणवले नाही की धमकावले नाही

आमचा दृष्टान्त मोकळेपणे त्यांनाही सांगितला
आणि त्यांनाही त्याच्या मागावर पाठवले

ही वाट, हा मार्ग सर्वांत महान भव्य बक्षीस
काही कुत्रे तर अजिबात बधत नव्हते
तरीपण दुसरे काही पाठलाग करण्यास पुढे आले
आता ठीक - हे काही माझ्याबरोबर संपणार नाही

आता या म्हाताऱ्या कुत्र्याकडून तुम्ही धडा घ्या
शिका, चांगले घटवून शिका, ध्यानात ठेवा
वाटेने बाजूला पडलेल्या एकेका कुत्र्यासाठी
आणखी तिघांनी या पाठलागात सामील व्हावे, पुढे यावे

ही साखळी मोडणार नाही याची काळजी घ्या
हा पाठलाग असाच चालू राहील हे पाहा
कोणत्या तरी रानकुत्र्याच्या जीवनात स्वतःला गुंतवा
आणि दाखवा त्याला कुठून कसा पाठलाग करायचा

मी तुम्हांला आता कसा दिसतो?
मरू घातलेला दीन दुबळा कुत्रा समजू नका मला
माझा प्रकाश चमकेल अधिक तेजाने
मी शेवटचा श्वास सोडीन तेव्हा

कारण मी दुसऱ्या रानकुत्र्यांना शिकवले आहे
मी त्यांना हे चांगलं शिकवलंय
नाकतोंड वर कसं करायचं ते शिकवलंय
वास कसा घ्यायचा तेही त्यांना मी शिकवलंय

त्यांना मी आणखी एक गोष्ट शिकवली
अगदी महत्त्वाची गोष्ट आहे ती
मला ठाऊक होती, मी जगतो ती व्यूहरचना
त्यांना शिकवली, ''पळायचं'' कसं ते दाखवलं

*टॅली हो द फॉक्स!*

आता ऐकलीत ना माझी गोष्ट
नीट कान देऊन लक्ष लावून ऐकलीत ना?
नरकापासून एका पावलाच्या अंतरावर असणारं
कुत्र्याचं जिणं तुम्हांला हवं आहे काय?

आव्हान तर तुमच्या समोरच आहे
तुम्ही या समुदायात आणखी भर घालणार ना?
मग चला व्हा पुढे आणि सुरू करा पाठलाग
धावा नीट धावा आणि चांगलं मन लावून धावा

**आयन बॉवर्स**



# परिशिष्ट

# रूपरेषा प्रकरणांची

**प्रकरण १ दूरदृष्टी किती महत्त्वाची, मार्मिक आहे? (नीती.२९:२८)**

१. आध्यात्मिक संकल्पना
   - अ. दृष्टान्ताचे महत्त्व
   - ब. दृष्टान्ताचे अर्थविवरण

२. दुरवस्था : शोचनीय परिस्थिती
   - अ. पुलपिटवर दृष्टान्त नाही
   - ब. सभासदांमध्ये दृष्टान्त नाही
   - क. सार्वजनिक जीवनात दूरदृष्टी नाही

३. गंभीर परिणाम
   - अ. लोक अनावर होतात - घरबंद सोडतात - दृष्टान्त नसल्यामुळे होणारे नैतिक परिणाम
   - ब. लोकांचे विघटन - विभाजन होते - दुही माजते. दृष्टान्त नसल्यामुळे होणारे सामाजिक परिणाम
   - क. न्यायाच्या वेळी लोक उघडे पडतात - दृष्टान्त नसल्याचे वैयक्तिक परिणाम
   - ड. लोक नाश पावतात - नष्ट होतात - दृष्टान्त नसल्याचे आध्यात्मिक - सार्वकालिक परिणाम

## प्रकरण २ आमचे कार्यकर्तृत्व निश्‍चित करणारी कामगिरी (मत्तय.२८:१८-२०)

१. या कामगिरीमागचे आश्‍वासन (व.१८,२०अ)

अ. दिव्य अधिकार

ब. सोपवलेला अधिकार

क. लायकीनुसार अधिकार

ड. नेमलेला निश्‍चित अधिकार

२. महान कामगिरीमध्ये नेमून दिलेले काम (व.१९,२०)

अ. मंडळीला - ख्रिस्ती माणसाला दिलेला एकमेव आदेश

ब. ह्या कामगिरीचे भागशः विभाजन

१. मनुष्यबळ कामाला लावा

२. सेवाक्षेत्रामध्ये प्रवेश करा, तिकडे जा

३. दृष्टी विशाल व्यापक करा

४. त्यांना सुवार्ता सांगा

५. सुवार्ता सांगितलेल्यांना दाखल करून घ्या

६. दाखल करून घेतलेल्यांना शिक्षण द्या - त्यांचे प्रबोधन करा

७. तो कार्य करील ही अपेक्षा ठेवा

क. महान कामगिरी का महान उपेक्षा?

## प्रकरण ३ आमची कार्यपद्धती निश्‍चित करणारी संकल्पना (मत्तय.२८:१९)

१. शिष्य करणे

अ. शिष्य

ब. शिष्य करणारा





क. शिष्यपणाचे शिक्षण देणे

ड. शिस्त लावणे

२. बहुगुणन व्हावे अशा प्रकारे शिष्य तयार करणे

## प्रकरण ४ मंडळीच्या इतिहासाच्या आघाडीस असलेली दाराची किल्ली

१. पहिल्या ग्रंथाचा उल्लेख

अ. लूककृत शुभवर्तमान

ब. लूक कोण होता? या वृत्तांतामध्ये तो कसा आला?

क. भक्तिमय सत्ये

१. मंडळी - ख्रिस्ताचे शरीर हे रूपक

२. लूकने दोन अद्‌भुत लेख, ग्रंथ लिहिले

२. हा शिष्य कोण? त्याचा परिचय

अ. नव्या कराराचा एक चतुर्थांश भाग एकाच व्यक्तीसाठी लिहिला आहे

ब. लूकाने हे दोन्ही लेख एकाच व्यक्तीला उद्देशून का लिहिले?

क. वैयक्तिक साक्ष

३. लेखनाचा हेतू स्पष्ट करणारे निवेदन

अ. येशूने जे जे करावयास व शिकवावयास आरंभ केला ते सर्व

ब. येशू आता काय करतो आहे?

१. तो शिकवतो आहे, करतो आहे

२. प्रत्येक विश्‍वासणारा त्याच्या प्रत्यक्ष समक्षतेचे सजीव पात्र आहे

क. येशूने कोणत्या प्रकारच्या व्यक्तींचा उपयोग केला?

१. सर्वसामान्य माणसे

२. निवडलेली माणसे

३. खातरजमा झालेली माणसे

४. आज्ञाधारक माणसे

५. नियंत्रित माणसे

**प्रकरण ५ शिष्य करण्यासाठी अतिआवश्यक बाबी अगर महान कामगिरी पूर्ण करण्यासाठी डॉक्टरी उपाय (लूक.१:१-१४)**

१. वैयक्तिक जबाबदारी

२. परिश्रमपूर्वक संशोधन

३. अचूक, नेमकी साधनसामग्री

४. चिकाटीने पुनरुत्पादन

**प्रकरण ६ : देवाचे गुणाकार कोष्टक (२ तीमथ्य.२:२)**

१. बहुगुणन करणाऱ्या शिष्याचे स्वभावचित्र

अ. पुत्र

ब. सैनिक-शिपाई

क. कसरतपटू-खेळाडू-मल्ल

ड. शेतकरी

इ. कामकरी

फ. भांडे-पात्र

ग. सेवक-दास

२. बहुगुणन होण्यासाठी शिष्य तयार करणे -प्रक्रिया पद्धत

अ. शिष्याशी संपर्क कसा साधावा?

ब. ऐकण्याच्या प्रक्रियेत आवश्यक बाब

क. शिष्याला सज्ज-तयार केल्यानंतर तो काय करतो?





३. बहुगुणनाचे महत्त्व व त्यातील सुप्त शक्ती दाखवणारी उदाहरणे

अ. सुवार्तिक

ब. दररोजच पेन्टेकॉस्ट

क. पैसा दुप्पट होणे

ड. शिष्य करून जगावर प्रभाव टाकण्याची दूरदृष्टी

**प्रकरण ७ येशूच्या योजनातंत्रामागील अलौकिक बुद्धिवैभव (१ थेस्सल.१:८)**

**प्रकरण ८ : या तंत्रानुसार मंडळीमध्ये कार्य कसे चालते? (इफिस.४:७-१४)**

१. कृपादाने देणारा

अ. तो खाली उतरला

ब. त्याने आरोहण केले

क. तो सर्वांत उच्चस्थानी गेला

२. कृपादाने

अ. प्रेषित

ब. संदेष्टे

क. सुवार्तिक

ड. पाळक, शिक्षक

३. ही कृपादाने देण्याचे उद्देश

अ. मंडळीसाठी सभासद करून घेणे

ब. मंडळीतील सभासदांना सज्ज करणे

क. मंडळीच्या द्वारे सभासदांना सेवा नेमून देणे

**प्रकरण ९ त्याचे अखेरचे शब्द, त्याची अखेरची इच्छा (प्रे.कृ.१:८)**

१. सुवार्तेच्या प्रगतीसाठी योजना

२. सुवार्तासाक्षीचा उगम

३. सुवार्तासाक्षीचा विषय

४. सुवार्तासाक्षीची व्याप्ती

अ. तुम्ही आहात तेथील स्थिती

ब. तुमची मध्यंतरीची पार्श्वभूमी

क. तुमचा आंतरराष्ट्रीय परिसर

५. सुवार्तासाक्षीचे रहस्य





# अधिक माहितीसाठी ग्रंथांची सूची

## शिष्य तयार करणे

ॲडसिट, क्रिस्टोफर बी, *पर्सनल डिसायपलमेकिंग*

कोलमन, रॉबर्ट इ; द *मास्टर प्लॅन ऑफ इव्हँजिलिझम*

कोलमन, रॉबर्ट इ; द *मास्टर प्लॅन ऑफ डिसायपलशिप*

डेविस, रॉन ली; मेंटॉरिंग : द *स्ट्रटेजी ऑफ द मास्चर*

एम्स, लरॉय, द *लॉस्ट आर्ट ऑफ डिसायपल मेकिंग*

फॉस्टर, रॉबर्ट, द *नॅव्हिगेटर*

फ्रयलिंग ॲलिस, *डिसायपल मेकर्स हँडबुक*

हेडिडिअन, ॲलन, *सक्सेसफुल डिसायपलिंग*

हेन्रिकसन, वॉल्टर, *डिसायपल्स आर मेड नॉट बॉर्न*

हल, बिल; *जीझस ख्राईस्ट डिसायपल मेकर*

हल, बिल; द *डिसायपल मेकिंग चर्च*

हल, बिल; द *डिसायपल मेकिंग पास्टर*

जोन्स, मिल्टन; *डिसायपलिंग : द मल्टिप्लाइंग मिनिस्ट्री*

कुन्हे, गॅरी; द *डायनॅमिक्स ऑफ डिसायपलशिप ट्रेनिंग*

मूर, वेलॉन; *न्यू टेस्टामेन्ट फॉलोअप*

पीटर्सन, विल्यम; द *डिसायपलिंग ऑफ तिमथी*

स्लिनर, बेटी, डॉज
स्टॅटन, क्नेफिल; *चेक युवर डिसायपलशिप*
ट्राटमन, डॉसन, *बॉर्न टु रिप्रोड्युस (बुकलेट)*

## नातेसंबंध जोडणे - सांभाळणे

अर्विन, गाईल; द *जीझस स्टाईल*
जॉर्ज, बॉब; *क्लासिक ख्रिश्चॅनिटी*
जॉर्ज बॉब *ग्रोइंग इन ग्रेस*
जॉन्स्टन जॉन, *वॉल्स ऑर ब्रिजेस?*
किड मंक; *गॉड्स जॉयस सरप्रायजेस*
लार्सन, ब्रूस, *नो लाँगर स्ट्रेंजर्स*
लार्सन, ब्रूस, *सेटिंग मेन फ्री*
मॅक्सवेल, जॉन बी, *बी अ पीपल पर्सन*
मॅकगिनिस, ॲलन लॉप, *ब्रिंगिंग आउट द बेस्ट इन पीपल*
झॅकगिनिस ॲलन लॉप, द *फ्रेंडशिप फॅक्टर*

## जागतिक सुवार्तासेवा

बेरी, हॅसेल, *इस्लाम (बॅक टु द बायबल - बुकलेट)*
बॉर्थविक, पॉल, *अ माइंड फॉर मिशन्स*
बॉर्थविक, पॉल; *हाऊ टू बी अ वर्ल्ड क्लास ख्रिश्चन*
ब्रायंट, डेविड इन द गॅप
हॉवर्ड डेविड; द *ग्रेट कमिशन फार टुडे*
जॉन्स्टन पॅट्रिक, *ऑपरेशन वर्ल्ड*
काइल, जॉन; द *अनफिनिश्ड टास्क*
काइल जॉन, *फिनिशिंग द टास्क*
ऑटीस जॉर्ज; द *लास्ट ऑफ द जायंट्स*
शिब्ले, डेविड अँड नाओमी, द *स्मोक ऑफ अ थाउजंड व्हिलेजेस*





स्नोग्रेन, बॉब; *इन विथ द व्हिजन*
स्टर्नस, बिल अँड ॲमी; *कॅच द व्हिजन २०००*
टेलर, डॉ. अँड मिसेस हॉवर्ड, जे, *हडसन टेलर, गॉड्स मॅन इन चायना*
टकर, रूथ, *फ्रॉम जरुसलेम टू इरिअन जाया*
विंटर, राल्फ; *पर्स्पेक्टिव्हस ऑन द वर्ल्ड ख्रिश्चन मुव्हमेंट*
यामुरी टेस्टसुनाओ, *गॉड्स न्यू एन्व्हायज*
योहानन के. पी.; द *कमिंग रेव्होल्युशन इन वर्ल्ड मिशन्स*
योहानन के. पी.; *व्हाय द वर्ल्ड वेट्स*

## पाठ्यक्रम अभ्यासासाठी

ब्लँचर्ड जॉन, *विल द रिअर जीझस स्टँड अप?*
ब्रिजेस जेरी, द *डिसिप्लिन ऑफ ग्रेस*
बन्यन जॉन; *पिलग्रिम्स प्रोग्रेस* (विषयावर उदाहरणे जमवा आणि मगच हे पुस्तक वाचा)
हॉर्न, चार्लस;द *डॉक्ट्रिन ऑफ साल्वेशन*
हबर्ड, डेविड ॲलन; *व्हॉट्स गॉड बिन डुइंग ऑल धिस टाइम?*
केनडी जेम्स; *नोईंग द होल ट्रुथ*
लिंडसे हाल, द *लिबरेशन अपॉन प्लॅनेट अर्थ*
(शुभवर्तमानातील शब्द व सिद्धन्त यांचा उत्तम अभ्यास)
लॉक्यर हर्बट, *ऑल द डॉक्ट्रिन्स ऑफ द बायबल*
मॅकलम डेनिस, *ख्रिश्चॅनिटी : द फेथ दॅट मेक्स सेन्स*
शॉ, मार्क; *डुइंग थिऑलॉजी विथ हक ॲन्ड जिम*
वेटसन, डेविड; *इज एनीवन देअर?*
वॅटसन, डेविड; *माय गॉड इज रिअल*
विअर्सबी कॅरन;*की वर्डस ऑफ द ख्रिश्न लाईफ*

## पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी

उत्पत्ती

ग्रिफिथ - थॉमस, डब्ल्यू एच., *जेनसिस*

फिलिप्स, जॉन. *एक्सप्लोअीरंग जेनसिस*

निर्गम

मायर, एफ. डब्ल्यू; *एक्सोडस भाग १ व २*

पिंक, ए. डब्ल्यू; *ग्लीनिंग्ज इन एक्सोडस*

लेवीय

बोनर, ए.ए. ॲन एक्सपोझिशन ऑफ लेविटिकस

सायन, जे. ए. द गॉस्पल इन लेविटिक्स

गणना

अनुवाद

यहोशवा

पिंक, ए. डब्ल्यू, *ग्लीनिंग्ज इन योशुआ*

मायर, *एफ. बी. जोशुआ*

शास्ते

हंटर, जॉन, *जजेस ॲन्ड अ पर्मिसिव्ह सोसायटी*

रूथ

विअर्सबी वॉरन, *पुट युअर लाइफ टुगेदर*

द हान एम. आर., *द रोमान्स ऑफ रिडेम्शन*

१ व २ शमुवेल

पिंक ए. डब्ल्यू, *द लाईफ ऑफ डेविड*

रेडपाथ, ॲलन, *द मेकिंग ऑफ अ मॅन ऑफ गॉड*

१ व २ राजे

मायर, एफ. डब्ल्यू., *एलिया*

रेंडॉल, डी. एस. *लिव्हिंग द अबंडंट लाइफ*





१ व २ इतिहास

एज्रा

नेहम्या

रेडपाथ, ॲलन, *व्हिक्टोरिअस ख्रिश्चन सर्विस*

एस्तेर

स्टोडमन, रे, द *क्वीन अँड आय*

थॉमस, आय, *इफ आय पेरिश... आय पेरिश*

ईयोब

स्तोत्रसंहिता

फिलिप्स, जॉन, *३ व्हॉल्युम्स, एक्स्प्लोअीरंग द साम्स*

स्पर्जन, चार्लस; *द ट्रेझरी ऑफ डेविड*

नीतिसूत्रे

उपदेशक

स्टोडमन, रे. *सॉलोमन्स सीक्रेट*

स्विंडॉल, चार्लस, *लिव्हिंग ऑन द रेंग्ड एज*

गीतरत्न

फिलिप्स, जॉन; *एक्सप्लोअरिंग द साँग ऑफ सॉलोमन*

बरोज जॉर्ज, *द साँग ऑफ सॉलोमन*

यशया

यंग इ. जे., *द बुक ऑफ इझाया*

यंगब्लड, रोनाल्ड, *थीम्स फ्रॉम्स इझाया*

यिर्मया

पीटर्सन, *विल्यम द प्रॉफेट हु बुडंट क्विट*

मॉर्गन, जी कँबेल, *स्टडीज इन दे प्रॉफेसी ऑफ जेर्माया*

यहेज्केल

दानीएल

कँबेल, डोनाल्ड, *डॅनिएल, डीकोडर ऑफ ड्रीम्स*

होशेय

मॉर्गन जी कॅंबेल, *द हार्ट अॅन्ड होलीनेस ऑफ गॉड*

रिग्ज, जॅक, *होजियाज हार्टब्रेक*

योएल

प्राइस वाल्टर, *द प्रॉफेट जोएल*

आमोस

हनीकट, रॉय, *अॅमॉस अॅंड हिज मेसेज*

ओबद्या

योना

कर्गसन, सिंक्लेअर, *मॅन ओव्हरबोर्ड*

वाईज जी. ख्रिश्चन; *रॉंग वे जोना*

मीखा

नहूम

हबक्कूक

लॉयड जोन्स, डी. मार्टी, *फ्रॉम हिअर टु फेथ*

सफन्या

हाग्गय

जखऱ्या

बॅरन, डेविड, *द व्हिजन्स अॅंड प्रॉफेसीज ऑफ जखऱ्या*

मलाखी

कैसर, वॉल्टर, *गॉड्स अनचेंजिंग लव्ह*

मॉर्गन, जी कॅंबेल, *मलाखीज मेसेज फॉर टुडे*

मत्तय

मार्गन जी. कॅंबेल, *गॉस्पेल अकॉर्डिंग टु मॅथ्यू*

विअर्सबी, वॉरन, *मीट युअर किंग*

मार्क

स्क्रॉगी, ग्रॅहॅम, *गॉस्पेल ऑफ मार्क*

स्टोडमन, रे, २ *व्हॉल्युम्स - द सर्व्हन्ट हू रुल्स; द रुलर हु सर्व्हज*





लूक

ब्लांचार्ड, जॉन, *लुक थ्रू लूक*

मार्गन जी. कॅंबेल, *गॉस्पेल अकॉर्डिंग टु लूक*

योहान

हेंड्रिक्सन, विल्यम, *गॉस्पेल ऑफ जॉन*

पॉवेल, आयव्हर, *जॉन्स वंडरफुल गॉस्पेल*

प्रेषितांची कृत्ये

स्टेडमन, रे, *दोन खंड (२ व्हॉल्युम्स)*

*बर्थ ऑफ द बॉडी*

*ग्रोथ ऑफ द बॉडी*

मॉर्गन जी. कॅंबेल, *अॅक्टस ऑफ द अॅपॉस्टल्स*

रोमकरांस पत्र

फिलिप्स, जॉन, *एक्सप्लोअीरंग रोमन्स*

विअर्सबी, *वॉरन, बी राइट*

करिंथकरांस पहिले पत्र

ब्लेअर, अॅलन, *लिव्हिंग वाइजली*

स्ट्रेटमन रे, *एक्सपॉजिटरी स्टडीज इन १ करिंथिअन्स*

करिंथकरांस दुसरे पत्र

रेडपाथ, अॅलन, *ब्लेसिंग आऊट ऑफ बफेरिंग्ज*

विअर्सबी वॉरन, *बी एनकरेज्ड*

गलतीकरांस पत्र

ग्रोमास्की, रॉबर्ट, *स्टॅंड फास्ट इन लिबर्टी*

स्टॉट, जॉन आर. डब्ल्यू., *द मेसेज ऑफ गलेशन्स*

इफिसकरांस पत्र

अॅंडर्स मॅक्स, *द गुड लाइफ*

पॅक्सन, रुथ, *द वेल्थ वॉक, अॅंड वॉरफेअर ऑफ द ख्रिश्चन*

फिलिप्पैकरांस पत्र

किंग, गाय. *जॉय वे*

मायर एफ. बी. *एपिसल टु द फिलिपाईन्स*

कलस्सैकरांस पत्र

किंग गाय, *क्रॉसिंग द बॉर्डर*

विअर्सबी वॉरन, *बी कम्प्लीट*

थेस्सलनीकाकरांस पहिले व दुसरे पत्र

हायबर्ट, एडमंड, द *थेस्सलोनिअन एपिसल्स*

विअर्सबी वॉरन, *बी रेडी*

तीमथ्याला पहिले पत्र

ग्रोमास्की रॉबर्ट, *स्टँड टू द मार्क*

किंग गाय., *ए लीडर लेड*

तीमथ्याला दुसरे पत्र

किंग गाय., *टु माय सन्स*

स्टॉट, जॉन आर. डब्ल्यू., *गार्ड द गॉस्पेल*

तीताला पत्र

गेट्झ जीन, *अ प्रोफाईल फॉर अ ख्रिश्चन*

पॅटरसन, पेज, *लिव्हींग इन द होप ऑफ इटर्नल लाइफ*

इब्री लोकांस पत्र

हेन्रीकसन, वॉल्टर, *आफ्टर द सॅक्रिफाईस*

फिलिप्स, जॉन, *एक्सप्लोअीरंग हिब्रूज*

याकोबाचे पत्र

ब्लांचार्ड, जॉन, *ट्रुथ फॉर लाइफ*

किंग गाय, *अ बिलीफ दॅट बिहेव्ज*

पेत्राचे पहिले पत्र

हर्बट एडमंड, *फर्स्ट पीटर*

विअर्सबी वॉरन, *बी होपफुल*





पेत्राचे दुसरे पत्र

योहानाचे पहिले पत्र

किंग गाय, द *फेलोशिप*

विअर्सबी, वॉरन, *बी रिअल*

प्रकटीकरण

कोलमन, रॉबर्ट; *साँग्ज ऑफ हेवन*

फिलिप्स, जॉन; *एक्सप्लोअीरंग रिव्हीलेशन*

पार्श्वभूमी समजण्यासाठी उपयुक्त ग्रंथ

बॅक्स्टर जे. सिड्लो; *एक्सल्पोअर द बुक*

हेन्री मॅथ्यू, *कॉमेंटरी ऑन द होल बायबल*

मायर्स हेन्रीएटा, *व्हॉट द बायबल इज ऑफ अबाउट*

फिलिप्स जॉन, *एक्सप्लोअीरंग द स्क्रिप्चर्स*

# ह्या पुस्तकाचा अभ्यास करण्यासाठी प्रश्न आणि सूचना

## पहिले प्रकरण : दृष्टान्त कितपत महत्त्वाचा आहे?

१. दिव्य दृष्टान्त म्हणजे काय ते स्पष्ट करणाऱ्या दोन व्याख्या द्या

२. देवाच्या लोकांना दृष्टान्त नसतो, होत नाही तेव्हा कोणते परिणाम घडतात?

## दुसरे प्रकरण : आमचे कार्यकर्तव्य निश्चित करणारी कामगिरी

१. महान कामगिरीमधील नेमून दिलेले सात भाग कोणते ते सांगा. त्यात आज्ञा किती आहेत?

२. वरील प्रत्येक भागातील योजनेसाठी सैतानाने कोणकोणत्या पर्यायी योजना सुचवल्या आहेत?

## तिसरे प्रकरण : आमची कार्यपद्धती निश्चित करणारी संकल्पना

१. पुढील प्रत्येक शब्दाची व्याख्या सांगा

‘‘शिष्य’’, ‘‘शिष्य करणारा’’, ‘‘शिष्यपणाचे शिक्षण देणे’’ आणि ‘‘शिस्त लावणे’’.

२. नित्य नियमाने मंडळीत उपासना प्रार्थनेला जाणे, मंडळीच्या कामात भाग घेणे या प्रकारचा सर्वसाधारण ख्रिस्ती विश्वास आणि बहुगुणन होत राहावे अशा प्रकारे चालवलेला ख्रिस्ती जीवनक्रम या दोहोंत कोणता फरक आहे?

## चौथे प्रकरण : मंडळीच्या इतिहासाच्या आघाडीस असलेली दाराची किल्ली

१. पौल - लूक - थियफिल या शिष्य करण्याच्या प्रक्रियेचा थोडक्यात सारांश सांगा

२. थितफिलानेही ही योजना समजून घेतली आणि त्यानुसार पुढे कार्य केले असे म्हणण्यास काही पुरावा आहे का?

## पाचवे प्रकरण : शिष्य करण्यासाठी अतिआवश्यक बाबी

१. थियफिलास शिष्यत्त्वाचे शिक्षण देण्यासाठी डॉ. लूकने केलेल्या चार गोष्टी सांगा व त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण करा.

२. एकंदर प्रक्रियेमध्ये प्रत्येक टप्पा किती महत्त्वाचा आहे? शिष्य तयार करण्याचे यातील एक पायरी गाळली तरी त्याला यश मिळेल का? शिष्य चांगला तयार होईल का? एखादा शिष्य तयार करण्यासाठी सध्या यांपैकी कोणकोणत्या पायऱ्यांचा उपयोग करीत आहात?

## सहावे प्रकरण : देवाचे गुणाकार कोष्टक

१. २ तीमथ्य.२ मध्ये शिष्याची सात स्वभावचित्रे कोणती आहेत? हे शिष्याचे संपूर्ण सविस्तर चित्रण आहे का केवळ सूचक आहे?





२. २ तीमथ्य.२:२ मधील पिढ्यानपिढ्यांची योजना परंपरा पाहा. त्यातील तंत्र स्पष्ट करा.

## सातवे प्रकरण : येशूच्या योजनातंत्रामागील अलौकिक बुद्धिवैभव

१. येशूने आपल्या बारा प्रेषितांना प्रशिक्षण देऊन तयार केले त्यातील येशूचे संघटनात्मक कौशल्य स्पष्ट करा.

२. या प्रकरणात दिलेला तक्ता आकस्मिक, प्रासंगिक का मूलभूत स्वरूपाचा आहे ते सांगा. याविषयी तुम्हांला नेकमे काय वाटते?

## आठवे प्रकरण : या तंत्रानुसार मंडळीमध्ये कार्य कसे चालते?

१. शिष्यांच्या अनेक पिढ्या तयार करण्याची योजना संघटनात्मक मंडळीत कार्यवाहीत येईल का? कशी?

२. या प्रकरणामध्ये दाखवलेले भेददर्शक तक्ते तयार करा. त्यात प्रथम परंपरागत नमुना नंतर इफिस.४:७-१४ मध्ये सुचवलेला नमुना दाखवला आहे.

## नववे प्रकरण : त्याचे अखेरचे शब्द, त्याची अखेरची इच्छा

१. सुवार्तेच्या प्रगतीसाठी देवाने केलेली योजना 'प्रेषितांची कृत्ये' मधील कोणत्या एका शब्दातून प्रकट झाली आहे? या शब्दाचे दोन अर्थ कोणते ते सांगा. या शब्दाच्या दोन अर्थांमध्ये काय संबंध आहे?

२. देवाचे 'कामकरी' कोण एकत्र करतो? ह्या कामकऱ्यांनी कोणत्या क्षेत्रात काम करायचे आहे?

*टॅली हो द फॉक्स!*

३. ह्या कामकऱ्यांनी नेमून दिलेली ही कामगिरी कोणत्या साधनांनी पूर्ण करायची आहे?

## दहावे प्रकरण : सावध! सावज उठलं आहे!

१. 'कोल्ह्याचे' रूपक स्पष्ट करा.

२. स्थानिक मंडळीमध्ये तुम्ही पाहिले आहे त्याला अनुसरून हे रूपक यथार्थ आहे का?

३. 'मोठा कोल्हा' कोण आहे?